प्रिय वाचक -


आज माझे वडिल कै. श्री. रघुवीर सामंत यांचा पंचविसावा स्मृतिदिन.

आज त्यांच्या 'उपकारी माणसें' या त्रिखंडात्मक कादंबरीचा तिसरा खंड 'आकाश-गङ्गा' मराठी पुस्तकेच्या संकेतस्थळावर टाकीत आहो.

भाईंची म्हणजे रघुवीर सामंतांची - सर्व पुस्तके पुनःप्रकाशित करण्याचा आमचा मानस आहे. पण त्याआधी त्यांना जवळजवळ ४०-५० वर्षांनी, पुन्हा वाचकांसमोर आणण्यसाठी आम्ही ही पुस्तके संकेतस्थळावर ठेवली आहेत. वाचकांकडून पुरेसा प्रतिसाद असेल मागणी असेल तर ती छापणे ही शक्य आहे. तरी वाचकांनी आपला प्रतिसाद नोंदवावा.

या खंडाचे संगणकलेखन नाशिकचे श्री. सतीश मोरे यांनी केले असून, मुद्रितशोधन (जुन्या पद्धतीने) मी छाया देव हिने केलेले आहे.

- छाया देव, नाशिक.






**पारिजात**
प्रकाशन

# उपकारी माणसें

[ महाराष्ट्र-समाज व त्याच्या भाव-भावना ]
यांचा
प्रदीर्घ चित्रपट

खंड ३ रा.

## आकाश-गङ्गा

पुष्प ८ वे

- रघुवीर सामंत, ठाणे

श्री. धोंडो रघुनाथ तेंडुलकर
यांनी
पारिजात प्रकाशन संस्थे'साठी
प्रसिद्ध केले.
कोल्हापूर, एप्रिल १९४०

- सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन -

कांदबरीची रचना
मार्च ते मे १९३४
लेखनकाल.
खंड १ला-जुलै ते ऑक्टो १९३४
खंड दुसरा व तिसरा
६ मार्च ते २१ एप्रिल १९३५

प्रसिद्धी.
खंड १ला- महाशिवरात्री १८५९
खंड २रा-अंनत चतुर्दशी १८६०
खंड ३रा-पाडवा १८६२

श्री. बा.ना. ठकार,
यांनी
कोल्हापूर येथें श्रीसिद्धेश्वर प्रिंटिंग प्रेसमध्यें
मुद्रीत केलें



महाराष्ट्रीय समाजाच्या गेल्या पाऊणशें वर्षांतील भाव-भावनांचा
यथातथ्य आविष्कार करणारी मराठी वाङ्मयांतील
पहिलीच त्रिखंडात्मक कादंबरी

# उपकारी माणसें

लें० रघुवीर सामंत बी. ए., बी. टी.

खंड १ ला
**प्रवासांतील सोबती**
पृ. सं. २७० डेमी,
साधी १। रु., अँटिक ३। रु.

खंड २ रा
**अभ्रपटल**
पृ. सं. २८० डेमी,
साधी २। रु., अँटिक ३। रु.

खंड ३ रा

## आकाश-गङ्गा

( पृ. सं. २५० डेमी )

साधी २॥ रु. अँटिक ३॥ रु.

दिवसेंदिवस नष्ट होणाऱ्या एकत्र कुटुंबाचा घटक असलेल्या
एका ध्येयवादी भावनाशील तरुण कलावंताचा जीवनवृत्तांत.
अभिनव पण ओळखीचें मनोरंजक विविध वातावरण—
जुन्या नव्या पिढींतील अव्याहत झगडा—
१९३० सालचें राजकीय संक्रमण व
तरुण मनाचीं आंदोलनें.

-: प्रकाशक :-
पारिजात प्रकाशन—७ मॅथ्यू रोड, मुंबई नं. ४.

## श्री. रघुनाथ ज. सामंत बी. ए., बी. टी.

( जन्म ता. २४ डिसेंबर १९०९ )

महाराष्ट्रीय वाचकवर्गास "कुमार रघुवीर" हे १९३० सालीं विशेष परिचित झाले. 'शब्दचित्र' हा नवीन वाङ्मय प्रकार मराठींत त्यांनींच विशेष रूढ केला. १९३२ सालीं त्यांनीं "हृदय" हा आपला शब्दचित्रें व लघुकथा यांचा संग्रह प्रसिद्ध केला. यांतील अनेक चित्रें शालोपयोगी पुस्तकांतूनहि आलेलीं आहेत. १९३३ सालीं डिसेंबर पासून त्यांनीं आपलें "पारिजात" मासिक सुरू केलें व तें थोड्याच महिन्यांत आपल्या गुणांनीं रसिकप्रिय झालें; पण शेवटीं अल्पजीवी ठरलें. १९३४ सालीं "वाळूंतील पाऊलें" हा विविधता व कलात्मक यांनीं नटलेला दुसरा लघुकथासंग्रह प्रसिद्ध झाला. १९३५ डिसेंबरमध्यें प्रसिद्ध झालेलें "सुरंगीची वेणी" हें रूपांतरित पुस्तकहि वाचकवर्गाला प्रिय असेंच ठरलें.

१९३५ सालीं त्यांचें "पारिजात" मासिक बंद झाल्यावर दोनतीन वर्षें त्यांचें स्वतंत्र लिखाण फारसें प्रसिद्ध झालें नाहीं. १९३९ सालीं 'पणत्या' हा लघुनिबंधसंग्रह व "आजचीं गाणीं" या नांवाचीं सांघिक गीतें हीं त्यांचीं दोन पुस्तकें प्रसिद्ध झालीं व तींहि महाराष्ट्रास आवडलीं.

आज हा "उपकारी माणसें" या त्रिखंडात्मक कादंबरीचा तिसरा खंड "आकाश-गङ्गा" प्रसिद्ध होत आहे. पहिला खंड "प्रवासांतील सोबती" व दुसरा खंड "अभ्रपटल" हे १९३८ सालीं प्रसिद्ध झाले. प्रस्तुत कादंबरी १९३६ मध्येंच लिहून तयार झाली होती.

ही प्रदीर्घ कथा महाराष्ट्रसमाजाच्या पार्श्वभूमीवर व्यापक स्वरूपांत चित्रित केली असल्यामुळें तिला मराठी वाङ्मयांत अभिनव व महत्त्वाचें स्थान आहे. यांतील विविधता, जिव्हाळा, परिचित भावभावनांचा आविष्कार, व्यापकता महाराष्ट्रांतील प्रत्येक रसिक वाचकास चटका लावल्यावांचून रहाणार नाहींत. प्रा. वा. म. जोशी यांच्यासारख्या विद्वान् टीकाकारानें "महाराष्ट्राच्या आधुनिक वाङ्मयीन कालखंडांतील ही अभिनव सामाजिक कादंबरी तिच्या अंगच्या अनेक गुणांमुळें फार वरचें व मानाचें स्थान पटकावील" अशा सारखा "मुंबई आकाशवाणींतून" निर्वाळा दिला आहे.

गेल्या जानेवारी १९४० पासून त्यांनीं "ज्योति" नांवाच्या मासिकाच्या द्वारें वाङ्मयसेवा सुरू केली आहे.

श्री. रघुवीर सामंत याच्या लेखनाचे विशेष म्हणजे मूलगामी पण कलात्मक दृष्टि, साधी सुटसुटीत ओघवती भाषा, व व्यापक मानवी भावनांचा पाया असे थोडक्यांत सांगतां येतील. प्रकाशक (—पाडवा १८६२)

प्रकाशक.— पारिजात प्रकाशन— ७ मॅथ्यूरोड, मुंबई नं. ४




## श्री. रघुवीर सामंत

### यांचीं पुस्तकें.

**हृदय**—शब्दचित्रें व लघुकथा यांच्या या संग्रहांत महाराष्ट्रांतील दलितवर्गींतील व्यक्तींचीं हुबेहूब कलात्मक अशीं मार्मिक शब्दचित्रें प्रत्येक पानावर सांपडतील. शब्दचित्र हा अभिनव प्रकार या पुस्तकापासून प्रामुख्यानें रूढ झाला आहे. त्यामुळें अभ्यासू वाचकाला हें पुस्तक संग्रणीय वाटेल. पृ. सं. २५० **किंमत १ रु.**

**वाळूंतील पाउलें**—हा लघुकथासंग्रह विविधता, कलात्मकता, भावनाविष्कार या सर्व गुणांनीं सुंदर झाला आहे. पृ. सं. १७५ **किंमत १। रु.**

**सुरंगीची वेणी**—रशियन लेखक रॅमेनॉव्ह याच्या "Without Cherry Blossom" या पुस्तकांतील निवडक लघुकथांचें हें रूपांतर इतकें सुंदर झालें आहे कीं मराठी रूपांतरित वाङ्मयांत याला बरेंच वरचें स्थान दिलें जातें. पृ. सं. १६० **किंमत ८ आणे.**

**आजचीं गाणीं**—महाराष्ट्रांतील पहिलींच सांघिक गीतें. "अक्षुण्ण विषय काव्यरचनेला निवडून त्यांतील सौंदर्य रसिकांच्या दृष्टीला आणून दिल्याबद्दल श्री. सामंत यांचे जितकें कौतुक करावें तितकेंच त्या विषयासंबंधीं वाचकांच्या मनांत प्रक्षोभक विचार निर्माण करण्याच्या त्यांच्या लेखणीच्या सामर्थ्याबद्दलहि त्यांचें अभिनंदन करायला हवें" (विविधवृत्त) पृ. सं. १२४ **किंमत ९ आणे.**

**या संग्रहांतील "हुदशार" "व्हाडिवाल्या" "डोलकाठी" या गीतांच्या "हिज मास्टर्स व्हॉइस" तर्फे रेकॉर्ड्सहि तयार झाल्या आहेत.**

**पणत्या**—अभिनव व स्निग्ध भाषेंतील लघुनिबंध. यांत नित्याचेच अनुभव व त्यांतून उत्पन्न झालेलीं वातचक्रें यांचें दिग्दर्शन उत्कृष्ट रीतीनें केलें आहे. यांतील बहुतेक लेख अप्रसिद्धच आहेत. लेखकाची लघुनिबंध लिहिण्याची अगदीं घरगुती स्नेहाळ धाटणी रसिकांना खात्रीनें प्रिय होईल. पृ. सं. १०५ **किंमत १५ आणे.**

**आगामी** { **तारांगण**— ( चिमुकल्या चांदण्यांचा संग्रह )
**तांडा**— ( लघुकथासंग्रह )

**—पारिजात प्रकाशन, ७ मॅथ्यूरोड, मुंबई नं. ४.—**

श्री. रघुवीर सामंत बी. ए., बी. टी.

यां चीं

## पु स्त कें

प्रकाशित—

१ हृदय ( लघुकथा व शब्दचित्रें )
२ वाळूंतील पाउलें ( लघुकथा )
३ सुरंगीची वेणी ( रूपांतरित लघुकथा )
४ प्रवासांतील सोबती ( कादंबरी )
५ अभ्र–पटल ( कादंबरी )
६ आजचीं गाणीं–१ ( कविता )
७ पणत्या ( लघुनिबंध )
८ आकाश–गङ्गा ( कादंबरी )

कल्पित—

९ तारांगण ( चिमकुल्या चांदण्यांचा संग्रह )
१० तांडा ( लघुकथा )

### ❀ शालोपयोगी पुस्तकें ❀

छपाईस तयार--

१ वानग्या ( पूर्वार्ध ) : ( हायस्कूलसाठीं स्थूलवाचन )
२ वानग्या ( उत्तरार्ध ) : ( हायस्कूलसाठीं स्थूलवाचन )
३ ' मी लेखक होणार !— '
( इंग्रजी १ ते ६ वर्गासाठीं मराठी निबंध–मार्ग–दर्शिका )



प्रियतम सौ. स्नेहल सामंत
प्रदेयागमा
इजला—

# उपकारी माणसें

## खंड ३ रा.

## आकाश - गङ्गा

: ७११ :

सारीं घरीं येतात तों सगळीकडे अगदीं सामसूम होतें! तेंच पूर्वीचें घर; पण त्यावर एक प्रकारची कसली तरी काळी छाया पसरली आहे असेंच जणूं अरुणला वाटलें.

दारांतील मंद मंद पेटणारी समई अगदींच भयाण दिसत होती!..

सर्वांनीं गप्प गप्प अंघोळी केल्या, अरुणनें अंग पुसून एकदां घरांत चौफेर खिन्न नजर टाकली; त्याला अगदीं चुकल्या चुकल्यासारखेंच वाटत होतें.

शेवटीं सावकाशपणें पावलें टाकीत तो बाबांच्या खोलींत गेला. ती अगदीं ओकीओकी दिसत होती. दुधाची वाटी... जवळच पेटती लुकलुक हलणारी पणती व त्याच्यावरील टोपलींतून वरवर खुंटीपर्यंत चढून खिडकींतून बाहेर डोकावणारें आणि सूं सूं करणाऱ्या बाहेरील अफाट वायूशीं सख्य करून, जणूं त्याच्याकडे पहातच हलणारें, सूत! अगदीं दुःखी मनानें त्यानें त्या सुताबरोबर वांकडी तिकडी दृष्टी फिरवीत खिडकीबाहेर पाहिलें व पुन्हां बाबांशिवाय ओसाड दिसणाऱ्या त्या खोलींत एकदां नजर फिरविली. आपली दृष्टि तशी फिरवितां फिरवितां त्याचे डोळे पाण्यानें भरून आले. अगदीं उचंबळून आलेला एक हुंदका त्यानें हळूच आंत दडपला.

कांहीं एक न बोलता तो तसाच दिवणखान्यांत आला. जानकीकाकू, कमळामावशी, सुनीति, शरद् वगैरे मंडळी एका कोपऱ्यांत बसली होती व अजूनहि मधूनच कांहीं कुजबुजून हळूहळू अश्रू ढाळीत होती. त्यांच्याकडे त्यानें एकदां सुन्न मनानें पाहिलें व तो बाहेर ग्यालरींत जाऊन उभा राहिला.

: ७१२ :

त्याचे अस्ताव्यस्त झालेले केंस व दाढी त्याच्या दुःखी मनस्थितीमुळें जास्तच चमत्कारिक व उग्र दिसत होती. पहाटेच्या वाऱ्याच्या झुळकेमुळें दोन्ही हळू हळू हलूं लागत. तो तसाच बेफिकीरपणें इकडे तिकडे येरझारा घाली... कितीतरी वेळ असेंच चाललें होतें.

शेवटीं अश्रू भरलेल्या नेत्रांनी मुरारी तिकडे आला व म्हणाला, ‘‘दादा, चला जेवायला!’’

त्यानें एकदां त्याच्याकडे खिन्न दृष्टिक्षेप टाकला व त्याला म्हटलें, ''मला इच्छा नाहीं रे! तुम्ही जेवा जा!''

मुरारी त्याच्याकडे थोड्या केविलवाण्या मुद्रेनें पहात उभा राहिला; पण मग तो कांहीं एक न बोलतां आला तसाच निघून गेला.

एकाकी अरुण, अश्रू पुशीत, पुन्हां येरझारा घालूं लागला. गेल्या चारपांच दिवसांतील साऱ्या धांवत्या वेगवान् घटना व बाबांचा शेवटीं घडून आलेला अकल्पित मृत्यू.. त्याला तर सारें अगदीं स्वप्नवत्च वाटत होतें!..

''कायरेऽ? चल ना अरुण...'' थोड्या वेळानें कमळामावशीच असें कांही अडखळत बोलत, त्याच्याजवळ उभी असलेली त्याला दिसली.

'अंऽ?' अरुण आपल्या त्या तंद्रीतून एकदम धडपडून जागा झाला; आणि तिजकडे कावराबावरा पाहूं लागला.

अरुणची भांबावलेली मनःस्थिति पाहून कमळामावशीचेहि डोळे पाण्यानें भरले होते. ती कांहीं एक न बोलतां, त्याच्याजवळ आली व त्याच्या पाठीवर हळूच आपला हात ठेऊन, त्याला आपल्याबरोबर चालवीत चालवीत ती स्वयंपाकघराकडे येऊं लागली.

अरुणनें तिजकडे एकदां उग्याउग्याच आपली अश्रूपूर्ण दृष्टि रोंखली व तो अगदीं हतबलपणें तिजबरोबर आपलीं पावलें टाकूं लागला.

: ७१३ :

**कांहीं दिवसांनंतरची गोष्ट!** -

व्हिक्टोरियामधून वसंतामागून अरुण खालीं उतरला. अगदीं विषण्ण चित्तानें त्यानें आपल्या गौरवर्ण चेहऱ्यावरून आपला हात फिरविला. त्याला भव्यपणा आणणारी त्याची दाढीमिशी आज तेथें नव्हती.

त्यामुळें त्याच्या खिन्न मनाला पुन्हां पटकन् बाबांची आठवण झाली आणि फाटकांतून आंत शिरतां शिरतां त्यानें समोर दिसणाऱ्या आपल्या बाबांच्या घराकडे पाहिलें.

जगाची नश्वरता,... मानवी धडपडींचा फोलपणा,... असल्याच भयाण व निराश विचारांनीं त्याचें मन, गेले कित्येक दिवस व्यापलें होतें आणि त्यामुळेंच तो अगदीं वेड्यासारखा झाला होता.

तिसऱ्या दिवशीं बाबांच्या अस्थि व अश्मा जिन्याजवळ टांगतानां त्याला त्याचें मनच टांगल्याप्रमाणें वाटलें होतें व तो बधिर मनानें जिना चढून वर आला होता.



: ७१४ :

त्यानंतर, आठवडाभर तो अगदीं भानावरच नव्हता! यांत्रिकपणें सारी दिनचर्या पार पाडावी, तेच तेच मागील आयुष्यांतील विचार मनांत घाळवावे,... असें चाललें होतें...

एके दिवशीं आगाऊ ठरल्याप्रमाणें, वसंत आला. त्याच्याबरोबर तो बाबांचे शेवटचे अवशेष घेऊन नाशकास जाणार होता.

तेथील सारे धार्मिक विधी करतांना, अरुणचें मन त्यांत जरादेखील नव्हतें. लोभी भटांची बडबड, अगदीं मन घट्ट करून, त्यानें सहन केली होती. ते सांगतील तसें सगळें करीत, सारें एकदां केव्हां उरकतें याची तो वाटच पहात होता!

नाहीं म्हणावयास एकदांच काय तो त्याच्या मनावरचा ताबा सुटला होता. भटांनीं तेराव्याच्या जेवणावगैरेचा समारंभ चालविला होता. गुळाचाच गणपती व गुळाचाच नैवेद्य अशासारखें त्या समारंभाचें सारें स्वरूप होतें. पण पिंडाला कावळा शिवण्याची वाट पाहाण्यास भटजींनीं अरुणला सांगितलें होतें. आणि त्याप्रमाणें तो वाट पहात होता...

पण कां कोणास ठाऊक... तीं दोनतीन मिनिटें मात्र त्याची छाती धडधडत होती. आणि शेवटीं एकदां एक कावळा येऊन त्या बलीला शिवला हें पहातांच त्याच्या अंगावर रोमांच व डोळ्यांत अश्रू उभे राहिले होते.

: ७१५ :

रीतीला अनुसरून होणारे तेथले सारे सोहाळे एकदांचे उरकून त्यानें परतण्यासाठीं वसंताबरोबर गाडींत पुन्हां पाय टाकला... तेव्हां त्याला किती हायसें वाटलें होतें!... त्या वेळीं त्यानें समाधानानें सोडलेल्या सुस्काऱ्यांत, तोंपर्यंत त्यानें दडपलेल्या किती भावना होत्या तें त्याचें त्यालाच ठाऊक!..

आणि म्हणूनच आतां त्यानें फाटकांतून आंत पाऊल टाकतांना आपल्या घराकडे दृष्टि टाकली त्या वेळीं त्याला तीच नश्वरतेची कल्पना पुन्हां जाचूं लागली.

त्यावरून घर बांधतांना केवळ मौज म्हणून इमारतीच्या पायामध्यें घातलेली सीलबंद बाटली व त्यांत भावी संशोधकांना लिहिलेला मजकूर त्याला एकाएकीं पटकन् आठवला!

त्या प्रसंगाच्या आठवणीनें, त्या मनःस्थितींतहि अरुण हळूच हंसला!.

आपल्याशीं असेच विचार करीत, तो जिना चढून वर येतो, तों त्याला दारांतच रडण्याचा आवाज ऐकूं आला!

म्हणून तो समोर पहातो, तों जानकीकाकूंची चुलती, डोळ्याला पदर लावून ओक्साबोक्सी रडत, त्याच्यासमोर उभी!...

: ७१६ :

''आपल्या हातची आहे का हो ती गोष्ट, अरुण...ऽऽ? येईल त्या प्रसंगाला तोंड दिलं पाहिजे!... आमच्या शरद्च्या आईला किती दुःख झालं असेल!.. त्या तिघांना तुमच्याशिवाय आतां कोण आहे बरं?..'' ती स्फुंदून स्फुंदून रडत होती व मधूनच तुटक तुटक वाक्यें बोलत होती.

तिच्याविषयीं अरुणचा चांगला ग्रह कधींच झाला नव्हता. जरा सुद्धां सहानभूति वाटत नव्हती त्याला... आतांपर्यंत ती त्याच्याशीं कधींच विशेष प्रेमानें बोलत नव्हती.

पण आज... तो आंत शिरतो तोंच सुरू झालेला तिचा हा शोक?... त्यांत दांभिकपणाच जास्त असावा असें अरुणला लागलीच वाटल्याशिवाय राहिलें नाहीं मात्र!...

वास्तविक त्याला त्या वेळीं कांहीं वेळ तरी पूर्ण शांतता पाहिजे होती. ती सांगत होती त्या साऱ्या गोष्टी त्यालाहि समजत होत्या. त्यांची उजळणी तर त्याला मुळींच नको होती!... आणि विशेषतः, तिच्या त्या शोकामागील कोरडा झरा अरुणला प्रतीत झाल्यामुळें तर तो थोडा खिन्न चेहरा करून नुसतें 'हूं' म्हणाला व कपडे काढण्यास निघून गेला.

कपडे काढून, जणूं काय बाबा तेथें आहेतच, अशा समजुतीनें, त्यानें एकदां त्यांच्या खोलींत डोकावून पाहिलें. त्यांची कॉट, त्यावरील बिछाना व मच्छरदाणी तशीच तेथें होती. पण ते स्वतः मात्र आतां तेथें दिसत नव्हते! ते आतां पुढेंहि कधींच दिसणार नाहींत, या कल्पनेनें त्यानें एक सुस्कारा सोडला व तो पुन्हां हॉलमध्यें आला.

: ७१७ :

पहातो, तों जानकीकाकूंच्या चुलतीचा भाचा - प्रो. बाळकृष्ण तेथेंच एका कोपऱ्यांत, गंभीर चेहऱ्यानें, उघडेच, इकडे तिकडे येरझारा घालीत आहेत. अर्थात् ती त्यांची नेहमींचीच पद्धत होती.

त्यांना पाहून खिन्न चेहऱ्यानें अरुणनें मामुली प्रश्न केला, ''तुम्ही केव्हां आलां?...''

''शरदचं पत्र गेलं...'' ते चालतां चालतां थबकून म्हणाले. ...''मामी लागलीच म्हणाल्या - 'चला!'... मिळत नव्हती; पण बरीच खटपट करून पांच दिवसांची रजा काढून आलो... तुम्ही येथून नाशकाला निघून गेलांत त्याच दिवशीं रात्रीं...''

त्यांच्या शब्दांत गांभीर्य होतें. त्यांच्या दृष्टींत थोडीफार खिन्नता होती.

मघांच्या दांभिक शोकप्रदर्शनापेक्षां, अरुणच्या मनाला या त्यांच्या सरळ उत्तरामुळें थोडें तरी समाधान वाटल्यावांचून राहिलें नाहीं. पण तरी हा एकमार्गी प्रोफेसर आपली नोकरी थोडा वेळ बाजूस सारून नागपुराहून धांवत येण्यासाठीं असली धडपड कशी करूं शकला व आपल्या बायकोला - त्यांच्या 'मामीं'च्या मुलीला - त्यानें तेथेंच एकटी कशी सोडली, हा विचार अरुणच्या मनांत



डोकवल्यावांचून राहिला नाहीं.

इतक्यांत प्रो. बाळकृष्ण पुन्हां आपल्या पद्धतीप्रमाणें इंग्रजींत एकदम म्हणाले, ''आमच्या शरद्चं आणि त्याच्या आईचं दुर्दैवच म्हणायचं!...''

अरुण दचकला. ते शब्द प्रोफेसर कदाचित् सहजच बोलले असतील; पण त्यांना फक्त त्यांच्या शरद्चें व त्याच्या आईचें दुर्दैव दिसावें हें त्याच्या मनाला लागल्यावांचून राहिलें नाहीं. त्याच परिस्थितींत आपण आहों याची आठवणहि यांना कां होऊं नये हें त्याला कांहीं केल्या समजेना...

तो कांहींच न बोलतां ग्यालरीकडे वळला -

: ७१८ :

जेवणहि मुकाट्यामुकाट्यानेंच झालें. मुरारी अश्रुभरित नेत्रांनी अरुणकडे मधून मधून पहात होता. जानकीकाकूंचें कुंकुम विरहित कपाळ पाहून अरुणला थरथरल्यासारखें झालें. त्यानें हळूच आपल्या धोतरानें नाक पुसलें व दोन घांस खाऊन तो शेवटीं बाहेर आला.

'बाबांचं आयुष्य किती चमत्कारिकपणं संपलं! आणि आपण तर त्यांच्या आयुष्यांत कशा तऱ्हेनं वागलों!! आपल्या दुःखामुळंच त्यांना लौकर मृत्यू आला व त्यांच्या एकंदर दुःखास आपणच कारण झालों.' अशा तऱ्हेची विचारमालिका त्याच्या मनांत पुन्हां पुन्हां डोकावत होती - आणि ग्यालरींत तो खालीं मान घालून एकटाच फिरत होता.

इतक्यांत कमळामावशी व वसंत दोघेंहि त्याच्याजवळ येऊन उभीं राहिलीं. ''झोपायला चल. त्या खोलींत आपले बिछाने घातले आहेत!'' कमळामावशी व वसंत दोघें म्हणालीं. अरुणहि कांहीं न बोलतां त्यांच्याबरोबर तिकडे जाऊन बिछान्यावर लवंडला.

: ७१९ :

थोडा वेळ तिघेंहि गप्प गप्पच पडलीं होतीं.

शेवटीं कमळामावशी म्हणाली, 'अरुण, आतां पुढली व्यवस्था?''

त्या शब्दांनीं अरुण एकदम दचकला व तिजकडे वळून म्हणाला, ''काय? पुढली व्यवस्था? कसली पुढली व्यवस्था गं? तुमचे काय विधी असतात ते तर सर्व संपले ना गं मावशी आतां?... का अजूनहि माझ्या मनाला थोडी शांतता मिळूं नये असं तुम्हां सर्वांचं म्हणणं आहे?''

कमळामावशीला त्याच्या त्या हतबल उद्गारांचें वाईट वाटलें. तिनें त्याच्या पाठीवर आपला कांपरा हात ठेवला व म्हटलें, ''असं काय बरं करावं, अरुण? त्रागा करून रे कसं चालेल?... साऱ्या गोष्टींना तोंड हें दिलंच पाहिजे, बाळ.''

अरुणला पुन्हां तिच्या या शब्दांनी थोडा विरंगुळा वाटला. तो तिच्या बाजूस कुशीवर वळून

हळुवारपणें, शांत स्वरांत म्हणाला, ''आतां काय करायचं राहिलं आहे, मावशी? सांग!...''

''अरे, बाबांचं मृत्युपत्र. ... तें वाचलं पाहिजे नाहीं का?'' कमळामावशी शांतपणें उत्तरली.

: ७२० :

अरुण पुन्हां एकदां दचकला. त्याला वाटलें, ही मंडळी या गोष्टीची एवढी घाई कां करीत आहेत?

विशेषतः, कमळामावशी हें सुचवीत असलेली पाहून तर त्याला आश्चर्यच वाटलें. आणि तो म्हणाला, ''मावशी, हें गं काय?... तें सावकाश केलं तर नाहीं चालणार?... आजच कशाला इतकी त्याची घाई?...''

कमळामावशी थोडा वेळ गप्प बसली, आणि मग म्हणाली, ''अरुण, मला माहित आहे तुला काय वाटत असेल तें?... पण बाळ, ती तुझी एकट्याचीच का बाब आहे? त्यावर आणखीहि पुष्कळांचा अधिकार आहे!... तुला माहीत आहे का?... काकूंची चुलती आल्यापासून गेले दोन तीन दिवस काय म्हणत आहे हळू हळू तें?... 'तुमचे अरुण काय? ते आपले मोठे आहेत. पण आम्हांला आपली शरद्‌ची काळजी!... त्याचं आणि त्याच्या आईचं बाबासाहेबांनीं काय केलं असेल कुणास ठाऊक? तें एकदां समजलं असतं म्हणजे आम्हांला आपलं जायला बरं. ...आतां बाळकृष्णाला तरी रजा कुठं आहे जास्त? आम्हांला उद्या तरी गेलंच पाहिजे परत. ... नाहीं कांहो, कमळामावशी?' ती आजच जरा वाईट चेहरा करून सारं तुझ्यापर्यंत पोहोंचावं म्हणून मला म्हणाली. म्हणून म्हणते अरुण! बाळा, तुला दुःख होत असेल - पण तें कर्तव्य म्हणून तरी सारं करायला पाहिजेच ना तुला?...''

: ७२१ :

अरुण कांहींच बोलला नाहीं. त्या मंडळींच्या क्षुद्र बुद्धीमुळें त्याला दुःख होऊन त्याच्या डोळ्यांत अश्रू सांचले व संध्याकाळीं घरांत शिरतांच काकूंच्या चुलतीचा जणूं सामोरा आलेला तो दांभिक शोक त्याला आठवला!

पण मग त्याला वाटलें, स्वतः काकूंचें काय म्हणणें असेल त्याविषयीं? -

म्हणून त्यानें मावशीला पुन्हां धीर करून विचारलें, ''काकू काय म्हणाली गं त्यावर?''

''ती रे काय बोलणार?... कांहींच बोलली नाहीं ती!... न बोलतांहि पुष्कळ गोष्टी सुचविण्याची तिची पद्धतीच आहे...'' कमळामावशी खिन्न स्वरांत म्हणाली.

''मला वाटतं, अरुण, उद्यां सकाळींच आपलं बाबांचं मृत्युपत्र तूं सर्वांसमक्ष सविस्तर वाचावंस हें चांगलं. ...'' वसंत इतका वेळ गप्प पडून दोघांचें बोलणें ऐकत होता, तो एकदम म्हणाला.

तरी अरुण बराच वेळ त्यावर कांहीं एक बोलला नाहीं. खोलींत पुन्हां सारी शांतता होती.

''मग काय, अरुण?'' कमळामावशी पुन्हां त्याला प्रश्नार्थक म्हणाली.



''बरं आहे, मावशी!... तुम्ही म्हणतांच तर...'' अरुण दुसऱ्या कुशीवर झोंपण्यासाठीं वळत वाक्य अर्धवट टाकीत म्हणाला.

: ७२२ :

बाबांसारखा मनुष्य कोणाचें अकल्याण करणार? असें स्पष्ट दिसत असतांहि लांबून आपल्या माणसांच्या हितासाठीं धडपडत आलेलीं हीं उपकारी माणसें, असली घाई करून आपली क्षुद्र बुद्धीच प्रकट करीत आहेत; काकूहि त्याला मौन धरून एक प्रकारें संमतीच देत आहे, असें वाटून अरुणला मनस्वी दुःख होई. तरी तें सारें आंतल्या आंत दाबून सकाळीं चहानंतर सर्वांदेखत त्यांचें मृत्युपत्र वाचावयाचेंच असें त्यानें रात्रभर तळमळून शेवटीं ठरविलें होतें! -

चहा घेतां घेतां, काकूची चुलती हळूच दारांतून बाहेर डोकावून आपल्या जांवयाला उद्देशून म्हणाली, ''हें पहा, आपल्याला आज दुपारीं जायचं असेल ना?... रजा आहे कुठं जास्त?... अरुणांना सांगितलंत का जाणार तें?...''

''हो, अरुण! आम्ही जाणार आज दुपारीं नागपुरास परत...'' चहा पितां पितां एकदां आंत व एकदां अरुणकडे पहात प्रोफेसर म्हणाले. ''आपलीं माणसं म्हणून धांवत आलों खरं,... पण नोकरी सोडून आणखी कसं रहातां येणार?''

दोघांच्याहि शब्दांतील सूचकता न समजण्याइतका अरुण कांहीं बुद्धिहीन नव्हता.

त्याने एकदां खिन्न दृष्टीनें आंत पाहिलें. जानकीकाकूहि आपल्या चुलतीजवळ उभी राहून बाहेर पहात होती.

शेवटी अरुणनें आपल्या डोळ्यांच्या ओल्या झालेल्या कडा हळूच पुसून कोरडेपणें म्हटलें, ''आलांत, फार बरं केलंत!.. आज दुपारीं जाणार म्हणतां? ठीक!...''

पण मग त्याला एकदम पुढें कांहींच म्हणवेना. त्यानें कमळामावशीकडे अगदीं केविलवाण्या दृष्टीनें पाहिलें व मग धीर करून म्हटलें, ''आपण आतांच बाबांचं मृत्युपत्र काय असेल तें वाचूं या! - अनायासं सारी मंडळी जमलीच आहेत, मग मागाहून उगीच आणखी कांहीं किल्मिष मनांत रहायला नको कुणाच्या!....''

काकूंच्या चुलतीनें एकदां आपल्या पुतणीकडे पाहिलें. ती कांहींच बोलली नाहीं.

वसंत, कमळामावशी, अरविंद, सुनीति, शरद्... सारी मंडळी आळीपाळीनें एकमेकांकडे व अरुणकडे पहात होतीं.

इतक्यांत अरुणच शेवटीं म्हणाला, ''काकू, कपाटाच्या चाव्या कुणाकडे आहेत?... द्या पाहूं! - ''

: ७२३ :

"त्या दिवशीं बाबांचं बँकबुक आंत ठेवून मी चाव्या काकूंकडे दिल्या." वसंत अरुणकडे पाहून म्हणाला.

"हो, त्या मी माझ्या भिंतींतील फडताळांत ठेवल्या आहेत!..." काकू तिकडे वळून हात करीत म्हणाली.

इतक्यांत तिची चुलती हात पुढें करून म्हणाली, "हो, या बघ गं; काल कसल्या तें मला समजेना म्हणून मी माझ्याजवळच ठेवल्या!"

जानकीकाकू, अरुण, कमळामावशी, सारी मंडळी एकदम चपापली! - पण शेवटीं कोणीच कांहीं बोललें नाहीं.

अरुण जागेवरून उठला व त्यानें काकूच्या चुलतीकडून चाव्यांचा घोस आपल्या हातीं घेतला... अगदीं विषण्ण अंतःकरणानें अरुणनें कपाट उघडलें व इकडे तिकडे शोधक नजर फिरविली... शेवटीं, दोन तीन खण उघडल्यावर एका खणांत एक मोठें पुडकें त्याच्या हाताला लागलें.

तें त्यानें बाहेर काढलें व तो पुन्हां राउंड टेबलाजवळील खुर्चीवर येऊन बसला. त्यानें त्या बांधलेल्या पुडक्याकडे पाहिलें, तों त्यावर बाबांच्या हस्ताक्षराची एक लहानशी चिठी होती.

त्यांतील मजकूर मनांतल्या मनांत वाचतां वाचतां, अरुणचे डोळे पाण्यानें भरून येत होते. त्यानें मुकाट्यानेंच ती चिठी जवळ बसलेल्या अरविंदकडे दिली व जरा जड आवाजांत, हुंदका दाबून तो म्हणाला, "मोठ्यानं वाच पाहूं अरविंद, जरा...!"

साऱ्यांकडे व अरुणकडे एकदां पाहून त्या चिठींतील मजकूर अरविंद वाचूं लागला...

"या पुडक्यांत माझीं सारीं महत्त्वाची कागदपत्रें आहेत. पहिलेंच आहे तें माझें मृत्युपत्र! त्यांत इतर कागदपत्रांविषयी शेवटीं सगळी माहिती सांपडेल. माझ्या मृत्यूनंतर, चि. अरुणला योग्या वाटेल त्या वेळीं, त्यानें माझ्या साऱ्या माणसांना जवळ बोलावून, त्यांच्या देखतच ह्या मृत्युपत्राचें सील उघडावें व तें वाचून दाखवावें.

अरुणला वाटल्यास त्यानें आणखी कोणाला बोलवावें; पण माझीं माणसें असें मी जें येथें वर म्हटलें, त्या बाबतींत मी मुग्ध रहात नाहीं. थोडा विचार करून फक्त खालील माणसांना उद्देशूनच हें लिहिलें आहे... अरुण, शरद्, माझी बायको, सौ. कमळी, वसंत, अरविंद, सौ. सुनीति, मुरारी, काठ्या,...

**- बाबा ठाकूर"**

: ७२४ :

अरुणला एकदम आलेला हुंदका आवरेना. त्यानें काकूंच्या चुलतीकडे व प्रोफेसरांकडे एकदां एक कोरडा दृष्टिक्षेप टाकला व मग आंत स्वयंपाकघराकडे पाहून जड आवाजानें प्रेमळ हांक मारली. "अरे, मुरारी, ए मुरारी ऽ... इकडे ये पाहूं ..."

मुरारी चहाचीं भांडीं विसळीत होता; तीं तशींच तेथल्यातेथें टाकून तो बाहेर आला. त्याच्याकडे स्नेहपूर्वक दृष्टि फिरवीत अरुण म्हणाला, "अरे, काय करतो आहेस तूं?... आधीं... काठ्याला बोलावून आण व तूंहि परत इकडे ये!...

"बरंऽ, दादा!" असें म्हणून मुरारी मागें वळला.

इतक्यांत जानकीकाकूच एकदम म्हणाली, "त्या दोघांना रे कशाला अरुण, इथं बोलवायचं?... त्यांचा या आपल्या खाजगी बाबतींत काय संबंध आहे?..."

त्या तसल्या मनःस्थितींतहि काकूंच्या श्रेष्ठतेविषयींच्या त्या मूर्ख कल्पनेचा अरुणला राग आला; आणि त्यानें थोड्या रागानेंच तिच्याकडे पाहून करड्या आवाजांत म्हटलें, "हें पहा काकू, या सोबतच्या बाबांच्या चिठींत उल्लेख केलेल्या माणसांपेक्षां जास्त इथं कोणी हजर रहाण्यास फारतर माझी कांहीं हरकत नाहीं; पण मुरारी व काठ्या हे तुमचे नोकर असले तरी त्यांनाहि बोलावणं माझं कर्तव्य आहे. बाबांची तशी शेवटीची अगदीं स्पष्ट इच्छा दिसते आहे!"

: ७२५ :

दिवाणखान्यांत शिरतानां, मुरारी व काठ्या, दोघांचेहि डोळे पाण्यानें भरले होते. ते दबकत दबकतच आंत शिरले. तसे येतांना त्यांची चलबिचल पाहून, अरुण त्यांना प्रेमळ शब्दांत म्हणाला, "यारे, या. ... तुम्हांला बाबांनींच बोलवायला सांगितलं आहे! हं - बसा तिथं!" -

ते दोघेहि, आपले डोळे पुसत पुसत, दाराजवळ जमिनीवरच बसल्यानंतर अरुणनें तें मृत्युपत्र उचललें व थरथरत्या हातानें त्यानें त्याचें सील फोडलें.

पण घडी उघडून हातीं घेतल्यावर, बराच वेळ झाला तरी त्याला तें अगदीं मोठ्यानें वाचवेचना!

तेव्हां अरविंद खिन्न अंतःकरणानें त्याला धीर देण्यासाठीं म्हणाला, "कायरे अरुण, वाच ना -"

पण तरीहि अरुण थोडा वेळ कांहींच बोलला नाहीं. तो आपला आवंढा गिळून हुंदका आवरण्याचाच सारखा प्रयत्न करीत होता. ....

शेवटीं न बोलतांच त्यानें तें अरविंदच्या हातीं दिलें व क्षणभरानें त्याला थोपटीत, त्यानें मृत्युपत्र आपल्या हातीं घेऊन उघडलें व सर्वांकडे एकदां सूचक दृष्टि फिरवीत, तो तें मोठ्यानें - हळू - हळू - वाचूं लागला -

## श्री. जनार्दन केशव ठाकूर, एम्. ए. एलूएल्. बी. यांचे खाजगी मृत्युपत्र

**- माझें मृत्युपत्र -**

माझ्या इस्टेटीविषयींच्या माझ्या अंतिम इच्छा, येथें कलमवार व सही साक्षीनिशीं विचारपूर्वक लिहून ठेवीत आहे -

१. मी अगदीं गरिबींतून वर आलो आहे. लहानपणीं तर आम्ही अगदीं भुकेकंगाल! - माधुकऱ्या व लोकांच्या चाकऱ्या प्रयास करून, पहिला नंबर कायम ठेवीत, स्कॉलरशिपा मिळवून, मी विद्यार्जन केलें. सारें केवळ अगदीं स्वतःच्या हिंमतीवर! कोणीच मला कसलीहि मदत केली नाहीं. त्या सुरवातीच्या काळीं, व अत्यंत प्रतिकूल अशा परिस्थितींतहि शक्य तेवढ्या सामान्य माणसाच्या आटोक्यांतील साऱ्या पदव्या हस्तगत केल्या...

आणि त्यानंतर, हळूहळू वाढत जाऊन, शेवटीं, एक सरकारी वरिष्ठ अंमलदार म्हणून माझें सारें आयुष्य मी घालविलें. बुद्धिमत्ता अगर हुशारी, असामान्य नसतांहि, माझी मूळ परिस्थिति व कल्पना, यांहून बऱ्याच वरच्या पदापर्यंत मी चढत गेलों, असेंच मला आतां येथें म्हणावेंसें वाटतें.

तथापि सुरवातीस येथें नमूद करावयास मला अतिशय समाधान होत आहे, कीं, मी स्वतः अगदीं प्रत्येक क्षणाला सदसद्विवेक बुद्धीला जागून, कोणाचाहि अपहार न करतां माझ्या मुलांमाणसांसाठीं आज ठेऊन जात असलेल्या या साऱ्या संपत्तीपैकी, पैन् पै निढळाच्या घामाची व काटकसर करून नेकीनेंच मिळविलेली आहे.

आज मला कोणाचें पैचें देणें नाहीं. ... तसेंच कोणाकडून येणेंहि नाहीं.

२. माझ्या आयुष्याच्या सुरवातीचीं माझीं मोठमोठीं ध्येयें सोडलीं, तर त्यानंतरची माझी पहिली कक्षा माझ्या कुटुंबियांपर्यंत विस्तारलेली होती. पण त्यांतहि मला शेवटीं वाईट अनुभव आला. म्हणूनच आतां माझी मरतांनाची शेवटची लहानगी कक्षा केवळ माझ्या मुलांबाळांपुरतीच आहे.

३. आणि या दृष्टीनेंच, माझी सदर्हू संपत्ति अगदीं वैयक्तिक स्वरूपाची असली, तरी माझ्या साऱ्या आयुष्यांतील जमाखर्चाची ठोकळ कल्पना माझ्या माणसांस देण्यास, मी स्वतःला कांहीं विशेष कारण नसतांनाहि, थोड्याफार प्रमाणांत जबाबदार समजतो.

सुरवातीस माझी मिळकत विशेष मोठी नव्हती; तरी पण हुजूर डेप्युटी कलेक्टर व कांहीं काळ कलेक्टर होतो; त्या सगळ्या काळांत, म्हणजे मधलीं सुमारें बावीस वर्षें, माझें सरासरी वार्षिक उत्पन्न रु. ७००० होते.



**जमा रु. ९९,०००**

त्यांतील माझ्या मुलांबाळांसाठीं व वैयक्तिक माझ्यासाठीं माझ्या पद्धतीप्रमाणें अगदीं काटकसरीनें राहूनहि, मला वार्षिक रु. २५०० खर्च असे. म्हणजे मी पेन्शन घेईपर्यंत, साधारणपणें पाहिल्यास, सुमारें ९९००० रुपये शिल्लक टाकू शकलो.

**खर्च रु. २१०००**

त्यापैकीं, पहिल्या चौदा वर्षांत, माझ्या अंदाजाप्रमाणें, मी वर्षाला १५०० रुपयेप्रमाणें, माझ्या एकत्र कुटुंबांतील व्यक्तींच्या सुखासाठीं खर्च केले; ते सुमारें २१००० रुपये होतात.

**खर्च रु. २३,००० खर्च रु. ३२,०००**

यांशिवाय, मी माझ्या हस्तें भावांच्या मुलांचीं लग्नेंमुंजी झाल्या, त्यासाठीं व त्यांतील कांहींच्या शिक्षणासाठीं, एकंदर सुमारें रु. ५००० खर्च केले. दुसरें, माझी मेहुणी सौ. कमळी, हिचें लग्न, माझ्या दोन मुलांचें शिक्षण व मुंजी, माझ्या तीन मुलींचीं लग्नें, माझीं स्वतःची दोन लग्नें व घरांतील आजार, यांमध्यें मी सुमारें रुपये २३००० खर्च केले. म्हणजे माझ्या पेन्शनच्या सुमारास मजकडे फक्त रु. ५०००० होते. त्यांतूनच, सुमारें ३२००० रु. खर्चून मी माझें हल्लींचे घर बांधलें.

**जमा रु. २८०००**

पण मग, त्याच सुमारास मला सरकारकडून माझ्या पेन्शनमधून रु. २८००० मिळूं शकले.

**जमा रु. ५,०००**

आयुष्यांत एकदांच मला शेअर्स घेण्याची इच्छा झाली. त्यासाठीं माझा वैयक्तिक खर्च अगदीं कमी करून व माझ्या इतर शिलकेंतील कांहीं त्यांत मिळवून, एकंदर सहा हजाराचे, एका देशी कंपनीचे शेअर्स, मी पंधरा वर्षांपूर्वी विकत घेतले. त्यांची किंमत बरीच कमी कमी होत जाऊन शेवटीं मला चिंता वाटत होती पण मागून त्यांचा भाव आतां वाढत आहे; तेव्हां लौकरच ते शेअर्स मी विकणार आहे. निदान त्या रकमेंतील ५००० रुपये तरी परत येतील.

**शेवटी शिल्लक रु. ५१,०००**

हा माझ्या रोख जमाखर्चाच्या मिळकतीचा अंदाजें ठोकळ हिशेब. याबद्दल आणखी तपशील विचारावयास तसा कोणालाच कसलाहि अधिकार नाहीं, हें मला पूर्ण ठाऊक आहे. पण तरीहि येथें जमलेल्या कोणास तसें वाटल्यास त्यानें मी माझ्या स्वतःच्या पद्धतीप्रमाणें तयार केलेल्या हिशेबांच्या साऱ्या वह्या पहाव्यात. (त्या माझ्या कपाटांत उजव्या बाजूच्या अगदीं खालच्या खणांत सांपडतील.)

४. तेव्हां साऱ्या आयुष्यभर कष्ट सोसून, शक्य ती धडपड करून, घरांतील साऱ्यांचें पालन, पोषण, संरक्षण, मदत करून, माझी सारी ठेव ही एवढीच!

मला ठाऊक आहे... माझ्यापेक्षां हजारों पटीनें श्रीमंत लोक या जगांत आहेत. पण त्यांचा मला कधीं हेवा वाटला नव्हता; व आतां शेवटींहि वाटत नाहीं.

मला दुसरेंहि ठाऊक आहे, मजपेक्षां हजारों पटीनें गरीब दुर्दैवी लोक, लाखों ... कितीतरी असतील; पण त्या साऱ्यांबद्दल काळजी करण्याचेंहि मजसारख्या दुबळ्या माणसाच्या अंगीं सामर्थ्य नाहीं!

५. म्हणूनच माझी खालील तपशीलाची सारी मिळकत, प्राधान्यतः फक्त माझ्या मुलांसाठींच, मी ठेवून जात आहे -

**- जमा -**

**रु. ३२०००** (१) माझें रहातें घर रु. ३२००० किंमतीचें.

**रु. ५१०००** (२) सुमारें रु. ५१००० बँकेंत.

**रु. २५०००** (३) रु. ५००० चे चार निरनिराळ्या कंपन्यांचे विमे. बोनस वगैरे धरून एकंदर किंमत सुमारें रु. २५०००.

**रु. ३०००** (४) माझ्या दोन्ही बायकांसाठीं दोन निरनिराळ्या वेळीं केलेले दागिन्यांचे जोड रु. ३००० किंमतीचे. पैकीं माझ्या प्रथम पत्नीचा एक जोड माझ्या कपाटांत आहे. दुसरा, माझ्या सध्यांच्या पत्नीच्याच ताब्यांत आहे. तो तिच्यासाठीं आहे.

**रु. ५००** (५) याशिवाय चि. वसंताच्या शेतालगतच्या माझ्या मालकीचा पंधरा रुपये धाऱ्याचा शेतजमिनीचा एक लहानसा तुकडा - रु. ५०० किंमतीचा.

**रु. २५००** (६) व इतर घरांतील मूल्यवान कपडे वगैरे सामान सुमारें रु. २५०० किंमतीचें (कमीत कमी). त्याची यादी इतरत्र सांपडेल.

एकूण बेरीज रुपये ११४०००

६. यांपैकीं सर्व वस्तू माझ्या पश्चात् माझ्या मुलांना मिळाव्या अशी माझी इच्छा असली, तरी, त्यांची वांटणी कसकशी करावयाची तें मात्र माझें मीच ठरविणार आहे. कायदा म्हणजे काय, तें मला स्वतःला, माझ्या आयुष्यभर मी त्यांतच असल्यामुळें, चांगलें समजतें आणि म्हणूनच कोणत्याहि बाबतींत कसलीहि संदिग्धता न ठेवणें हेंच मला जास्त श्रेयस्कर वाटतें. भाऊबंदकी व धुसपूस यांना मी जरादेखील जागा ठेवणार नाहीं.

माझें कुटुंब, माझ्या पश्चात् एके ठिकाणीं सुखासमाधानानें राहिलें, तर त्यांत मला आनंदच आहे पण तसें न झाल्यास, मी वेड्यासारखा त्यांना तसें रहाण्याचा उपदेश करून, तंटा उपस्थित करावयास



व माझी निढळाच्या घामाची मिळकत कोर्टकचेऱ्यांमध्यें फुकट गमावण्यासच कारण होईन, असें मला वाटतें.

तेव्हां मी माझी मिळकत जशी स्वतः मिळविली तशी आतां स्वतःच वांटणार आहे. न्यायाधीशाचें काम माझें मीच करण्यास मला अधिकार व हक्क आहेत खास, असें येथें जमलेल्यांपैकी कोणालाहि कबूल करावें लागेल!

७. एका घराची दोन भावांत वांटणी करणें व त्यांत भिंतीबंधारे घालून आपल्या हातानें आपल्याच घराचे तुकडे पाडणें, मला मुळींच योग्य वाटत नाहीं. या दृष्टीनें तें कोणा एकालाच देणें भाग आहे. आणि थोडा विचार करून तें मी चि. शरद्च्याच नांवांवर करून ठेवीत आहे. घर अगदीं नवीन आहे हें खरें; पण उत्पन्नाच्या दृष्टीनें जास्त किंमत असली तरी त्याची रोख रकमेशीं बरोबरी कधींच करतां येणार नाहीं. कारण अगदीं उघड आहे. मोड आहे, तोड आहे. म्हणून मी चि. शरद्ला या घराशिवाय आणखी रु. १२,००० देत आहे. घरांत असलेल्या सर्व वस्तूंची मालकी अर्थात्च त्याच्याकडे राहील. (रु. २५००)

**खर्च रु.** ३२,००००, १२,०००, २५००. एकूण बेरीज रु. ४६,५००

८. चि. अरुणला मी केवळ भराऱ्या मारणारा तरुण समजत होतो. परंतु पैशाची किंमत त्यालाहि आतां हळूहळू जगाचा थोडाफार अनुभव घेऊन आल्यावर कळूं लागल्यावांचून रहाणार नाहीं. माझ्या इतर संपत्तीपैकीं मी त्याच्या नांवें चारी विमे व रु. १८,००० रोख ठेवीत आहे.

याशिवाय त्याच्या आईचे सुमारें रु. १५०० चे दागिने माझ्या कपाटांत वरच्या बारक्या खणांत सांपडतील, ते त्याच्या आईची आठवण म्हणून त्यानें स्वतःच्या बायकोस घालावेत.

**खर्च रु.** ४४,५००

९. माझी पत्नी सौ. जानकी, हिची व्यवस्था मला अत्यंत विचारपूर्वक करावी लागत आहे. घरांत सापत्न नातें असल्यावर काय किंवा नसल्यावर काय, मुलापासून आईचें रक्षण करून ठेवण्याची आपली शेवटची जबाबदारी अत्यंत दक्षतेनें व दूरदर्शीपणें विचार करून कर्त्या माणसानें संभाळलीच पाहिजे अशा मताचा मी आहे. नाहीं तर पूर्वीचें आयुष्य नवऱ्याबरोबर त्याच्या हृद्यास साजेल असें घालवूनहि हिंदू विधवांची स्थिति, मुलांच्या बेफिकीरीनें त्यांच्या उत्तर आयुष्यांत, कधीं कधीं अतिशय दुःखाची होते. अशीं उदाहरणें मी प्रत्यक्ष पाहिलीं आहेत. तिचा प्रत्यक्ष मुलगाहि कदाचित् तिला विचारीनासा होतो. पैसा ही जगांतील अशीच चीज आहे. त्या विषाची परीक्षा, मनुष्य प्राण्याच्या भावना व चांगुलपणा यांवर विसंबून, सुज्ञ माणसानें कधींच पाहूं नये! - आणि या दृष्टीनें मी तिच्या बाबतींत असें ठरविलें आहे. -

(१) तिला तिचे दागिने स्त्रीधन म्हणून मालकी हक्कानें दिले आहेत.

(२) पेन्शन फंडांतून तिला दरमहा रु. ३० मिळतील.

(३) तिला तीर्थयात्रेसाठीं वगैरे पाहिजे असल्यास किंवा दुसऱ्या कशासाठींहि रु. १००० मालकी हक्कानें ठेवले आहेत.

(४) याशिवाय तिला तिच्या हयातींत व्याज घेतां येईल अशी रु. ४००० ची रक्कम तिच्या नांवे मी ठेवीत आहे. मात्र तिच्या पश्चात् ती रक्कम दोघां भावांत समसमान वांटली जावी.

(५) एवढें असलें तरी, तिच्या आवडी - नावडीप्रमाणें व इच्छेप्रमाणें ती कोणाएका मुलाकडे अगर एकत्र कुटुंबांत त्याच्या त्याच्या संमतीनें रहाणार असली तर मात्र तिला तोडून दिलेल्या मासिक उत्पन्नाचा निम्मा भाग तरी त्या एका मुलास अगर एकत्र कुटुंबास तिनें द्यावयास पाहिजे.

**खर्च रु.** १५००, १०००, ४०००, एकूण बेरीज रु. ६५००

१०. माझे जांवई, चि. अरविंद नाईक यांच्या बाबतींत माझ्या हातून एक अक्षम्य चूक झाली आहे. ती येथें उघडपणें नमूद केल्यावांचून मला मुळींच रहावत नाहीं!...

माझ्या, आतां चि. शरद्ला दिलेल्या घराचें बांधकाम चालू असतांना चि. सुनीतीबरोबर त्यांचें लग्न झालें नव्हतें. प्रथम कराराबाबत झालेल्या भानगडींत रास्त - म्हणजे माझ्या इच्छेविरुद्ध असली तरी माझ्या घरासाठीं तो खर्च झाला होता या दृष्टीनेंच - ठरत असलेली रक्कम मी त्यांना हट्टानें व रागानें दिली नाहीं.

पण मग त्यांचा व आपला संबंध येऊं शकेल या अपेक्षेनेंच मी त्यांस ती रक्कम दोन दिवसानंतर देऊं केली. त्यांनीं ती अतिशय बाणेदारपणानें नाकारली; याचें मला खरोखरच कौतुक वाटतें. पण तसला गौण प्रकारचा व्यवहार माझ्या हातून तरी व्हावयास नको होता. तरी तसा तो झाला याबद्दल मला त्या वेळीं व त्यानंतरहि अनेक वेळां, तितकाच पश्चात्ताप झाला आहे!

तेव्हां, या वेळीं, माझ्या साऱ्या व्यवहारांची निरवानिरव करीत असतांना, मला त्यांची आठवण होऊन, मी त्यांना आज रु. ५००० अत्यंत प्रेमानें व शुद्ध मनानें देत आहे. त्या रकमेचा त्यांनीं स्वीकार करावा. माझे ते जांवई आहेत म्हणून मी त्यांस ही रक्कम देतो आहे असें नव्हे. तर त्यांच्यासारख्या उमद्या तरुण मित्राला एका मजसारख्या त्यांच्या वृद्ध स्नेह्यानें, येथून - या जगांतूनच जातां जातां दिलेली, अल्पशी प्रेमाची भेट म्हणूनच! -

**खर्च रु.** ५,०००

११. सौ. कमळी माझी मेहुणी खरी. पण माझ्या आयुष्यांत मला न लाभलेली भगिनी किंवा मोठी मुलगी या दृष्टीनेंच मी तिजवर आजपर्यंत अतिशय प्रेम करीत आलो. या प्रसंगीं, तिचीहि प्रेमळ



आठवण मला होत आहे. मला खात्री आहे, तिच्या मुलांना व तिला माझी आठवण नुसतीहि कायम राहील. पण त्यांच्याविषयींचें माझ्या मनांतील वात्सल्य दाखविण्यासाठीं, मी आज रु. ५००० सौ. कमळीच्या हवालीं करीत आहे. त्या रकमेचा तिनें वाटेल तसा विनियोग करावा.

**खर्च रु.** ५,०००

१२. यानंतर, माझ्या घरीं सुमारें दोन तपें घालवलेल्या माझ्या दोन नोकरांची - स्वयंपाकी मुरारी व गडी काठ्या यांची कांहीं व्यवस्था करणें मला माझें कर्तव्य वाटतें. त्यांना मी माझ्या मनःस्थितीमुळें माझ्या आयुष्यांत अनेक वेळां रागावलों असेन; माझ्या स्वभावाप्रमाणें काटेकोर दृष्टीनें पहात असतानां, मी कदाचित् कित्येक वेळां त्यांना अतिशय दुखविलेंहि असेन; तरी पण माझ्या स्वभावाशीं जुळतें घेऊन, माझ्यावर अत्यंत आपुलकीचा लोभ करून, त्यांनीं इतके दिवस माझ्याकडे इमानें इतबारें नोकरी केली, माझ्यावरील प्रेमानें माझ्याशीं मोठ्या मनानें जुळतें घेतलें व माझी शुश्रूषा केली. मी त्यांचा त्याबद्दल फार आभारी आहे. यापुढें त्यांना वाटल्यास त्यांनीं माझ्या घरांत नोकरी करावी; वाटल्यास न करावी. पण मी मात्र जातांना माझ्या ऐपतीप्रमाणें त्यांना खालीप्रमाणें आनंदानें देऊन जात आहे.

(रा) साऱ्या आयुष्यभर, साऱ्या चढ - उतारांतून प्रवास करतांना, मी अत्यंत साध्या पद्धतीनें रहात होतों. तरी मजकडे माझ्या शेवटच्या दर्जाला शोभणारे पण साधेसुधे बरेचसे कपडे अजून चांगल्या स्थितींत राहिले आहेत. मुरारी म्हातारा - जवळ जवळ माझ्याच वयाचा आहे. त्यानें त्यांचा उपभोग घ्यावा. याशिवाय, त्याला त्याच्या उतार वयांत उपयोगी पडतील असे रु. १०० रोख मी ठेऊन जात आहे.

**खर्च रु.** ८००, १०० रु. एकूण बेरीज रु. ९००

(म) आमचा काठ्या अगदीं कष्टाळू गडी! त्याची जवळ जवळ अर्धीअधिक हयात आतां माझ्या घरीं गेली. मला ठाऊक आहे, जी माझ्या मालकीची जमीन चि. वसंताच्या जमिनीजवळ आज आहे, ती पूर्वी ती. नानांनीं त्याच्या बापाच्या गहाणांत मिळविली होती. माझ्या दोन्ही मुलांपैकी शेतीकडे कोणाचाच कल नाहीं. त्यामुळें माझी ती जमीन, मी काठ्याला वंशपरंपरेनें बक्षिस म्हणून देत आहे. याशिवाय त्या जमिनीची मशागत वगैरेसाठीं त्यास रोख रु. १०० ठेवले आहेत.

**खर्च रु.** ५००, रु. १००, एकूण बेरीज रु. ६००

१३. वांटतां वांटतां आतां माझी सर्व संपत्तीच जवळ जवळ संपत आली, तेव्हां राहिलेले रु. ५०००, मी दरवर्षी दोघां योग्य विद्यार्थ्यांना शिक्षणास मदत देण्यासाठीं ठेऊन देत आहे. त्याची व्यवस्था अरुणनें काय ती करावी.

**खर्च रु.** ५०००

आणि एवढाच काय तो माझा धर्म!... माझी वृत्ति धार्मिक माणसाची असली तरी बाहेरील धर्म व देवळाची बांधणी वगैरेपेक्षां, घरांतील धर्मालाच मी जास्त किंमत देतों. माझ्या मतें, स्वार्थ व धर्म यांचें फार निकटचें नातें आहे!...

१४. चि. अरुण सज्ञान आहे. त्याच्याविषयीं मला आतां काळजी नाहीं. पण चि. शरद् याला सज्ञान व्हावयास अजून वेळ आहे. त्यासाठीं मी चि. अरुण, चि. अरविंद व चि. वसंत या तिघांना त्याचे ट्रस्टी नेमीत आहे. या तिघांच्या मदतीनें त्याला योग्य दिशा मिळेल असा मला पूर्ण विश्वास वाटतो.

**एकूण खर्च रु.** १,१४,०००

१५. चि. अरुण मला सोडून गेल्यानंतरच्या काळांत, चि. वसंताच्या वागणुकीमुळें व त्याच्या लहानसहान मदतीमुळें, मला बरेंच समाधान लाभलें. त्याचा मी आतांपर्यंत उल्लेख केला नाहीं याचें कारण त्याची पूर्ण निरपेक्षता मी जाणतो. आणि त्याला त्याचें आहे तेंच पुष्कळ आहे. त्याला मी मुद्दाम देईन अशा माझ्या देणगीची मुळींच आवश्यकता नाहीं... माझें आरशाचें मोठें कपाट मी त्याला आठवणीसाठीं ठेवलें आहे.

तथापि, त्याला देण्यासारखी त्यापेक्षां महत्त्वाची देणगी मजजवळ आहे आणि ती म्हणजे या मृत्युपत्राजवळच मी सीलबंद करून ठेवलेली एक वही! तिची किंमत योग्य माणसानाच फक्त समजेल आणि वसंताची गणना मी तशा माणसांच्या यादींत प्रामुख्यानें करतो.

माझ्या दृष्टीनें, मी ती वही विशेषतः माझ्या अरुणसाठींच ठेवली आहे. पण त्यांत चि. वसंत, चि. अरविंद व चि. सौ. कमळी या आणखी तिघांनीं भागीदारी करावी.

झाले. माझ्याकडे असलेल्या साऱ्या गोष्टींची मी अशी वासलात लावल्यावर, आज मला एकप्रकारचें खरें...पूर्ण... समाधान होत आहे!

मी माझें सारें आयुष्य घालविलें व माझ्या माणसांना एवढें थोडेंच देऊं शकलो!... यापेक्षां जास्त देतां आलें असतें, तर मला आणखी समाधान लाभलें असतें!... पण प्रत्येक व्यक्तीच्या कर्तृत्वाला कोठेंतरी मर्यादा असतात आणि तशा त्या मलाहि आहेत!... असो ईश्वरेच्छेनें सर्व झालें तें झालें! सर्व त्याचीच मर्जी! त्याचीच कृपा! -

येथपर्यंत मी माझ्या माणसांसाठींच विशेषतः सारें कांहीं केलें! आतां तरी राहिलेली आयुष्याचीं पळतीं पळें माझ्या आत्मसमाधानासाठीं... परमानंदांत ... घालवीन असें म्हणतो आहे!... पण मनुष्यस्वभाव शेवटपर्यंत बदलणार थोडाच?... नाहीं म्हटलें तरी लहानसहान बाबतींत कधीं कधीं कसें



तरी गुरफटल्यावांचून मनाला चैनच पडत नाहीं...

पण एक मात्र खरेंच! आयुष्याच्या सुरवातीस मी या साऱ्या जंजाळांत जितका उत्कटपणें गुंग - रत होतो, तितका आतां मुळींच राहिलेलो नाहीं. मनाला लाभणारें समाधान व दिवसेंदिवस मनोमय येत असलेली ही अपूर्व विरक्तता मला मोठी गमतीची व नावीन्यपूर्ण वाटत आहे.

बाळांनो, आतां मी तुम्हां कोणाचाच कशासाठींहि बांधलेला नाहीं. माझें म्हणून होतें तें सारें सारें तुमच्या स्वाधीन केलें. जन्माला आलो त्या वेळेइतकाच मी आतां अकिंचन, निर्लेप, निर्विकार झालों आहे.

पण तरी शेवटीं, जातां जातां मी मनापासून अशी एक इच्छा करतो - तुम्हां सर्वांचें शुभ होवो!... द्यावयाचें मजकडे बाकी राहिलें होतें तें एवढेंच! - - सत् - चित् - आनंद! -

साक्षी - सही - जनार्दन ठाकूर.
ता.

: ७२७ :

अरविंदनें मृत्युपत्र शेवटपर्यंत कसेंबसें वाचलें. मधून मधून त्याचा कंठ जड होत होता. एक दोन वेळां गळा दाटून त्याला बोलतांहि येईना. पण मन अगदीं घट्ट करून तो पुढें वाचूं लागे.

शेवटपर्यंत सर्व वाचून झाल्यावर त्यानें भोवतीं दृष्टि फिरविली. कमळामावशी अरुणला हळूहळू पाठीवर थोपटीत होती व तो ओक्साबोक्सी रडत होता. वसंत मधून मधून अश्रू पुसत होता. शरद्, सुनीति यांकडे कोणाचें लक्षच नव्हतें. तीं दोघेंहि कोपऱ्यांत बसून रडत होतीं. अरविंद उठून त्यांच्याजवळ गेला.

प्रो. बाळकृष्ण इकडे तिकडे येरझारा घालीत होते. जानकीकाकू आंतल्या दाराजवळ डोळ्याला पदर लावून बसली होती. तिची चुलती तिच्याजवळ बसून हळूहळू तिची समजूत करीत होती.

: ७२८ :

चहूंबाजूची ती शांतता मुरारीला शेवटीं असह्य झाली. तो म्हातारा एकदम अरुणजवळ येऊन मोठ्यानें हुंदके देत म्हणाला, ‘‘दादा, दादा,ऽऽ... शोक आवरा तुमचा!... बाबा तुमचे वडील होते हें तुमचें केवढें भाग्य...! मी तर त्यांच्या पायांतला जोडा... शेवटपर्यंत झिजायला त्यांचे पायहि मला लाभले नाहींत! - ’’

काठ्या कांहींच न बोलतां एकदम उठला व स्फुंदत स्फुंदत बाहेर धांवला.

शेवटीं अरुण शांत होऊन उठला व ग्यालरीकडे वळला. त्यानें वसंत व अरविंद यांना जवळ बोलावलें.

''वसंत, अरविंद, तुम्हींच सारी व्यवस्था करा आतां'' अश्रु पुशीत अरुण म्हणाला. ''माझ्या मनाला आतां थोडी शांतता मिळूं द्या जरा...''

: ७२९ :

वसंत मन घट्ट करून पुन्हां हॉलमध्यें गेला, आणि काकूंना उद्देशून म्हणाला, ''बाबांच्या इच्छेप्रमाणं काय काय कसं कसं करायचं?...''

''असं काय विचारतोस वसंत, मला?''... जानकीकाकू दुःखानें स्फुंदत म्हणाली. ''मी अरुणच्या बाहेर आहे का रे कधीं तरी?...''

''मग मला वाटतं, काकू, प्रथम बाबांच्या इच्छेप्रमाणं दोघांची लागलीच निरनिराळी व्यवस्था करावी!'' वसंत विचार करीत म्हणाला. ''आणि मग पाहिजे तर...''

''मग काय?...'' काकूच्या चुलतीनें सूचक प्रश्न केला. तिच्या दृष्टींत एक प्रकारचा संशय होता.

जानकीकाकूला तिच्या मनाच्या वांकड्या धांवेची पटकन् कल्पना आली. पण काकूचा नेहमींचा हलकेपणा जणूं बाबांच्या पुण्याच्या झोतामुळें त्या क्षणीं अगदींच विरघळला होता. त्यामुळें ती थोड्याशा रागानेंच आपल्या चुलतीकडे पाहून म्हणाली, ''चूप गं,... मध्येंच बडबडूं नकोस!...''

इतक्यांत शरद् धांवत धांवत ग्यालरींत गेला व अरुणला मिठी मारून, मोठ्यानें रडत म्हणाला, ''दादाऽदादा, मला नाहीं ना रे तूं एकदम सोडून जाणार कुठं?''

अरुणला त्याच्या त्या प्रश्नाने भडभडून आलें. त्याला अगदीं रहावेनाच. उत्कट प्रेमानें त्यानें त्याला अगदीं जवळ घेतलें व तो अडखळतच त्याला म्हणाला, ''शरद्, बाळ, आपले बाबा फार मोठे होते बरं!...''

: ७३० :

जेवणें झाल्यावर प्रोफेसर बाळकृष्ण व त्यांची मामी - दोघें निघून गेलीं.

'शरद्‌ची आई बरी नाहीं' अशी सबब पुढें करून काकूची चुलती प्रथम तेथेंच तळ ठोकण्याचा विचार करीत होती.

पण अरुणनें तिच्या मनांतील हेतु जाणून तिला सौम्यपणेंच पण स्पष्ट शब्दांत सांगितलें, ''नको, कशाला आजी? आम्हीं सारे आहों. तुम्ही कशाला तुमच्या जावईबुवांची गैरसोय करतां? ठरल्याप्रमाणंच होऊं द्या सारं.''



त्यामुळें नाइलाज होऊन, शेवटीं आपलें सामान घेऊन तीहि बाहेर पडली.

कदाचित् वातावरण उगीच कलुषित होण्याचा संभव टळला या विचारानें अरुणनें एक समाधानाचा सुस्कारा सोडला व तो आपल्या खोलींत येऊन बसला!

: ७३१ :

कमळामावशी, अरविंद वगैरे मंडळी त्याच्याजवळ सत्रंजीवर पडली होती. अरुण थोडा वेळ गप्प बसला व नंतर अरविंदला हळूच म्हणाला ''अरविंद, मला वाटतं तूं तुझं मुंबईचं बिऱ्हाड मोडून आतां इथंच रहायला ये. कांही दिवस तरी तूं व सुनीति दोघं शरद् व काकू यांच्याजवळ असायला पाहिजे.''

अरविंद त्यावर कांहीं वेळ गप्पच राहिला; आणि मग म्हणाला, ''आणि तूं?''

''माझं अजून कांहींच निश्चित होत नाहीं! इथं घरांत राहून तरी माझ्या मनाला सध्यां समाधान मिळणार नाहीं, एवढं खरं!'' अरुण खिन्नपणें अरविंदकडे वळून पहात म्हणाला.

इतक्यांत वसंत घाईघाईनें आंत आला व म्हणाला, ''अरुण, बाबांनीं उल्लेखिलेली त्यांच्या कपाटांतली सीतामाईंच्या दागिन्याची पेटी कुठं आहे? तूं काढली होतीस?''

कमळामावशी व अरुण दोघेंहि एकदम चपापली. अरुणनें कांहीं न बोलतांच माहित नाहीं अशी मान हालवली.

''बाकीच्या यादीप्रमाणं अगदीं सारं सामान सांपडतं,'' वसंत गंभीर चेहरा करून म्हणाला, ''दागिन्यांची पेटी कां सांपडूं नये? बरं, त्यांच्या कपाटाच्या किल्ल्या कुणाकडे होत्या?''

किल्ल्यावरून अरुणला आठवण झाली. त्यानें काकूच्या चुलतीच्या हातूनच सकाळीं किल्ल्यांचा घोस घेतला होता. काकूंचें त्यांत अंग असो वा नसो, तिच्या चुलतीचाच तो सारा कारभार असावा अशी अरुणची खात्री झाल्यावांचून राहिली नाहीं.

: ७३२ :

बराच वेळ अरुण, वसंत किंवा कोणीहि कांहींच बोललें नाही.

इतक्यांत कमळामावशीला रहावेना. ती पटकन् आपल्याला कांहींतरी जास्त माहीत आहे अशा स्वरांत, पण खोंचकपणें म्हणाली, ''ही लांबून धांवून येणारीं उपकारी माणसंच बरं!...''

पण वसंत व कमळामावशी यांच्याकडे पूर्वीप्रमाणेंच अगदीं खिन्नपणें पाहून अरुण म्हणाला, ''जाऊं दे रे वसंत! मावशी, तूंहि उगीच खोलांत शिरतेस! - माझ्याच आईच्या दागिन्यांची ती पेटी होती ना? - त्यावर बाबांनीं माझीच मालकी ठेवली होती ना? मग आतां त्याचा जास्त गाजावाजा कशाला आपल्यास उगीच?''

अरविंद, वसंत, कमळामावशीं, अरुणकडे व एकमेकांकडे आळीपाळीनें कांहीं न बोलतांच, पहात होतीं.

तोंच अरुण पुन्हा म्हणाला, ''हें पहा, तो विषय सोडून द्या पाहूं एकदम! आपणां चौघांसाठीं बाबांनीं ठेवलेली ती सीलबंद वही तरी कुठं आहे? ती सांपडली ना? प्रथम ती उघडून आपण वाचूं या! - कदाचित् बाबांनीं आतांपर्यंत दिलेल्या त्यांच्या साऱ्या संपत्तीहून जास्त मौल्यवान् मोतीं आपणांस तिच्यात सांपडतील. वसंत, खरंच रे! - ती वहीच आण आंता पहिल्यानं इथं! - आपण आपल्या दुःखी मनांना तिनंच विरंगुळा आणण्याचा प्रयत्न करूं या...''

कमळामावशीचे व वसंताचे डोळे पाण्यानें भरले होते. अरविंदला अरुणची ती सूचना एकदम पसंत पडून तो म्हणाला, ''खरंच, वसंत, सारं काम टाकून प्रथम ती वहीच आण जा वाचायला...''

वसंतहि 'हं!' असें म्हणून, लगबगीनें कपाटाकडे गेला; त्यानें ती वही बाहेर काढली, कपाटाला पुन्हां कुलुप लावलें व तो परत सारीं बसलीं होतीं त्या खोलींत आला.

: ७३३ :

कमळामावशीनें दार लावून घेतलें आणि ती, अरुण व अरविंद यांच्याजवळ येऊन बसली.

बाबांनीं आपल्या हातांनीं लावलेलें तें शेवटचें सील वसंत फोडीत असतांना साऱ्यांचे डोळे पाण्यानें भरून आले.

वसंतानें वही उघडून एकदां शेवटपर्यंत भर्कन् चाळून पाहिलें. बाबांनीं आपल्या हस्ताक्षरांत, तें वापरीत असलेल्या जुन्या फाऊंटन - पेननें त्या वहींत सारें घाईघाईनें लिहून काढलें होतें. मधून मधून त्यांच्या म्हाताऱ्या प्रेमळ डोळ्यांतून ठिबकलेल्या अश्रूंच्या मोठ्या ठिपक्यांमुळें, जागोजाग शाईचे डाग पडले होते.

वसंतानें क्षणभर थबकून तिजकडे पहात आले डोळे पुसले; मन घट्ट करून दाटलेला गळा साफ करण्यासाठीं तो एकदां खाकरला व त्याच्याजवळ मुकाट्यानें व उत्सुक मनानें बसलेल्या अरुण, अरविंद व कमळामावशी यांच्याकडे एकदां मंद दृष्टि फिरवून तो जड आवाजानें वाचूं लागला.

: ७३४ :

**व्यक्तिगत मृत्युपत्र -**

माझ्या आयुष्यांतील महत्वाच्या अनुभवांची, फक्त माझ्या जिव्हाळ्याच्या माणसांसाठींच, केलेली जंत्री.

''अरुण, बाळ, माझ्या मृत्युपत्राप्रमाणं सारी व्यवस्था झालीच असेलना? ह्या वहीचं सील उघडून ज्याअर्थी हीं पहिलीं वाक्यं तुम्ही आतां वाचीत आहां, त्याअर्थी तें सर्व पूर्वींच उरकलं असावं.



समाधानानं उरकलं ना सारं? ठीक. नसलं तरी तुझ्यावर व या इतरांवर माझा विश्वास आहे. त्याविषयीं मला जरासुद्धां चिंता वाटत नाहीं... आतां! -

बरं, पण आतां कोण कोण मंडळी जमलीं आहेत इथं? मी लिहिल्याप्रमाणं, तुझ्याशिवाय कमळी, वसंत आणि अरविंद... तिघंहि आहेत ना इथं?

बरं, छान! माझ्या हयातीमध्यें तुम्हां सगळ्यांना असं जवळ एकत्र बोलावून तुमच्याशीं मला मोकळेपणानं बोलण्याची संधि मिळाली नाहीं. पण मग वाटतं, झालं तें ठीकच झालं! हें सारं आतां तुमच्यासाठीं लिहून ठेवीपर्यंत, अरुण कांहीं मला भेटलेला नाहीं. माझ्या मृत्यूपर्यंत तो मला भेटेल; कदाचित् भेटणारहि नाहीं! पण आजतरी मी माझ्या जबाबदारींतून पार पडतो आहे!

आज हें वाचतांना तो इथं हें ऐकायला आहेना? असेल! मला तशी खात्री वाटते! - कुठूनहि माझ्या पश्चात् तरी तो मजकडे धांवत येईल! तर मग, बाळांनों, आपण सारीं, आज थोडा वेळ अगदीं मोकळेपणानं बोलूं या हं! -

: ७३५ :

कोण वाचतं आहे बरं माझ्यासाठी? बहुतेक वसंताच असेल! हो ना? तोच तुमच्यांतील धीरगंभीर मुलगा आहे.

बरं तर. तो वाचीत असेल, तर तुम्ही बाकीचीं तिघं कुठं आहांत? - कमळे, तूं अशी समोर बस. मी तुझ्याविषयींहि थोडंसं या लोकांना आज सांगणार आहे. ह्यांना कदाचित् त्यांतलं ठाऊक नसेल, तर तें आतांच त्यांना पहिल्या प्रथम समजेल! म्हणून तूं रागवणार तर नाहींस ना मजवर? पण वेडे, हीं सारीं आपलींच माणसं नाहींत का? मग? - सारं आपल्याच मनांत ठेवायचं का शेवटपर्यंत? त्यांनाहि त्यांतलं कळायला पाहिजे. तेव्हां मला तुझी परवानगी आहे असंच धरून चालूं ना मी?

अरविंद, तुम्ही असे वसंताजवळ बसा. घरबांधणीच्या वेळीं तुम्हीं माझे जांवई नव्हतां; त्या वेळची माझी प्रत्येक बाबतींतील कांटेकोर दृष्टि आणि तसं म्हटलं तर जन्मतःच किंवा परिस्थितीमुळं झालेला म्हणा - माझा चिरचिरा स्वभाव, तुमच्या दृष्टीस वारंवार पडला असेल, त्या वेळीं तुम्हीं मनांत म्हणालांहि असाल, 'काय कद्रू म्हातारा आहे!' नाहीं? -

हो, अरविंद, मला पुष्कळांनीं तसंच म्हटलं आहे. पण कद्रूपणा हा माझा दोष का हो? स्वतां कष्टानं मिळवलेलं स्वतःच संभाळण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे ना?

एक मात्र, घराच्या कॉंट्रॅक्टच्या बाबतींत मी तुम्हांला दुखविलें; मला एक प्रकारचा मोहच झाला त्या वेळीं! आणि त्याबद्दल मी हें आज तुम्हा साऱ्यांनां सांगत आहे तोंपर्यंत मला अनेक वेळां वाईट वाटलं! - तसं माझ्या हातून व्हायला नको होतं!

पण अरविंद, तुम्हांलाहि अनुभव असेल - माणसाला अनेक वेळां मोह होतो. त्यामुळं चुकतो... अक्षम्य चुकाहि करतो कधीं कधीं... पण तेवढ्यावरूनच निखालस त्याची योग्यता तुम्ही ठरवाल का? आणि दुसरं सांगूं का? तुम्हाला पाहिलं, कीं, मला माझ्या स्नेह्याची - तुमच्या वडिलांची आठवण होत असे. कदाचित् त्यामुळंच असेल, तुमच्याबरोबर मी जरा ऐसपैस आपुलकींत वागलो! आणि दुसरं तुमच्यासारखा चांगला मुलगा माझ्या सुनीतीला वर मिळावा हा मोहच विशेषतः त्या वेळीं तुम्हांला दुखविण्यासारखं कांहीं माझ्या हातून घडविण्यास कारण झाला. पण एवढं सांगितल्यावर तुम्ही तें सारं साफ विसराल ना?

: ७३६ :

आतां माझा अरुण कुठं आहे तो?... ये बाळ, बैस असा, वसंताच्या उजव्या बाजूला. तूं मला बहुतेक माझ्या मृत्यूपूर्वी खात्रीनं भेटशील, अशी माझी मनोदेवता आज या क्षणीं पुन्हा पुन्हां सांगते आहे. भेटलास तर - वेळ मिळेल तसं तुला थोडेफार कांहीं सांगेन!... पण न भेटलास तर?...

तर काय? मला फारसं वाईट नाहीं वाटणार. वेड्या, मला तूं सोडून गेलास. मजवर रागावलास; म्हणून मी रागवेन कारे तुझ्यावर? अरुण, मला तुझीं श्रेष्ठ ध्येयें थोडींफार तरी कळतात; पण तूं व माझीं इतर माणसं, यांच्याभोंवती उभारलेल्या रुपये - आणे - पै मोजणाऱ्या व्यवहारी जगालाच माझे पाय चिकटलेले होते, आहेत व मरेपर्यंत असणार! याला मी तरी काय करूं सांग.

तुझा भावनाप्रधान स्वभाव, तुझ्या मनाच्या मोठ्या आकांक्षा, मला समजत नव्हत्या असं का तुला वाटतं? ही कमळामावशी तुझ्याजवळ बसली आहे; तिलाच विचार. ती तुला एक दोन गोष्टी सांगेल!...

पण तसं कशाला?... मीच सांगतो तुला त्या...

: ७३७ :

तूं लहान होतास, अरुण; किती?... अगदीं चार पांच वर्षांचा. त्या वेळीं मी नुकताच हुजूर डेप्युटी कलेक्टर झालो होतो. सकाळच्या वेळीं माझं काहीं काम करीत ओटीवरच बसलों होतों मी. कामांत अगदीं गढलों होतों. तुला नवीन केलेली विजार पायांत चढवीत चढवीत तूं माझ्याकडे आलास, माझा उजवा हात लिहितां लिहितां तूं बाजूला ओढलास व मला उत्साहानं व जणूं अधिकारानंच म्हणालास, ''बाबा, एवढीं हीं बटनं लावा हो!''...

पण मी लिहिणं तसंच चालू ठेवून ''चल रे, काय तुझी कटकट ही?'' असं थोड्या रागानंच तुला म्हटलं आणि तुला बाजूला सारलं. तुझ्या बालमनालाहि तो अपमान पटकन् जाणवला. तूं तसाच थोडा मागं चालत गेलास, फुरंगटलास, पुन्हा माझ्याजवळ आलास; आणि आपले गाल एकदम



फुगवून मोठे करीत शेवटीं तूं मला म्हणालास, ''काम आहे काय तुम्हाला, बाबा? आणि आईनं आतां चहाला बोलावलं तर मग कसे जाल हो झटकन उठून?...''

: ७३८ :

तुझ्या त्या बालिश शब्दांची मला इतकी गंमत वाटली त्या वेळीं! कागद टांक तसेच बाजूला टाकले, तुला चटकन उचलून प्रेमानं वर घेतलं व तुझं एकदां चुंबन घेऊन मी तुझ्या विजारीचीं बटनं लावीत लावीत, तुला सहजच म्हटलं. ''मोठा लबाड आहेस तूं! हं पण कायरे अरुण, तुझा नवा धडा केलास का तूं?''

''होऽबाबा!'' तूं म्हणालास, ''मी आतां खूप खूप शिकणार आहे!''

त्या वेळीं तुझ्या भवितव्याविषयीं मला अशींच एकएक स्वप्नं पडत. आपल्याला गरीबीमुळं यश अशक्य झालं तें सर्व तुझ्या बाबतींत तरी आपण शक्य करून दाखवूं अशी मला नेहमीं उमेद वाटे. त्यामुळं तसलाच विचार करतां करतां, मी तुझी मान वर करून, तुला विचारलं, ''अरुण, बाळ, तूं शिकून कोण होणार रे?''

''मोऽठ्ठा! खूप मोऽठ्ठा!'' तूं आपलं मनोगत, हात व शब्द यांनींच व्यक्त करीत होतास! ''कोण कलेक्टर?...'' मी तुझ्या मनाची धांव कुठपर्यंत व कोणत्या बाजूस जाते, तें पहाण्यासाठीं म्हणालो.

''हं. मी होणार डॉक्टर! अशी अशी छाती तपासणार लोकांची!'' माझी छाती तपासण्याचा अभिनय करून तूं पुढं म्हणालास, ''नाहीं तर बाबा, तो आपला वसंता काढतो ना चित्रं? तसलीं चित्रंच काढणार आपलीं मी!''

तुझ्या त्या शब्दांनीं मात्र माझी किती निराशा झाली होती! मला वाटलं होतं, माझ्या मनाच्या मोठमोठ्या अपेक्षा या बालकाच्या अजून कुठल्या ध्यानीं यायला?.....

: ७३९ :

इतक्यांत तूंच मला पुन्हां विचारलंस, ''बाबा, कलेक्टर मोठा असतो काहो खूप?''

हात पसरून 'मोठा' ही कल्पना तूं दाखवीत होतास. मला लागलीच पुन्हा आशा वाटूं लागली; तुझ्या मनावर परिणाम करण्यासाठीं मी म्हणालो, ''हो तर, त्याला खूप पगार असतो! हजार रुपये...''

त्याचं तुला मोठं आश्चर्य वाटलं, तूं डोळे किलकिले केलेस, तुझा चिमुकला हात आपल्या तोंडावर ठेवलास व एकदम मोठ्यानं म्हणालास, ''अबबब!... हजार? येवढे हो काय करायचे असतात त्याला? आपल्या मुरारीला किती पगार आहे; माहीत आहे बाबा तुम्हाला?... दहा...अकरा...बारा...तेराऽहं.... तेरा रुपये. बास. येवढेच काहो त्याला?'' तूं बोटं मोजून सारं

सांगत होतास.

''चल, मूर्ख आहेस अगदीं!' मी उलट जास्तच रंजीस होऊन म्हणालो, ''अरे मुरारी स्वयंपाकी... शिपाई आहे; वेड्या,... अन् कलेक्टर साहेब असतो. त्याला कपडे लागतात!... घर बांधायचं असतं!''...

तेवढ्यांत तुझ्या विचारांचा रूळ एकदम बदलला. माझ्या मांडीवरून तूं पटकन् खालीं उतरलास व आपलं पहिलं बोलणं तसंच अर्धवट टाकून, तूं दुसऱ्या विषयांत शिरून म्हणालास, ''हो बाबा, मीहि आपल्या नानांसारखं एक घर बांधणार आहे.''

मला त्यांतल्या त्यांत थोडं बरं वाटलं व मी मोठ्याउत्सुकतेनं पुढं विचारलं, ''एकच? आणि मी तें घेतलं तर?''

''देईन तुम्हाला! घ्याऽ...! मी दुसरं बांधीन!'' तूं आपले डोळे मोठे करून म्हणालास.

''आणि तें मुरारीनं घेतलं तर रे?'' मी पुन्हा गमतीनं म्हणालों.

''मग मी आणखी दुसरं बांधीन ना नवं!'' तुझे हातवारे व नवीन घरं बांधणं कांहीं थांबेना...

इतक्यांत ही कमळी तिथं गेली. तिच्याकडे धांवत धांवत जाऊन तूं तिला एकदम विचारलंस 'ए मावशी मावशी... तूं माझं घर घेशील का गं?''

''नाहीं, नाहीं बाळ! - ' ती म्हणाली...तिला मागचा कांहीं संदर्भ ठाऊकच नव्हता. त्यामुळं त्या उत्तरानं एकदम आनंदून तूं मजकडे हंसून पाहिलंस व म्हणालास, 'बघा, बाबा, मावशी नाहींच घ्यायची माझं घर! अन् मुरारीसुद्धां नाहीं घेणार. आम्ही सगळे सगळे एकाच घरांत... खूप मोऽऽऽठ्या घरांत रहाणार!''... कमळे, त्या वेळीं तुझं नुकतंच लग्न झालं होतं. तोंपर्यंत तूं माताहि झाली नव्हतीस; आठवतो तुला तो प्रसंग? याचे हातवारे पाहून तुला त्याचं किती कौतुक वाटलं होतं त्या वेळीं! तूं त्याला पटकन वर उचललंस आणि त्याचे मटामट मुके घेतलेस... होना? -

: ७४० :

दुसरा प्रसंग आठवतो आहे मला अरुण -

घरांत एक शिकारी कुत्रं होतं. जवळच्याच कुणाचं तरी एक कोंबडं चरत चरत आमच्या घराच्या मागल्या बाजूस आलं; तूं तिथंच खेळत होतास. मला वाटतं, इतक्यांत ह्या कुत्र्यानं, तुझ्या देखत त्या कोंबड्यावर एकदम झडप घातली. त्याला त्यानं मारलं; अगदीं साफ पिसडलं!...

तें प्रत्यक्ष डोळ्यासमोर घडलेलं पाहून तूं घाबरलास व रडत रडत येऊन मला बिलगलास! तेव्हां तुझी समजूत करायला मला त्या वेळीं कितीतरी वेळ लागला!

नंतर तूं खेळायला गेलास. साऱ्यांचीं जेवणं झालीं - आणिं नेहमींप्रमाणं तूं माझ्या बिछान्यावर,



माझ्या पांघरुणांत येऊन गप्प झोंपलास...

रात्रीं साडेअकरा बाराचा सुमार होता. माझं कचेरीचं काम संपवून, तुला नीट पांघरुण घालून, मी नुकतांच तुझ्याजवळ पडलो होतो. इतक्यांत एकदम मोठ्यानं ओरडत तूं उठून बसलास व मला अडखळत अडखळत म्हणालास, 'बाबा बाबा, चलानाऽधांवा! त्यानं पहा त्या कोंबडीला मारून टाकलं! असं कां तें त्याला मारतं हो? त्यानं काय केलं त्याचं?... देव पाप नाहीं का करणार त्याला?...''

मी तुला जवळ घेतलं; जागं केलं! तुझे डोळे पाण्यानं तुडुंब भरले होते. तुझ्या मनाची समजूत करून तुला पुन्हा झोंपवायला मला किती प्रयास पडले त्यानंतर!...

शेवटीं तुला पुन्हां गाढ झोपलेला पाहून, मी एक समाधानाचा सुस्कारा टाकला. तरी पण, त्या दिवशींच्या त्या लहानशा प्रसंगाचा तुझ्या भावनाप्रधान बाल मनावर झालेला तो कायम परिणाम पाहून, मला अगदीं चैन पडत नव्हतं. म्हणूनच त्यानंतर कितीतरी वेळ मी तसाच बिछान्यावर तळमळत होतो.

कमळे, त्या वेळीं तूं माझ्याकडेच माहेरीं आली होतीस. दुसऱ्या दिवशीं सकाळीं हा प्रसंग मी तुला सांगितला; तें आठवतं का आतां तुला? त्यावर तूं म्हणाली होतीस 'असाच हळवा आहे हो अगदीं तो. त्या दिवशीं आमच्याकडे आला होताना? तो आमच्या गड्याचा मुलगा - बेचकानं पक्षी मारून खालीं पाडतो आणि फुलपाखरं धरून लहान लहान डब्यांत भरून ठेवतो... म्हणून त्याच्याबरोबर त्या दिवशीं त्यानं मारामारी सुरू केली होतीन्... मला तें भांडण सोडवतां सोडवतां अगदीं नाकीं नव आले, बाबा.'

: ७४१ :

अरुण, हे प्रसंग तुझ्या अगदीं लहानपणांतले; पण ते आजहि डोळ्यांसमोर घडत आहेत, असंच वाटतं मला आणि असल्या माझ्या आठवणींतील प्रसंगांमुळंच, मला नेहमीं तुझ्याविषयीं जास्त काळजी वाटे. मला पुन्हां पुन्हां वाटे, या भावनाप्रधान, आत्तांपासूनच मोठ्या वेड्या ध्येयांमागं लागलेल्या, लहानग्या कोंकराचं, त्याच्या पुढील आयुष्यांत, जगाच्या धकाधकींत, कसं चालणार बरं? मी नाहीं म्हणत नाहीं, अरुण, पण या काळजीमुळंच, अनेक वेळां, तुझ्याच हिताच्या दृष्टीनं, तुला मी प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीनं दुखविलं असेन!...

आणि त्यानंतर, तूं हळूहळू मोठा होत गेलास! मोठेपणींहि तुझीं ध्येयें, दुसऱ्यांच्या सुखाच्या तुझ्या व्यापक कल्पना, सारं मला थोडं तरी आकलन करतां येत असे. कारण मलाहि माझीं थोडींफार ध्येयें होतीं. अरुण, मलाहि स्वतांचीं व दुसऱ्यांचीं सुखदुःख समजत होतीं. तरीपण मी हळूहळू कठोर कसा

होत गेलों हेंच आज मी अगदीं मोकळेपणें तुम्हा साऱ्यांना सांगणार आहे —

: ७४२ :

मला वाटतं, मी अशी आयुष्यांत धडपड करून, माझ्या लहानशा कुवतीप्रमाणं, थोडीफार संपत्ति ठेवून गेलो; तसंच माझ्या साऱ्या आयुष्याच्या धडपडीचं लहानसं चित्र, तुमच्यापुढं उभं करणं हेंहि माझं कर्तव्यच आहे!

माझं आयुष्य संपतां संपतां, 'मनू पालटला!...' असे उद्गार माझ्या कानावर येत होते; पण मला वाटतं, अरुण, त्यांत तितकंसं तथ्य नाहीं. जगाचा व्यवहार हा असाच आणि असल्याच पद्धतीनं पुढंहि चालत राहणार! नव्या जुन्या पिढ्यांचीं हीं भांडणं, आपल्याला वाटतात तितकीं वरवरचीं नाहींत. त्यांचं मूळच मुळीं मनुष्यस्वभावांत आहे. एकानं दुसऱ्याला क्षुद्र ठरवायचं एवढंच काय तें! बाकी आपण सारीं जगांत वावरतांना, सारखींच क्षुद्र, स्वार्थी संकुचित दृष्टीचीं ठरतों!...

आणि म्हणूनच, माझं आयुष्य उदाहरणादाखल घेऊन, मला हेंच कुणाला तरी सांगावंसं वाटतं!... साधी गंमत पहा, माझी पहिली कक्षा केवढी मोठी होती!... पण आतां शेवटीं?.....

मी माझीं माणसं म्हणत होतों त्यांतूनहि गळत गळत, शेवटीं, आतां तुम्ही चौघंच राहिलां; याच दृष्टीनं मी तुम्हां चौघांनाच आज इथं बोलावलं आहे. आणि समाधानासाठीं कल्पनेनं तुमच्याशीं अगदीं मनमोकळं बोलत आहे.

तेव्हां, मला जसं जसं आठवेल, तसं तसं तुम्हांला मी आतां सांगतो... मी म्हणतो आहे इथं एकटाच बसून पण त्यापेक्षां जास्त माझ्या शब्दांतून तुम्ही मागाहून समजून घ्या. क्वचित् ठिकाणीं शब्द तोकडे पडतात! हात म्हातारपणामुळं चालत नाहीं!...

मग आतां अगदीं मोकळ्या मोकळ्या गप्पा मारूं या ना आपण, पाच स्नेह्यांप्रमाणं?.... हं वेड्यांनों,... मी तुम्हाला इथं दिसत नाहीं. आतां या क्षणीं तुम्हींहि मला दिसत नाहीं आहां!... म्हणून तुम्ही किंवा मीं गांगरण्यांत किंवा दुःखी होण्यांत काय अर्थ आहे?

हे पहा, मी माझे डोळे पुसले. आतां तुम्हीहि पुसा पाहूं!... हं अरुण, कमळे, वसंत, अरविंद... सांगू ना आतां मी सारं?.... ऐका तर...

: ७४४ :

वसंत वाचतां वाचतां गंभीरपणें एकदम थांबला.

त्या चौघांनाहि, जणूं काय, बाबा आपल्या नेहमींच्या हळुवार स्वरांत आपल्याजवळच बसून सारें कांही सांगत आहेत, असेंच वाटत होतें.

कमळामावशीनें स्वतःचे अश्रु पुसले व अरुणला थोडें जवळ घेतलें. अरविंद वसंताच्या खांद्यावर



एक हात ठेवून, समोर पडलेल्या बाबांच्या वहींतील शेवटच्या अक्षरांवर पडलेल्या त्यांच्या आतां सुकलेल्या अश्रूंच्या ठिबक्यांकडे अश्रुभरित नेत्रांनीं पहात होता!

''ज्या हृदयांतून हे अश्रु ठिबकले, तें आजहि धडधडतच आहे जणूं काय! पण माझे बाबा आतां कुठं आहेत?'' अरुण आपल्याला समजावीत स्वतःशींच म्हणाला.

इतक्यांत खालीं पहातां पहातां, वसंतानें मनाला पुन्हां धीर आणला; पुढलें पान उलटलें व तो गंभीर शब्दांत पुढें वाचूं लागला....

''बाळांनों, मूळ आम्ही कोंकणचे रहाणारे. घरांत अठरा विश्वे दारिद्र्य. आमचे वडील लहानपणींच वारले! राहिली आमची आई. खरोखरच मोठी धीराची ती. तिनं आम्हाला साऱ्यांना घेऊन इकडे मुंबईस पोटापाण्यासाठीं धांव घेतली. बरोबर वीस वर्ष वयाचा तिचा विवाहित भाऊ होता.

तिनं स्वयंपाक, मोलमजुरी, दळण, शक्य ते सारे कष्ट करून मुलांना पोसायला सुरवात केली. त्यांत तिची बरोबर आलेली भावजयहि तिला मदत करी. तिचा भाऊ, आमचा मामा - प्रथम स्वयंपाक्याची नोकरी करूं लागला. मी तर त्या वेळीं अगदींच लहान होतो. एकंदर पांच भाऊ होतों आम्हीं. पांच मुलांची आई असून धीरानं स्वतःच्या श्रमावर जगणारी ती प्रौढ विधवा. तिच्याकडे कधीं कधीं कोरड्या कौतुकानं पाहून लोक गमतीनं म्हणत, ''ही पहा कुंती आली!''

पण पांच मुलांची आई, या शिवाय त्या दोघींत दुसरं कांहीं साम्य नव्हतं. ती पुराणांतील वैभवसंपन्न कुंती नव्हती. आमच्या आईला जगण्यासाठीं हाडाचीं काडं करावीं लागत. तिलाहि त्या पुराणांतील कुंतीच्या पौराणिक वैभवावर, आपल्याला जगणं शक्य नाहीं हें पूर्णपणं समजत होतं. म्हणून ती महिन्या मागून महिने, वर्षांमागून वर्षें, स्वतःला व आपल्या मुलांना, पुढील आशा धरून, केवळ जगविण्याची धडपड करीत होती.

नारायण, यशवंत, जनू, श्रीनिवास व शंकर - अशीं आम्ही पांच भावंडं. आई मुंबईत आली, तेव्हां नारायण एकोणीस वर्षांचा होता. यशवंत सतरा वर्षांचा व त्याच्यापेक्षां चार वर्षांनीं लहान मी. आम्हीं तिघे माधुकरी मागून व लहानसहान वरकामं करून, विद्येसाठीं धडपत होतों. श्रीनिवास तर लहान; सारा पांच वर्षांचा. शंकर तान्हा; दीड दोन वर्षांचा. त्यामुळं त्या शेवटच्या दोघांचे लाड साहजिकच होत -

तेव्हां अशीं आम्हीं मुलं, आमची आई आणि आमचा मामा जगांत पुढं येण्यासाठीं वर्षांमागून वर्षं परिस्थितीशीं केवळ झगडत होतों! -

: ७४५ :

आमचा मामा प्रथम स्वयंपाकी होता. त्यानं त्या सुरवातीच्या कालांत एक हॉटेल काढलं. त्यामुळं

त्यांत पैसा थोडाफार हातीं आला. लागलीच आवडती बाजू म्हणून खेडेगांवांत त्यानं एक शेत घेतलं. त्यांत तो स्वतः व त्याची बायको दोघं जातीनं खपलीं. करतां करतां, पुढच्या अठरा वर्षांत तो थोडी पुंजी व बरीचशी शेतजमीन गांठीं करून बसला. पण जवळ जवळ पंचेचाळीशी आली तरी मूलबाळ नाहीं. म्हणून तो प्रेमळ मनुष्य 'काय करायचं पुढं' या चिंतेंत असे. इतक्यांत दुर्दैवानं त्याची बायकोहि प्लेगला बळी पडली!

- आणि आम्ही भाऊ? तेहि वयानं व संपत्तीनं आपल्या कर्तबगारीच्या जोरावर परिस्थितीशीं झगडत पुढं येत होतों. या साऱ्याच धडपडीचं वर्णन करणं शक्य नाहीं. तेवढा मला आज वेळ नाहीं, अंगांत ताकदहि नाहीं. पण याच पुढच्या अठरा वीस वर्षांत एक एक भाऊ पुढं आला.

... आमचे नाना - प्रथम शिक्षण करूं पहात होते. पण त्यांत त्यांचं विशेष लक्ष नसे. ते सर्वांत वडील. आम्हाला बरोबर घेऊन त्यांनीं माधुकरी मागावी - व आल्यावर एकदां आडवं पडावं. त्यांना त्या वेळीं दारिद्र्याच्या नांग्या जास्त लागत. एके दिवशीं - आमच्या एका आश्रयदात्याच्या मुलानं त्यांच्या पायावर बुटाचा करकरून पाय दिला! ... झालं ... भडकलं त्यांचं चित्त!... ''पैसा हीच जगांत माणसाला लहान मोठी ठरविणारी शक्ति आहे! ती कोणत्याहि प्रकारानं मिळविलीच पाहिजे व ती शक्य तितक्या लवकरच! कारण माणसाचं आयुष्य फार लहान असतं'' असं त्यांना वाटूं लागलं! आणि ते त्याच दिवशीं रात्रीं घरांतून बाहेर पडले. त्यानंतर त्यांनीं अनेक प्रकारच्या लहान मोठ्या नोकऱ्या केल्या. तसेच धंदेहि केले. 'कोणत्याहि धंद्यांत कमीपणा नाहीं; कसेहि पैसे मिळवावे,' ही त्यांची त्या वेळची नेहमींची दृष्टि. आपल्या खेडेगांवांत त्यांनीं शेवटीं दारूचं दुकान थाटलं! सावकारी सुरू केली. अगदीं कशाचीहि लाज...हा त्यांच्यापुढं प्रश्नच नव्हता तेव्हा!... पैशाला पैसा येऊन मिळतो म्हणतात. आणि नानांच्या नीति - अनीतीच्या कल्पना कांटेकोरहि नव्हत्या. एका निराळ्या दृष्टीनं 'व्यापक' स्वरूपाच्या त्या होत्या; तेव्हां त्यांची संपत्ति हळूहळू वाढत गेली. शेवटीं शेवटीं पैसा मिळविण्याचा कैफ त्यांच्या अंगावर चढला. परिस्थिति वांकडी आल्यामुळं त्यांच्याचकडे गहाण पडलेली मेहुण्याची इस्टेट - मंजुळेच्या वडिलांची सारी जिंदगी - तीहि त्यांनीं आपलं मन मारून स्वार्थासाठी बळकावली. पण त्यांच्या असल्या कृत्यांशीं आपल्याला आतां कांहींच कर्तव्य नाहीं. ते आतां चांगले श्रीमंत झाले, प्रतिष्ठित झाले, एवढं खरं!.....

दुसरे, यशवंतदादा, हुशार विद्यार्थी हें खरं पण अंगांत विशेष कोणत्याच प्रकारची मोठी धडाडी - धमक - नव्हती. परिस्थित्यनुरूप कष्ट करण्याचीहि तितकी कुवत शरीरांत नव्हती. अगदींच एकमार्गी एकांडे शिलेदार! प्रथमपासून स्वार्थ मात्र सपाटून - त्यांनीं लौकरच मराठी मास्तरकी पत्करली. संसार सुरू केला; मुलंबाळं वाढलीं. पण त्यानंतर संसाराच्या आर्थिक बाबींच्या वाढीची प्रगति तेवढ्यावर



तिथंच खुंटली!

त्या दोघांनंतरचा मी... माझं विद्यार्जन मात्र शेवटपर्यंत कायम चालू राहिलं! पण माझ्या मते तरी याला कारण मीच! - 'मोठं व्हावं, श्रीमंत व्हावं, पण योग्य मार्गानं'; ही इच्छा माझ्या मनांत सारखी वागत होती; आणि तशीच 'विद्येच्या जोरावर मोठं व्हावं व होऊंहि' ही धमकसुद्धां वाटत होती! त्यामुळं गरीबींतहि मी कष्ट खूप केले. सारख्या स्कॉलरशिपा मिळवल्या. नातेवाईकांनीं घातलेले त्या वेळच्या पब्लिक सर्व्हिस, स्कूलफायनल परीक्षांचे मोह धीर मनानं टाळले, - व शेवटीं स्वतःच्या हिमतीवर त्या वेळच्या साऱ्या मोठ्या पदव्या हस्तगत करीत गेलो. वकिली केली, ती स्वभावामुळं जुळेना; शेवटीं कलेक्टर कचेरींत कारकुनी...वाढत वाढत मामलेदार व शेवटीं हुजूर डेप्यूटी कलेक्टर झालो. लहानपणाच्या प्रतिकूल परिस्थितींत केलेल्या आयुष्याच्या कल्पनेहून असा किती वर चढत आलों होतो आतां!...

: ७४६ :

ही आमची त्या वेळची स्थिति! आमचं कुटुंब पूर्वीच्या मानानं आता एकंदरींत बरंच सावरलं होतं. मामा चांगला शेतकरी होता. नाना श्रीमंत सावकारांत गणले जाऊं लागले होते. मी एक मोठा सरकारी अंमलदार होतो. यशवंतदादा ट्रेनिंग घेऊन असिस्टंट हेडमास्तर झाला होता आणि कुटुंबाची परिस्थिति बरी असल्यामुळं आमचे दोघे धाकटे भाऊ, श्रीनिवास आणि शंकर - आमच्यासारखी धडपड न करतां शिक्षण घेत होते. श्रीनिवास त्या वेळीं मॅट्रिक झाला होता; पण शंकर मात्र अति लाडामुळं व जात्याच अगदीं कमी बुद्धीचा असल्यामुळं इंग्रजी तिसऱ्या चौथ्या इयत्तांतच घोटाळत होता.

तेव्हां, आतां आम्हां भावांपैकीं प्रत्येकानं, आपापल्या परीनं स्वतःच्या आयुष्याला कमी - जास्त प्रमाणांत स्थिरता आणली होती. तरी, आमच्या बालपणांत जिनं आमच्यासाठीं शारिरीक कष्ट केले होते, हालअपेष्टा सहन केल्या होत्या ती आमची आई सहाजिकच सर्वांची मुख्य व मध्य केंद्र झाली होती. त्यामुळं तिच्या इच्छेप्रमाणं आम्ही आपापल्या कामासाठीं बाहेर असलों, तरी मुलांबाळांसह कल्याणास नानांच्या घरांतच रहात होतों.

मामा व आई ही आमच्या घरांतील वडील मंडळी. शक्य तों त्यांच्या इच्छेबाहेर जायचं नाहीं हा आमच्या घराचा त्या वेळचा अलिखित कायदा! त्यामुळं आमचीं मुलं, आमच्या बायका, किंबहुना आम्ही या साऱ्यांवरच एक प्रकारचं नतिक नियंत्रण करणारीं अशीं मामा व आई हीं दोन माणसं होती! आणि आम्हीहि आमचे मागले दिवस आठवून त्यांच्या लहानसहान हुकमांनासुद्धां नेहमीं मान वाकवीत असूं!....

: ७४७ :

पण आतां गंमत पहा १९०७।८ ची गोष्ट -

आपली बायको व वसंत यांच्यासह घरांत राहून, तेथूनच गांवढ्यावरील व्यवहार नाना संभाळीत असत. नेहमीं त्यांच्या निरनिराळ्या प्रकारच्या वसुल्या आणि धंदे चालूच असत. यशवंतदादाहि आपली बायको, पांडोबा व विठोबा हे दोघे मुलगे वगैरे सर्व मंडळींसह त्या वेळीं कल्याणासाच रहात असत व ते तेथून दादरला शाळेंत मास्तरकीसाठीं जात असत!

माझी नोकरी दिवसेंदिवस वाढत्या पगाराची; आणि नेहमीं मला इकडे तिकडे फिरावं लागे. तरी तुझी आई, व त्या वेळीं हयात असलेल्या तुझ्या बहिणी, असं सारं बिऱ्हाडं मीं तिथंच ठेवलं होतं.

आतां इथंच खरा प्रश्न निर्माण झाला. मामा, नाना वगैरेंचीं उत्पन्नं वार्षिक, व माझं मासिक. यामुळं मी पैशापुरता घरांत जास्त मोठा समजला जात असे! अर्थात्‌च कुटुंबाचा बहुतेक खर्च हळूहळू माझ्याच डोक्यावर पडूं लागला. आणि बाळांनों, इथंच माझ्या नव्या आयुष्यास खरी सुरवात झाली.

: ७४८ :

प्रत्येकाची या वेळची परिस्थिति मी थोडक्यांत आतांच सांगितली असली तरी मी स्वतः मात्र माझ्या आयुष्याकडे एक प्रकारच्या समाधानानंच पहात होतो. मला वाटे, आपले पूर्वीचे गरीबीचे दिवस आतां संपले; आतां आपण सांवरलों! हीं सारीं आपलींच माणसं आहेत; तेव्हां अशा वेळीं आपली मिळकत यांच्याचसाठीं आहे!

आणि केवळ या एकाच कल्पनेनं मी आमच्या कुटुंबाच्या त्या वेळच्या एकत्र स्थितींत साऱ्यांसाठीं सढळ हातानं खर्च करीत असे. माझी स्वतःची वैयक्तिक रहाणी अगदी साधी, सरळ होती. त्यामुळं मला बरीच शिल्लक टाकतां येई. आणि मी तिचा विनियोग माझ्या कुटुंबासाठीं, त्यांतील साऱ्या मुलांबाळांसाठीं, अगदीं आपुलकीनं करी. मला तें माझं खरं कर्तव्य, असंच त्या वेळीं वाटे. त्यामुळंच घरांत शुभकार्य आलं, आजार आला, शिक्षणाचा खर्च आला कीं मी स्वतःच पुढाकार घेई व त्या त्या वेळच्या ऐपतीप्रमाणं त्याला लागणाऱ्या खर्चाला हातभार लावी.

पण अरुण, माझी सुरवातीची अफाट...विस्तृत कक्षा, मी त्या वेळीं माझ्या कुटुंबियांपुरती आणून ठेवली होती; तरीहि, मला पुढं फारच वाईट अनुभव आला!.. तो कसा चमत्कारिक होता पहा!...

: ७४९ :

आतांपर्यंत, आमच्या मामांनी, आमच्या कुटुंबाला वेळोवेळीं अतिशय जीवापाड मदत केली होती. अत्यंत हाल सोसूनच त्यांनीं कांहीं मिळकत गांठीं केली होती. पण आपलं उतार वय झालं, बायको मेली आणि मूलबाळहि नाहीं, या कल्पनेनं ते दुःखीकष्टीच असत. आपल्या पश्चात्‌, आपल्या या



संपत्तीचं काय करावं हें त्यांस कांहींच समजत नसे.

अशा वेळीं घरांत कायद्याचं नीट ज्ञान असलेला मीच काय तो. मजबरोबर तेहि फार प्रेमानं वागत. तेव्हा एके दिवशीं ते एकदम मजकडे आले. मला त्यांनी आपलं त्या बाबतींत मनोगत सांगितलं व कायद्याचा सल्ला विचारला.

त्या वेळीं ते मला म्हणाले, ''अरे जनू, नानाला त्याचं स्वतःचं पुष्कळ आहे. तो आतां चांगला श्रीमंत आहे! तुझीहि परिस्थिति आतां ठीक आहे, वाढेलहि पुढं. श्रीनिवास, शंकर हे तर काय अजून शिकताहेत! त्यांचं भवितव्य अजून लांब आहे पण मला काळजी वाटते ती यशवंताची. तो एक साधा गरीब शाळा मास्तर! बिचाऱ्याचीं मुलंबाळंहि अजून तशी स्थिर नाहींत. तेव्हां माझ्या मतें, माझ्या संपत्तीचा बराचसा भाग - (ती आहे कितीशी म्हणा; सारी बारा चौदा हजार होईल) - यशवंताला व त्याच्या मुलांना मिळावा; आणि कांहीं भाग, तुझ्याकडून मी मागं कधीं कधीं घेतलेल्या कर्जाच्या फेडीबद्दल तुझ्या मुलाला - अरुणला - द्यावा.''

मला त्यांचं हें सारं बोलणं कांहीं अंशीं सयुक्तिक वाटलं व मी त्यांना दादांच्या दोघां मुलांपैकी पांडोबास दत्तक घ्यावं असें शेवटीं सुचविलं.

कारण, उघड होतं - विठोबाचा लटपट्या स्वभाव मला प्रथमपासून ठाऊक होता! तो स्वार्थी होता. एवढंच नव्हे तर वेळ पडल्यास एखाद्या वांकड्या मार्गांतहि शिरणारा उलट्या काळजाचा मुलगा आहे, हें माझा स्वानुभव सांगून त्या वेळीं मामांना मीं पुन्हा एकदां सुचविलं होतं.

तो पूर्वीचा गंभीर प्रसंग त्यांना ठाऊक होता -

: ७५० :

त्याचं असं झालं होतं -

विठोबा पूर्वी माझ्याकडे शिकायला असे. तथापि त्याची त्यांत कसली विशेष प्रगति होईना. अर्थात्‌ त्यामुळंच, त्याच्या सुपीक डोक्यांत नोकरीची कल्पना आली! पण ती मिळवावी कशी याबद्दल मात्र त्याच्या स्वतःच्या अशा कांहीं स्वतंत्र कल्पना होत्या! म्हणून त्यानं सी.आय.डी. खात्याला पत्र लिहिलं, ''तुम्ही ज्यांना मोठे अमलदार समजतां ते माझे चुलते तुम्हांला वाटतात त्याहून निराळे आहेत! त्यांचा एका अराजक कटाशीं महत्त्वाचा संबंध आहे. वाटल्यास ती सारी माहिती मी तुम्हाला पुरवितो; पण मला तुमच्या खात्यानं साठ सत्तर रुपयांची कायम नौकरी दिली पाहिजे. कुठं भेटूं तें कळवा.''

त्या खात्यांतील तो अम्मलदार माझ्या ओळखीचा होता. त्याला तें खरंच वाटेना. तो सरळ माझ्याकडेच आला व माझ्या हातीं एक कागद देत हसत हसत मला म्हणाला, ''हें घ्या वारंट! -

तुम्हांलाच गिरफदार करायला आलो आहे मी, साहेब, आज!''

विठोबाचंच तें पत्र होतं. हस्ताक्षर मी लागलीच ओळखलं. पण मी अर्थातुच नेहमींच्या आमच्या कुटुंबांतील पद्धतीप्रमाणं, आमच्या आईकडे तो न्याय सोपविला व कपाळाला हात लावून स्वस्थ बसलों. आमची आई आपल्या नातवाला थोडीशी रागावली, तिनं माझ्याकडून त्याची उचलबांगडी केली एवढंच! आणि तें प्रकरण तेवढ्यावरच थांबलं. ज्याच्यासाठीं मी निरपेक्षपणें माझा पैसा ओतीत होतों, तोच आपल्या काल्पनिक क्षुद्र स्वार्थसाठीं माझ्यावर असा ''उलटावा'' याचं मला राहून राहून दु:ख होत होतं! - -

याच विठोबाचा मोठा भाऊ पांडोबाहि मजकडे त्यापूर्वी शिकायला होता. तो बिचारा विशेष तैल बुद्धीचा नसला तरी सरळ मार्गी असल्याबद्दल माझी तरी खात्री होती; आणि म्हणूनच मी मामांना, त्याला दत्तक घ्यायला त्या वेळी सुचविलं.

पण मामांचा ओढा या धाकट्या नातवाकडे जास्त! तेव्हां त्यांनीं दोन दिवसांनी मला पुन्हां येऊन सांगितलं, ''जनू, बाबा, मी विठोबालाच दत्तक घ्यायचं ठरविलं आहे विचार करून!''

मला त्यांत कांहींच बोलतां येईना. मी लागलीच म्हणालों, ''बरं! मग तुमचं तुम्हीं पहा!''...

आणि त्यानंतर, महिन्यांभरांतच मामांनीं विठोबाचं लग्न ठरविलं व 'तुला दत्तक घ्यायचं मी ठरविलं आहे,' असंहि त्याला सांगून टाकलं.

: ७५१:

अगदीं लग्नाच्या आदल्या आठवड्यापर्यंत विठोबा कांहीं एक बोलला नाहीं. पण शेवटीं एके दिवशीं त्यानं मामांना सांगितलें, ''माझं तुम्ही लग्न करणार, तर आधीं सारी दत्तकाची व्यवस्था करा! - त्याशिवाय मी मुळीं लग्नालाच उभा रहात नाहीं!''

यामुळे तो वृद्ध प्रेमळ मनुष्य मजकडे अगदीं धांवत धांवतच आला व म्हणाला, ''अरे बाबा, अब्रू जायची वेळ आली! आतां काय करूं तें सांग?'' -

अर्थातच, त्या वेळीं, विठोबाला लागलीच दत्तक घेणं त्यांना भाग होतं. त्याप्रमाणं विठोबाचं दत्तकविधान झालं आणि लग्नहि उरकलं! नंतर मामांनीं आपल्या नातसुनेला दागिन्यांनीं मढवून मोठ्या हौसेनं तिच्या माहेरीं पाठवलं.

लग्नकार्य झाल्यावर, मामांना हायसं वाटत होतं; पण त्यांच्या मनाला मात्र विठोबानं आपल्या फजितीची वेळ आणली होती, हें सारखं जाचत होतं. म्हणूनच, रागाच्या भरांत, आपल्या सरळ स्वाभावाप्रमाणं, विठोबाला ते एकदां झटकन् चिडून म्हणाले, ''गाढवा, तूं फारच माजला आहेस! तुला मी दत्तक घेतलं खरं; पण याद राख! कांहीं देणं, न देणं, हें माझ्याच हातीं आहे अजूनहि!''



: ७५२ :

या शब्दांनी विठोबा दचकला खराच! पण अगदीं निमूटपणं त्यानं एका वकिलाकडे जाऊन त्याचा सल्ला घेतला व मामांना कायदेशीरपणं तसं करणं अजूनहि शक्य आहे हें त्याला स्पष्ट दिसतांच त्यानं त्यांना एक दोन दिवसांतच पत्र लिहिलं,

''लग्न होण्यापूर्वी मी तुम्हाला सांगत होतों, काय असेल तें माझ्या नांवावर करून द्या; नाहींतर विनाकारण घरांत एक माणूस मात्र खायला जास्त होईल!...पण तुम्हीं माझं ऐकलं नाहीं आणि मला शेवटीं बेडी घातलीत!

आतां मात्र तुम्ही विनाकारण काळजी करून म्हणतां आहां!.''मी म्हातारा! - मला कोण विचारील माझं सारं दिलं तर? स्वत:च्या मुलाची गोष्ट निराळी! - तूं आयत्या वेळीं माझी अब्रू घालवीत होतास म्हणून हें मी केलं! आतां तूं माझा दत्तक मुलगा असलास तरी मी मरेपर्यंत कांहीं द्यायचा नाहीं तुला! - कारण मला जो यापुढं प्रेमानं विचारील त्यासच मी देईन!''

आतां हें असं कां? तुमचा जर विश्वास नव्हता तर तुम्ही हें सगळं दत्तकाचं नाटक केलं कशाला?

पण तें कांहीं असो. मला आज इतकंच सांगायचं आहे, कीं, तुम्हाला जें कांहीं द्यायचं असेल तें आतांच तुमच्या हयातींत माझ्या स्वाधीन करा. निदान आर्धी इस्टेट तरी मला मालकी हक्कानं लागलीच मिळाली पाहिजे!

त्या दिवशीं मी पर्यायानं ही गोष्ट काढली, तेव्हां तुम्ही साध्या सेटलमेंटच्या मुळमुळीत गोष्टी मला सांगत होतां! तो नुसता कागद होईल! मागाहून कुळं मला उत्पन्न न देतील असा बंदोबस्त कराल! तुमची पुंजी तुमच्या गांठीं ठेवाल! म्हणजे झालंच कीं सर्व...

तें कांहीं नाहीं! मी म्हणतों तेच अखेरचे शब्द! अर्धी इस्टेट मला आज देत असलं तर ठीक! नाहींतर तुमचा माझा संबंध तुटला...

माझ्या सासऱ्याला मुलगी घरीं पाठवूं नको असं मी लिहिलं आहे! दागिन्यांची तुम्ही चिंता करणं, आशा धरणं अगदीं फुकट आहे! तुम्हांला तुमचे शहाणे शहाणे भाचे शिकवतात आणि तुम्ही ऐकतां! मध्यें आम्हां गरीबांचं आपलं मरण!!...

मग काय? ठरवा काय तें.''

मामा बिचारे या पत्रानं तर अगदीं रडकुंडीस आले, अतिशय घाबरले; आणि पुन्हां माझ्याकडे धांवत आले.

पण मी तरी त्यांस आतां सारं होऊन गेल्यानंतर काय सांगणार?

नांव, वंश, चालवणारा मुलगा गेला, हौसेनं घरांत आणलेली नवी सून गेली आणि आपले

मूल्यवान दागिनेहि गेले!...अशी त्यांची मोठी चमत्कारिक मनःस्थिति झाली होती त्या वेळीं! बरं, ही गवगव्याचीहि गोष्ट नव्हती. आपलीच अब्रू जायची!...

असल्या पेचांत सांपडल्यामुळं, मामा अगदीं ओक्साबोक्सी रडूं लागले व बोभाट न होतां करण्यासारखा उपाय नाहीं, तर निदान हसं तरी नको लोकांत; अशा विचारानं शेवटीं अगदीं नाइलाजानं त्यांनीं विठोबाच्या म्हणण्याप्रमाणं सारं केलं! त्याला निम्मी इस्टेट आपल्या हयातींतच दिली!

त्यांनी तें मृत्युपत्र माझ्या साक्षीनिशी घाई घाईनं केलं व नंतर ते जे चार दिवसांसाठीं म्हणून आपल्या खेडेगांवी गेले, ते तिथंच दुःखानं एकाएकीं मरण पावले!

असे आमचे मामा होते बिचारे! -

: ७५३ :

यांत दुसरी एक भानगड होती! मामांना नेहमीं जमिनी खरेदी करण्याचा मोठा नाद! त्याप्रमाणं मजकडून व अरुणच्या आईच्या स्त्रीधनांतून, वेळोवेळीं कांहीं रकमा उचलून त्यांनीं त्या जमिनींत गुंतवल्या होत्या; त्यांची फेड करण्यासाठीं, तितक्याच किंमतीची जमीन त्यांनीं मृत्युपत्रांत अरुणच्या नांवावर ठेवली होती.

यावरच विठोबा व यशवंतदादा या बापलेकांची माझ्याशीं अनपेक्षितपणं रणं सुरू झालीं!...

नानांच्या बाहेरच्या व्यवहारांत त्यांची नीति - अनीति कशीहि असली, तरी कुटुंबाच्या व्यवहारांत तरी त्यांना नीति समजत असे खास आणि यामुळंच यशवंतदादाच्या गरीबीकडे पाहून ''मामाच्या इस्टेटींतील आपणास एक कपर्दिकहि नको'' असं त्यांनी मृत्युपत्रापूर्वी मामांस स्पष्ट सांगितलं होतं. त्यांचा मजप्रमाणं मामांशीं देण्याघेण्याचा व्यवहारहि नव्हता; त्यामुळं मामांच्या मृत्युपत्राच्या बाबतींतहि नाना तटस्थ राहिले.

माझीहि इच्छा तीच होती. पण अज्ञानाचा पालक हीहि मजवर जबाबदारी होती. त्यामुळं मामांनी तुला, अरुणला, दिलेल्या जमिनीची व्यवस्था करणं मला भाग होतं. त्यावेळीं जमिनीला भाव होता. मी ती विकायला काढली, तेव्हां तिची किंमत माझ्या रकमेहून जवळ जवळ दुपटीपेक्षां जास्त आली!

हें दादांना सहन होईना; तेव्हां ते मधून मधून कुरकुरूं लागले. मामाचं सारं त्यांच्या मुलास मिळूनहि त्यांची ती अरुणच्या जमिनीच्या बाबतींतील चिरचिर मला शेवटीं सहन होईना! मी त्यांना सांगितलं, 'अरुणच्या आईची व माझी जी रक्कम मामांच्या व्यवहारांत इतकी वर्षे अडकली आहे ती मला सव्याज द्या आणि जमीन ताब्यांत घ्या पाहिजे तर! मला तिच्याशीं कांहींच कर्तव्य नाहीं. असल्या क्षुद्र फायद्यासाठीं मी हपापलेला नाहीं!'



पण तेंहि त्यांना पटेना! त्यांना ती सारी जमीन दोन तीनशें रुपयांतच पाहिजे होती. शेवटीं मी माझ्या अडकलेल्या साडेसातशे रुपयांबद्दल, त्यांजकडून फक्त पांचशें रुपये घेतले व त्यांस त्या जमिनीबद्दल हातीं आलेले दोन हजार रुपये दिले

मूर्खपणाचं ठरेल हें कदाचित्! पण त्या वेळीं मी विचार केला, अरुणसाठीं माझ्या हयातींत मी दुसरं मिळवीन! पण दादा वगैरेंचा असंतोष कायम ठेवून साडेसातशें रुपयांना जमिनीची घ्यावयाची ही साडेसाती आपल्याला मुळींच नको.

तेव्हा असा कांहींसा थंडपणें मी विचार केल्यामुळंच तो त्या वेळच्या भांडणाचा प्रसंग टळला!

: ७५४ :

वास्तविक, त्यानंतर तरी प्रत्येकानं प्रत्येकाचे व्यवहार स्वतां संभाळायला पाहिजे होते. कारण, यापुढं मामांच्या इस्टेटीच्या अकल्पित लाभामुळं, यशवंतदादा, त्यांचे मुलगे यांची स्थिती आतां चांगली होती.

पण आमच्या आईच्या केंद्राभोंवती सारीं अजून कल्याणासच एकत्र रहात होतीं. त्यामुळंच मजवर आतांहि पूर्वीइतकाच व पूर्वीप्रमाणंच एकत्र कुटुंबाच्या संसाराचा भार पडत होता!

त्याच्याच आधींची, १९०६/७ ची गोष्ट! आमच्या घरांत एक चमत्कारिक प्रसंग घडून आला. आम्ही तिघे मिळवते होतों. पण आमचे दोघे धाकटे भाऊ श्रीनिवास व शंकर अजून शिकत होते. शंकर शेवटीं शिक्षणाला नालायक ठरला. त्याची उचलबांगडी नानांनीं आपल्या गावंढ्यावर केली. तिथंहि त्याचा ऐदीपणा व बेफिकीरी हीं वाढतच गेलीं होतीं. पण केवळ आईकडे पाहून नानांनीं त्याला तिथं ठेऊन घेतलं होतं.

श्रीनिवास हुषार मुलगा. पण त्याचं लक्ष परीक्षांपेक्षा चित्रकलेकडे, वाङमयाभ्यासाकडेच अधिक होतं. त्याला वाटे, आपण चित्रकार व्हावं. पैशाची विशेष काय जरुरी आहे? तो बराच भावनाप्रधानहि होता. जवळ जवळ अरुणच्याच स्वाभावाचा होता तो!...

इथं तुमच्यांत बसलेली ही कमळी! तिची आई वारल्यावर ती निःसहाय्य झाली होती. तिला तिच्या बापानं पांचशें रुपयांचं शेत ठेवलं होतं तेवढंच. त्यामुळे अरुणच्या आईच्या इच्छेप्रमाणं शेवटीं मी तिला माझ्याकडे आणलं. मला वाटलं, मला बहीण नाहीं; राहील आपल्याकडे. आणि जात्या प्रेमळ मुलगी असल्यामुळं तिनं आमच्या म्हाताऱ्या आईलाहि थोड्याच दिवसांत बराच लोभ लावला. त्यामुळं तिच्याबद्दल कुणालाच परकीपणा वाटत नसे.

: ७५५ :

कमळे, यांना सांगतो आतां तुजविषयीं थोडं हं!

मी त्या वेळीं नोकरीनिमित्त फिरतीवर. घरीं सारीं मुलं. कमळी त्या वेळीं चौदा वर्षाची असेल. ती मराठी सहावी इयत्ता पुरी करीत होती. श्रीनिवास जात्या हुशार, प्रेमळ व भावनाप्रधान, पण धीरगंभीर मुलगा. नेहमीं आपल्याच विचारात गर्क असे. कमळीला त्याच्याविषयीं साहजिकच आकर्षक वाटलं व तें वाढत गेलं. त्यालाहि तिच्याविषयीं कांहींतरी वाटे.

पण दोघंहि त्या बाबतींत बाहेरून अगदीं तटस्थ होतीं.

त्या वेळीं लग्नं लौकर होत. कमळी व श्रीनिवास दोघंहि लग्नास योग्य झालीं होतीं; म्हणून मला दोघांचंहि आकर्षण दिसून येतांच मी कमळीला एके दिवशीं सहज हसत हसत प्रश्न केला.

ती हसली, लाजली व आणि पळाली.

श्रीनिवासला तसंच विचारलं. तोहि कांहीं बोलला नाहीं. तसाच लाजून पळाला.

तेव्हा मी ठरविलं, त्यांचं लग्न जमविणं बरं....

म्हणून मी ती गोष्ट, आई, नाना व दादा यांच्याकडे काढली. आई कांहींच बोलली नाहीं. फक्त एवढंच म्हणाली, ''अरे, सख्ख्या बहिणी सख्ख्या जावा कशारे होणार?''

दादा म्हणाले, ''तो काय मिळवता आहे? त्यालाच आम्हाला पोसावा लागतो. आणि लग्न करायचंच तर चांगला हुंडा तरी मिळाला पाहिजे. ही गरीबाच्या कफल्लक पोरीची धोंड काय कामाची?''

: ७५६ :

या अकल्पित कल्पना मध्यें आल्यामुळं, माझा तर अतिशय विरस झाला. मला रूढी कळत होती; पण अंधभक्ति आवडत नव्हती. पैसा समजत होता; पण कमळीची किंमत व त्या दोघांचं सुखहि समजत होतं! पण आई वगैरे बऱ्याच मंडळींच्या विरुद्ध जाणंहि अशक्य! त्यामुळं शेवटीं मी तो नादच सोडला!...

त्याच सुमारास एका विधवेची एकुलती एक पण अधू मुलगी, हुंडा व घर सारं कांहीं देऊन, शंकरला सांगून आली! साऱ्यांनीं एकदम हो म्हटलं व तोहि लागलीच लग्नाला कबूल झाला. पण श्रीनिवास मधला. तेव्हां त्याचं लग्न रूढीप्रमाणं धाकट्या भावाच्या लग्नापूर्वी झालंच पाहिजे. म्हणून शेवटीं नानांनींच एक मुलगी पाहून ठरविली.

दोघांची लग्नं बरोबरच एका मांडवांत झालीं. श्रीनिवास निमूटपणें साऱ्या गोष्टींना कबूल झाला. लग्नानंतर त्यानं कांहीं तरी मिळावायलाच पाहिजे असं सर्वांनी ठरवितांच त्यानं शिक्षण थांबवलं व नोकरी धरली...

मी त्याच वर्षी मनांतल्या मनांत कष्टी होऊन, कमळीला दुसरं स्थळ पाहून, तिचं लग्न करून दिलं!

त्यानंतर दीड वर्षानंच अरुणचा जन्म झाला. त्याच सुमारास श्रीनिवासची बायकोहि एका मुलाला



- जयंताला - जन्म देऊन, बाळंतपणांतच वारली! मी त्या वेळीं फिरतीवर होतो....

एके दिवशी मला जयंत व अरुण आजारी असल्याचं पत्र आलं. आणखी एका पंधरवड्यानंतर दुसरं पत्र आलं त्यात जयंत वारला, आणि त्यानंतर तीन चार दिवसांनीं श्रीनिवास घरांतून एकाएकीं नाहींसा झाला अशी हकिकत होती. चार दिवसांची रजा काढून मी घाईघाईनं घरीं आलो पण श्रीनिवासचा कांहींच पत्ता नव्हता!

शेवटीं बरीच खटपट करून आम्ही तो नाद सोडून दिला.

: ७५७ :

आजपर्यंत, आम्हाला त्याचा शोध लागला नाहीं!...

माझ्या भावाचा एकाएकीं झालेला वियोग मला अजूनहि दुःख देत आहे. त्यानं जगांत कांहीं तरी नांव काढलं असतं खास!...पण आतां काय त्याचं? तो कुठं असेल कुणास ठाऊक!!...

कमळे, पण तूं मात्र खरी धीराची!...पुढील मोठ्या आशा उराशीं बाळगून वागतां वागतां, तुझं सारं आयुष्यच त्या वेळीं एकाएकीं बदललं. पण तूं आल्या परिस्थितींत, आजपर्यंत इतकीं वर्षे, सारी दुःखं मनांतल्या मनांत मुकाट्यानं दडपून वागत आलीस! एक आदर्श पत्नी, या दृष्टीनं जगानं तुझ्याकडे पाहिलं! मुलांच्या संगोपनांत मागील सारं विसरण्याचा प्रयत्न करून, तू संसार केलास, केवढं हें तुझं धैर्य!! तुझी कुचंबणा होत होती याची कल्पना मला आतांपर्यंत नव्हती!...मृत्युपूर्वी मला त्यामुळं थोडंतरी दुःख झाल्यावांचून रहाणार नाहीं.

पण...जाऊं द्या....विसर त्या साऱ्या गोष्टी...आतां आपल्या मुलांकडे पाहूनच तुला यापुढचं आयुष्य घालवायचं आहे!...

कमळे, आज मी हें सारं सांगत असतांना, मागील आणखी अनेक गोष्टी तुला आठवत असतील, नाहीं? मलाहि आठवतात. पण पोरी, पूस ते डोळे...

आपल्या माणसांसाठीं त्याग करतांना माणसाच्या मनाला जें समाधान वाटत असतं, तें फार मोठं असतं; असा मला तरी अनुभव आहे! तुलाहि आला असेल आतापर्यंत!....

म्हणून म्हणतो, माझ्याप्रमाणंच तूंहि आतां डोळे पूस. मला अजून तुम्हाला दुसरं पुष्कळ सांगायचं आहे.

करूं ना सुरवात पुढच्या कांहीं गोष्टींची?...

: ७५८ :

वसंत थांबला. तिघांनींहि कमळामावशीकडे पाहिलें.

ती बाजूला मान वळवून उगीच एका कोपऱ्यांत शून्यपणें पहात होती. तिच्या डोळ्यांतून अश्रु

वहात होते...

कोणीच कांहीं बोललें नाहीं. थोडा वेळ शांतता होती!

वसंत पुन्हा पुढें वाचूं लागला -

: ७५९ :

एकत्र समजून मी वागत होतो, त्या आमच्या कुटुंबांतील माणसांची मनोवृत्ति कशी होती तें आतां पहा.

मला वाटे, माझ्यासारखींच हीं सारीं आपपरभाव सोडून वागत आहेत. मला लहानसहान बाबतींत वाईट अनुभव येत; तरी पण मी तिकडे लक्ष देत नसे. आमच्या वृद्ध आईकडे पाही व माझे व्यवहार तसेच पुढें चालू ठेवी.

दादा वगैरे मंडळी बाजूस होईनात; पण तिकडे मी दुर्लक्षच केलं. आतांपर्यंत मी जसा वागत आलो होतो तसंच पुढेंहि चाललं होतं. श्रीनिवास व शंकर यांच्या लग्नासाठीं मी जवळ जवळ दीड हजार रुपये आईच्या हवालीं केले. मला उघड उघड दिसत होतं,...दुसरा कुणीहि माझ्याप्रमाणं कुटुंबाच्या व्यवहारास मदत करीत नाहीं!...तरीसुद्धां माझं कर्तव्य समजून मी तें करीत असे....

या माझ्या सौजन्याचं कुटुंबांतल्या माणसांकडून झालेलं चीज हें पहा!...एक दोन चित्रं मी तुमच्यापुढं उभीं करतो...

: ७६० :

अशक्य म्हणून, श्रीनिवासच्या स्थळाचा नाद मी सोडला आणि या तुझ्या कमळामावशीचं लग्न शेवटीं, मी वासुदेवरावांशी जमवलं. कुणी आपण होऊन लग्नाच्या खर्चाबद्दल गोष्ट काढीना. मीच सारी व्यवस्था करीत होतो. आयत्या वेळीं दोनशें रुपयांची तूट पडली.

दुसऱ्या कुणाकडे जाण्यापेक्षां आपल्या घरांतच ही रक्कम मिळाल्यास पहावं असं मला वाटलं. नानांकडे ती रक्कम मिळेल म्हणून मी त्यांच्याकडे शब्द टाकला. त्यांनी मला दोन चारदां झुलवून, शेवटीं नाहीं म्हणून सांगितलं!

तेव्हां मी ताबडतोब बाहेरून माझ्या एका सधन मित्राकडून ती रक्कम आणिली आणि एकदांचं तें हातीं घेतलेलं शुभकार्य वेळेवर तडीस नेलं.

कार्याला सगळीं माणसं हजर होतीं. पण हरएक प्रकारचा खर्च माझ्या एकट्याच्या खिशांतून होत होता.

नाहीं म्हणायला, कांहीं कामासाठीं म्हणून मी बाजूस गेलो असतां, एक पाहुणा आला, त्यावेळी एकदां टांग्याचे चार आणे नानांकडून खर्च झाले, ते माझ्याकडून नानांनी घेतले नव्हते! एवढीच काय



ती एकत्र कुटुंबाची त्या वेळीं मला झालेली मदत! माझ्या तें पक्कं लक्षांत राहिलं होतं!...

अगदीं क्षुल्लक व उपेक्षणीय गोष्टच ही वास्तविक पण माझा राग आंतल्या आंत धुमसत होता. तरीहि मी वरून थंड होतो. आपण त्यांच्यासाठीं एवढें करूनहि वेळीं हे कुणी मला मदत करीत नाहींत; मग मी नानांच्या चार आण्याकरितां तरी ओशाळें कां रहावं? म्हणून मी ते चार आणे पुन्हा सरकारी कामानिमित्त जातांजातां नानांना देण्याकरिता म्हणून आईजवळ देऊन ठेवले...

: ७६१ :

तेवढं मात्र त्यांना झोंबलं. पण दांभिक त्रागाशिवाय त्यांच्याकडून कांहींच झालं नाहीं. त्यांनीं कांहींशा रागानंच मला त्या वेळीं पत्र लिहिलं. त्यांतील कांहीं मजकूर असा -

"आपली मेहुणी, चि.सौ. कमळी इचें लग्न तर ईश्वरेच्छेनें पार पडलें. त्या कामीं मजला कोणत्याही प्रकारची मदत करतां आली नाहीं. लोकांनीं बरीच मदत केली व आम्ही कांहीं विशेष केलें नाहीं; हें आम्हास लांछन तर खरेंच.

परंतु खरा प्रकार काय तो माझा मलाच ठाऊक! मजकडे फारशी शिल्लक नाहीं. आहे ती सावकारींत गुंतलेली. शेतीचें उत्पन्न मनाप्रमाणें येत नाहीं आणि हें साल तर फारच कठीण गेलें.

चालू सालीं ३००० रु. चे भात विकलें.

किंमत आली म्हणून ४००० रु. ची जमीन विकली.

घरचें सोनेंहि ४० तोळे (रु. १००० चें) विकलें. आता खर्च कसा झाला पहा -

एक हजार सरकारधारा भरला. दोन हजारांची नवीन जमीन घेतली. एक हजार जमिनींत खर्च केले. जमीनीची मशागत वगैरेसाठीं किरकोळ खर्च पांचशे झाला. गवताचा धंदा केला त्यांत पांचशें नुकसान आलें. घरांत खर्च दोन हजार झाला. कल्याणला एक लहानसें घर विकत घेतलें त्यांस पंचवीसशें दिले. म्हणजे जवळ जवळ पांचशें रुपये उचलण्याची पाळी आहे आतां कुणाकडून तरी -

आणि माझ्या अशा अडचणींत आपल्याकडे लग्न निघालें व मला आपणास नाइलाजानें कांहीं मदत करितां आली नाहीं. म्हणूनच कदाचित् जातांना आपण माझ्यासाठीं आईकडे ठेवले ते चार आणे मला मिळाले. लग्नांत मीं ते माझ्या खिशांतून खर्च केले याची आठवण ठेऊन, आपण ती रक्कम मला इतक्या लौकर परत केलीत याबद्दल मी आपला फार आभारी आहे. मला खरोखरच त्यांचा उपयोग फार झाला.

"हे जसे आपण आठवण ठेवून दिलेत, तसेच मागें आपल्या मुलीच्या आजारांत मी १।। - २ शें रु. खर्च केला होता त्याची आठवण ठेऊन आज तेहि दिले असतेत तर फारच बरें झालें असतें. कदाचित् ती आठवण आपण विसरलां असाल म्हणूनच कळवीत आहे..."

यांत वास्तविक खोट्या त्राग्याशिवाय कांहीं नव्हतें. आणि मी इतकं माझं सर्वस्व खर्च करीत असतां, नानांनीं कधीं माझ्या गैरहजेरींत खर्च केला होता, त्यांचे मजवरील उपकार मात्र या वेळीं त्यांनीं काढून दाखविले! तें तर माझ्या मनाला अतिशयच झोंबलं....

: ७६२ :

तरी पण मी शांतपणें सारं सहन करून, पुन्हा पूर्ववत् चालूं लागलो.

इतकंहि करून, कुणी माझ्या माणसांच्या आजारांत धांवून मदत करीत असे का?....छे! -

अरुणची आई अत्यवस्थ होती. मी व कमळी तिच्या शुश्रूषेंत, रात्रींच्या रात्रीं घालवाव्यात!

एकदां माझी प्रकृति बरोबर नव्हती. तरी मी तिजजवळ बसून होतो. मग तीच म्हणाली, ''तुम्हीं जा, झोंपा. पांडोबा किंवा दुसरा कोणी तरी येऊन बसेल कीं, माझ्याजवळ! - ''

मी त्याला बोलावून आणण्यास कमळीला सांगितलं. पण ती परत येऊन मला म्हणाली - ''बाबा, दादा म्हणतात, की आजारीपणा असला म्हणून सगळ्यांनाच कां जाग्रण?''

तें ऐकून मला किती वाईट वाटलं! तिला पुन्हा पाठवलं व म्हटलं ''सांग पांडोबाला,म्हणावं, 'बाबा बोलावताहेत तुला.' माझ्या निरोपानं पांडोबा आला व तो तास दोन तास अरुणच्या आईला आळशीच्या पिठानं शेकीत बसला. त्याला थोडी तरी कृतज्ञता होतीच कीं!

इतक्यांत पडल्या पडल्या मला पलीकडल्या खोलींत, दादांचा शब्द ऐकूं आला म्हणून मी उठून तिच्या खोलींत आलों - तों दादा दारांत उभे राहून म्हणत होते - ''हे काय - श्रीमंत लोक आहेत! त्यांना रे काय? नर्ससद्धां आणतील ते! - पण पांडू, तुला उद्या नोकरीवर जायचं आहे! - आणि पुन्हा रोग अगदींच असाध्य आहे हें ठाऊक आहे ना साऱ्यांना?''....

अरुणच्या आजारी आईच्या देखतच असले बेफिकिरीचे शब्द त्यांनीं उच्चारले! तें पाहून मात्र, माझा संताप आनावर झाला! - कधींहि रागावलों नव्हता इतका मी त्या वेळीं एकदम रागावलो!

तरी पूर्वीपासूनचा मनावरील संस्कार कायम असल्यामुळं, दादांना मी शक्य तितक्या सौम्य शब्दांत म्हणालों, ''हो - दादा, मला ठाऊक आहे माझ्या बायकोचा रोग अगदीं असाध्य आहे तो. पण म्हणून तुम्ही म्हणतां त्याप्रमाणं रोग्याला जिवंत उचलून तर स्मशानांत नाहीं ना ठेवायचं? आराम पडावा म्हणून खटपट करतांना जर उपयोगी पडणार नाहींत कोणी अडल्यावेळीं, तर माणसं तरी कशाला इतकी खंडीभर घरांत?''

माझ्या या शब्दांनीं दादा चपापून गप्प झाले; व आल्या पावलींच झोंपायला निघून गेले.

: ७६३ :

नंतर थोड्याच दिवसांत अरुणच्या आईचं जास्त झालं आणि तिला घोर लागला. औषधोपचारासाठीं कमळी व मी धांवत होतों, त्या वेळी घरांतील इतर मंडळी मात्र जेवण उरकून घेण्यासाठीं स्वयंपाकघराकडे धांवत होतीं.

कमळे, आठवतात हे सारे प्रसंग तुला? त्या दिवशीं, अरुणची प्रेमळ आई, तुझी एकुलती एक बहीण व माझी साध्वी पत्नी, शेवटीं आपल्याला सोडून गेली! पण मी माझं कुटुंब म्हणत होतो, त्यांतील इतर मंडळी आपल्याच सुखसोयींत चूर होती!...

असं हे आमचं एकत्र कुटुंब! त्यांतून बाहेर पडावं; पडू नये; असल्या दोलायमान मनःस्थितींत मी त्यावेळी होतो.

तरीहि पुढं चार वर्षे तशींच कशीबशीं ढकललीं. अरुण त्या वेळीं नऊ दहा वर्षांचा झाला होता. मी तसाच पूर्वीप्रमाणं धडपडत पुढें चाललो होतो.

प्रत्येक गोष्टीला कळस असतो असं म्हणतात. तसंच या बाबतींत झालं आणि त्यामुळें निदान मी तरी आमच्या कुटुंबापासून बाजूस सरलो...

तो प्रसंगच ठेवतो तुमच्यापुढं आतां......''

: ७६४ :

कमळामावशीनं अरुणला जवळ घेतलं व वसंताचा हात धरून त्याला थोडा वेळ थांबवण्यास सांगितलं - तिला आपल्या बहिणीची सारखी आठवण होत होती. बाबा दृष्टीपुढें उभे करीत असलेले सारे प्रसंग तिच्या समोरून भरभर जात होते. राहून राहून तिला आश्चर्य वाटत होतें, ''बाबा सांगत सांगत आपल्या बहिणीच्या मृत्यूपर्यंत आले, तरी अजून एक गोष्ट मागं लपवून कां ठेवीत आहे या साऱ्यांपासून?'' -

पण मग तिला वाटलें, 'आपल्याला या क्षणीं जरी समजत नसला, तरी बाबांचा त्यांत कांहीं तरी हेतु असेल!' -

तिनें आपल्या मनाचें समाधान केलें आणि अरुणच्या पाठीवर हळूच थोपटत ती त्याला म्हणाली, 'अरुण तुझी आई - माझी बहीण - खरोखरच एक प्रेमळ साध्वी होती. पुढं तिच्याविषयीं कांहीं तरी सांगितल्यावाचून बाबा खास रहाणार नाहींत! -

वसंताकडे व अरविंदकडे वळून मंद स्वरांत ती म्हणाली, 'हं चालूं दे वसंत, पुढं!'

***

: ७६५ :

''यानंतरहि मी आणखी सुमारें सहा वर्षे एकत्र कुटुंबाशीं निगडीत होतो. त्या अवधींत जे लहानसहान प्रसंग घडले असतील ते माझ्या बरोबरच नाहींसे होतील -

बाळांनो, हीं जी माझ्या भोंवती माणसं होतीं, त्यांची मनोवृत्ति अगदींच निराळी होती! त्यांना दुसऱ्यापासून सुख...लाभ...सारं कांहीं पाहिजे होतं. पण दुसऱ्यासाठीं त्यांना कांहीं करायला नको होतं. तरी मी शांत मनानं मला जें माझं कर्तव्य म्हणून वाटलं ते माझ्या पद्धतीनं करीतच असे. दोन तीन प्रसंग मात्र माझ्या हृदयाला शल्याप्रमाणं बोचल्यावांचून राहिले नाहींत.

: ७६६ :

वसंत, तुझे नानाच पहा - एकंदरींत कर्तृत्ववान् मनुष्य तर खराच. पण त्यांनाहि क्षुद्र स्वार्थ सुटत नव्हता. पैशाचा वेडा कैफ त्यांच्या डोक्यामध्यें धिंगाणा घालीत होता -

तुझी आई त्यांच्या अगदीं विपन्नावस्थेंत त्यांच्याबरोबर झगडत झगडतच वैभवास पोहोंचली. धडधाकट निकोप प्रकृतीची, करारी व सुस्वरूप चेहऱ्याची ती आमची मोठी वहिनी अगदीं घरांतील लक्ष्मीच शोभे! -

अरुणची आई वारली, त्यानंतर पंधरवड्यांतच ती डबल निमोनियानें एकाएकीं आजारी झाली. कांहीं नाहीं, कांहीं नाहीं, म्हणत, शेवटीं तिचं दुखणं विकोपास गेलं तेव्हां कुठं नानांनीं गांवड्यावरून तिला कल्याणास आणून ठेविलं!

अरुणची आई एकाएकीं मला सोडून गेली होती म्हणून त्या निराश, विषण्ण मनःस्थितींतच मी घरांत वावरत होतो. इतक्यांत रोगाची प्रथमपासूनच आबाळ झाल्यामुळं, वहिनीहि शेवटीं तिच्या फटकळ स्वाभावाप्रमाणं नानांना खूप शिव्या देत देत, बघतां बघतां मरण पावली!

तिचं प्रेत पाहून, मला माझ्या नुकत्याच निघून गेलेल्या प्रिय पत्नीची आठवण झाली. वहिनीच्या अंत्यविधीची व्यवस्था चालली होती. सवाष्ण बाईला लागणारं सर्व सामान आणण्यांत आलं होतं. पहीलं अंगावरील सारं कांहीं काढून नाना तीं नवीन लेणीं वहिनींच्या अंगावर घालीत होते. त्या सामानांत असलेलं नकली मंगळसूत्र पाहून, नानांनीं मृत वहिनीच्या गळ्यांत असलेल्या मंगळसूत्राला हात घातला!

तो प्रकार दारांत उभा राहून मी लांबून मुकाट्यानं पहात होतो.

मला शेवटीं अगदीं रहावेना. मी झपझप त्यांच्या जवळ गेलो; आणि मोठ्यानं ओरडून जड आवाजांत नानांना म्हटलं, 'नाना, काय हें? जी साध्वी तुमच्या घरांत जन्मभर खपली...तिच्या मानाचं व हक्काचं मंगळसूत्रहि सोडवत नाहीं ना तुम्हाला?... त्याची किंमत ती काय? आणि तिची किंमत केवढी?''

माझ्या या शब्दांनीं नाना फार बिचकले!...त्यांनी त्या प्रेतावर ते जन्मभर गळ्यांत असलेलं खरं मंगळसूत्र तसंच ठेवून दिलं; आणि गोंधळलेल्या चेहेऱ्यानं मजकडे पहात ते तेथून उठून गेले!



त्या प्रसंगामुळं मला मात्र कितीतरी दिवस चैन पडत नव्हतं!...

: ७६७ :

त्यानंतर माझ्या घरांतील मुलींचे तीन मृत्यू!

त्या वेळींहि मला स्वतःलाच साऱ्या व्यवस्था कराव्या लागल्या. एवढं मोठं गजबजलेलं घर! पण रात्रीं अगदीं सामसूम असे. मी, माझे तैनाती शिपायी, व आमचा मुरारी, यांच्यांतच रात्रीच्या जाग्रणाच्या पाळ्या होत! आई बिचारी मधून मधून ओरडे व कधीं कधीं तर स्वतःचें म्हातारपणहि विसरून माझ्याजवळ रोग्याच्या बिछान्यापाशीं थोडा वेळ बसे.

त्यांच्या मृत्यूनंतर फक्त माझं सांत्वन करण्यासच बाकीचे येत. हे प्रसंग माझं हृदय पिळवटून काढीत! पण या साऱ्या प्रकारांची अगदीं शेवटचीच मर्यादा आली होती; म्हणनूच कीं काय कुणास ठाऊक; त्यानंतर वर्षा दीड वर्षानंच एक प्रसंग घडून आला! -

तो मी जन्मांत कधीहि विसरणार नाहीं.

: ७६८ :

सारी मंडळी घरांतच होती. यशवंतदादा, यशोदावहिनी, त्यांचे दोघे मुलगे, त्यांच्या बायका, नाना, शंकर, वसंत, अरुण व इतर लहान लहान मुलंहि घरांत होतीं. माझं दुसरं लग्न झालं होतं. सुनीतीची आई तिला जन्म देण्याकरिता माहेरी गेली होती.

नोकरीनिमित्त फिरतीवर जाण्यापूर्वी मी नेहमींप्रमाणं दहाबारा दिवस पुरेल इतका दाणागोटा घरीं आणून ठेविला होता -

फिरतीवर माझा मुक्काम कामानिमित्त आठदहा दिवस आणखी वाढला. त्या दिवशी मी घरी उशीरांच पोंहोचलो होतो. घरी आल्यावर सारी मुलं सुखरूप आहेत हे पाहून मला समाधान वाटलं. शांत मनानं पूजाअर्चा करून मी पाटावर जेवायला बसलों.

सर्व मंडळींचीं जेवणं होऊन स्वयंपाकघरांत नेहमींप्रमाणेच सामसूम होतं. मुरारीची एकट्याचीच काय ती पाटपाणी ठेवण्याची, वाढण्याची धांदल चालली होती. शेवटीं, त्यानं ताट वाढून माझ्यासमोर आणून ठेविलं.

मी माझ्याच विचारांच्या तंद्रींत असतांना, चित्राहुती घालून आमटीचा भुरका मारला. ती बरीच अळणी होती; मला एकदम ठसका लागला. तरी मी नेहमींच्या स्वभावामुळं कांहींच बोललो नाहीं.

भाजी खाऊन पाहिली तीहि अळणीच!

क्षणभरच माझ्या रागाची तिडीक मस्तकाला गेली! मन मोठ्या प्रयासानं आवरून अर्धवट रागानंच मुरारीला म्हणालो, ''तुझं डोकं ठिकाणावर आहे कारे आज? सर्व जिनसा अळणी केल्या

आहेत त्या! थोडं मीठ आण पाहूं इकडे! - ''

मुरारी थोडा वेळ थांबून, तसाच उभा राहिला. मी पुन्हा म्हणालो, ''मीठ आण म्हणतो आहे ना मी?'' -

तेव्हा तो हळूच म्हणाला, ''मीठ संपलं बाबा घरांतलं! होतं तेवढं वापरलं मी! -

: ७६९ :

मी केवढ्यानं तरी दचकलो. प्रथम मला त्याचा अर्थच कळेना. घरांतलं मीठ संपतं? - म्हणजे काय? - माझं डोकं तर अगदीं सुन्न झालं! -

मी मुरारीला म्हणालो, '' अरे, वेळेवर वाण्याकडून मीठ आणायचं नव्हतं का?''

मुरारीनं घाबरत घाबरत मजकडे पाहिलं. क्षणभर घुटमळून म्हणाला, ''हो बाबा, पण मिठाला पैसे पाहिजेत असं मी दोन तीन वेळा म्हणालों; तरी कुणीच कांहीं बोललं नाहीं...''

''नाना, दादा, कुणीच नव्हतं घरी?''

''ओटीवर बसले आहेत कीं!'' त्यानं सूचक उत्तर दिलं...

मला एकदम भडभडून आलं. मी नेसलेल्या सोवळ्याच्या कदानं नाक पुसलं व पुढं न जेवतांच आचमन घेऊन कसा बसा ओटीवर आलो.

मुरारीनं त्या दिवशीं मला खरोखरच दिव्यदृष्टि दिली. त्याला स्वतांच्या खिशांतून त्या दिवशीं मिठाला एक आणा खर्च करिता आला नसता असं नाहीं.

पण इतकीं वर्षे तो माझ्या संगतींत राहिला होता -

तो आचारी - साधा स्वयंपाकी खरा!...पण मोठा धोरणी! त्याला माझ्या घराचं खरं स्वरूप मला दाखवायचं होतं!

एवढा - दुःखांकडे कठोर मन करून चालणारा - मी!..पण त्या दिवशीं बिछान्यांत एकटा किती तरी वेळ मी रडत, तळमळत, पडलो होतो!...

: ७७० :

इतका पगार मी मिळवतो तो कशासाठीं...? माझ्या घरांत माझी किंमत आज काय आहे? स्वतः फारशी शिल्लक न टाकितां माझ्या कुटुंबासाठीं मी इतकी झीज सोसली त्याचं फळ म्हणजे आजची ही निमकहरामी का?''

आणि माझीच जिथं किंमत नाहीं, तिथं संकटकाळीं माझ्या पोरक्या मुलांची काय स्थिती होईल?

तें मनोमय भीषण दृश्यच - रात्रभर माझ्या मनाला पुन्हा पुन्हा भेडसावीत होतं! -

मी कुणी मोठा समाज - सेवक नव्हतो. पण माझं कुटुंब हेंच माझ्या कार्याचं क्षेत्र समजून तोपर्यंत



तरी मी सर्व प्रकारें वैयक्तिक झीज सोशीत आलो होतो. आणि याच कुटंबांतील माणसांची ही आज अगदीं सूर्यप्रकाशाप्रमाणं स्पष्ट दिसून आलेली वृत्ति!

बिछान्यावर पडल्या पडल्या माझं मन मला पुन्हां पुन्हां सांगूं लागलं, ''वेड्या, तसं पाहिलंस तर जगांत कुणी कुणाचं नाहीं बरं! - स्वतःची वैयक्तिक परिस्थितीच शेवटीं हीं सुखदुःखं निर्माण करते!''

मी धडपडून उठलो; दिवा लावला आणि माझा जमाखर्च पाहिला.

वीस वर्षांच्या वाढत्या पगाराच्या सरकारी नोकरीनंतरहि त्या तारखेला माझ्याकडे सारे दहा हजारच शिल्लक होते! - अरुणचं सारं शिक्षण, सुनीतीचं भवितव्य! आणखीहि सारं सारं...तेवढ्यावरच संपवायचं होतं! त्या भयानक विचारामुळं मला एकदम वाटूं लागलं, माझ्या जिवाला अचानक अगदीं या क्षणींच - काहीं तरी झालं तर माझ्या पश्चात् पोरांचं काय होणार? पांच हजारांचे दोन विमे त्यांना कितीसे पुरणार? -

त्या अस्वस्थ रात्रीनंतरच, दुसऱ्या दिवशीं पांच पांच हजाराचे आणखी दोन विमे उतरण्याची मी खटपट केली व पांच चार दिवसांत उतरलेहि! - पण त्याच वेळी मनांत ठरवलं, ''झालं तेवढं पुरे! कुटुंबाविषयींच्या आपल्या व्याख्येची कक्षा याहूनहि संकुचित व्हायला पाहिजे आहे! सौम्यपणें, शांतपणें, कां होईना - पण आपल्या कुटुंबाशीं असलेला आपला असला वेडा आपुलकीचा संबंध, - हळूहळू आंखडूनच घेतला पाहिजे!'' - आणि देवाच्या दयेनं, त्याच वेळीं, माझी ॲक्टिंग कलेक्टर म्हणून अहमदाबादेस बदली झाली. तेव्हा त्या संधीचा फायदा घेऊन तिथूनच मी घरीं आईला व नाना-दादांना उद्देशून पत्र लिहिलं, - ''वारंवार बदली होत असल्यामुळं मला तिथलं बिऱ्हाड हलविलं पाहिजे. प्रत्येक नव्या ठिकाणी ने-आण करतांना सामानाची बरीच धूळदाण होते. माझं कामहि आतां वाढल्यामुळं वारंवार घरी येणं मला शक्य नाहीं. तरी तेथील सर्व व्यवहार आपणच संभाळून घ्यावेत. मला सवड होईल तशी मी शक्यतोंवर मदत करीनच...

दादांचं त्या सौम्य शब्दांनींहि पित्त खवळलं; पण नाना व आई हीं मात्र निमूट राहिलीं!...

याच सुमारास विठोबा दादरवरील शंकरच्या घरांत कामधंद्यानिमित्त राहूं लागला. पांडोबालाहि तेथून नोकरीवर जाणं जास्त सोईस्कर वाटल्यामुळं तोहि तिथं गेला.

पुढलीं आठ नऊ वर्षे नाना थोडी मदत करीत. मीहि मधून मधून कांहीं रकमा घरीं पाठवी. पण दादांचा लोभ दिवसेंदिवस वाढत गेला आणि तें पाहून नानांनीं शेवटीं थोड्या रागानंच आपल्या मुलाकडे जाऊन रहाण्यास दादांना सांगितलं.

दादा प्रथम चिडले. पण मग एके दिवशीं, आपणच सौम्यपणें जुळतं घेऊन दादरला जाऊन राहिले!

त्यांना पेन्शन मिळालं होतं. जातांना यशोदावहिनीनं ''आपलें'' ''आपलें'' म्हणून घरांतील बरंचसं सामान नेलं! पण एकंदर परिस्थितीकडे पाहून नानांनीं त्याला फारशी आडकाठी घेतली नाही.

आई कल्याणासच असल्यामुळं आम्ही मात्र मधून मधून तिकडे जात असूं...

: ७७१ :

हीं सात आठ वर्षे माझ्या कुटुंबाच्या दृष्टीनं थोडी फार शांततेंत गेलीं. माझा पगार वाढता होता, पण राहणी पूर्वीप्रमाणंच होती. त्यांत आणखी शक्य ती कांटकसर करून मी मुलांकरितां शिल्लक टाकीत होतो. आतां तेंच माझं कर्तव्य असं मला वाटत होतं. त्यामुळं मी बाकीच्या मंडळींच्या व्यवहाराकडे फारसं लक्ष देत नव्हतो. माझ्या मुलांसाठीं मी घरहि बांधायला घेतलं होतं -

नाहीं म्हणायला शंकरच्या घराची भानगड उपस्थित झाली होती. त्या वेळीं आम्हांस थोडं मध्यें पडावं लागलं - तरी पण नाना काय, मी काय, थोडेसे तटस्थच होतों. कारण आम्हाला आमच्या अळवाची खाज ठाऊक होती!

अरुण! त्या वेळीं तुझ्या सरळ मनाची ध्येयवादी धडपड मी जाणत होतो; तुला माझ्या अनपेक्षित तटस्थपणाबद्दल माझा रागच आला असेल.

वसंत, दादांनीं शंकरला लुबाडलं व नाना त्याबाबतींत कांहींच बोलत नाहींत, म्हणून तुला दुःख झालं असेल.

अरविंद, - तुम्ही आमच्या लोकांच्या या साऱ्या व्यवहाराकडे पाहून, त्या वेळीं मनांतल्या मनांत हसलां असाल.

कमळे, तूं त्या वेळीं तिथं नव्हतीस पण अरुण - अरविंद त्यांनी सांगितल्यावर तुलाहि माझा थोडा तरी राग आला असेलच.

पण वेड्यांनों, जगाचे व्यवहार इतके साधे व सरळ नसतात! -

अरुण, कदाचित् त्यामुळंच चिडून तूं माझ्या इच्छेविरुद्ध शांतिनिकेतनला निघून गेला असशील. पण बाळ, तूं निघून गेल्यानंतर थोड्याच दिवसांत आमच्या कुटुंबांत दादांनीं पेटवलेला कौटुंबिक कलहाचा वणवा नीट पाहिलास का? - केवळ मी सरकारी नोकरी होतो म्हणूनच तो फार दिवस धुमसत राहिला नाहीं. आमची आई श्रेष्ठ दर्जाची करारी स्त्री म्हणूनच त्याला शेवटीं - समेटाचं स्वरूप तरी आलं.

हें सर्व खरं...पण काय? मिळविलेलं सारं नांव, सारी अब्रू दादांनीं पैशासाठीं केलेल्या आपल्या खोट्या, क्षुद्र, दुष्ट धडपडीमुळं अगदीं चव्हाट्यावर आणली! शिवाय त्यामुळं झालेले मनस्ताप व



पैशाचा व्यर्थ अपव्यय, हीं दोन्ही कांहीं टळलीं नाहींतच!...

त्याविषयीं मी जास्त कांहीं सांगत नाहीं इथं...हीं माझ्याजवळचीं कांहीं प्रत्यक्ष पत्रंच पहा!...मला खात्री आहे, तुम्हाला वाटेल कीं आम्ही - निदान मी स्वतःतरी...क्षुद्र बुद्धीनं जगणारा, केवळ पैशासाठी हपापलेला नीच द्रव्यलोभी मनुष्य नव्हतो!...

: ७७२ :

वसंत थोडा वेळ विसाव्यासाठीं थांबतांच, खोलींत पुन्हा शांतता नांदूं लागली.

कोणीच कांहीं न बोलता सारे एकमेकांकडे अर्थपूर्ण दृष्टीनें पहात होते...

आणखी थोडा वेळ तसाच गेला; आणि मग वसंत पुढें वाचूं लागला....

- - - - - - -

: ७७३ :

नानांचें मला अचानक आलेलं पत्र

कल्याण, ता....

चि. बाबासाहेब यांस, अनेक आशीर्वाद विशेष - दोन तीन दिवस येथे बराच पाऊस पडत आहे. कदाचित् आठदहा दिवसांत आवणीला सुरवात करातं आली, तर मी लौकरच गांवढ्यावर जाऊन रहाणार म्हणतों. असो.

चि. यशवंतदादा यांचें मजप्रमाणेंच तुम्हाला नोटिशीवजा पत्र गेलं आहे कीं नाहीं मला ठाऊक नाहीं; म्हणूनच मला आलेलं त्यांचें पत्र सोबत आपणांकडे मी पाठवीत आहे. तें वाचून त्यावरील आपला अभिप्राय काय तो कळवावा. त्याबरोबरच सोबतचें पत्रहि परत पाठवावें.

हल्लीं, चि. यशवंतदादा मजकडे शंकरच्या घरविक्रीच्या प्रसंगानंतर, बऱ्याच दिवसांनी कल्याणास येऊन राहिले होते. बिऱ्हाडें यापूर्वींच वेगळीं झालीं होतीं, हें एका अर्थी बरें झालें. यशवंतदादा जातां जातां, ती. आईला मध्यें घालून, जेव्हां 'आपल्या मुलांबाळांसाठीं पंधरा वीस हजार रुपये दे' असें मला सांगूं लागले, तेव्हां मात्र माझा संताप अनावर झाला; आणि मी त्यांना सांगितलें, ''इतके दिवस तुम्हाला सावरून घेतलें तरी तुम्हाला असें मागावयास कांहीं लाज वाटत नाहींच! माझ्याकडे कांहीं पैशाची झाडें लागलेलीं नाहींत! माझ्या पैशावर असा हक्क सांगणारे तुम्ही हो कोण? मी तुम्हांलाहि जाणत नाही. आणि आईलाहि जाणत नाहीं! - ''

यावरून ते खूप संतापले व मला शिव्या देत देत, मजकडून कल्याणहून निघून गेले! -

आज दहाबारा दिवसांनंतर, त्यांचें हें मोठें रजिष्टर पत्र आलें आहे -

तें पुन्हां पुन्हां वाचल्यावर मला वेड लागण्याची पाळी आली आहे;

आणि म्हणूनच तुमचे मनोगत समजून घेण्यासाठीं, मी आज घाईघाईनें प्रस्तुतचें पत्र लिहित आहे. कृपा करून, उलट टपालीं आपणांस जें काय वाटतें, तें स्पष्टपणें कळवावें. फार आभारी होईन -

: ७७४ :

यशवंतदादांनीं आपल्या पत्रांत मोठमोठ्या शास्त्राच्या गोष्टी सांगून, आपला अखेरचा निश्चयहि मला कळवला आहे; तसेंच मी पुढें कसें वागावें याविषयींच्या आपल्या कल्पनाहि मला विनाकारण उपदेशात्मक पद्धतीनें कळविल्या आहेत.

परवां ते येथून गेलेल्या प्रसंगाला उद्देशून मला लिहितात, ''तुम्ही मला परवां नाहीं नाहीं त्या शिव्या देऊन, घरांतून हांकून दिलेंत, पण याद राखा!...अतितृष्णा फार घातक आहे! तुम्हाला पाहिजे असल्यास आपण साफ वेगळें होऊं या. परंतु तसें करतांना इस्टेटीची समभाग वाटणी झाली तरच ती वंशपरंपरा अव्याहत चालेल! नाहींतर प्रसंग बिकट आहे!''....

पण माझी अतितृष्णा दाखवतांना त्यांनी आपली स्वतःचीच हलकट तृष्णा व्यक्त केली आहे. कारण माझी इस्टेट मिळवण्याच्या कामीं, त्यांनीं मला कोणत्याहि प्रकारची मदत न करतां, व माझी इस्टेट एकत्र कुटुंबाची आहे, असें मानण्यास मी त्यांना कधींहि कारण दिलें नसतां, माझ्या इस्टेटीची समभाग वाटणी करून, त्यांनां मी एक हिस्सा द्यावा हें ते कोणत्या धर्मशास्त्राच्या आधारानें लिहितात, मला तरी कळत नाहीं!

आपणांस त्यांचे हें म्हणणें रास्त वाटतें काय? काय वाटत असेल तें सारें स्पष्टपणें ताबडतोब कळवावें.

: ७७५ :

वास्तविक, आपल्या कुटुंबांतील माणसें इतके दिवस कल्याणास एके ठिकाणीं राहिलीं, हेंच योग्य झालें नाहीं. पण व्यक्तिशः खुद्द आपल्या सौजन्याचा फायदा, आम्ही सर्व मंडळींनीं, वेळोवेळीं पुरेपूर घेतला, हें लज्जास्पद असलें तरी येथें मला प्रांजलपणें कबूल करावयास पाहिजे! -

यशवंतदादांची नबळी प्रकृति व दुबळी आर्थिक परिस्थिति पाहून, विशेषतः, आपण ( व मधून मधून थोडीफार मीहि) त्यांनां आपुलकीनें मदत केलीं. मातोश्रींच्या हयातींत तिच्या मनास मुळींच दुःख होऊं नये, म्हणून, व वरील कारणांस्तव, आजपर्यंत आपण एकत्र जेवणखाण चालवलें! पण तेवढ्याच गोष्टींचा फायदा घेऊन, दादांनी आतां समभाग वाटणीं मागण्यापर्यंत पल्ला गाठला आहे! -

आम्ही तर बोलून चालून पैशामागें लागलेले. निरक्षर शेतकरी! त्यांच्या हिशोबीं हलकट दारुदुकानदार! - पण यशवंतदादांनी आजपर्यंत पुष्कळ धर्मग्रंथ वाचले असतील, त्यांतून त्यांनी हाच निष्कर्ष काढला



आहे काय? -

उलट आमचे मामा निरक्षर होते; त्यांनीं धर्माचा किंवा वेदाचा एकहि ग्रंथ, एखादें अक्षरहि वाचलें नव्हतें. तरीहि त्यांनां यशवंतदादाच्या हजारपट खरा खरा धर्म पूर्ण समजत होता! -

: ७७६ :

तुम्हाला आठवतच असेल, इस्टेट कमावणयच्या कामीं मामांना यशवंतदादांनी कोणत्याहि प्रकारची मदत केली नव्हती, एवडषंच नव्हे तर एका शब्दानेंहि त्यांच्याबरोबर ते कधीं गोड बोलले नव्हते. उलट अनेक वेळा मामांच्या मानापमानाकडे दुर्लक्ष करून, त्यांना मारण्यासाठीं त्यांच्या अंगावर यशवंतदादा धांवले होते. अगदी जुनी गोष्ट आहे. मी इकडे तिकडे फटिंगपणें भटकत होतो. मामांना कर्ज झालें होतें - त्या वेळीं!...म्हणून ते यशवंतदादाकडे कांहीं दिवस रहावयास, व जमल्यास कांहीं रकमहि मिळाल्यास मागावी, या हेतूनें गेले होते. त्या वेळीं - मात्र ''तुमचा व माझा कांहीं एक संबंध नाहीं'' असें रागानें सांगून, याच यशवंतदादांनीं मामा - मामी दोघांनाहि घरांतून हाकून लावलें होतें!

मामा खरोखर उदार हृदयाचे!...त्यांना पैसे मिळूं लागतांच, ते या मागल्या साऱ्या गोष्टी विसरून गेले. एवढेंच नव्हे, तर त्यांनी यशवंतदादाच्या मुलांस मदत करण्यास सुरवात केली. त्यांच्या एका मुलाला विठोबाला दत्तक घेऊन, आयुष्याच्या अखेरीस तर आपली सर्व इस्टेट, दादाकडून आयुष्यभर स्वतः अपमान व जुलूम सोसूनहि जवळजवळ त्यांच्याच हवालीं केली! असे हे आमचे मामा!...

खरी गोष्ट, मला वाटतें, अशी आहे, कीं फायद्यापुरते धर्मशास्त्राचे आधार कोणालाहि दाखवितां येतील!...ती नुसती पोपटपंची असते. परंतु शास्त्राप्रमाणें, वर्तणुकींत, आपल्या कृतींत सारें आणणें हें फार कठीण असतें!...तेव्हां प्रत्यक्ष मातोश्रीस मारण्यास धावतांनाहि परशुरामाचा आधार दाखवणाऱ्या यशवंतदादांना, आपल्या मतलबांसाठी वाटेल त्या धर्मशास्त्राचा आधार - त्यांनीं अनेक धर्मग्रंथ वाचले असल्यामुळें - दाखवितां यावा यांत काय नवल?....

: ७७७ :

आपल्याला आठवत असेल, यशवंतदादा व त्यांचीं मुलें यांची आजपर्यंतची वर्तणूक किती वांकड्या मार्गाची व किती अपमानकारक होती! तरी पण मातोश्रीकडे पाहून ती सहन करावी लागली. एवढेंच नव्हे तर मामांनीं त्यांच्या इस्टेटीविषयीं आपल्याला सल्ला विचारला, त्या वेळीं आपण कांहींएक लोभ, मोह न धरतां, दादांच्या परिस्थितीकडे लक्ष देऊन, त्यांच्याच मुलांस ती सर्व द्यावयास सांगितलें. मीहि थोडा विचार करून आपल्या व कै. मामांच्या म्हणण्यास माझी संमती दिली. एवढेंच नव्हे तर, आपण स्वतःचें नुकसान सोसूनहि मामांच्या अखेरच्या इच्छेबाहेर जाऊन, सारी इस्टेट दादांच्या मुलांच्या स्वाधीन केली! आयुष्यांत मी कदाचित् अन्यायी व्यवहार केले असतील; पण मला न्यायाची व

धर्माची थोडीफार कल्पना आहे. आपण हा आपल्या माणसांसाठीं केलेला सारा त्याग मी जाणतो. आपल्या या कृतीलाच फक्त मी धर्म म्हणेन! -

या प्रसंगानंतरहि, आपण किंवा मी, चि. यशवंतदादा व त्यांची मुलें यांच्याशीं शक्य तों चांगल्या प्रकारें वागण्याचा प्रयत्न केला; पण आश्चर्य हें, कीं, तरीहि दादांची इच्छा तृप्त झाली नाहीं! आतां एक नवा डाव टाकून पहाण्याचें त्यांनीं ठरविलेलें दिसतें. ते आतां मला शास्त्राच्या गोष्टी सांगून, माझ्या इस्टेटीचा अर्धा भाग मी त्यांना द्यावा असा उपदेश करीत आहेत! यापेक्षां जास्त नीचपणा माणसाला कोणता करतां येईल बरें?

: ७७८ :

माझ्या भावांचें हित व्हावें, असें मला वाटावें हें चांगलें! तोहि एक प्रकारचा मोठा धर्म आहे हें मला समजतें; आणि त्या दृष्टीनें 'मला तुमच्या इस्टेटींतून तुम्ही कांहीं तरी द्यावें' अशी यशवंतदादांनी गोडीनें व एखाद्या स्नेह्यासारखी प्रेमानें मजकडे याचना केली असती, तर मीहि त्या गोष्टीचा विचार केला असता! - पण त्यांची ही हक्काची अरेरावी मी कां चालू द्यावी?

आपण मजपेक्षां लहान आहां; पण मजपेक्षां किती तरी विद्वान आहांत. आपलें सारें आयुष्य आपण न्यायबुद्धीनें घालविलें आहे! आपण कायदाहि पूर्णपणें जाणतां. आजपर्यंत आपण अनेकांचे व अनेक प्रकारचे न्याय सोडविले असतील! आणि म्हणूनच मी आपणापेक्षां वडील असूनहि यशवंतदादांनीं सुरू केलेल्या धर्माधर्माच्या या झंजावातांत, काटकीप्रमाणें सांपडून गांगरल्यामुळें आपल्याकडे घाईघाईनें धांव घेतली आहे.

आज मी काय करावें म्हणजे तें न्याय ठरेल? आपणच काय तो आपला निर्णय उलट टपालीं कळवून मला उपकृत करावें -

कळावें हे आशिर्वाद -

आपला -

नाना ठाकूर

***

: ७७९ :

ता......

ती. नानांस शि. सा. नमस्कार वि.वि. - पत्रोत्तरास इतर कारणामुळें विलंब लागला. राग नसावा. गेलीं कांहीं वर्षे, आपल्या घरांत यशवंतदादामुळें भाऊबंदकीचा वणवा धुमसत आहेच. त्यानें गेल्या आठवड्यांत शेवटीं पेट घेतला तर! ठीक!... आतां मनःस्वाथ्य संपलेंच; पण पैशांचाहि किती



चुराडा होईल कोणास ठाऊक?...

आपलें व ती. दादांचें, अशी दोन्हीं पत्रें समग्र वाचली. वास्तविक यशवंतदादांनी सुरू केलेला हा खटला निखालास खोटा आहे. आपण म्हणतां तेंच खरें आहे. त्यांच्यासारख्या वेदान्ती माणसानें , आपल्या आयुष्याला उतार लागल्यानंतर, म्हातारपणींहि असें खोट्यांत शिरावें, हें आमचें खरोखर दुर्दैवच!

: ७८० :

आतापर्यंत, आम्ही सारे भाऊ केवळ सोईसाठी एकत्र रहात होतों, हें खरें असलें; तरी प्रत्येकानें आपापली मिळकत आपापल्या निरनिराळ्या व भिन्न कर्तबगारीवरच स्वतःसाठी मिळवली आहे आणि त्या दृष्टीनें, एकाला दुसऱ्याच्या मिळकतीवर हक्क सांगण्याचा कोणत्याहि प्रकारें अधिकार पोंहचत नाहीं.

यशवंतदादा स्वतः कफल्लक होते. म्हणून ती. मामांची इस्टेट त्यांच्या मुलालाच आम्ही देवविली आहे. पण इतकें असूनहि पैशांच्या मोहानें, दादा आतां वांकड्यांत शिरत आहेत व खोटे पुरावे गोळा करून व विशेषतः तुमच्या इस्टेटीवर डोळा ठेवून, आपला हिस्सा मागत आहेत!

त्यांच्या ह्या खोट्या दाव्यांत मी त्यांना मदत करीन अशी त्यांना अपेक्षा होती, मला वाटतें. कारण, त्याबाबतींत आपल्या पत्राबरोबरच मला त्यांचें एक पत्र आलें होतें. आपल्या भावाची स्वकष्टार्जित इस्टेट वेदांती दादांना स्वतःची...समाईक...वाटू लागली, तरी मला तुमची फुकटची दिडकीही नको आहे, हे येथें प्रथमच स्पष्ट सांगून ठेवतो.

: ७८१ :

गेल्या आठवड्यांत, खोटा त्रागा करून, दादांनी भांडण उकरून काढलें व ते हिश्याच्या गोष्टी बोलूं लागले असें आपण लिहितां; पण त्यांत त्यांच्या आतांपर्यंत दिसून आलेल्या स्वाभावाकडे पहातां, आश्चर्यकारक असें कांहींच नाहीं. त्यांनीं मला लिहिलेल्या पत्रांत कायद्याच्या दृष्टीनें माझा सल्ला विचारला होता. तें वाचतांच, मला त्यांचा अतिशय राग आला; व त्यांना एक अलाहिदा पत्र पाठवून त्यांची लबाडी मी यापूर्वीच स्पष्टपणे कळविली.

त्यांच्या असल्या खोट्या कामी, माझी मदत यत्किंचितदेखील होणार नाही असें मीं त्यांस निक्षून बजाविलें आहे. त्यामुळें एकदम चिडून, पुन्हां उलट टपालीं, पाठविलेल्या आजच्या पत्रांत त्यांनीं मला नाहीं नाहीं त्या शिव्या दिल्या आहेत! त्यांत ते पुढें म्हणतात, कीं, चार दिवसांनी ते स्वतः वादी होऊन हिस्सा मागण्यासाठीं सामाईक कुटुंबाच्या मिळकतींतील स्वतःच्या कुटुंबांतील इतर सर्व मंडळीवर, दिवाणी कोर्टात दावा मांडणार आहेत.

दावा तें जिकतील कीं नाहीं हा प्रश्न निराळा. पण आज कुटुंबांची अब्रू मात्र चव्हाट्यावर आली आहे. कांहीं कारण नसतां, आपल्या कुटुंबावर विशेषतः तुमच्यावर हा मोठा चमत्कारिक व दुःखदायक प्रसंग आला आहे एवढें खरें!...

ही अशी गंमत पाहिली, म्हणजे हंसूं येतें व दुःखहि होतें! - 'समाईक कुटुंब'..'समाईक इस्टेट'...असले शब्द, दादांनीं आपणा दोघांच्याहि पत्रांत वापरलेले आहेत. ते पाहून त्यांच्या मूर्खपणाची व विशेषतः असल्या वांकड्या मार्गाची कींवच करावीशी वाटते - 'मी मिळविलें तें माझं व तुझें तेंहि माझंच!' हीच जेथें प्रथमपासून त्यांची वृत्ति तेथें एकत्र कुटुंबाचा प्रश्नच येत नाहीं! -

: ७८२ :

बरें, आपल्या कुटुंबाची कोंकणांतील वडिलोपर्जित अशी सारी इस्टेट तरी कांहीं मोठी होती...म्हणावें - तर ती सारी दोन एकर जमीन, दहा नारळी व एक पडकें घर एवढीच! त्याशिवाय, जवळ असलेला थोडाफार ऐवज आमच्या चुलत्यांच्या भांडखोर वृत्तीमुळें कोर्ट - कचेऱ्यापांयीं गेला!...आणि वांटणींत आमच्या वडिलांना अर्धा एकर जमीन व अडीच नारळींचीं झाडें मिळाली. दोन नारळीचे ठीक; पण अर्ध्या नारळीचीहि वांटणी भांडखोर भावाबरोबरच व्हावयाची!...

शेवटी आमचे वडील कंटाळून गांठचा सारा ऐवज कमरेला बांधून मुलांबाळांसह निघाले. वाटेंतच, त्यांचें अचानक देहावसान झालें आणि आम्हीं लहान लहान मुलें मामा-आईसह जगाच्या या अनोळखी भागांत येऊन उघडीं पडलों!...

त्या आपत्काळीं आमच्या आईची धडपड व मामा-मामींचे मुलांबाळांकरितां चाललेले काबाडकष्ट अजूनहि आठवले कीं, डोळे भरून येतात! आम्ही लहान लहान मुलें त्या वेळीं वार लावून माधुकरी मागून कसेबसे दिवस ढकलीत होतों!..त्यानंतर वर्षांमागून वर्षें गेलीं!...सुखदुःखांतून दिवस जात होते, तरी प्रत्येकजण पुढें येत होता. तुम्ही लक्षाधीश झालां! दादा फक्त शाळामास्तर राहिले तरी पण मामाची सारी इस्टेट त्यांच्या मुलाला मिळालीच ना? मी हुजूर डेप्युटीपर्यंत वाढत आलो! आतां कांहीं महिने कलेक्टर आहे.

: ७८३ :

हा अगदीं थोडक्यांत आपल्या कुटुंबाचा सारा इतिहास! तो येथें मुद्दाम पुराव्यासाठीं आपल्याला लिहून पाठवीत आहे.

आणि आज दादांच्या डोक्यांत तुमची श्रीमंती व स्वतःची गरीबी पाहून एकदम कल्पना येते - 'कुटुंब व कुटुंबाची मिळकत समाईक आहे!'

मीहि कदाचित दादाप्रमाणेंच म्हणेन अशी गेल्या पत्रांत दिसते त्याप्रमाणें तुम्हाला भीति वाटत



असली तर ती मात्र नाहक आहे. आपण मजविषयीं अगदीं निश्चित असावें. माझें हें पत्र पुराव्यासाठीं आपल्याकडे राहीलच!

परंतु दादांच्या या कावेबाज व लबाडीच्या फिर्यादीला तोंड द्यावयाचें काम आपण मजवरच सोंपवावें हें लौकिकदृष्ट्या तरी योग्य होणार नाहीं. मात्र, आपण आपला पैसा कशाहि प्रकारें मिळविलेला असला, तरी त्यावर दादांचा किंवा आमचा कोणाचाहि कोणत्याहि प्रकारचा हक्क पोंचत नाहीं, हें मला अगदीं मान्य आहे. आणि त्या दृष्टीनें, या कामीं आपल्याला शक्य ती मदत करणें, हें मी माझें कर्तव्य समजतो.

मजविषयीं म्हणाल, तर मी एकत्र कुटुंबासाठीं किंवा यशवंतदादा व त्यांचीं मुलें यांच्यासाठीं आजपर्यंत जी झीज सोशीत आलो त्यांत माझी कसलीहि विशेष अपेक्षा नव्हती. समाईक कुटुंब ही कल्पना माझ्यासाठीं नव्हती. तें माझें कर्तव्यच वाटे, त्या वेळीं मला! - ती. मामांची इस्टेट यशवंतदादांच्या विठोबास मिळेल, अशी आपण दोघांनीं खटपट करूनहि, अजून त्यांचा दुष्ट स्वार्थ थांबत नाहीं; हें पाहिलें, कीं, दुःख वाटल्यावांचून रहात नाहीं. एवढ्याचसाठीं माझें आज आपणास अगदीं स्पष्ट सांगणें आहे कीं, आपण त्यांच्या शापास अगर शास्त्र - वचनांस भिऊन आपल्या मनाविरुद्ध कांहीं एक करूं नका! -

ती. यशवंतदादाची स्वतःची, थोडीफार दोघांमुलांची, व ती. मामांची इस्टेट मिळून त्यांजकडे आतां जें कांहीं आहे त्यांतच त्यांनीं वास्तविक संतुष्ट असावयास पाहिजे होतें. तसें म्हटलें तर मजकडे तरी आजपर्यंत सारा खर्च करतां करतां, विशेष तें काय शिल्लक राहिलें आहे? उलट माझी परिस्थिति कठीण आहे; तरी सुद्धां मला दुसऱ्याच्या पैशाची जरादेखील अपेक्षा नाहीं! माझ्या स्वतःच्या गरीब स्थितींत मी पूर्ण संतुष्ट आहे.

तेव्हां, ती. यशवंतदादांनीं दावा मांडला किंवा मांडला नाहीं, ते तुमची अगर माझी नालस्ती करीत आपल्या ओळखीच्या माणसांत फिरले, तरी तुम्ही तिकडे शक्य तों शांत मनानें दुर्लक्ष करावें. मुख्य म्हणजे, कोणी विचारल्यास, आपली बाजू मांडून, त्याची समजूत करण्याच्या भानगडींत मुळींच पडूं नये. आपणांस एकदम बसत असलेला हा आघात, कदाचित् सहन होणार नाहीं! आणि तें साहजिकच आहे. पण त्यामुळें चिडून मात्र जाऊं नये; आपल्याला वाटल्यास, कोणी विचारलें तर सर्व दोष मजवर टाकून मलाच विचारण्यास सांगावे.

कळावें, जास्त काय लिहूं? लोभ असावा -

आपला

बाबा ठाकूर

: ७८४ :

श्री. यशवंतदादा यांचे शेवटचें नोटिशीवजा दोघांना आलेलें जोड पत्र

मुंबई; ता.........

ती. नाना व चि. बाबा ठाकूर यांस नमस्कार व आशिर्वाद -

(१) तुमच्या दोघांच्या संगमनमतानें ठरल्याप्रमाणें, माझ्या छळास आतां जोरानें आरंभ झाला म्हणावयाचा! - ती. नानांचे हडपे - पेट्या रुपयांनीं खूप भरल्या आहेत. तशीच चि. बाबा यांची बँक भरली आहे. तुमच्या ओळखीचे मोठमोठे वकील, बॅरिस्टर, शेटसावकार असल्यामुळें, कोर्टात तुम्ही दोघे कदाचित् चुटकीसरसा माझा पाडाव करून टाकाल, हें मी जाणतो. परंतु, तरीहि अनाथास ईश्वर, हेंहि मी जाणतों व म्हणूनच, सारें कोर्टाच्या निदर्शनास आणून मी दाद मागणार आहे.

(२) कालचक्र आतां फिरलें, पण जरा मागील इतिहासाकडे दृष्टि टाका! तुम्ही दोघेहि रानोमाळ भटकत फिरत होतां. विशेषतः, चि. बाबाला माझीच विद्यार्जनांत मदत झाली आहे. याची साक्ष त्यांच्या अंतरींचा राम त्यांना देईल! - त्याविषयीं मजकडे अनेक पुरावेहि आहेत. आमची एकत्र कुटुंबाची समाईक इस्टेट, कर्ती व हुशार माणसें म्हणून, तुमच्या दोघांच्या ताब्यांत होती, व तुम्ही आमच्या परवानगीनें व्यवहार करीत गेलां; पण आतां तुमचे डोळे फिरले व मज गरीबाचे वाईट दिवस आले.

(३) ती. नानांनी तर मला शेवटीं घराबाहेर हांकलून देण्यास कमी केलें नाहीं; व त्यांस, तुम्हीं - चि. बाबा यांनीं - आंतून संमति दिलीत! - हें मी पूर्ण जाणतो! बाबांनों, त्या वेळीं मी टाहो फोडीत होतों, ''धीर धरा! - एकत्र कुटुंब असें फोडूं नका! नाहीं तरी, आतां मी क्षेत्रींच जाऊन रहाणार आहे!''...पण माझें कोणीहि ऐकलें नाहीं! -

(४) दारिद्र्यावस्थेंत मी तुमची - चि. बाबा यांची-वेळेवर काळजी घेतल्यामुळेंच, तुम्हीं एवढ्या वैभवास चढलां, हें विसरलां वाटतें? - तुम्ही आपल्या समजुतींत येऊन आपल्या हिमतीवर पुढें शिकत राहिलां असतां, तर तुम्हाला पंचवीस रुपये पगार मिळविण्याचीसुद्धा पंचाईत पडली असती. पण आजचा तुमचा एवढा पगार पहा!...आतां तुमचा निम्मा पगार मला दरमहा जन्मभर देत राहिलांत तरी तुम्ही माझ्या उपकारांतून कधींच सुटणें शक्य नाहीं! तुम्ही देवपूजा करतां, ना? तुमची उपासना सिद्ध झाली असेल, तर राम तुम्हाला अंतरांतून याचें उत्तर येईल! पण तुम्ही कृतघ्न!...सापाप्रमाणें मजवर उलटून मला कायदेशीर उपदेश करतां! - हा एक झाला.

दुसरा माझा मोठा भाऊ, जो नाना! 'पांच मिनिटांत घराबाहेर हो' असें मला वृद्ध मातोश्रीसमोर सांगतो.

बाबानों, तुम्ही दोघेहि संपत्तीसाठी मज गरिबाबरोबर वैर करतां काय? तुम्ही लक्षाधीश!...मी अकिंचन! तुम्ही सत्ताधीश! मी नोकर - खरेंच तें!...ईश्वराकडे एवढीच प्रार्थना कीं, देवा, यांच्या कृतघ्नपणाचीं फळें यांस लौकर लौकर भोगावयास लावण्याची पाळी आणूं नकोस!...

(५) चि. बाबांना मला एवढेंच सांगावयाचें आहे, कीं ती. नानांनीं चोंहोबाजूंनीं, माझ्या व माझ्या मुलांच्या भोंवती जाळें पसरलें आहे. त्यांत तुम्ही मात्र सांपडूं नका. तुमचाहि नाश व्हावयास वेळ लागणार नाहीं! -

(६) मातोश्रीकडे मी गाऱ्हाणें नेलें. पण ती फारशी बोलली नाहीं. तिला मी सांगून पाहिलें, कीं तुला लोक कुंती म्हणत! मग मजवर तुझा कुंतीसारखा लोभ कां नाही? पांच जणांनीं आणलेली कसलीहि भिक्षा कुंती पांचांना सारखी वांटून देत असे. एवढेच कशाला? द्रौपदी एकट्या अर्जुनानें आणली. पण तिचीहि पांचांतच तिनें वांटणी केली. आता दुर्दैवानें, आपला चि. श्रीनिवास नाहींसा झाला आहे; त्याचाहि हिस्सा पाहिजे तर बाजूस काढून ठेंव. पण मला वाटतें, तें शक्य नाहीं! - माझेच दिवस फिरले! मातोश्री आतां श्रीमंताकडेच पहाणार! ज्याच्या हातीं ससा तो पारधी! - खरेंच आहे. माझेंच दैव फिरलें! -

(७) आतां मी तुम्हांला शेवटीं एकच सांगून पहातो - बाबानों, तुम्ही अजूनहि सावध व्हा! रामानें आपल्या भावाच्या मुलांस प्रथम राज्य देऊन नंतरच आपल्या लवकुशांना दिलें. तुम्हीहि तसेंच करा.

(८) तें न ऐकतां, तुम्ही आपलाच हेका चालवून, मज गरिबाला धुळीस मिळविणार असलां, तर होईल तें निमूटपणें सहन करण्यास मी तयार आहे! ईश्वर फार दयाळू आहे. हिरण्यकश्यपूच्या छळामुळें जो खांबातून प्रल्हादाकरितां प्रकट झाला, तो मला अंतर देणार नाहीं. मला तुम्ही चोहोंबाजूनें पिडलेंत तर माझ्या रक्षणासाठीं, तो वेळेवर प्रगट झाल्यावाचून रहाणार नाहीं.

(९) तुमचें शिक्षण, लग्नें वगैरेस मजकडून यथाशक्ति मदत होत गेली. आपलें सारखें एकत्र कुटुंबच होतें. हें सारें तुम्हां दोघांस ठाऊक आहे; पण अकलेच्या व तर्कटी कायद्याच्या बळावर, खोटा व्यूह रचून, मला कपटानें फसविण्याचा आतां तुम्ही दोघे प्रयत्न करीत आहां! याचा अजूनहि विचार करा. तुमच्या मांडीवर मान ठेऊन, विश्वासानें स्वस्थ निजलेला जो मी, त्याचा विश्वासघात करून गळा कापण्यासहि तुम्ही तयार झालां आहां! -

(१०) तुम्ही दोघे वैभवसंपन्न, ज्ञानसंपन्न, कुटिलतासंपन्न आहां. मला घरांतून हांकलून लावलेंतच. तेव्हां आतां तुमचा दरिद्री म्हातारा बंधू, तुमच्या दुःखांतून सुटण्यास व तुमची कपटजालें तोडण्यास

दुःखाच्या भरांत हातपाय झाडणार नाहीं, तर त्यानें दुसरें करावे तरी काय?...माझें मागणें बरोबर आहे असें अजूनहि मी म्हणतो. प्राण गेला तरी तुमच्यासारख्या कपटी व कृतघ्न बंधूस घाबरून मी उगीच शरण येणार नाहीं! -

(११) बाबांनों, एक लक्षांत ठेवा, 'कपट तेथें तळपट'!

(१२) 'जैसी जैसी वेळ पडे। तैसे तैसे होणें घडे।'

(१३) चि. बाबांना, आतां माझें एवढेंच सांगणें आहे कीं, तुम्ही विद्वान् असलां तरी एकंदरीत मूर्खपणाच करीत आहां. न्यायदेवतारूपी सीताशुद्धीकरितां, रात्रंदिवस तळमळणाऱ्या मजसारख्या मारुतीच्या पुच्छास, स्वतःच्या कायदेशीर दीर्घ कल्पनारुपी उंची वस्त्रे गुंडाळून स्वतःच्या गुप्त तृष्णारूपी स्निग्ध द्रव्यांनी ती भिजवून, व कलहरूपी अग्नीला फुंकर घालून वर सभ्यपणाचा आव आणीत आहां!

(१४) ती. नानांना मला सांगावयाचें आहे, तें हेंच कीं, तुम्ही दीर्घ द्वेषानें आडमार्ग धरून रावणासारखीं मजभोंवती चोहोंकडे कपटाचीं जाळीं पसरविलीं आहेत. ती कोर्टरूपी अग्नींतच हवन केल्याशिवाय, आतां जळणें अगदीं अशक्य आहे! आणि एकदां जळली म्हणजेच काय ती मला शांत झोप लागेल. म्हणून, तेवढ्यासाठीं, वेळ पडल्यास पडेल तें व्याज देऊन मी कर्ज काढीन व नादारींत फिर्याद देईन. त्यांत मला ईश्वर यश देईल अशी माझी पक्की खात्री आहे. तथापि, रावणासारखें कपट करून, तुम्ही न्यायरूपी सीतेचें हरण केलें, तर मग रामाप्रमाणें वनोवन, गावोगांव फिरून, तुमची ही अपकीर्ति चारी बाजूस पसरविण्यांतच मी समाधान मानीन!

(१५) तेव्हा तात्पर्य एवढेंच!...'' सुखदुःखे समेकृत्वा, लाभालाभौ जयाजयौ'' या न्यायानें, तुम्ही ऐकत नाहीं तर, आतां मी दिवाणी कोर्टांत दाद मागणार! आणि ''यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः । तत्र श्रीविजयोभूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम'' या न्यायानें माझ्या बाजूचाच निकालहि लागणार!... तथापि, तेथें तुमचा उपाय व तुमची शक्तिहि जास्त बलवत्तर असल्यामुळें रावणाप्रमाणें न्यायरूपी सीतेचें हरण करण्याचा प्रयत्न चोहोंबाजूंनी जोरजोरानें सुरू करा!

परंतु ती. नाना, सीतेला कपटानें हरण केल्यामुळें रावणाची शेवटीं काय दशा झाली? पण त्याबद्दल चि. बाबांनाच विचारा! त्यांनीं रामायणाचीं पारायणें केलीं आहेत; तीं त्याबाबत त्यांना साक्ष देत असतील.

अजूनहि जागे व्हा! - मी धार्मिक दृष्टीनें सुचविलेले हे विचार लक्षांत घेऊन आपलें आचरण सुधारा! - बाबांनों, अगदींच यावनी संस्कारानें धर्मलंड होऊं नका! - कळावें हे आशिर्वाद

आ.

यशवंतदादा



: ७८५ :

बाळांनों, आमच्यामध्यें त्या वेळीं झालेल्या साऱ्या पत्रव्यवहारांतील, हीं फक्त तीनच पत्रं नमुन्यादाखल तुमच्यापुढं ठेवलीं आहेत (आतां तर बाकींचीं सारींच पत्रं मी नाहींशीं करून टाकलीं आहेत. त्यामुळं मला थोडंफार तरी समाधान लाभलं) त्यांवरून तुम्हांला आमच्यांतील प्रत्येकाची मनोभूमिका बरीचशी समजून येईल.

दादांचं हें शेवटचं पत्र आम्हां दोघानां मिळालं, तेव्हा दोघांनांहि अत्यंत दुःख झालं. विशेषतः, सारं पत्र तांबड्या शाईनं लिहिलं होतं. व त्यांना महत्त्वाचीं वाटणारी वाक्यें त्यांनीं मधून मधून काळ्या शाईनं लिहिलीं होतीं. त्यामुळं माझ्या दृष्टीसमोर क्षणभर काजवे चमकल्याप्रमाणंच झालं.

पुढं आठ दिवसांनीं दावा सुरू झाला. मी वजन खर्च करून दावा शक्य तितक्या लौकर चालेल, निकालांत येईल अशी खटपट केली. त्यामुळं पुढच्या आठ महिन्यांत, मधून मधून, पण लौकर लौकरच, तारखा लागूं लागल्या.

: ७८६ :

पण गंमत ही कीं, बाळानों, यांतील सारंच कांहीं खोटं होतं! पण जगांत खऱ्यापेक्षां खोट्याला तोंड देण्यासच जास्त सामर्थ्य खर्च करावं लागतं! माझा साऱ्या आयुष्यांतील हा अनुभव आहे.

खटल्याच्या आठ नऊ तारखा झाल्या होत्या. ती. यशवंतदादा आपला हिस्सा शाबीत करण्याकरितां अनेक पुरावे कोर्टापुढं आणीत होते. ही पुराव्याचीं कागदपत्रं, त्यांचे साक्षीदार, त्यांची स्वतःची जबानी; हें सारं पाहून मला तर अगदीं अचंबाच वाटला. इतक्या पूर्वीपासून, अगदीं दूरदर्शीपणानं, असल्या पुराव्याची जुळवाजुळव दादा गुप्तपणें करीत असतील, अशी मला स्वप्नांतहि कल्पना नव्हती! - तें सारं पाहून त्या वेदान्ती माणसाला म्हणावं तरी काय, हेंच मला शेवटीं समजेना.

: ७८७ :

यशवंतदादांनी भाऊबंदकीचा दावा केला हें ऐकून प्रथमच आमची आई रडली; खूप चिडली. तिनं आम्हां तिघांनांहि सारख्याच शिव्या दिल्या-आणि नंतर एके दिवशीं नानांबरोबर भांडून ती म्हणाली, ''तुम्ही दोघे माझ्या यशवंताला नाडतां आहे काय? मी त्याच्याच बाजूनं सारं सांगणार थांबा...''

त्यामुळे नाना तर जास्तच संतापले. त्यांना आवरून धरतां धरतां माझी पुरेवाट झाली! - ते आधींच अगदीं हवालदील झाले होते. सारखे डोक्याला हात लावून बसत व सुस्कारे टाकीत स्वतःशी पुटपुटत ''हं! गेलं, सारं फुकट गेलं. म्हातारपणीं माझा पोरगा मात्र उघडा पडणार!''....

: ७८८ :

कशाहि प्रकारें असो - पण नानांनीं आपल्या आयुष्यभर नाहीं नाहीं ती तिकडीं धाडशी कृत्यें करून

र्तीं पचविलीं होतीं. अशा रीतीनं घुसळलेल्या आयुष्याच्या ताकावर तरंगणाऱ्या लोण्याच्या गोळ्यावर, दादांनीं मांजरासारखी झडप घातलेली पाहून, त्यांचा जीव असा जास्त दुःखीकष्टी झाला होता!

तें अर्थात् अगदीं सहाजिक होतं! नीति - अनीति, कसलाहि मार्ग म्हटला, तरी त्यामुळं शिरावर चढणाऱ्या पाप - पुण्याची, जोखीम - धोक्यांची, स्वतः संपूर्ण जबाबदारी घ्यायला नाना तयार होते! तेव्हा तो मार्ग चांगला कीं वाईट हा आमचा प्रश्नच नव्हता मुळीं! -

पण दादांसारख्या वेदान्ती माणसानंहि, आपणच प्रथम त्या पैशाला नरक म्हणून, त्या नरकांत जाणून बुजून पाऊल टाकणं, तोंड खुपसणं योग्य कसं ठरतं?

: ७८९ :

शेवटीं, कोर्टात नानांची जबानी झाली. यशवंतदादांनीं तर, हरतऱ्हेनं आम्हां दोघांची बेअब्रू करण्याची शिकस्त चालविली होती! ज्या दुःखाला तोंड देत नाना वर आले, त्याचा पाढा चार लोकांदेखत, तुडुंब भरलेल्या कोर्टात, स्वतःच्या तोंडानं वाचतांना नाना अगदीं ढसढसून रडूं लागले!

आपल्या जबानीच्या वेळीं, डोळ्यांतून धारा गळत असतांना ते मागची हकिगत सांगत होते.

''जजसाहेब, दरिद्री आईबापांची दरिद्री मुलं आम्हीं! आईनं दळणकांडण करावं व आम्हीं वार लावावे! श्रीमंतांच्या आश्रयाला राहिलों होतों. पण आम्हीं अकिंचन! - आम्हांला विचारतो कोण? श्रीमंतांचीं तीं मुलं आम्हांला त्याची जाणीव करून देण्यासाठींच की काय, आमच्या पायांवर बुटांचे पाय देत! सर्वांत मोठा, जाणता मीच! त्या वेळीं माझ्या डोळ्यांतून अश्रु येत...हृदय अगदी पिळवटून निघे!!

पण करणार काय? आईनें त्यांच्याकडून कर्जाऊ पैसे काढिले होते. आम्हीं त्यांच्या उपकारांत होतों! - पण एके दिवशीं, माझ्या मनांत, एकटा बसलो असतां, जोराचा विचार आला. मी मनाशीं पक्की खूण - गांठ बांधली कीं, ''हो! आज...मी लाचार आहे, गरीब आहे! खरी गोष्ट! पण गरीबींतच मरणार नाहीं खास!''

: ७९० :

आणि शेवटीं, त्या रात्रीं मी तडक मुंबईस पळालो. शिक्षण बाजूस राहिलं. साध्या मजुरांत शिरलो. कोणतंहि काम करायला मी तयार होतो! ''पैसा'' ही दोन मोठीं अक्षरं सतत माझ्या डोळ्यांसमोर होतीं! तेंच माझं ध्येय! त्यामुळं गटरइन्स्पेक्टर, सोनापूर स्मशनांतील रामोशी, ट्रामकंडक्टर, असल्या हलक्या मोठ्या नोकऱ्या केल्या! ग्यासलेटचे डबे डोक्यावर घेऊन रस्त्यांतून ओरडत फिरलो. थोडाफार पैसा गांठीं आला. एक खानावळ घातली!...माझी धडपड चाललीच होती!...नंतर खेड्यांत दारूदुकान, सावकारी, किराणामाल, गवताचा धंदा... सत्रा प्रकार...प्रसंगपरिस्थितींना तोंड



देत केले!...मध्यें एकदां मला वाईट परिस्थिति आली! एक मोठा धंदा अंगावर आला. मी नादार झालो...त्या वेळीं मात्र माझ्या भाऊबंदांनीं कुणीच मला जवळ केलें नाहीं!... मी तसाच वाट काढीत पुढं जात होतो!...आणि मजपुढं त्यावेळीं एकच ध्येय होतं. ''पैसा मिळवणं! श्रीमंत होणं!''

: ७९१ :

मजवर फिर्याद करणार, माझा पाठचा भाऊ - यशवंतदादा, नीतीनं चालणारा कर्मठ वेदान्ती आहे. मी अनीतीनं सारा पैसा मिळवला, लोकांना लुबाडलं, असं त्याचं कालपर्यंत म्हणणं होतं. पण म्हातारपणीं विचार बदलत असतील कदाचित्; किंवा पैसा धुतला कीं, त्याचीं पापंहि नाहींशीं होतात - अशी कदाचित् त्याची कल्पना असेल! -

जज्जसाहेब, गरिबींतून मी वर आलो. कोणत्याहि पद्धतीनं कां होईना माझं लहानपणचं ध्येय आज थोडंफार तरी साध्य झालं आहे. आणि आतां...(माझ्या पडत्या काळीं मला भाऊ म्हणून ओळखायलाहि तयार नसलेला) या खटल्यांतील वादी, यशवंतदादा, मजबरोबर असलेला दाट रक्ताचा संबंध शाबीत करायला व अनीतीनं मिळवलेली माझी इस्टेट समाईक ठरवायला, पुढं सरसावत आहे! वादी यशवंतदादा, आपला भाऊ म्हणून मला ओळखायला या वेळीं तयार होतो, हेहि त्याचे मजवर फार मोठे उपकारच!'

हें सारं सांगतांना, नाना मधून एकीकडे तोंड करून एकसारखे अश्रु पुशीत होते. बोलतां बोलतां, त्यांना शेवटीं भोंवळ आल्यासारखं झालं. त्यांनी खालीं बसकण घेतली! त्यामुळं कोर्टानं त्यांना बसायला खुर्ची दिली. व त्यांना विसावा घ्यायला लावला!....

: ७९२ :

त्यानंतरची माझी जबानी, तीहि अगदी कसून झाली!...माझ्यावर लहानपणी केलेले लहानसहान उपकार, भर कोर्टात ती. यशवंतदादांचा वकील मला पुन्हा पुन्हा विचारीत होता. त्यांचीं उत्तरं मी शांतपणे सरळ देत होतो. तरी आजपर्यंत, माझ्या कुटुंबासाठीं - आणि विशेषतः ती यशवंतदादा व त्यांची मुलं यांच्यासाठीं...मीं एवढं करूनहि मजवर हा प्रसंग यावा,...हें मनाला लागल्यामुळे, मला वारंवार रडू येत होतं. पण मी एका बाजूस डोळे पुसून, जड आवाजांत वकिलाला सुचतील तीं सारीं उत्तरं स्पष्टपणे देऊन, माझी उलट तपासणी केव्हा संपेल, त्याचीच वाट पहात होतों.

पण नवीन सुचणारे लहानसहान अप्रस्तुत मुद्देहि, आपल्या वकिलाच्या कानांजवळ येऊन, यशवंतदादा सुचवीत होते. माझ्या व ती नानांच्या आयुष्यांतील क्षुद्र प्रसंगहि असे भर कोर्टात चव्हाट्यावर आले, कीं, ते एकदां रागीट मत्सरी दृष्टीनं आम्हां दोघांकडे हंसून पहात! त्यावेळीं, आपलं हृदय कुणीतरी जोराजोरानं कुरतडीत आहे, असंच जणूं मला वाटे!

: ७९३ :

यशवंतदादांच्या उलट तपासणींत मात्र बरीच गंमत उडाली. वडील भाऊ म्हणून नानांना व लहान म्हणून मला ते वेळोवेळी बरीच मदत करीत आले होते, असं त्यांचं म्हणणं होतं. कांहीं कांहीं वेळीं, हजारांनींहि जमा भरती झाली असं त्यांनीं सांगितलं -

मग मात्र आमच्या वकिलांनी, त्यांना प्रश्न विचारून, त्यांच्या वार्षिक उत्पन्नाचा प्रथम आढावा घेतला. जास्तीत जास्त शिकवण्या जमेस धरूनहि, एखाद्या गरीब शाळामास्तरास हजारांनीं मदत करणे व त्या बरोबर आपलं वाढतं कुटुंब चालविणं अगदीं अशक्य आहे. असं स्वतः जज्ज त्यांना रागावून म्हणाले.

पंधरा वर्षांत एकदांच १५०० रुपयांची ठेव नानांकडे दादांनी जमा केलेली जमाखर्चाच्या वहींत आढळली. पण ती मदत अगर भांडवल म्हणून नव्हे, तर पोष्टांत ठेवल्यास व्याज कमी येतं तेव्हां, त्यापेक्षा नानांच्या सावकरीच्या व्यवहारांत अडकविल्यास व्याज तरी जास्त येईल, या आशेनंच. असं शेवटीं, त्यापुढील नोंदीच्या पुराव्यावरून कोर्टानंहि ठरविलं.

: ७९४ :

दादांची फिर्याद, इथपर्यंत तरी, जवळ जवळ पोकळ ठरलीच होती. आतां फक्त आमच्या आईची तेवढी जबानी राहिली होती. ती अतिशय महत्त्वाची होती व किंबहुना तिजवरच सर्व खटल्याचा निकाल कदाचित् अवलंबून राहील, असे उद्गार उठतां उठतां कोर्टाच्या तोंडून निघाले होते.

ती तर आमच्यावर रागावून दावा सुरू झाल्यापासून यशवंतदादांकडेच दादरला रहात होती. तिची देखील म्हातारपणीं असली कोर्टांपर्यंत धिंड निघूं नये, म्हणून मी सरकारकडे बरीच खटपट केली. सराकारनंहि तें लागलीच कबूल केले; आपल्यातर्फे तिच्या जबानीसाठीं कमिशन नेमलं व दादरच्या दादांच्या घरींच तिची सरकारी जबानी घ्यायचं शेवटीं ठरलं.

: ७९५ :

दादा मात्र त्या एकंदर प्रकारामुळं बरेच बिथरले होते. त्या दिवशीं, खटल्याचं कोर्टातील बहुतेक काम संपल्यावर, वकिलांच्या चेंबरमध्यें आम्हीं बसलों होतों. इतक्यांत दादा एकदम आंत आले व मला उद्देशून आमच्या वकिलास रागानं म्हणाले, ''काय हो, तुमचे हे सत्यवक्ते कलेक्टरसाहेब मला तोंडघशीं पाडूं पहातात काय? पण याद राखा - त्यांना म्हणावं! - तुमचाच राम तुमचें बरोबर काम केल्याशिवाय रहाणार नाहीं!''

आमचे वकीलहि थोडे थट्टेखोर! मी शांत बसलेला पाहून ते एकदम म्हणाले, ''म्हणजे एकंदरींत सूर्यप्रकाशासारख्या सत्य गोष्टींसाठीं, यांच्या रामाची आणि तुमच्या कृष्ण विठोबाची कुस्ती होणार तर, मास्तरसाहेब!'' आपला देव व मुलगा यांना उद्देशून त्यांनीं एकदम समर्पक उत्तर दिलेलं पाहून



यशवंतदादा संतापले. पण त्यावर कांहीं एक न बोलतां शेवटीं एकदम चरफडत निघून गेले.

: ७९६ :

मला थोडी भीति वाटे ती आमच्या आईच्या जबानीची. तिचा प्रथमपासून यशवंतदादाकडेच ओढा. त्यामुळं खटला सुरू झाल्यापासून तिची सहानुभूति त्यांच्याच बाजूस असे. त्या वेळीं ती रहातहि होती त्यांच्याकडेच. त्यामुळं आतां तिच्या जबानींत काय होतं कुणास ठाऊक? अशी आमच्या मनाला सारखी रुखरुख वाटे. आणि त्या म्हातारीच्या जबानीला कोर्ट बरीच किंमत देणार यांत मुळीच संशय नव्हता.

शेवटीं ठरल्याप्रमाणं आम्ही सर्व दादरला यशवंतदादाकडेच जमलों होतों. कमिशनमध्यें दोन सरकारी वकील नेमले होते. आयत्या वेळी नाना कांहीं आले नाहींत. रागाच्या भरांत तिथे कदाचित् बोलाचाली होईल ती टाळायचाच त्यांचा हेतू असावा! -

आईची प्रकृति विशेष चांगली नव्हती. यशवंतदादा सकाळपासून तिच्याचजवळ बसून होते. मला भीति वाटे, ती एवढीच कीं, म्हातारी आयत्या वेळीं कदाचित् त्यांच्या कारस्थानास बळी पडेल आणि आम्हाला उगीच दगा देईल. जेवणानंतर कोर्टाच्या कामास सुरवात झाली! आणि त्या वेळीं घडलं तें सारंच अगदीं अनपेक्षित!

: ७९७ :

आई तक्क्याला ओडगून बिछान्यावरच बसली होती. वकीलमंडळी तिच्या भोंवतीं खुर्च्या टाकून बसले होते. मी आईच्या बिछान्याजवळच बसलों होतों. यशवंतदादा मात्र खोलींत इकडून तिकडे सारख्या येरझारा घालीत होते.

शेवटी मुख्य सरकारी वकिलानं कामास सुरवात केली. -

ते म्हणाले, ''आजीबाई, आम्हीं सर्व इथं कां जमलों आहों, हें तुम्हांला ठाऊक असेलच? तुम्हांला कोर्टात जाण्याचा त्रास होऊं नये म्हणून आम्हीं मुद्दाम घरीं आलों आहों तुमच्या! आतां तुमच्या यशवंतदादांचं असं म्हणणं आहे कीं, 'आजपर्यंत आमचं कुटुंब सारं समाईक होतं व आजहि आहे. अर्थात् आज नारायण वगैरे मंडळींच्या हातीं असलेली इस्टेट सामाईक स्वरूपाचीच आहे. तेव्हां त्यांचं कोर्टाकडे मागणं असं कीं, वडिलार्जित भांडवलावर एकत्र कुटुंबातर्फे कमावलेल्या या इस्टेटीचे, साऱ्या भावांत व त्यांच्या मुलांत सारखे हिस्से पडावेत! -

''तुमच्या नारायणरावांचं असं म्हणणं कीं, 'आम्हीं दरिद्री कुटुंबांतून वर आलों आहों. आमचीं वडिलोपार्जित एक दिडकीहि नव्हती. प्रत्येकजण आपापल्या कर्तबगारीवर वर आला. व प्रत्येकाचं नशीब ज्याच्या त्याच्याबरोबर आहे. एकत्र कुटुंबहि नव्हतं. व समाईक इस्टेटहि नाहीं!'' -

''अशा वेळीं सरकारला प्रश्न पडला आहे कीं, यांतील खरं कुणाचं?

''आणि म्हणून सरकारनं आम्हांला तुमच्यासारख्या म्हाताऱ्या माणसाला यांतील खरं काय तें विचारायला पाठविलं आहे!''

: ७९८ :

थोडा वेळ सगळीकडे शांत होतं! प्रत्येकाला म्हातारी काय उत्तर देते या विषयीं आपापल्यापरीनं हुरहुर लागली होती.

आईचा सुरकुतलेला चेहरा गंभीर झाला होता. आपले थरथरते हात टेकून ती तक्क्याजवळ नीट बसती झाली. आपल्या मिचमिच्या डोळ्यांना लावलेला जाड कांचेचा चष्मा बरोबर नाकावर ठेवून, पांढऱ्या धोतराचा डोक्यावरील पदर तिनं अदबीनं कपाळापर्यंत पुढं ओढला व एकदां सभोंवतीं बसलेल्या मंडळीकडे पाहून, ती पुन्हां शांतपणें तक्क्यावर भार टाकून स्वस्थ राहिली.

''मग काय आजीबाई? हें तुमचं कुटुंब व त्याची इस्टेट ही समाईक कीं विभक्त? तुमचं काय म्हणणं?'' वकिलानं पुन्हां आईला प्रश्न केला.

: ७९९ :

क्षणभरच ती गप्प होती. इतका वेळ ती सारखा विचारच करीत होती...

पण मग एकदम सभोंवार पहात ती म्हणाली, ''तुम्ही मोठमोठीं शहाणी मंडळी! मजसारख्या म्हातारीसाठीं मुद्दाम त्रास घेऊन आलांना? मला फार वाईट वाटतं...खरं म्हटलं तर भांडणाला कांहींच जागा नाहीं हो. यशवंतानं असं वांकड्यांत शिरायला नको होतं. नारायण माझाच मुलगा आणि जनूहि माझाच. पण यशवंत गरीब राहिला. नारायण लक्षाधीश झाला. जनू कष्ट करून खूप खूप शिकून मोठ्या अधिकाराला चढला. प्रत्येकानं हाल सोसूनच परिस्थितींतून आपापला मार्ग काढला! हीं माझीं मुलं...मी स्वतः मोलमजुरी करून वाढवलीं आहेत होऽ! कोणता शहाणा म्हणतो आहे, कीं वडिलार्जित कांहीं होतं म्हणून? छे छे! पैशाचा मोह वाईटच एकंदरीत!...

मी सांगतें तें ऐका थोडं...यशवंत एकमार्गी मनुष्य; तो जन्मभर शाळामास्तरच राहिला! त्याला पैसा मिळवताच आला नाहीं. माझा नारायण उलाढाल्या! त्यानं आयुष्यभर कष्ट करून पैसा गोळा केला. जनूंनंहि विद्या संपादन केली आणि आपली स्थितिहि सुधारली. आतां तुम्हीच पहा. यांत वडिलार्जित तें काय आहे बरं?...

वकीलसाहेब, माझ्या हाताचीं सगळींच बोटं सारख्या लांबीचीं असतीं तर मला बरं वाटलं असतं. पण तीं नाहींत म्हणून मी दुःख करण्यांत काय अर्थ? खरं सांगूं का?...ऐका...नीट लिहून घ्या...यशवंत स्वतः गरीब आहे म्हणून त्यानं हा खोटा मार्ग धरला. आणि म्हणून नारायणाची एकट्याची इस्टेट



समाईक ठरवण्याची त्यानं आतांपर्यंत खोटी खटपट केली आहे. पण म्हणून मी तें खरं कसं म्हणूं?...

तुम्हीं सारीं शहाणी मंडळी आहांत! असा अन्याय करूं नका. यांतील खरं मलाच विचारीत असलां, तर मी एवढचं सांगतें. वडिलार्जित अशी फुटकी कवडीसुद्धां नव्हती. यशवंताला मिळवतां आलं नाहीं. आणि नारायणानं स्वतःच्या हिंमतीवर स्वतःच्या मुलांबाळांसाठीं, स्वतःची ही मोठी इस्टेट मिळवली. त्यावर माझ्या कुटुंबांतील दुसऱ्या कुणाचाहि अधिकार - हक्क नाहीं. तेव्हां आतां सरकारला जाऊन सांगा म्हणावं..यशवंताचा हा खटला साफ खोटा आहे असंच त्याची आई म्हणत होती!... त्याच्या विरुद्ध न्याय द्या. माझा म्हातारीचा यांतला प्रत्येक शब्द खरा आहे.''

: ८०० :

आईचं हें अचानक सत्यकथन आम्हां सर्वांनाच अगदीं अनपेक्षित होतं. वास्तविक यशवंतदादाकडे तिचा सर्वांत जास्त ओढा! त्या घटकेपर्यंत तर ती त्याचीच बाजू खरी असं म्हणून आम्हांला शिव्या देई. तेव्हां ती आजहि त्याच्या बाजूनंच साक्ष देणार अशी आमची कल्पना होती!

पण शेवटीं तिनं अधिकारवाणीनं एकाएकीं दिलेला हा खरा निर्णय ऐकून, आम्हीं तर अगदीं आश्चर्यचकितच झालों! -

यशवंतदादा आईवर एकदम चिडले व तिजकडे रागानं इंगळासारखे डोळे करून पाहूं लागले! - ते तिला कांहीं तरी बोलणार -

इतक्यांत म्हातारी ओक्साबोक्शीं रडत, पुन्हां मोठ्यानं बोलूं लागली, ''मला विचारलंत. मी खरं ते सांगितलं. पण आतां या गरीब म्हातारीची, माझ्या या श्रीमंत मुलांकडे हात जोडून पदर पसरून मरणापूर्वीची एक मागणी आहे!...माझा यशवंत गरीब आहे. पैशाच्या मोहानंच तो खोट्यांत शिरला! नारायणाला म्हणावं - तोहि आतां म्हातारा झाला आहे - तूं पैसे मिळविले आहेस. यांतील कांहीं, तुझी म्हातारी आई तुला विनंति करीत आहे म्हणून हात उचलून त्याला दे. देव तुझं कल्याण करील!...''

तिचे ते म्हातारपणचे गद्गदून आलेले शब्द वकीलमंडळीनाहि हालवून सोडल्यावांचून राहिले नाहींत! मग मी तर तिच्याच उदरांत जन्मलेला, तिच्या रक्तामासांचा मुलगाच! मी पुढं होऊन तिला स्फुंदत विचारलं, ''आई, तूं आम्हांला अशी विनंति करूं नकोस; तुझी काय इच्छा आहे? आज्ञा कर आई! आम्हीं यशवंतदादाला काय द्यावं म्हणतेस?''

''कोण जनू? बाबा, तूं कुटुंबासाठीं आतांपर्यंत पुष्कळ झीज सोसली आहेस. तुझ्याकडे स्वतःसाठीं आतां काय आहे तें मला ठाऊक आहे! तुझ्या मुलांबाळांना नको का आहे तें? - माझी विनंति एक त्या नारायणाकडेच आहे. त्यानं यशवंताला हात उचलून दहा हजार रुपये द्यावेत. त्याचा तो हक्क

नाहीं, केवळ आई म्हणते म्हणून नारायणानं ते द्यावेत! आणि खटला करण्यासाठीं कांहीं खर्च झाला असेल यशवंताला तर तो त्याला द्यावा. मला तुमचे कायदे कळत नाहींत. तुम्ही सर्व शहाणे आहांत; मग सरकारला आतां सांगा, - म्हणावं, ''आमचा खटला संपला. आम्हीच त्याचा फैसला केला - आतां हाच निकाल कायम झाला!''

: ८०१ :

आईची ही अचानक प्रकट झालेली अधिकारी न्यायबुद्धि पाहून, तिची योग्यता किती मोठी आहे तें आम्हाला तात्काळ समजून आलं. मी नानांना याविषयीं सर्व कळवून आईची आज्ञा ऐकण्याची विनंति केली. त्यांचा यशवंतदादावरील रोष अजूनहि कायम असल्यामुळं - आणि तें अगदीं सहाजिकच होतं - ते एकदम या गोष्टीस कबूल होणार नाहींत हें जाणून रकमेची निम्मी जबाबदारी मी मजवर घेतो असंहि त्यांत कळविलं. त्यामुळं मजवर ती एक नवीन जबाबदारी उगीच येऊन पडणार होती, हें मला समजत होतं. पण मला एकच समाधान होतं त्यांत, कीं गेलीं अनेक वर्षे आंतल्या आंत धुमसणारा हा कुटुंबकलह अशा अनपेक्षितपणें तरी एकदांचा शांत होईल! -

यशवंतदादा यशस्वी होणार नव्हतेच. आणि ते चार चौघांत खोटे ठरले हें खरं असलं तरी एकंदर मनस्ताप लक्षांत घेतां आईकरितां कां होईना, शेवटीं कांहीसं पडतं घ्यावं लागल्याबद्दल नानाच्या मनाला दुःख झाल्यावांचून राहिलं नाहीं! -

कारण, त्यानंतर पांच सहा दिवसांतच, नानांची प्रकृति एकाएकीं बरीच आजारी झाली. व तसल्याच मनस्थितींत मला त्याचं पुढील पत्र आलं -

: ८०२ :

कल्याण ता....

चि. बाबासाहेब यांस अनेक आशिर्वाद विशेष -

आपलें पत्र मिळालें. मी तेथें दादरला हजर राहिलों नाहीं हें एका अर्थी बरेंच झालें तर - नाहीं तर मी माझ्या संतापी स्वभावाप्रमाणें उगीच कांहीं तरी बोललो असतो व आजपर्यंत केलें तें बाजूस राहून चार चौघांतील माझे वांकडे शब्द तेवढे मागें राहिले असते. असो.

एकंदरीत मातोश्रीनें 'समेट' घडवून आणला आणि आपण तिच्या सांगण्याप्रमाणें मी वागावें, असें आपलें मत पत्रांत कळवितां; ठीक! मला व्यक्तिशः आपणांविषयीं जिव्हाळा असल्यामुळें, शब्दास मान देण्यासाठीं मी त्यास कबूल होत आहे.

: ८०३ :

तरी पण चार गोष्टी येथें नमूद केल्यावांचून मला अगदीं रहावत नाहीं. आईच्या म्हणण्याप्रमाणें,



चि. यशवंतदादा यास दहा हजार रुपये, त्याचा फिर्यादीचा खर्च तीन हजार रुपये, एवढे तर मी द्यावयाचेच! - पण त्याच्या घरांत माझ्या हातचे केलेले दागिने आहेत त्याविषयीं मात्र ती मुग्धच राहिली आहे.

आतां गम्मत पहा. आपल्या कल्याणच्या बिऱ्हाडी तिनें कोंकणांतून आणलेला एक शिसवी पाट होता. आपण मामांच्या कारकीर्दीपर्यंत व पुढेंहि कांहीं दिवस, दरवर्षी त्याच्यावर गणपती बसवून घरीं आणत असूं. तो मात्र आईनें, मुद्दाम मजकडून मागून घेऊन, चि. यशवंतदादाकडे पाठवून दिला. त्या पाटास कोंकणांतून आणल्याला पन्नासाहून जास्त वर्षे झालीं. पण तो पाट वडिलार्जित याची मात्र आठवण चि. यशवंदादास व मातोश्रीस रहाते!..

आणि मी माझी परिस्थिति विशेष चांगली नव्हती, तरी मुद्दाम सारी शिल्लक खर्च करून चि. यशवंतदादाच्या लग्नांत, पाटल्यांचा जोड करून मातोश्रीच्या हातानें, यशवंतदादाच्या बायकोस घातला. तसेंच चि. पांडोबाच्या पहिल्या लग्नांत, चि. यशवंतदादानें त्याच्या बायकोस घातलेली नथ खोटी निघाली, म्हणून त्याचा सासरा कांहीं तरी उपमर्द करून बोलूं लागला. त्याची चीड येऊन, मी माझ्याकडे गहाण पडलेली एक नथ, मातोश्रीचे हातानेंच, लागलीच चि. पांडोबाच्या बायकोस घातली. त्याची मात्र आठवण तिजला किंवा त्यांना यावेळीं रहात नाहीं. फार उत्तम!...

पण माझे दिवसच उलटे आहेत, त्याला कोण काय करणार? म्हणूनच, शक्य, तों, शांतता राखून मी या गोष्टीहि तुमच्या व मातोश्रीच्या सांगण्यावरून, इतक्या रकमेबरोबर विसरून जात आहे. त्याबद्दल काळजी नसावी. जेथें मला हे तेरा हजार रुपये व माझा स्वतःचा दोन अडीच हजार रुपयांचा दाव्यासाठीं झालेला खर्च खिशांतून विनाकारण काढणें भाग पडत आहे, तेथें असल्या लहान गोष्टींकडे दुर्लक्ष करणें हेंच शहाणपणाचें. तुमचाहि या दाव्याप्रीतर्थ नाहक झालेला खर्च मजपुढें आहेच! तेव्हां मी ह्या गोष्टी दुर्लक्षावयाच्या नाहीं तर करावयाचें तरी काय?...

: ८०४ :

मात्र येथे थोडक्यांत लिहावयाचें म्हणजे, परमेश्वराच्या घरीं न्याय नाहीं!...माझी तर आतां अशी समजूत जाली आहे कीं दावा - कमिशन, हें सारें ढोंग होतें. हें सतरा अठरा हजार रुपयांचे नुकसान व एवढा मनस्ताप मजला देण्याचें कारण, मी या आईच्या पोटीं जन्म घेऊन जगांत आलो त्या उपकारांची फेड करण्यासाठींच! ही माझी आई नसून ती पूर्व जन्मींची माझी वैरीणच होती; तिनें आपलें वैर साधण्यासाठीं मजला व माझ्या मुलाला लुटून आमचं पुरेपूर नुकसानच केलें व तिनें आपल्या एका दुबळ्या, दांभिक मुलाकडेच लक्ष ठेवून, माझें सर्वस्व लुटून त्यास दिलें!

कांहीं का असेना, आतां तिला म्हणावें, 'माझा व तिचा किंवा यशवंतदादाचा यापुढें कसलाच

संबंध राहिलेला नाहीं!' त्या दोघांनीं याचसाठीं जन्म घेतला होता जणूं काय! तें त्यांचें अवतारकार्य पुरें झालें. आतां त्यांनीं यापुढें तरी सुखानें आनंदांत रहावें हीच आमची इच्छा! मात्र हा अन्याय जगांत चालला, तरी ईश्वराकडे रुजू होणार नाहीं खास!

हो, कदाचित्, मी स्वत:च जगांत अनेक वेळां अतिशय अन्यायानें वागलो! त्यामुळेंहि हा प्रसंग मजवर आला असेल! नाहीं कोणी म्हणावें...पण तें असो. या साऱ्या प्रकरणाचा माझ्या हयातींतच निकाल लागला, यामुळें तरी मला आज समाधान वाटतें आहे.

: ८०५ :

यानंतर आतां मी फारसा जगेन असें मला तरी वाटत नाहीं. मात्र जे थोडे दिवस जगांत यापुढें जातील त्यांत असल्या नीच, कृतघ्न भाऊबंदांचीं तोंडेंसुद्धां पहावयाची आतां माझी इच्छा नाहीं.

पण यापेक्षांहि वाईट गोष्ट म्हणजे आज मला ही ठरलेली रक्कम पुरी करण्यासाठीं माझी कांहीं उत्तम जमीन विकावी लागणार आहे. कारण मजकडे रोख शिल्लक आज कांहीं नाहीं. या दाव्यांत मजकडील शिल्लक रोख रक्कम संपत गेली. त्यासाठीं माझ्या कांहीं घरांना बरीच किंमत येण्याचा संभव असूनहि, फूटतूट, दुरुस्ती करण्यास पैसा नसल्यामुळें, मला मध्यें कांहीं दिवस अगदीं स्वस्थ बसावें लागलें. आणि आज हें दुहेरी तिहेरी नुकसान मला निमूट सोसावें लागत आहे.

पण तरीहि, मी आपल्या म्हणण्याप्रमाणें सर्व गोष्टींस, मन घट्ट करून तयार झालो आहे. महिन्याभरांत आपल्या आईच्या म्हणण्याप्रमाणें सारी व्यवस्था करतो.

चि. यशवंतदादा यानें माझ्या छातीवर बसून माझें असें नुकसान केलें, तर त्याच्या उलट आपण, मी त्यांना द्यावयाच्या त्या रक्कमेंत निम्मा भाग आपल्या शिरावर लादण्यास मला सांगतां? खरोखर जग किती परस्परविरोधी आहे!

बाबासाहेब, मला या वेळीं अगदीं रहावत नाहीं. तुमच्यासारखा एक तरी भाऊ मला लाभला आहे, याबद्दलच मी स्वत:ला अतिशय भाग्यवान् समजतो. तुमची खरी किंमत आम्हांला आजपर्यंत समजत नव्हती. आम्ही स्वार्थानें तुमच्या सौजन्याचा व संपत्तीचा आजपर्यंत वर्षानुवर्षे बराच गैरफायदाच घेत आलों, असें मला येथें माझ्या मनाला जागून प्रांजलपणें म्हटल्यावांचून रहावत नाहीं.

तेव्हां, चि. यशवंतदादा यांस रक्कम द्यावी लागते, म्हणून त्या रकमेची भर आपल्याकडून घेऊन करावी, असें तुम्हीं म्हणालां, तरी मला कांहीं माणूसकी आहे कीं नाहीं बाबासाहेब?... तसें कदापिहि होणार नाहीं. तुम्ही आजपर्यंत जी आपल्या कुटुंबासाठी धडपड केली व जो खर्च केला त्याचा हिशेब केला तर आजपावेतों आपल्याकडून जी मदत झाली आहे तिची एकंदर रक्कम मजला आज द्यावी लागत आहे त्याहून किती तरी जास्त भरेल! उलट मीच आपणांस कांहीं तरी कां देऊं नये बरें?



पण खरोखर जगाचे व्यवहारच फार उरफाटे आहेत! छातीवर बसून घेणाऱ्याला मिळतें व आपल्यासारख्यांना कांहींतरी आनंदानें देण्यास मजजवळ आज तरी सुटी रक्कम अशी कांहीं नाहीं! मात्र आपण आमचे भाऊ म्हणून आपलीहि आमच्याबरोबर बेअब्रू तेवढी झाली!...आपल्याला दगदग सोसावी लागली! खर्च झाला. कदाचित् दांभिकपणाहि वाटेल यांत आपल्याला माझा! - पण मनुष्य पापी असला तरी त्याची त्याला जाणीव असते. आणि तोहि जगांत कधीकधीं मनापासून अगदीं खरे खरे हृदयाचे शब्द बोलतो हें आपल्याला मी सांगायला नको! - असो. आमच्याकडून आपल्याला कांहीं मिळालें नाहीं तरी ईश्वरच आपल्याला जगांत हात देईल!...

: ८०७ :

आणि, अशा वेळींच वाटतें, या नीचांना कांहींहि देऊ नये!

पण पुन्हा आपल्यासारख्यांचा मोठेपणा पाहून मन एकदम आवरावें लागतें!...मी पैशाची भीति कधीं बाळगली नाहीं व पुढेंहि मरेपर्यंत कधीं बाळगणार नाहीं. अशा अनेक धाडशी उलाढाल्या मी माझ्या आयुष्यांत करीत आलो; पण आतां वय बरेंच झालें. हल्लीं प्रकृतिहि बरी नसते. त्यामुळें कसलाहि नवा धंदा करण्यास मन धजत नाहीं! -

तेव्हां वर लिहिल्याप्रमाणें सर्व झाल्यावर, मी जवळजवळ पूर्वीसारखाच कफल्लक बनलो म्हणावयाचा. आतां जें काहीं राहिलें आहे ते वसंतासाठींच! - त्याला माझ्याप्रमाणें जगाचा अनुभव नाहीं! म्हणून मी या आठवड्यांतच सारी व्यवस्था करणार आहे! तरी कृपा करून, आपण समक्ष दोन दिवस येथें रहावयास येऊन, कशी ती कायदेशीर व्यवस्था करावी -

आतां इकडे येतांना, आईला भेटून तिला म्हणावें, ''तुझ्या सांगण्याप्रमाणें नानानें सारें केलें आहे. पण मजकडे अजून, वडिलार्जित अशा कांहीं गोष्टी असल्यास मुद्दाम कळव. मजकडे असतांना, तूं पुन्हां पुन्हां ज्याच्यासाठीं टुमणें लावीत होतीस, तो माझ्या गावंढ्यावर असलेल्या कुटुंबाच्या मालकीचा मुलांचा पाळणा आतां मी येथें आणला आहे. तो लागलीच घेऊन जाण्याची व्यवस्था करावयास चि. यशवंतदादास सांग किंवा पाहिजे तर मी माझ्या माणसाबरोबर लौकरच पाठवितो. याशिवाय, तुझ्या हातची, कै. मामांच्या हातची अगर आमच्या वडिलांच्या हातची आणखी कांहीं चीजवस्तू माझ्या स्वकष्टार्जित स्वत:च्या मालकीच्या ह्या घरीं असेल, तर त्यांची यादी, नीट विचार करून अगर चि. यशवंतदादाला विचारून पाठव. म्हणजे असेल ती प्रत्येक चीज त्याजकडे पाठवून देईन. कोणती घरांत सांपडत नसेल तिची तूं किंवा यशवंतदादा ठरवील ती रोख रक्कम पाठवीन. मजला तें ठेऊन घेऊन तुमचें कोणाचें ओशाळें रहावयास मुळींच नको आहे. आजपर्यंत केलेत तेवढे उपकार पुष्कळ झाले!...पण कृपा करून तोंडानें कोणत्याहि प्रकारचे वाईट शब्द मात्र मला अगर माझ्या मुलाला उद्देशून वापरूं नका

म्हणावें! तो तुम्हांला आतां तर जरासुद्धां हक्क पोहोंचत नाहीं. आणि दुसरें - मला आतां कायमचे विसरून जा!...तुम्हांला पाहिजे तें सारें मी दिलें आहे. हात जोडून तुमच्याकडे आतां माझें फक्त हें एकच मागणें!...''

या पत्राचें उत्तर लौकर यावें व आपण केव्हा येतां तेंहि कळवावें. कृपा करून कोणत्याहि प्रकारचा उपदेश त्यांत असूं नये. मला आतां त्याचा तिटकारा आला आहे. कळावें हें आशिर्वाद.

आपला

**नाना ठाकूर**

ती. नानांचं हें पत्र त्यांनीं अगदीं पिळवटलेल्या हृदयांतून लिहिलं होतं यांत कांहींच संशय नाहीं. आणि तें अगदीं नैसर्गिकहि होतं. त्यांच्यासारख्या माणसानं आपल्या जबाबदारीवर सारी मिळकत कमविली! त्यावेळीं त्यांतील आपण कुणाला कांहीं द्यायचं नाहीं, तसंच कुणाकडून कांहीं घ्यायचंहि नाहीं ही त्यांची साधारणतः वृत्ति होती आणि असं असतांना, त्यांना म्हातारपणीं हा भूर्दंड भरावा लागला, मनस्ताप भोगावा लागला आणि ते सारंच इथून तिथून वेदांती पोषाख घातलेल्या खोट्यावर व अंध स्वार्थावर उभारलेलं! त्यामुळें त्यांच्या जीवाचा असा संताप होणे अगदीं सहाजिक होतें.

: ८०८ :

पण आईचा, ती. यशवंतदादाकडे ओढा असावा हेंहि कांहीं अगदींच अस्वाभाविक नव्हतं. जगांत नेहमीं आपण पहातों दुबळ्या, अनाथ, चिडखोर व खोटा स्वार्थी त्रागा करणाऱ्या मुलांनाच, माता आपलं पांघरूण घालीत असतात. तेव्हां आमच्या आईनं, आपलं वजन खर्च करून, नानांकडून यशवंतदादांसाठीं तडजोडीच्या पद्धतीनं कांहीं पैसा मिळवणं हें कांहीं अगदी अस्वाभाविक नव्हतं. म्हणून नानांना त्रास झाला, तरी तो सर्व आपल्या मातोश्रीसाठीं सहन करणं हे आपलं कर्तव्य ठरतं व तें ईश्वराकडे खासच रुजू होईल, असं मला शेवटीं वाटलं!

तडजोड झाली व पैशापेक्षां आईच्या शब्दांना आपण मान दिला यामुळं चार परिचित लोकांत आमचा जसा मान राहिला, तसा कायदेशीररित्या नानांच्या बाजूनं निकाल लागल्यावर तो रास्त व सहाजिक असूनहि राहिला नसता! म्हणूनच मी रकमेची अर्धी जबाबदारी स्वतःवर घ्यायला तयार झालो होतो. पैशापेक्षां आईच्या शब्दांची कदर करणं व चार लोकांतील मानाची अपेक्षा धरणं हेंच मला जास्त श्रेयस्कर वाटलं! -

पण मग नानाहि, मला प्रथम वाटले तितके केवळ पैशामागं लागलेले नव्हते. त्यांनी माझ्या मदतीचा साफ इन्कार केला, हें त्यांना भूषणावहच होतं. त्यांनीं अन्यायांनीं कदाचित् पैसा मिळवला



असला, व त्यांची एकंदर चिरचिर दिसत असली तरी या वेळीं त्यांच्या हातून होत असलेला हा त्याग खरोखर बिनमोल होता!

त्या प्रसंगीं, त्यांच्या जीवाचा संताप झाला, याबद्दलहि मी त्यांना दोष देत नाहीं! मनुष्याला असल्या अपेक्षा असतातच. निदान आपापसांत तरी न्याय असावा असं वाटत असतं. तो कांहीं लोखंडाचं यंत्र नसतो! -

ह्याच सर्व गोष्टी मला सांगाव्याशा वाटत असूनहि, असाच विचार करून, मी नानांच्या इच्छेप्रमाणें त्यांना कसलाहि उपदेश केला नाहीं. वास्तविक मला तसला अधिकारहि नव्हता. म्हणून त्यांचं दुःख, त्यांचा संताप, त्यांच्याच मनांत शांत होऊं द्यावा, असा विचार करून नानांना फक्त त्यांच्या इच्छेप्रमाणें समक्ष भेटावं असं ठरविलं व त्याबद्दल त्यांस, मी साधं कार्डच लिहून टाकलं.

: ८०९ :

तिथं जाण्यापूर्वी, आईला सहज भेटायला म्हणून यशवंतदादाकडे दादरला गेलो. तिथं नानांनीं रागारागांत लिहिल्याप्रमाणं, आईला साऱ्या गोष्टी सांगण्याचा, माझा अर्थातच विचार नव्हता!

पण तिथे गेल्यावर त्या वृद्ध, जवळ जवळ अंधच झालेल्या आमच्या जन्मदात्रीची त्या साऱ्या माणसांकडून होत असलेली एकंदर आबाळ पाहून मात्र माझे डोळे पाण्यानं भरून आल्याशिवाय राहिले नाहीत!...

जिनं आम्हांला जन्म दिला, अंगमेहनत, काबाडकष्ट करून लहानपणीं आमचं पालनपोषण केलं, आपापसांत भांडणें उपस्थित झाल्यावरहि जी नेहमी यशवंतदादांच्या हितासाठीं दक्ष राहून आमच्याबरोबर झगडली, तिच्या आयुष्याच्या या साऱ्या धडपडींचं त्याच माणसांनी तरी काय चीज केलं?

ती लहानसहान गोष्टीसाठींसुद्धां लहान मुलासारखी नेहमीं रडे - त्रागा करी हट्ट धरी! - खर्चातील काटकसरीसाठीं म्हणा किंवा तिला त्रास देण्याकरिता म्हणा - तिच्या दृष्टीला दिसत नाहीं याचा फायदा घेऊन, तिला लागणारं ताक दहीं माझ्यादेखत बाजारांतून आलेलं पाहून माझ्या हृदयाला विंचवाच्या हजारो नांग्या सलल्यासारखं झालं.

आणि त्याच वेळी यशवंतदादासारखा वेदान्ती, तिजजवळ येऊन तिला सांगत होता, ''आई, तूं आतां फारच म्हातारी झालीस - तुला आतां म्हातारचळ लागला आहे! हा तुझा श्रीमंत मुलगा - कलेक्टरसाहेब तुला आज भेटायला आले आहेत! - म्हणून तूं हीं असलीं नाटकं करून दाखवतेस होय?'' -

मी तिच्याजवळ बिछान्यावर बसलो होतो. मला ते शब्द ऐकून मनस्वी दुःख झालं. पण भांडणाचा नवा प्रसंग उगीच येईल, तो टाळावा म्हणून मी गप्प बसलो.

: ८१० :

दादा निघून गेल्यावर, मी डोळे पुसून आईला हळूच विचारलं, ''आई, तूं थोडे दिवस मजकडे माटुंग्याला रहायला येतेस का?''

ती थोडा वेळ गप्प राहिली. व आपल्या भरलेल्या म्हाताऱ्या डोळ्यांनीं मजकडे पाहून म्हणाली, ''नको रे बाबा जनू. आतां राहिले तरी असे कितीसे दिवस माझे? - मला म्हातारीला इकडून तिकडे कशाला हालवतां तुम्हीं आतां? मी मरणाची अगदीं वाट पहात आहे. माझा तुम्हाला कुणाला कशाला भार पाहिजे आतां?...''

: ८११ :

शेवटीं त्या दिवशीं मी तसाच 'बरं येतो' असं म्हणून तिजकडून निमूटपणें निघालो; तो तडक नानांकडे कल्याणला गेलो -

पुढले दोन दिवस मी तिथंच होतो. नानांनी मला रहावयाचा फार आग्रह केला.

ते गांवढ्यावरून चार पांच दिवसांपूर्वीच कांहीं व्यवस्था करून परत आले होते. तिथं त्यांनां त्यांच्या पूर्वीच्या राघ्या गड्यानं मारलं, अशी अफवा उठली होती.

पण ते मात्र मला दोन तीनदां म्हणाले, ''मी कुणाचा तरी राग कुणावर तरी काढतो. मला आतां वेड लागण्याची पाळी आली आहे. मरेन तेव्हां सुटेन. या बाबतींत, राघ्या अगदींच निरपराधी आहे!'' -

तिथं दोन दिवस राहून, त्यांचं कायदेशीर मृत्युपत्र करून देऊन, मी परत माटुंग्यास फिरतों, तोंच त्यांच्या मृत्यूची बातमी मला समजली.

आणि त्यानंतर, आमची म्हातारी आई, पंधरवड्यांतच त्याच्याबद्दल शोक करीत करीत मरण पावली! -

आतां आम्हीं दोघेच भाऊ राहिलों होतों. तेव्हां आईच्या स्मशानयात्रेंत, यशवंतदादा वडील म्हणून त्यांनींच विस्तवाचं मडकं हातीं धरलं होतं!...

: ८१२ :

झालं. अरुण, कमळे, वसंत, अरविंद, बाळानों! अशी आमची आई, आमचे मामा, आम्हीं भाऊ होतों! आमच्या एकत्र कुटुंबाचा, असा स्वार्थात पिचत पिचतच धुव्वा उडाला!...

आतां यापुढं मी थोडक्यांत व्यक्तिशः माझ्या वैवाहिक व कौटुंबिक जीवनाचा तुमच्यापुढं पाढा वाचतो! कंटाळूं नका! मला आतां अगदीं थोडं सांगायचं आहे! - ''



: ८१३ :

कंटाळा येण्याऐवजी साऱ्यांना दुःखाचे हुंदकेच येत होते! -

नानांच्या मृत्यूचा प्रसंग आठवीत, वसंत एकदम थांबला -

बाबांनीं आतांच सांगितलेली भाऊबंदकी, अरुणसमोर सारखी उभी रहात होती. राघोची तुरुंगांतील भेट त्याला पुन्हां आठवली! - पण त्यावर नानांच्या आतांच समजलेल्या मनःस्थितीचा प्रकाश पडून, ती पूर्वीइतकीं काळोखी काजळी वाटेना! - प्रत्येक माणसाच्या प्रत्येक कृतीला कांहींतरी भूमिका असते, त्याला वाटलें! -

अरविंद व कमळामावशी, दोघांनींहि त्या भावांकडे अत्यंत सहानुभूतीनें पाहिलें व ऐकलेल्या वृत्तांतानें बधिर झालेल्या अंतःकरणास स्थिर करण्यासाठीं, त्यांनीं दुःखाचे सुस्कारे टाकले.

अचानक झालेली ही शांतता मोडून, वसंत पुन्हा धीरानेंच पुढें वाचूं लागला -

: ८१४ :

''अशा तऱ्हेनं, एकामागून एक घडलेल्या नाना व आई यांच्या मृत्यूंचा माझ्या मनावर फारच परिणाम झाला.

तडजोड व आईचा मृत्यू! - त्यामुळं नाहींसा झालेला कुटुंबाचा मध्यवर्ती केंद्र! - इथंच एकत्र कुटुंबाचा उरलासुरला ऋणानुबंध संपला होता.

त्यामुळं, झटकन् थोड्याशा भयभीत अंतःकरणानं, मीहि - माझ्या वैयक्तिक व्यवहाराकडे, निरवा निरवीच्या दृष्टीनं पाहूं लागलों. अनेक रात्रीं जागून पुन्हां पुन्हां विचार करून, मी माझ्या मृत्युपत्राचं कच्चं टिपण तयार केलं; तेव्हांच माझ्या मनाचं कुठं समाधान झालं.

: ८१५ :

त्या वेळीं, शरद् नुकताच आजारांतून बाहेर पडला होता. माझीहि प्रकृति बरीच नादुरुस्त झाली होती. आणि मला एकेकदां वाटे, माझ्या मनांत हें जें सारं येत आहे, तें आपल्या माणसांपैकी कुणाला तरी मोकळेपणें सांगावं!

पण मग, आपलीं म्हणजे कोण? या दृष्टीनं, मी माझ्या घरांत चौफेर नजर फिरवूं लागलो!

एकत्र कुटुंबाचं प्रकरण तिथंच संपलं होतं. नाना निघून गेले होते. अरुण मला सोडून चळवळींत गेलेला. त्यामुळं त्या वेळीं तो तुरुंगांत शिक्षा भोगीत होता. शरद् लहान! त्याला काय सांगणार आणि समजणार? असे विविध विचार मनांत डोकावत होते. अरविंद मधून मधून मजकडे येत; पण त्यांना त्याच वेळीं, घरांतील सर्व गोष्टी व व्यवहार कळविणं मलां प्रशस्त वाटेना. शरदची आई माझी पत्नीच पण तिलाहि सारं सांगायला माझं मन घेईना! -

असल्याच विचारांत माझ्या वृद्ध व नबळ्या झालेल्या शरीरानं, माझे सारे व्यवहार कुणाच्या मदतीशिवायच एकाकीपणें मी कसेबसे ढकलीत, दिवस कंठीत होतो.

: ८१६ :

मी स्वतःच्या पत्नीला सांगायला कां कचरत होतो? असा कुणीतरी मला इथं प्रश्न करील! -

त्याचं उत्तर?...एकदां वाटतं, सांगावं; एकदां वाटतं, सांगूंच नये! - पण सांगतोच सारं! आतां माझं इथं या जगांत राहिलं आहे काय तर चोरून ठेऊं? आतापर्यंत अगदीं मोकळेपणें सांगितल्यावर माझं वैवाहिक जीवन तरी मी तुमच्यापासून कां लपवूं?...

: ८१७ :

बाळांनो, मी आतां सांगत होतो त्याच दिवसांतील गोष्ट, शरद्‌ची प्रकृति बरी झाली होती पण त्याचं औषध चालू होतं. मी स्वतः जाऊन डॉक्टरकडून औषधाची बाटली दोन दिवसांपूर्वी आणली होती. त्याच वेळीं एका वैद्यानं मला स्वतःला 'कांहीं नाहीं तर नागलीचं सत्त्व व वांकेरीचं भातं तरी घेत चला' असं सांगितलं होतं.

साधारणपणें पूर्वीपासून मला स्वावलंबनाची संवय झालेली! त्यामुळं मीच रोज सकाळीं उठून वांकेरीचं मूळ देवघरांत बसून उगाळीत असे. दुधांतून तें घेतां घेतां मी सहज घरांत प्रश्न केला, ''काल आणून दिलेल्या नागल्याचं माझ्यासाठीं सत्त्व तयार केलं का?''

प्रश्न दोनदां विचारल्यावर मग 'नाही' असा आंतून जबाब आला.

''शरद्‌ची प्रकृति आतां चांगली आहे असं वाटलं तरी त्याचं औषध चालू ठेवायला डॉक्टरनं सांगितलं आहे हो. आणलेलं दोन दिवसाचं औषध संपलं का?''

''नाहीं!...राहिलं!'' थोड्या वेळानं उत्तर आलं. मी उठून बाटली पाहिली. दोन दिवसांत दोनच डोस गेले होते. परत बसल्या ठिकाणीं जाऊन कसं बसं माझं औषध मी घेतलं व कांहीं न बोलतांच हॉलमध्यें आलो.

माझं आता आयुष्यांत विशेष काय होतं? जन्मभर करीत आलो होतो, तशीच माझी सारी धडपड माझ्या मुलांमाणसांसाठींच होती. आणि म्हणूनच डॉक्टरनं सांगतांच, मुलांच्या भवितव्याच्या दृष्टीनं तरी, आपल्या प्रकृतीची आबाळ न करणं, हें माझं कर्तव्य आहे असं वाटून, मी घाईघाईनं बाजारांतून स्वतःच नागल्या घरीं आणून टाकल्या होत्या. त्यानंतर दोन दिवस त्याच्या सत्त्वासाठीं मी मधून मधून सूचनाहि करीत होतो!

पण आजपर्यंत दिसून आलेली साऱ्यांची बेफिकीरी, माझ्या म्हातारपणींहि कायमच होती. घरांतील मंडळी जणूं माझंच सत्त्व पहात होती. शरद्‌च्या औषधाविषयींचा तो तसा बेफिकीरपणा! तोहि माझ्या



मनाला तसाच त्या वेळीं या विचारांमुळें झोंबला.

: ८१८ :

इतक्यांत, आमचा काठ्या गडी माझ्याजवळ आला व गोरामोरा कष्टी रंजीस चेहरा करून म्हणाला, ''बाबा, मना नको तुमचा शेत खंडान्; बिजा कुनाला बि द्या.''

''कां रे?''...मी त्याला विचारलं.

पण तो कांहीं न बोलतां आला तसाच निघून गेला.

वसंताच्या शेताजवळचा माझा लहानसा जमिनीचा तुकडा दुसऱ्या एका कुळाकडे खंडानं होता.

एके दिवशीं, माझं अंग चेपतां चेपतां, काठ्या मला म्हणाला, ''बाबा, मी अयां असलों तरी बी माजी बायको लावील श्येत!...तुमची जमीन मला लावाया द्या.''

तो तीन मण खंड कमी देऊं करीत होता. तरी शेवटीं, तो माझ्या घरांत खपत आहे, या विचारानं, मी त्याला तें कबूल केलं होतं व त्याप्रमाणं सारी व्यवस्थाहि लावून आलो होतो.

मग आज हा एकाएकीं असा बिथरला कां? हें मला त्या वेळीं कांहीं समजेना! -

: ८१९ :

इतक्यांत शरद्‌ची आई, चहा घेऊन येतां मला म्हणाली ''काठ्याला काय आपली जमीन लावायला दिली आहे? - ''

''हो. कां?'' मी आश्चर्यानं दचकूनच विचारलं.

''नाहीं, तो म्हणत होता, आपल्याला तीन मण खंड कमी केला म्हणून!'' शरद्‌ची आई म्हणाली.

''हो. मला ठाऊक आहे तें!'' मी तिच्याकडे पाहून म्हटलं. ''मग? - तुम्हीं काय म्हणाला होतां त्या बाबतींत?''

''नाहीं बा. एवढीच चौकशी केली होती त्याच्याकडे!'' ती म्हणाली व आंत गेली.

चहा पितां पितां, मी विचार केल्यावर, माझ्या डोक्यांत प्रकाश पडला. काठ्यानं थोड्याच वेळांपूर्वी, 'जमीन लावायास नको' असं सांगितलं, याचं कारण बहुतेक माझी बायकोच.

त्याला कांहीं तरी हिणविणारे उपकारी शब्द ती बोलली असेल आणि गेल्या आठ दहा दिवसांत तर तसं अनेक वेळा होणं, तिच्या दृष्टीनं चमत्कारिक नव्हतं. त्यामुळंच, गरीबांनाहि स्वतःविषयीं वाटणाऱ्या थोड्याफार अभिमानामुळंच बिथरून, काठ्यानं आज मला नकार दिला.

: ८२० :

मला त्या वेळीं तें मनाला अतिशय लागलं. त्याबद्दल वाईटहि वाटलं. मला काटकसर समजते. पण शरदच्या आईची ही असली क्षुद्र काटकसर व घरांतील उधळा संसार मला अनेक वेळां समजून आला

होता.

पण आतां आयुष्याला उतार लागल्यानंतर, मी असल्या प्रत्येक बाबतींत मन घालूं लागलो, तर मला लाभणारं लहानसहान सुखहि मी गमावून बसेन, - हें जाणून, आजपर्यंत मी जसा मनावर ताबा मिळवीत आलो होतो, तसाच, त्या दिवशीहि मी मुग्ध राहिलो. कुणासहि कांहींच बोललो नाहीं

मात्र त्या वेळीं तयार केलेल्या माझ्या मृत्युपत्राच्या टिपणांत ती जमीन व काठ्या यांचा उल्लेख केला.

: ८२१ :

त्या दिवशीं, कां कुणास ठाऊक, वैवाहिक जीवनांतील अनेक लहान मोठे प्रसंग येऊन जात होते आणि त्याबरोबर त्यांत निगडित असलेल्या तुम्हा साऱ्यांचीहि एकामागून एक आठवण होत होती -

कमळे, तुझ्या बहिणीच्या मृत्यूनंतर तूं अरुणला आपल्या घरीं घेऊन गेलीस! त्यानंतर, त्या वेळीं मला त्याच्या आईच्या सहवासांतील अनेक प्रसंग कांहीं दिवस सारखे आठवत होते आणि कांहीं दिवस, एकत्र कुटुंबांत माझं एकाकी जीवन तसंच चाललं होतं.

पण मग मला वाटूं लागलं, हें असंच आयुष्याच्या शेवटापर्यंत आपलं कसं चालणार? आणि म्हणून, बराच विचार करून, धीरानें द्विधा मनःस्थिति बाजूस सारून लग्न केलं होतं!

मला वाटलं, आपली विस्कटलेली घडी आतां तरी पुन्हां नीट बसेल!...नवीन पाश, नवीन वातावरण, यांत आपलं मन पुन्हां रमूं लागेल. तेवढ्यासाठीं माझ्या माणसांना, मला सुख देईल अशी माझी ही नवी पत्नी असली म्हणजे झालं.

: ८२२ :

पण पहिल्याच तीन चार वर्षांत तुझा संबंध दुरावला!...

मला ते दोन्ही प्रसंग चांगले आठवतात....

अरुणची मुंज होती. तुला मी प्रेमानं बोलावलं. तूं आपल्या लहान लहान मुलांना घेऊन आलीस, इतरहि मंडळी जमली होती. सारी गडबड चालली होती. आणि बायकांना बोवाळायला पुढं यायला, असलेच प्रसंग असतात...

पण तूं आपली मागं मागंच! तुझ्याच अरुणची मुंज आणि हें असं कां? मला समजेना. मोठं कोडं वाटे!...

हे अगदी क्षुद्र प्रसंग असतात व वाटतील!..पण सांगतोंच आतां...

तेव्हां शेवटीं मी वेळेवर, एक नवीनच कल्पना काढली. आलेल्या मंडळीसाठीं पानसुपारीचं चांदीचं तबक तयार करायला आपुलकीनं तुला सांगावं; म्हणून मी तुला हांक मारली व म्हटलं, ‘‘कमळे, आपल्याकडे तबक वाट्या वगैरे चांदीचं सामान असेल, त्यांत पान, सुपारी, कात वगैरे घालून घेऊन ये पाहूं बाहेर!’’

पण तूं उलट गोंधळून उभीच राहिलीस. आणि मग हळूच म्हणालीस, ‘‘बाबा, सामान सारं आंत आहे!’’

त्यावर मी म्हणालों, ‘‘मग घेना शरद्‌च्या आईकडून मागून!...’’

‘‘पण त्या कामांत गुंतल्या आहेत!’’ असं म्हणून तूं पुन्हां गप्प होऊन दुसरीकडे निघून गेलीस! तें पाहून मी तिलाच हांक मारली.

ती जवळच दुसऱ्या खोलींत होती. ती पुढं आल्यावर तिला मी तें सांगतांच ती म्हणाली ‘‘करूंया हं!...मी जरा कामांत आहे! आता येईल सारं बाहेर.’’

तेव्हां मी पुन्हा तुला हांक मारून, तिला म्हटलं, ‘‘कमळीकडे चाव्या दे. ती करील सारं, तुला वेळा नसला तर!’’

पण ती घाईघाईनं जातांना म्हणाली, ‘‘नको नको, भांडीं आंत आहेत! तिला नाहीं समजायचं त्यांतलं कांहीं. सुनीति आणील सारं तयार करून. तूं काय ग ऐकतेस, कमळामावशी, यांचं? तूं बैस आपली!’’...

तिच्या या साध्या वाटणाऱ्या उद्गारांनी, तुला किती दुःख झालं असेल याची मला त्या वेळींहि आतांइतकीच जाणीव होती.

पण तरीहि मी तिथून निमूटपणें निघून गेलो -

: ८२३ :

आणखी वर्षानंच एकदां तूं मजकडे आली होतीस. त्यावेळीं दोन दिवसांसाठीं मी तुजवर घर सोंपवून, शरद्‌च्या आईसह, तिची चुलती आजारी होती म्हणून, एकाएकीं नागपुरास गेलो होतो.

तिथून परत येतो, तो मला सारी अगदी नवखी वाटणारी साफसूफ दिसली!...

मी आनंदानं माजघरांत डोकावलं, देवघरांत पाहिलं... स्वयंपाकघरांत दृष्टि फिरविली!...

मला नेहेमीं दिसणारा सारा गोंधळ कुठंच दिसत नव्हता!...

स्वयंपाकघरांत नेहमीं परचुंड्यापुरचुंड्यांनीं अस्ताव्यस्त दिसणारं सारं सामान किंवा लहानमोठीं भांडीं नीट एका शेल्फवर मांडलेलीं दिसत होतीं.

देवघर साफसूफ झालं होतं. देवाचा देव्हारा ओल्या फडक्यांनीं पुसून साफ झाला होता. देवासमोरील माझं आसन व्यवस्थित ठेवून, जवळ समई तेवत होती!...तिचा मंद अखंड प्रकाश माझ्या मनाप्रमाणंच थरथरत होता!...

माजघरांत साऱ्या गाद्यागिरद्या नीट रचून ठेविलेल्या होत्या. प्रत्येकाचे निराळे कपडे निरनिराळ्या ठिकठिकाणच्या खुंटीवर व्यवस्थित लावलेले दिसत होते.

हॉलमधील व्यवस्थित फर्निचर व आरशांच्या काचा फडक्यानं पुसून साफसूफ केलेल्या दिसत होत्या.

सगळीकडे असा असामान्य फरक झालेला पाहून, मला वाटलं, मी एकाद्याच्या नव्या, दुसऱ्याच्याच घरांत, तर शिरलो नाहीं ना? तुझ्या बहिणीच्या मृत्यूनंतर साऱ्या आयुष्यांत माझ्या कल्पनेप्रमाणं मला दिसणारं तें घर पाहून मला अतिशय आनंद झाला होता! -

आणि म्हणून मी हंसत हंसत तुला सहज म्हटलं, 'कमळे, तूं तर दोन दिवसांत घराचा अगदीं नवीन अवतार केलास! हें असंच कायम रहाणार आहे का पण?''...

: ८२४ :

पण त्यानंतर दुपारीं मी वामकुक्षी घेण्यासाठीं पडलो असतांना शरद्च्या आईचे तुला उद्देशून हळूच पडलेले शब्द माझ्या कानावर एकदम आले, ''हें पहा कमळामावशी, माझ्या घरांतील सामानाला असा तिसऱ्यानं कुणी हात लावलेला मला नाहीं खपत! माझं सारं अस्ताव्यस्त असलं तर माझं मला! तूं काय आपली दोन दिवसांची पाहुणी! तुझी असली तात्पुरती व्यवस्था मला काय कामाची? त्यापेक्षां स्वस्थ बसली असतीस, तरच मला जास्त आवडलं असतं!''

मिटलेले डोळे मी एकदम दचकून उघडले आणि संतापानं खुर्चीवर उठून बसलो. क्षणभरच राग अनावर होऊन वाटलं, घरांत जाऊन सांगावं! पण मग, माझं मीच मन आवरलं; दुःखानं निराशेचा एक सुस्कारा टाकला व पुन्हा वामकुक्षी घेण्याचा प्रयत्न करूं लागलों.

: ८२५ :

त्यानंतर, तुला मी कधीं माझ्या घरीं आणण्याची उत्सुकताच दाखविली नाहीं. आणि तूंहि निरनिराळ्या सबबी पुढं करून आली नाहींस.

नाहीं म्हणायला माझ्या घराच्या सुरवातीपूर्वी तुला मी येण्याबद्दल आग्रहाचं पत्र पाठविलं. त्यावेळींहि, 'तूं न येतीस तर बरी' अशीच शरदच्या आईची वृत्ति होती. पण मीच जास्त जोरानं सांगितल्यामुळं, तिच्या सबबी बाजूस राहिल्या व तिला गप्प रहावं लागलं.

कमळे, अरुण, विशेषतः तुम्हांला असल्या प्रकारचे किती तरी अनुभव माझ्या घरांत आले असतील. पण ते सारेच मी तुम्हाला इथं काय सांगत बसूं? -

पण एवढं खरं कीं मी ज्या आशेनं पुन्हां गृहस्थाश्रमांत शिरलो होतो, ती आशा मात्र दिवसेंदिवस दुरावत गेली. मला स्वतःला विशेषसं सुख लाभलं नाहींच; पण माझ्या इतर माणसांनाहि तें मिळालं



नाहीं! -

आणि त्यामुळंच माझ्यांत दिवसेंदिवस एक प्रकारची विरक्तता येत होती. कदाचित् त्या वृत्तीमुळंच मी कधीकधीं कुणावर तरी चिडे. मला जास्त चिकित्सा न करतां एक प्रकारच्या प्रवाहपतितपणेंच वैवाहिक जीवनाकडे पहाण्याची, हळूहळू संवय होऊ होऊं लागली. अशाच मनःस्थितींत, मला कधीं दुःख झालं तर समोर दिसेल त्याच्यावर मी पटकन् चिडावं. पण यामुळं, मी तुम्हालाहि कांहीं वेळां विनाकारण दुःखी करीं! -

अरुण, वसंत यामुळंच, सुनीतीच्या लग्नांतील गोंधळ - अव्यवस्था सरळ दिसत असूनहि, मी तुमच्यावरच चिडत होतो. मला वाटे, हीं माझींच माणसं! यांच्यावरच चिडण्याचा मला जास्त अधिकार आहे.

बाळांनो, माझी वेडी बडबड मला समजत नव्हती, असं का तुम्हाला वाटतं? पण मग तुमच्यावर हक्कानं रागावून मला तेवढंच समाधान वाटे! - त्याचमुळं लागलीच तुम्ही दुःखी झालेले दिसलां, कीं मी शेवटीं गप्प रहावं. एवढंच माझ्या हातीं आहे असं मला वाटे. कारण, आतां यापुढं मी आयुष्यांत असले नवे फरक तरी कसले घडवून आणणार होतो?...

: ८२६ :

असल्या मनःस्थितींतच, त्या दिवशीं दुपारभर, काठ्याच्या नांवें मृत्युपत्रांत ती जमीन करून ठेवल्यावर, मी विचार करीत होतो. संध्याकाळीं, बाहेर कुठं पडलोच नाहीं.

माझ्याच घरांत मी तसा एकाकीपणें फिरतां फिरतां, मला मधून मधून दुःखाचे अस्फुट हुंदके येत होते...

शेवटीं, समाधानासाठीं, मी हातपाय धुतले व संध्या झाल्यावर बराच वेळ ईश्वराची पूजाअर्चा करीत माझं मन कांही काळ रमविलं -

बराच वेळ झाला, तरी माझ्या जेवणाची अजून तयारी नव्हती, म्हणून मीं गीता ठेवली, ओवळा झालो व हॉलमध्यें जाऊन, 'गीता-रहस्य' वाचीत बसलो.

थोडा वेळ गेला पण अजूनहि जेवणाची तयारी नव्हती. मी उठून जेवणाच्या खोलीजवळ गेलो.

: ८२७ :

अजून पाटपाणीहि ठेवलें नव्हतें.

शरद्ची आई कसले तरी लाडू करीत होती.

मुरारी बाटल्यांत कुटलेला मसाला भरीत होता -

''आमच्या जेवणाची तयारी झाली का?'' मी दारांतूनच प्रश्न केला.

" हो होते आहे!" आंतून शरद्च्या आईचे शब्द ऐकू आले.

मी तसाच पुन्हां बाहेर आलो. इकडे तिकडे येरझाऱ्या घातल्या. पण अजूनहि मला कुणी जेवायला आंत बोलवीना.

मला वाईट वाटलं! - वास्तविक नेहमीं मुरारी माझ्या जेवणाची तयारी करी.

इतका वेळा झाला तरी अजून माझ्या जेवणाची कुणीच तयारी करीत नाहीं हें पाहून मी तसाच आंत गेलों. भिंतीला ओडगलेला पाट खालीं ठेवला, त्यावर बसलो व हातावर कपाळ टेकून खालीं पहात हळूच म्हटलं, "वाढा हं, मी येऊन बसलो आहे!" -

'हो झालं' हे शब्द पुन्हां आंतून आले -

: ८२८ :

तरीहि, पांच मिनिटं झालीं...दहा मिनिटं झालीं. जवळ जवळ वीस मिनिटं झालीं पण मी तसाच बसून होतो.

त्या एकाच दिवसांत घडलेले सारे प्रसंग माझ्या मनांत पुन्हां पुन्हां येऊन जात होते! -

मध्येंच एकदां मुरारीनं लगबगीनं येऊन तांब्याभांडं ठेवलं होतं. पण अजूनहि ताट कांहीं पुढं येईना!

म्हणून, मी वर मान करून पाहिलं तों मुरारी पूर्वीप्रमाणंच दुसऱ्या एका बाटलींत मसाला भरण्यांत गढला होता.

शरद्ची आई मघांसारखीच लाडू आवळीत होती.

बाळांनो, मला त्या वेळीं किती दुःख झालं, तें काय सांगत बसूं तुम्हाला?

माझ्या डोळ्यांत अश्र सांचू लागले; मनावर शक्य तितका ताबा मिळवून, मी तसाच पट्कन पानारून उठलो, हॉलमध्यें गेलो व पूर्वीप्रमाणं येरझारा घालूं लागलो.

: ८२९ :

इतक्यांत माझ्या कानावर आंतली कुजबूज ऐकूं आली. - मुरारी म्हणत होता, "काकू, हें हो काय? बाबा येऊन येऊन जात आहेत मघांपासून - 'आज मी वाढीन; तूं मसाला भर, असं तुम्हीं मघां म्हणाला होतात ना? मग असं काय करतां अहां?" -

त्यावर शरद्ची आई त्याला रागांत म्हणत होती, "मुरारी, नेहमीं तूंच वाढतोस ना रे? मग आजच काय झालं आहे तुला न वाढायला? कसलं भूत संचारलं आहे तुझ्या अंगांत? - मी काय रिकामी बसले आहे थोडीच? अगदीं शब्दाला तेवढा धरशील नाहीं तिथं! -

नोकरी करायची तर असं शेफारून चालत नाहीं, मुरारी! समजलं तर चांगले रागावतील तुला! ठाऊक आहे? -



प्रत्यक्ष माझ्याच घरांत, माझ्याच जेवणासाठीं, त्यांची आपापसांत चाललेली ती हुज्जत, मला शेवटीं अतिशय असह्य झाली! -

मी डोळ्यांवाटे ओघळणारे अश्रु पुसले. काठ्यानं नुकत्याच घालून ठेवलेल्या माझ्या बिछान्याकडे वळलो; आणि त्यावर उताणा पडून, येणारा हुंदका आवरीत, अश्रूमुळं अस्पष्ट झालेल्या दृष्टीनं, माझ्याच घराच्या छताकडे खिन्नपणें पाहूं लागलो -

: ८३० :

अशीच पांच मिनिटं गेली. मला अतिशय दुःख होत होतं. आधींच म्हातारपणामुळं, माझी जेवणावर इच्छा नव्हती. थोडीशी होती ती निघून गेली होती. - आतापर्यंत मला वाटलं, आतां जेवण नकोन् कांहीं नको. -

इतक्यांत, मुरारी अगदीं धांवत धांवतच मजजवळ आला व रडत रडत माझ्या पायांना लांबूनच स्पर्श करून म्हणाला, "बाबाऽ, बाबा! माझी चूक झाली. मी आपला नोकर हें विसरलों! काकू म्हणाल्या होत्या 'मी वाढतें' म्हणूनच मी थोडी टाळाटाळ करून त्यांच्याबरोबर हुज्जत घातली!..तसं मी अगदीं करायला नको होतं. मी तुमचा अक्षम्य अपराध केला, पण मला क्षमा करा! जेवायला चला आधीं! पान वाढलं आहे!" -

मुरारी एकीकडे बोलत होता व एकीकडे ओक्साबोक्सी रडत होता! - माझ्याविषयींची त्या नोकराची तळमळ व प्रत्यक्ष माझ्या बायकोची बेफिकीरी, दोन्ही मजपुढं एकदम उभीं राहून, माझं हृदय पिळवटून निघत होतं. तरी मी शक्य तेवढ्या प्रेमळ स्वरांत म्हणालो, "मुरारी, मी तुजवर रागावलो नाहीं! पण मला आतां जेवायचंच नाहीं आहे!"...

माझ्या या शब्दांनीं तर, तो जास्तच रडूं लागला; आणि माझ्या पायाला पुन्हा स्पर्श करून, उसासे टाकीत म्हणाला, "बाबा असं नका ना करूं! मी सांगतोना कीं माझी चूक आहे. मला क्षमा करा - आणि जेवायला चला. तुम्ही भरल्या घरांत, माझ्या हातचं जेवला नाहींत, तर मीसुद्धां जेवणार नाहीं!" -

: ८११ :

" बरं तर, मुरारी, केवळ तूं सांगतो आहेस म्हणून मी येतो." असें म्हणून मी उठलो व जाऊन पानावर बसलो -

शरद्ची आई, मघांप्रमाणंच शांतपणें लाडू करीत बसली होती. मुरारीची मला वाढण्याची धांदल चालली होती. मीं कसे बसे त्याच्याच समाधानासाठीं चार दोन घांस घशाखालीं ढकलत होतो. -

मला मधून मधून एकत्र कुटुंबाच्या वेळीं अळणी जेवण जेवण्याचा मजवर आलेला प्रसंग सारखा

आठवत होता! आणि आज घडत असलेला हा हक्काच्या माझ्याच घरांतील दुसरा प्रसंग! -

मला शेवटीं जेववेचना! - मी तसाच आचमन घेऊन उठलो - व प्रथम दिव्याजवळ मृत्युपत्रांत फेरफार करून काठ्या जवळच मुरीचा उल्लेख केला व नंतर बिछान्यावर जाऊन पडलो.

: ८३२ :

मला त्या वेळीं वाटत होतं, - मी हें सारं कशासाठीं करीत आहे? आपल्या आयुष्याच्या अगदीं सुरवातीच्या विश्वकुटुंबाच्या कल्पना!...त्या तर केव्हांच विरल्या! पण एकत्र कुटुंबाचे देखतां देखतां सारे प्रयत्न करूनहि हे असे तुकडे तुकडे झाले! त्यांतूनच आपण कुटुंबावर स्थिर झालों. मुलांच्या आपल्या दृष्टींच्या उज्वल भवितव्याची स्वतःला मर्यादा घातली! - आणि ज्वाला मी इतके दिवस मनांत काळजी करीत वाढवला, शिकवला, तो माझा अरुण मला उपकारी अपेक्षापूर्ण मनुष्य म्हणून सोडून गेला! -

त्यानंतर केवळ व्यक्तिगत जीवन! - तेहि असंच! घरांतहि अशी स्थिति!

मग माझ्या आयुष्याची ही सारी धडपड आहे तरी कशासाठीं? व्यक्तीची पारमार्थिक प्रगति व माझ्या मुलांमाणसांचं सुख या कल्पनांत असा झगडा चालला होता! पण त्यांत दुसऱ्याचाच सारखा विजय होई!...

तरी देखील मला स्वतःच्या अपेक्षा होत्या आणि त्या बहुतेक निष्फळ झालेल्या पाहून मला वाटे, माझ्या आयुष्यांत, माझ्या वांट्याला सारं दुःखच आहे का? माझं धार्जिणंच असं का? -

: ८३३ :

पण, असा माझा आयुष्याचा विचार करतां करतां, मला आठवलं, साऱ्यांकडूनच असली बेफिकीरी माझ्या वांट्यास आली नाहीं! -

कारण, त्याच वेळीं, अरुणच्या आईची मूर्ती, जणूं काय माझ्या पायाजवळ उभी राहून, आपल्या सौजन्ययुक्त प्रेमळ चेहऱ्यानं मजकडे पहात, तिच्या पद्धतीप्रमाणं हळुवार शब्दांत मला सांगत होती, ‘‘असा काय त्रागा करायचा जीवाचा तो? शांत व्हा ना - मी तुम्हाला दिसत नसले तरी मी नेहमीं तुमच्या अगदीं जवळच असते बरं! - मग पुसा ना ते अश्रु प्रथम! - आणि आजपर्यंत जसं शांतपणे सारं सोशीत वागत आलांत, तसंच, यापुढंहि वागा - आतां तुमचे दिवस थोडे राहिले आहेत या जगांत!’’

हो, खरंच होतं तें! - ती माझ्या मनांत सदैव वास करीत असे - आणि तिच्या स्मृतीचा सुवास, माझ्या प्रत्येक दुःखाच्या वेळीं, माझ्या संतप्त जीवाला विरंगुळा आणीत असे! - खरंच अरुण, तुझी आई होतीच तशी मोठी साध्वी! ही तुझी कमळामावशी तुला त्याची साक्ष देईल!...’’



: ८३४ :

वसंत क्षणभर वाचतां वाचतां थांबला -

अरुण व कमळामावशी अश्रुपूर्ण नेत्रांनीं एकमेकांकडे पहात होतीं! -

शांतता मोडून, अरुणच शेवटीं रुद्ध कंठानें म्हणाला, ‘‘वसंत...वाच ना, पुढं वाच! - ’’

त्याला आपल्या आईचं दर्शन घ्यावयाचें होतें. आणि तेंच बाबा आतां त्यांना यापुढं देतील अशी त्याला फार आशा वाटत होती! -

वसंत व अरविंद एकमेकांकडे पाहून क्षणभर स्तब्ध राहिले व मग वसंत पुन्हा हळूहळू गंभीरपणें पुढें वाचूं लागला!...

: ८३५ :

‘‘पण बाळांनों, ती जिवंत असेपर्यंत मी तिला दुःखच दिलं! -

तुझ्याहि मनांत असंच येत असेल, होय ना, कमळे? -

होय, अरुण, तिचं म्हणणं खरं आहे -

तुझ्यासारखीं माझ्या आयुष्याला फार व्यापक ध्येयें नव्हतीं. पण ‘एकत्र सुखी कुटुंब’ हें माझं माझ्या आयुष्याच्या सुरवातीला मोठं ध्येय होतं.

आणि म्हणूनच, आई, मामा, नाना, दादा वगैरे वडील मंडळीच्या क्षणिक लहानसहान सुखासाठीं, मी तुझ्या आईबरोबर अनेक वेळां कठोरपणें वागलो! तिच्याशीं कधी फारसं मन मोकळं बोललो नाहीं. तिच्या लहानसहान इच्छेविरुद्धहि गेलो! - तिच्यावर रागावलों; तिला टाकून बोललो!

एवढंच नव्हे, अरुण, तर एक दोनदां माझ्या आईच्या समाधानासाठीं, तिच्यावर मी हातहि टाकला. एखाद्या निरक्षर आडदांड माणसाप्रमाणंच, माझं कांहीं कांहीं वेळां, तिजबरोबरचं हें वर्तन होतं! - तें आठवून आज मला मनस्वी दुःख होत आहे!

पण तरीहि, तिचा प्रेमळपणा, तिची पतिनिष्ठा अगाध होती! इतक्या माझ्या कठोर वागणुकीच्या वेळींहि ती मला कधीं उलटून बोलली नाहीं.

तिच्या हयातींत मी असा थोड्याफार वैभवास पोहोंचलेला, स्थिर, सुखवस्तु, मनुष्य नव्हतो. माझी आयुष्याची गाडी नुकती कुठं चढण चढूं लागली होती!...एवढं असूनहि माझ्या आयुष्याच्या त्या सुरवातीच्या गरीब संसारांत, ती माझ्या लहानसहान सुख - दुःखांत, सहानुभूतीनं, उत्कट आपुलकीनं, अगदीं पूर्णपणें समरस होण्याचा जिवापाड प्रयत्न करीत असे!

तिची मजवरील निष्ठा म्हणजे एक प्रकारचं वेडच होतं!

: ८३६ :

आजारीपणांत मी तिच्याजवळ बसणं हेंच तिला मोठ्यांत मोठं औषध वाटे! - अरुण, तुला खोटं वाटेल, ती माझी कधीं कधीं देवाप्रमाणं गंधफुलानं पूजा करी. मी तिला वारंवार म्हणे, ''वेडे, हें काय चालवलं आहेस तूं! - ''

पण ती त्यावर म्हणे, ''असूं द्या आमचं! आम्हीं काय साधीं अशिक्षित माणसं! वेडं होण्याचासुद्धां आम्हांला अधिकार नाहीं वाटतं?''

मीहि त्यावर कांहीं बोलत नसे. आणि तिच्या समाधानासाठीं, ती करील ते सारे सोहाळे, मनांत ईश्वराचं चिंतन करून, तिजकडून करवून घेत असे. आणि तिचं मजबरोबरचं सारं जीवन, असल्याच वेड्या वाटणाऱ्या प्रेमळ वातावरणांतील सुखदुःखांत जात होतं!...

मला ठाऊक नाहीं, अरुण तुम्ही अलिकडची तरुण मंडळी प्रेम कशाला म्हणतां तें! पण माझ्या आयुष्यांत मला कधीं प्रेम सांपडलं असेल तर याच वेळीं...तुझ्या आईच्या संगतींतच!...

: ८३७ :

आठवणी करीत बराच वेळ बसून, मला आतां अतिशय शीण आला आहे. तुम्हां मंडळींना, आणखी कितीतरी वेळ, असंच मनांत येणारं सारं सारं सांगत बसावं, असं मला किती वाटतं आहे म्हणून सांगूं? पण माझ्यांत आता, पूर्वीसारखा तेवढा त्राण राहिलेला नाहीं, त्याला मी तरी काय करूं? म्हणूनच आतां मी माझं मन आवरतो, हात आंखडता घेतो; आणि एक दोनच गोष्टी सांगून, माझं बराच वेळ लांबलेलं पुराण कायमचं थांबवतो!...

तेव्हां मी तुम्हाला काय सांगत होतों? हो, अरुणच्या आईची गोष्ट! -

अरुण, ती मजवर इतकी निरपेक्ष प्रेम करी, कीं तिच्या मृत्यूनंतर त्या आठवणीवरच, मी पुढील साऱ्या आयुष्यांत जगत आलो, असं म्हटलं, तरी वावगं होणार नाहीं! -

: ८३८ :

तिच्या आयुष्याच्या शेवटींशेवटीं घडलेली एकच गोष्ट तुम्हाला सांगतो - तूं त्या वेळीं चार साडेचार वर्षांचा होतास, अरुण - आणि तिच्या नव्या बाळंतपणाचा वेळ जवळ येत होता! -

बायकांच्या मनाची रचना अशी गमतीची असते कीं, त्या आपल्या नवऱ्यावर जितक्या निष्ठेनं प्रेम करताता तितकंच त्याचंहि आपल्यावर असावं ही उत्कट इच्छा त्यांच्या मनांत सदैव जागृत असते! - तीच गोष्ट तुझ्या आईची -

तिचं अर्धे अधिक आयुष्य, जवळ जवळ आजारीपणांतच गेलं. पण तिचं मजवरील प्रेम इतकं अतुलनीय, अमर्याद होतं, कीं, मी कधींकधीं तिच्याजवळ नुसता बसलेला असलों, कीं, ती सारखे डोळ्यांतून अश्रु ढाळी! - मी तिला विचारावं, ''काय दुखतं आहे ग? कसलं दुःख होतं आहे? मला



सांग! - कसले हे अश्रु?'' -

पटकन्, आपल्या क्षीण हातांत, ती माझा हात घेई; मनापासून तोंडभर हंसे व मग मला म्हणे, ''कसले नाहींत. आनंदाचेच!'' -

''कसला ग आनंद?'' मी पुन्हा विचारावं.

''कसला नाहीं!'' तिनं प्रेमानं माझा हात घट्ट दाबून म्हणावं, ''तुम्हीं माझ्या अगदीं जवळ असल्याचाच! - ''

असं अगदीं चमत्कारिक वेडं मन होतं तिचं! त्या वेळचे तिचे दिवस भरता भरतां शेवटीं असे अनेक प्रसंग वारंवार घडले.

: ८३९ :

एकें दिवशीं तिच्या पोटांत दुखूं लागलं. आधींच ती अतिशय अशक्त झाली होती. अंगांतील त्राण तर जवळ जवळ नाहीसंच झालं होतं. बराच वेळ झाला तरी तिची सुटका होईना!

नेहमीचा डॉक्टर झाला; सिव्हिल सर्जन झाला. शक्य ते सारे उपचार झाले, पण तिला आराम म्हणून पडेना! -

शेवटीं, मला कांहीं सुचेना; मी अगदीं हताश अंतःकरणानं बाहेर जाऊन बसलों!

इतक्यात थोड्या वेळानं तिनंच मला पुन्हां बोलावणं पाठवलं.

मी आंत गेलों; ती बिचारी वेदनांनीं तळमळत होती! - तिच्याजवळ जाऊन मी बिछान्यावर बसलों. तिचा हात हातीं घेतला; पण दोघांच्याहि तोंडून थोडा वेळ शब्दच बाहेर पडेनात! -

ती मजकडे अश्रु भरलेल्या डोळ्यांनीं, अगदीं असहायपणें पहात होती. मीहि कांहीं न बोलतांच तिच्याकडे दृष्टि लावली होती! -

शेवटीं मला राहवेना; मी तिला विचारलं, ''काय म्हणतेस? - ''

ती थोडा वेळ कांहींच बोलली नाहीं, पण मग मला एकदम म्हणाली, ''आतां कांहींच उपाय नाहींत का राहिलेले? अंऽ? - ''

मला काय बोलावं, तेंच समजेना. सर्जन निराश होऊन, अर्ध्या तासांत परत येतो म्हणून सांगून नुकताच निघून गेला होता!

मी आगतिकपणें नुसती 'नाहीं' अशी मान हालवली! -

तीहि त्यावर थोडा वेळ अगदीं स्तब्ध राहिली; कांहीं बोलण्याचा प्रयत्न करून, किंचित् घुटमळली व मग वेदना आवरून धरीत किती तरी लाजून, माझ्याकडे पहात म्हणाली, ''मला आपली तुम्ही वेडी म्हणाल! मी नाहींच सांगत कांहीं! - ''

: ८४० :

तिच्या मनांत काय चाललं होतं कुणास ठाऊक! मला मुळींच समजेना! पण तिला कांहीं तरी सांगायचं आहे, हें जाणून, मी अगदीं कानाजवळ तोंड करून तिला हळुवारपणें म्हणालों, ''असं काय बरं? मला सांग काय तें! तूं सांगशील तें मी करतो! - ''

ती किंचित् थांबली आणि मग धीर आणून मला म्हणाली, ''अंऽहं! - तुम्ही हंसाल! आमची आपली बायकांची वेडी श्रद्धा!''

पण तरीहि तिला मी धीर दिल्यानंतर तिनं मला हळूच, लाजत लाजत सांगितलं, ''तुम्हाला माहीत आहे का? एखाद्या परस्त्री मातेसमान समजून वर्तन करणाऱ्या पवित्र पुरुषाच्या पायाच्या आंगठ्याचं पाणी... अशा माझ्यासारख्या अडलेल्या बाईला दिलं, तर तिची लागलीच पांच मिनिटांत सुटका होते!'' -

बोलतां बोलतां ती थांबली! पण मला मात्र थोडासा नवा धीर आला!

मलाहि पाहिजे तर वेडा म्हणा तुम्ही! पण बाळांनों, मीहि कांहीं श्रद्धेचाच मनुष्य आहे. मी तिला विचारलें, ''मग मी काय करूं म्हणतेस?''

ती आणखीहि थोडा वेळ पुन्हां घुटमळली आणि मग एकदम रोखठोक शब्दांत म्हणाली, ''तुम्ही देतां का तुमच्या पायाचं तीर्थ मला?''

मी क्षणभर चपापलो, तें केवळ, तिच्या त्या प्रश्नाच्या अनपेक्षितपणामुळंच. पण मग किंचित् विचार केला व तिला उलट विचारलं, ''तुझी तशी मनापासूनची श्रद्धा आहे का, काऽय? -

''हो!'' तिचे क्षीण डोळे क्षणभर आत्मविश्वासानं चकाकले! -

: ८४१ :

त्यावर कांहीं न बोलतांच मी झटकन उठलो व तिच्या सांगण्याप्रमाणं सारं कांहीं करायला बाहेर जाऊं लागलों!

पण तिला होत असलेलं वेदनांचं दुःख सहन करीतच, तिनं पुन्हा मला एकदम जवळ बोलावलं आणि थोडसं घुटमळून, अगदीं मंद स्वरांत ती म्हणाली,

''पण हें पहा? माहीत आहे का? - तसं पवित्र वर्तन खरोखर नसेल तर सारं विपरीत होतं हो! तीर्थ घेणारं मनुष्य दगावतं सुद्धां!''

तिच्या बोलण्यात एक प्रकारचा अफाट जोर होता. आपल्या तसल्या अत्यवस्थ स्थितींतहि ती जणूं काय, माझी सत्त्वपरीक्षाच पहात होती या सूचनेनं! -

आणि हें समजूनहि, मी तसाच निर्धारानं ''बरं'' असं म्हणालो व तिथून बाहेर आलो! -



: ८४२ :

तडख मी देवघरांत गेलो. एका रुप्याच्या प्याल्यांत पाणी घेतलं व देवाजवळ जाऊन बसलो. तिथं मिणमिण तेवत असलेल्या प्रशांत समईची वात थोडी पुढं सारली! आणि क्षणभरच माझ्या साऱ्या लांब आयुष्याकडे एकदां सिंहावलोकनाच्या दृष्टीनं पाहिलं!

आणि मग मनाची खात्री होतांच, त्या पाण्यांत माझ्या उजव्या पायाचा आंगठा बुडविला -

तो पेला मी देवासमोर ठेवला; त्यांत देवाचा अंगारा टाकला; व त्याला उद्देशूनच मी भरून आलेल्या हृदयानं, मनांत म्हणालो, देवा, तुझा अंगारा माझ्या पायाच्या पाण्यांत टाकण्याची माझी किंचित्देखील योग्यता नाहीं! मला क्षमा कर! कारण ही माझ्या साध्वी बायकोची श्रद्धाच त्याला पावित्र्य आणीत आहे! मला आपलं एवढंच समाधान, कीं, तिची अट स्पष्टपणें ऐकूनहि माझी सदसद्विवेकबुद्धि या क्षणीं मला कसलीहि जाचणी करीत नाहीं! तिच्या श्रद्धेला तूंच काय तें यश दे! मी तरी हें तुझंच तीर्थ म्हणून तिला श्रद्धावंत मनानं देत आहे!'' -

तिथून मी तसाच उठलो! - तिच्याजवळ गेलों व तें पाणी, थरथरत्या हातानं अतिशय आत्मविश्वासानं तिच्यापुढं केलं!

तिनंहि एक क्षणभर थांबून, मजकडे मुकाट्यानंच पण निरतिशय प्रेमानं पाहिलं! आणि लागलीच त्याचा घोट घेतला!

एक क्षण असाच शांततेनं गेल्यावर, ती मला म्हणाली, ''तुम्ही जा आतां इथून! बाळ पोटांत फिरूं लागलं! - आता थोड्याच वेळांत माझी सुटका होणार!''

: ८४३ :

आणि मी बाहेर जाऊन, थोडा वेळ येरझारा घालीत होतो, इतक्यांत - काय आश्चर्य! दहा पंधरा मिनिटांतच, अरुण, तुझ्या आईची सर्जन परत येण्यापूर्वीच सुखरूपपणें सुटका झाली होती.

कदाचित् अतिशय चमत्कारिक, अचंबा वाटण्यासारखं वाटेल तुम्हाला, पण बाळांनों, ही अगदीं खरी खरी गोष्ट आहे!...माझ्यावर विश्वास ठेवा! -

त्या दिवशीं, माझ्या मनाला लाभलेलं समाधान, मी जन्मांत कधींहि विसरणार नाहीं! -

आणि नंतर, मी अरुणच्या आईकडे गेलो; त्या वेळीं, तिनं मजकडे इतक्या प्रेमानं, आदरानं पाहिलं, कीं साऱ्या आयुष्यांत तिनं तसं मजकडे कधींच अगदीं कधींच पाहिलं नव्हतं! -

: ८४४ :

अरुण, अशी तुझी आई होती! पण त्यानंतर, दोन तीन महिन्यांतच, आपल्या नवीन जन्मलेल्या मुलीसह, ती मला सोडून गेली!

हे असले प्रसंग आठवून, मी आजपर्यंत अनेक वेळां, माझ्या मनांतील सारीं दुःखं, निराशा,... विसरण्याचा प्रयत्न करीत आलो आहे! - आणि माझ्या विषण्ण आयुष्यांत, मला जी थोडी फार हिरवळ आढळे, ती केवळ यांमुळंच! -

तेव्हां माझ्या बाळांनों, माझं सारं आयुष्य, मुख्यत; हें असं होतं!...

मला तुमच्यासारखं लिहितां येत नाहीं....येणार नाहीं...तरी मी मला वाटलं तसंतसं एवढं तरी लिहीत आलो -

आतां राहिलेला चोथा...मी तुमच्यापुढं कशाला टाकूं बरं? - तो माझ्या या जीर्ण देहाबरोबरच, मातीला जाऊन मिळणार! -

: ८४५ :

कालच, मी वसंताला घेऊन, ती. दादांच्या अत्यवस्थ स्थितीची बातमी ऐकल्यामुळं, दादरला गेलो होतो. - त्यांना त्या वेळीं तरी भेटणं, मला माझं कर्तव्य वाटलं.

पण तिथं, ती. यशवंतदादांनीं, शेवटपर्यंत, आम्हांला - मला व नानांना उद्देशून चालविलेला शिव्याशापांचा वर्षाव, माझ्या मनाला अतिशय दुःखदायक झाल्यांवाचून राहिला नाहीं!

त्यांची स्मशानयात्रा संपवून, मी घरीं आल्यावर, माझ्या मनांत हें विचारांचं सारं काहूर उठूं लागलं! -

आणि म्हणूनच, मला वाटलं, माझीहि पटकन् अशीच स्मशानयात्रा निघाली तर? एकदां विचार करून, बसल्या जागेवरून उठलो. टेबलाजवळ जाऊन बसलो व स्वसमाधानासाठीं, असा एकटाच, कितीतरी वेळ, तुम्हाला हें सांगत बसलो आहे!...

बाळांनों, माझ्या क्षुद्र, स्वार्थी, संसारी आयुष्यांत, ज्याच्या ज्याच्याशीं माझा एकंदर संबंध आला,...तीं सारीं माणसं, ही अशीं होतीं!! -

: ८४६ :

माझा अरुण, आज माझ्याजवळ नाहीं. तो मला सोडून दूर निघून गेला आहे. जगांतील व्यापक अनुभव घेण्यासाठीं, तो आज झगडत असेल! -

माझ्या मनाला त्याबद्दल थोडं दुःख होत असलं, तरी मला त्याच्याबद्दल प्रेम - अभिमानच वाटतो! आणि म्हणूनच, मी त्याला जशी कांहींतरी संपत्ति देऊन जात आहे, तसंच, आज त्याच्यासाठीं, हें सारं लिहून ठेवूनहि जात आहे!..

याबद्दल, मला या क्षणीं, - अतिशय समाधान होत आहे!...मला यापुढं, स्वतःविषयींच्या अशा कांहींच आशा - आकांक्षा, आतां राहिलेल्या नाहींत!...



: ८४७ :

बाळ अरुण, हें मी असं सांगत असलेलं ऐकतांना, वाचतांना तूं कदाचित्, दुःखी कष्टी झाला असशील! माझ्या मृत्यूमुळं, - 'जगांत काय आहे? सारं नश्वर!' अशा प्रकारेंहि तुला वाटत असेल!..

पण बाळ, ही विचारसरणी जरा घाईची व वेडेपणाचीच होईल...हीं दुःखं, हळूहळू कमी होत जातात!...आणि तूं नीट विचार करशील, तर तुला खात्रीनं वाटेल, कीं, जगांत तडजोडीशिवाय तरणोपाय नाहीं!...

मग मात्र एकदां, ती दृष्टि आली, तर तुला याच तुझ्या भोंवतालच्या जगांत पुष्कळ चांगलं आहे, पुष्कळ सुख आहे, - असंच खात्रीनं वाटेल!

तूं सुज्ञ आहेस!...विचारी आहेस!...तुझे तूंहि, हे विचार कदाचित् जाणशील. आणि माझ्या मृत्यूपूर्वी, तुझी माझी भेट झाली नाहीं तर? म्हणून तुझ्याचसाठीं हें सारं मी आज सविस्तर सांगण्याचा दुबळ्या प्रकृतीच्या व मनःस्थितीच्या म्हातारपणींहि घाईघाईनं प्रयत्न केला आहे!..

: ८४८ :

अरुण, बाळ, यावरून खात्रीनं, जास्तच स्पष्टपणें तुझ्या लक्षांत येईल, कीं, तूं ज्या विविध, व्यापक जगाचा बाहेर अनुभव घ्यायला, माझ्यापासून धीरानं दूर गेलास त्यांतील सारी विविधता तुझ्या माणसांतहि होती, नव्हे का?

आतां, तूं मला अपेक्षेवर जगणारा, उपकारी मनुष्य म्हणाला होतास, नाहीं का?

होय! - मला अपेक्षा होत्या; पण, त्यांतील फारशा सफल झाल्याचं, मला समाधान लाभलं नाहीं असंच तुला आतां आढळेल! तरी पण माणसाला अपेक्षा असणं हा गुन्हा आहे, असं मला तरी मुळींच वाटत नाहीं!

बाळा, तसा विचार केलास तर जगांत कोण उपकारी नाहीं बरं? -

- तूंच पहा, तुझ्या वाट्याला आलेल्या तुझ्या या साऱ्या माणसांत, कांहीं श्रेष्ठ प्रतीचीं उपकारी माणसं तुला सांपडतील, तर कांहीं क्षुद्र वृत्तीच्या उपकारांत रममाण झालेलीं आढळतील! - म्हणूनच, अशा वेळीं, त्या साऱ्यांना सोडून जाणं, हा योग्य मार्ग नव्हे! तें खरं स्वातंत्र्यहि नव्हे! - एक प्रकारचा अविचारच तो! -

आणि दुसरं पहा - बाहेर गेल्यावर तरी, तुला याहून आणखी जास्त ते काय आढळलं?...तेंच...तसंच सारं! - जगांत रहायचं तर हें असंच आहे, बाळ, अगदीं प्रत्येक गोष्टीला नेहमीं दोन बाजू असतात!-

माझा भाऊ श्रीनिवास असाच तुझ्यासारखा - मागं एकदां गांगरला! - साऱ्यांना सोडून एकदम निघून गेला! - मला त्याची इथं तुझ्यामुळंच पुन्हा आठवण झाल्यावांचून रहात नाहीं.

: ८४९ :

अरुण, डोळे पूस! - बाळा, आतां यापुढं सारं आयुष्य जायचं आहे! - आयुष्याच्या सुरवातीस हे विविध अनुभव आलेले एकंदरींत वाईट नाहीं कांहीं!...

पण मग कधीं धीर खचला, तर तुझ्या कमळामावशीकडे तुझं हृदय उघडं कर! - तीच त्यासाठीं योग्य आहे! - ती तुझ्यापुढं सारा प्रकाश पाडून तुला योग्य मार्ग सुचवील! सुशिक्षित माणसांपेक्षा सुसंस्कृत माणसांतच ही शक्ति जास्त आढळते! -

कमळे, तूं तुझ्या वाढत्या मुलांच्या भवितव्याकडे दृष्टि लाव! - म्हणजे तुला निराळंच समाधान लाभूं लागेल.

वसंत, तुझ्या आयुष्याच्या सुरवातीस, तुझ्या साऱ्याच भावनाअपेक्षांचा थोडा चुथडा झाला! पण आज मंजुळा व सुहास यांच्यामुळं तुझ्या घरांत नवीन उजळ उत्साही वातावरण निर्माण झालं आहे; हें मी स्वतःच हल्लीं पहात आलो आहे. मग मागील सारं विसरून, माझ्या अरुणबरोबरहि प्रेमानं वागून, त्याच्या व तुझ्या आयुष्यांत, तूं आनंद निर्माण करशील ना? -

अरविंद, माझ्या सुनीतीप्रमाणंच, तुम्हीं व अरुण, दोघांनीं, माझ्या शरदूला सांभाळून घ्या. - वसंत तुम्हाला त्यांत मदत करील!

: ८५० :

झालं! - मला तुम्हा सर्वांना सांगावयाचं, तें सारं सारं संपलं! -

आतापर्यंत तुम्ही मजजवळ नव्हतां,...तरी मी स्वतःच्या समाधानासाठीं, तुम्ही सारीं माझ्याजवळ बसलां आहां अशी कल्पना केली होती.

आतां हें सारं वाचतांना तुम्हाला मी दिसत नसलो तरी मी अरुणजवळच बसलो आहे अशी कल्पना करा -

आणि तुम्हां सर्वांचं, तुमच्या आयुष्यांत, उज्वल भवितव्य व शुभ चिंतिल्यावर, आतां अरुणसाठीं म्हणून माझे अगदीं शेवटचे शब्द हेच -

बाळा, तुझ्या उच्च ध्येयांबद्दल श्रेष्ठ आकांक्षाबद्दल, मला अभिमान आहे! - त्यांविरुद्ध मी कधींच नव्हतों व नाहीं! - पण माझं आयुष्य तुझ्यापुढं ठेऊन मला एवढंच सांगायचं आहे, कीं तुझ्या भोंवतालची सामाजस्थिती तुम्ही नवी मंडळी कधी बदलाल तेव्हा बदलाल ! पण ती अगदीं आमूलाग्र बदलणं मात्र तुम्हाला कुणालाहि केव्हांहि शक्य होणार नाहीं! -

आणि तसं जोंपर्यंत होणार नाहीं,...तोंपर्यंत या स्वार्थी जगांत सरळ उघड उघड, स्वार्थ ठेवणं हा मला तरी गुणच वाटतो! - आणि म्हणूनच बाळा, स्वार्थत्यागाचा तुझ्या कक्षा हळुहळू लहानांतूनच



मोठमोठ्या करीत जा! आणि शेवटीं आपल्या कुवतीप्रमाणं त्या विश्वव्यापी कर!...तुझा धर्म, तुझा त्याग, तुजपासून सुरू केलास, तरच, बाळ, तो तुझ्या यशोमंदिराचा योग्य पाया होईल! शुभं भवतु!

- सत् - चित् - आनंद! - ''

: ८५१ :

वसंतानें वही बंद करून खालीं ठेवल्याचा आवाज ऐकतांच, सारी एकदम दचकलीं!

प्रत्येकाला आतांपर्यंत जणूं काय वाटत होतें, बाबा सारखे आपल्याजवळ बसून आपल्या आयुष्याविषयीं, आपल्याला मोकळ्या, उघड्या मनानं सारं सारं सांगत आहेत! -

त्यांच्या परिचित शब्दांचे काल्पनिक पडसाद, त्या चौघांच्या कानांत अजूनहि स्पष्टपणें निनादत होते! -

अरुणला प्रथम एक हुंदका आला. पण बाबा आपल्याजवळ उभे राहिले आहेत आणि ''बाळ, पूस बरं ते डोळे! तुझं अजून या पुढलं सारं आयुष्य जायचं आहे!'' असें, जणूं काय आपल्या शेवटच्या वत्सल दृष्टीनें पहात आपल्याला सांगत आहेत असा त्याला भास झाला! - आणि त्यानें खरोखरच, आपले ओले झालेले डोळे धीरानें पटकन् पुसले व खोलींत एकदां चौफेर दृष्टि टाकली.

कमळामावशीनें बटन दाबून खोलींत दिवा लावला! - आणि ती मुकाट्यानें पुन्हा साऱ्यांजवळ येऊन बसली.

तिच्यापुढें बाबांनीं नुकतेच चितारलेले अनेक प्रसंग समोर उभे रहात होते. त्यांतील कितीतरी तिच्यासमोर पूर्वी घडले होते.

पण तिला दोनच गोष्टीचें आश्चर्य वाटत होतें!...

तिच्या बहिणीच्या मृत्यूनंतरचे प्रसंग बाबा सांगत सांगत आले; पण त्यांत त्यांनी अरुणविषयींची एक गोष्ट उघड उघड जाणून बुजून लपवून ठेवली होती.

त्यांनीं तसें कां केलें, ह्याविषयीं ती आपल्याशींच विचार करूं लागली, तेव्हा तिला त्यांचा एक अतिशय उदात्त हेतु आढळल्यावांचून राहिला नाहीं.

पण मग, तरीहि मावशीच्या मनाचें त्यामुळें खरें - पूर्ण समाधान मात्र कांहीं केल्या होईना! -

दुसरी गोष्ट म्हणजे बाबांचें व्यक्तिगत आयुष्य!....

त्यांच्या मनाची असली मुग्ध कुचंबणा, तिला तरी त्या क्षणापर्यंत अगदीं अज्ञातच होती! - आणि म्हणूनच बाबांच्या साऱ्या आयुष्याचे निरनिराळे टप्पे, निरनिराळीं संकुचित होत गेलेलीं कर्तव्य - केंद्रें, त्यांच्या कक्षा - त्यांतहि स्पष्टपणें दिसणारे फोल आशा - अपेक्षांचे प्रसंग,...सारें सारें एकवटून, तिच्यापुढं प्रत्यक्ष घडत असल्याप्रमाणें उभें राहिलें!

आणि मग इतकी दडपणें मनावर तशीच ठेवून, तसल्या धुमसत्या हृदयानेंहि शक्य तितकें प्रेमळ वातावरण व इतरांसाठीं स्वस्वार्थत्याधिष्ठित सुखच आपल्या आयुष्यभर निर्माण करणाऱ्या त्या संसारी थोर महात्माविषयीं, तिचें हृदय अतिशय आदरानें भरून आलें.

बाबांची काल्पनिक पण भव्य, प्रेमळ, धीरगंभीर करारी मूर्ति सर्व प्रकारच्या प्रतिकूल परिस्थितींतून वाट काढीत, हातांतील जणूं मोठी आत्मविश्वासाचीच कांठी टेकीत टेकीत पुढें जात असल्यासारखी तिच्यापुढें उभी राहिली!

आणि तिनें अभावितपणें, अगदी अश्रुभरित नेत्रांनीं, त्या बाजूस पहात एकदम आपले हात अतिशय आदरानें जोडले!...

: ८५२ :

पण मग, बाबा तेथे प्रत्यक्ष समोर नाहींत, हे लागलीच तिच्या लक्षांत आलें;...ती पटकन् भानावर आली; आणि तिनें आपले जोडलेले हात पटकन खालीं घेतले?...

मावशीच्या बांगड्यांचा, त्या खोलींतील शांततेंत, एकदम खळकन् आवाज झाल्यामुळें अरुणहि आपल्या विचारांच्या तंद्रींतून जागा झाला! त्यानें तिच्याकडे गंभीर पण प्रेमळ दृष्टीनें एकदां ओझरतें पाहिलें व मान बाजूस फिरविली....

त्या त्याच्या कमळामावशीविषयींच काय, पण त्याच्या कुटुंबांतील जवळजवळ सगळ्याच व्यक्तींविषयीं त्याला आतां नवी, सखोल, व्यापक दृष्टि आली होती! -

आणि त्यामुळेंच त्याला, विशेषतः बाबासाहेब व कमळामावशीं या त्याच्या दोन जिव्हाळ्याच्या व्यक्तींविषयीं विशेषच आदर वाटूं लागला होता.

आपण या साऱ्यांना क्षुद्र, त्याज्य ठरवून बाहेर वणवण फिरलों. ध्येयहीन झालों, केवळ जडजीवनच कुत्सितपणें कांहीं काल जगलों, एवढेंच नव्हे तर बाबांच्या - आपल्या श्रेष्ठ दर्जाच्या जनकाच्या आयुष्यांत, त्याच्या दुःखासच त्यामुळें सारखें कारण होत गेलों यांविषयींच्या विचारयंत्रानें घणाचे घाव पडल्यासारखे होत होतें त्याला! -

जो आपल्या हितासाठीं, मरेपर्यंत एक प्रकारच्या श्रेष्ठ अपेक्षेनें, वत्सलतेच्या दुथडी भरून चाललेल्या नदींत, स्वतः संकटें निमूटपणें सोशीत निराशेच्या निष्ठुर खडकावर हजारों ठिकाणीं आपटत, पोहतां पोहतां, शेवटीं त्यांतच बुडाला, त्या महात्माशीं...त्याची रस्त्यांत त्या दिवशीं अनपेक्षितपणें भेट झाली असतांहि आपण कठोरपणें वागलों! या मनाला अतिशय सलणाऱ्या आठवणीनें तर अरुणला जास्त जास्तच दुःख होत होतें! -



: ८५३ :

''खरोखर, हे एकेक भाऊ, म्हणजे आपापल्या परीनं, आपल्या लहानशा कक्षेंत, अगदीं नरसिंहच होते म्हणायचे!'' शेवटीं ती बराच वेळ पसरलेली शांतता मोडून, अरविंद म्हणाला, ''आणि त्यांची कर्तव्यशील आई, प्रेमळ मामा!... त्यांच्या विषयींच्या आदरानं कुणाचंहि हृदय अगदीं भरून आल्यांवाचून रहात नाहीं.''

तेवढ्यांत विचारी मुद्रेनें व गंभीर हळूहळू उच्चारलेल्या शब्दांत वसंत म्हणाला, ''हो खरंच! - नाना! - प्रत्यक्ष माझे वडीलच! - पण त्यांच्याविषयींहि बाबांनीं आज हें सारं सांगेपर्यंत मला इतका आदर कधींच वाटला नव्हता!...आणि बाबा तरी शेवटीं शेवटीं, आपल्या नेहमींच्याच निर्भेळ प्रेमळपणानं, पण किती विरक्ततेनं वागत होते!...तुम्हाला कुणाला याची खरी कल्पनाच नाहीं होणार!''

''यशवंतदादा, विठोबा, त्यांची मात्र, आजपर्यंत मला इतकी ओळख नव्हती! - '' अरविंद तिघांच्याकडेहि आळीपाळीनें पाहून पुन्हा म्हणाला! -

आणि मग कमळामावशीकडे हळूवारपणें पाहून पुढें तिला म्हणाला, '' पण वहिनी, तुम्हां दोघां बहिणीविषयीं तर आम्हाला आजपर्यंत कांहींच कसं सांगितलं नव्हतंत तुम्ही?'' -

कमळामावशी, कांहीं न बोलतांच, डोळे पुशीत होती. तिला आपलें, आपल्या बहिणीचें, बाबांचे साऱ्यांचें आयुष्य पुन्हां एकदां आठवलें व तें जणू काय आपण आतां या क्षणींच अनुभवीत आहों असे वाटलें.

: ८५४ :

शेवटीं, आपला हुंदका आवरून, अश्रु भरलेल्या नेत्रांनी अरुण म्हणाला, ''अरविंद, वसंत, खरंच मी किती वेडा रे!...जगांत मलाच तेवढीं उच्च ध्येयें आहेत, अशा उद्दामपणानं मी साऱ्यांकडे पहात सारखा वागत आलो - जगाशीं मी एकटाच काय तो धैर्यानं झगडतो आहे, असं मला त्या वेळीं वाटे! - पण - ''

थोडा वेळ तो तसाच बोलतां बोलतां स्तब्ध झाला; आणि मग पुन्हा पुढें म्हणाला, ''पण बाबा म्हणतात तेंच खरें!...बाहेर थोडा वेळ भटकून, मी परत माझ्या घरीं येऊन पहातो, तों माझ्या भोंवतालींच, अगदीं माझ्याशीं रक्तमासानं निगडित अशीं, कितीतरी उपकारी माणसं होतीं! - आतां त्यांत अनेक क्षुद्र उपकारी माणसंहि मला दिसत आहेत! - पण माझ्या बाबांची किंमत, त्यांच्या हयातींत तरी मला कांहीं समजली नाहीं. मी वेड्यासारखा, एखाद्या आदर्श, श्रेष्ठ माणसाची, मनोमय कल्पनाच तेवढी करीत होतो! - पण त्यांच्यासारखा अगदीं क्वचित् दिसणारा श्रेष्ठ उपकारी माणूस,

माझा प्रत्यक्ष जनक होता! - तो माझ्या अगदीं सदैव जवळ असूनहि त्याची मला आजपर्यंत ओळख नव्हती!''

आणि एक मोठा सुस्कारा टाकून अरुण शेवटीं म्हणाला, ''कमळामावशी, माझ्याप्रमाणं तुला नाहीं का ग वाटत? आपल्या बाबासारखीं कांहीं उपकारी माणसं भोंवतीं वावरत आहेत, म्हणूनच हें जगांत दिसत असलेलं, थोडं फार सुख,..प्रेम,...पुण्य जिवंत आहे! - जगांतील माणुसकी चालू राहिली आहे!'' -

***



# उपकारी माणसें

## - - आकाश गङा - -

# विभाग ३ रा

: ८५५ :

बाबांच्या आत्मकथनावर मनांतल्या मनांत विचार करीत, सारी मंडळी जेवीत होती. जणूं काय, नवी दृष्टीच लाभल्यासारखें होऊन प्रत्येकाच्या मनाला अननुभूत समाधान वाटत होतें.

मुरारी त्यांना वाढीत होता. काठ्या दिवाणखान्यांत झाडलोट करून साऱ्यांच्या झोंपण्याची व्यवस्था करीत होता.

त्या दोघांच्याहि तसल्या धडपडीकडे पाहून, अरुणला बाबांची आठवण झाली -

त्याच्या मनांत विचार चालले - '''दलित वर्ग' 'दलित वर्ग' असे ओरडत आपण नुसता निष्क्रिय विचार करून, त्यांच्याबद्दलच्या कळकळीनं आजपर्यंत अनेक वेळां केवळ बोलघेवडेपणा केला पण आपले बाबा वरवरनं कठोर दिसत खरें; पण फक्त त्यांच्या कक्षेंत आलेल्या या नोकरमाणसांनाहि आपलींच माणसं समजून, कळकळीनं आपल्या आयुष्याच्या शेवटीं तरीं त्यांनी अगदीं निमूटपणें त्यांच्यासाठीं जें कांहीं थोडंफार करून ठेवलं तें आपल्याहून खासच जास्त, भरीव स्वरूपाचं आहे.

: ८५६ :

असल्याच विविध विचारांत अरुण पानावरून लवकरच उठला; आणि न्हाणीघरांतून तो आंचवून बाहेर येतो, तों मुरारी पुढें होऊन त्याला म्हणाला, ''दादा, बाहेर नुकतेच कुणी पाहुणे येऊन बसले आहेत. कुणी दाढीवाले न् म्हातारेसेच आहेत बा! आणि बरोबर शंकरकाकाहि आले आहेत.''

''शंकरकाकांबरोबर दाढीवाले पाहुणे? कोण बरं असतील?'' याचाच मनाशीं कयास करीत, अरुण बाहेर आला.

आणि पहातो, तों शंकरकाकांच्या जवळच्याच खुर्चीवर, श्रीचंद्र टागोर बसलेले! ते त्यांच्या नेहमींच्या प्रेमळ, वत्सल नजरेनें त्याच्याकडे वळून पहात होते.

अरुण अगदीं आश्चर्यचकित होऊन लगबगीनें त्यांच्याजवळ जात म्हणाला, ''कोऽण भाई? तुम्हीं होतां तरी कुठं? आणि असे अचानक इथं कसे आलां? शंकरकाकांची आणि तुमची भेट कुठं झाली? - तुमची त्यांची ओळख तरी कुठली?''

बाबांच्या मृत्यूमुळें झालेलें दुःख, अरुणच्या भेटीमुळें झालेला आनंद, या दोन्ही भावनांनीं भाईंचें हृदय तुडुंब भरून आलें होतें. तरी त्यांनी अरुणला आपल्या जवळ ओढून त्याला प्रेमानें थोपटीत म्हटलें, ''सारं सांगतो, बाळ, तुला! पण प्रथम असा बस तर खरा. तुझं जेवण झालं नां? मीहि सारं उरकूनच आलो आहे!''

शंकरकाकांकडे प्रश्नार्थक चेहरा करीत अरुण जवळच्या खुर्चीवर बसला. भाई शंकरकाकांबरोबर कसे? हा प्रश्न त्याला पडला होता! शिवाय भाई कितीतरी दिवसांनीं त्याला भेटत असल्यामुळें आनंदहि होत होता.

या संमिश्र भावनांच्या भरांत ''भाई - भाई - '' एवढेच शब्द अरुणच्या तोंडांतून बाहेर पडले -

स्वयंपाकघरांत जेवतां जेवतां, कमळामावशीला भाईंचा गंभीर आवाज ऐकूं आला व अरुणचे शब्दहि तिच्या कानांवर पडले.

: ८५७ :

थोड्याशा साशंक मनानें ती अर्धवट जेवून चटकन उठली व लगबगीनें हात धुऊन बाहेर आली.

मावशी जवळ आलेली पहातांच, अरुण तिच्याकडे पाहून गडबडीनें म्हणाला, ''अग मावशीऽ! तुला मी मागं सांगत होतो ना, तेच हे श्रीचंद्र टागोर! तुरुंगातून सुटल्यावर यांच्याचकडे मी तीन महिने काढले! आणि तुला ठाऊकच आहे, भाई होते म्हणूनच मी त्या वेळच्या आजारांतून कसाबसा वांचलो!''

बोलतां बोलतां अरुणची नजर भाईंकडे गेली...

कमळामावशीकडे पहातां पहातां भाई एकदम केवढ्यानें तरी दचकले!

अरुणच्या लक्षांत तें आलें पण त्याचा अर्थ त्याला लागेना. कमळामावशीकडे त्यानें दृष्टि फिरविली तों तीहि किंचित् बावरल्या नजरेनें भाईंकडे निरखून पहात होती!

: ८५८ :

अतिशय गोंधळलेल्या अंतकरणानें अरुण दोघांकडे आश्चर्यचकित मुद्रेनें आळीपाळीनें पहात शेवटीं म्हणाला, ''भाई - मावशी - - तुमचीहि दोघांची ओळख आहे कीं काय? हें सारं आहे तरी काय गौडबंगाल, शंकरकाका?''

पण ती दोघं होतीं तेथून मुकाट्यानें आपापल्या गंभीर दृष्टीनें अरुणकडे पाहूं लागलीं.

शंकरकाकाहि गप्प बसले होते.

अरुणनें शंकरकाकांकडे अगदीं अधीर उत्सुकतेनें वळून पाहिलें; तेव्हा शेवटीं ते त्याला चाचरतच म्हणाले, ''अरुण, हेच बरं तुझे चुलते - श्रीनिवास ठाकूर! माझे वडील भाऊ!'' -



: ८५९ :

त्या शब्दांनी अरुणला एकदम धक्का बसला!

इतक्यांत, भाईच पुढें म्हणाले, 'होय, अरुण, तुझा शंकरकाका सांगतो आहे तें खरं आहे! तुझ्या जन्मानंतर थोड्याच दिवसांत घरांतून निघून गेलेला तुझा चुलता तो मीच. तूं माझ्याकडे होतास, त्यावेळीं, तुझ्यापासून मुद्दामच तें मी लपवून ठेवलं होतं! शेवटीं सांगणार होतो; इतक्यांत...''

वाक्य अर्धवट टाकून आपल्या प्रेमळ, अश्रु भरलेल्या डोळ्यांनी त्यांनीं अरुणकडे पाहिलें व त्याला जवळ ओढून अगदीं घट्ट मिठी मारली.

थोडा वेळ तसाच गेला.

कमळामावशी, त्या दोघांकडेहि प्रेमानें पहात, तशीच निमूटपणें उभी राहिली होती.

तिच्या आयुष्याच्या सुरवातीस ज्यांच्याविषयीं तिला जिव्हाळा, प्रेम, सारं कांहीं वाटत होतें, ज्यांच्या संगतींत जाणाऱ्या आपल्या भावी आयुष्याचीं मनोमय सुखस्वप्नें तिनें एकदां चितारलीं होतीं, तेच, एके काळीं तिला तिचेच असे वाटणारे श्रीनिवासभाई, त्या मोठ्या वियोगाच्या काळानंतर, आज इतक्या वर्षांनीं असे एकाएकीं तिच्यापुढें प्रत्यक्ष उभे राहिलेले पाहून ती प्रथम बरीच भांबावली होती.

: ८६० :

पण मग, तिनें आपल्या मनावर ताबा मिळविला आणि अरुणकडे व भाईकडे एकदां स्थिर दृष्टीनें पाहून, ती म्हणाली, 'थांब, बाळ, आधीं त्यांना जेवायचं वगैरे असेल, तर तें प्रथम आटपून घेऊं देत. आज इतक्या दिवसांनीं भाईकाका साऱ्यांची आठवण होऊन रस्ता चुकले, आणि तडख तुला भेटायला आले. तेव्हां ते तुझ्याकडे थोडे दिवस राहून, मोकळेपणानं गप्पागोष्टी केल्याशिवाय आतां जातील थोडेच?''

अरुणला उद्देशून बोललेल्या त्या शब्दांतून मावशी भाईना, जणूं काय, आपल्याच मनांतील संदेश गुप्तपणें तारायंत्रानें कळवीत होती.

भाईहि, अरुणजवळच्या खुर्चीवर बसत बसत आपल्या गंभीर दृष्टीनें तिच्याकडे पहात म्हणाली, ''नाहीं. कमल, माझं सारं कांहीं झालं आहे. शंकर आणि मी मुंबईलाच जेऊन निघालों.''

थोडा वेळ सारीं अगदीं निःशब्द होतीं!

मग जवळ बसलेल्या वसंत, अरविंद, शरद् वगैरे मंडळीकडे पाहून, भाई कुतूहलानें म्हणाले, ''नानांचा वसंत कुठं आहे? अंऽ? हाच कीं काय? अरे अस्संऽमी त्याला अगदीं लहान असतांना पाहिला होता. आणि हे कोण? बाबांचे जावई वाटतं? आणि हा...बाबांचा दुसरा मुलगा का?''

किंचित् काळ थांबून ते पुढें म्हणाले, ''हं...बरं झालं. सारी मंडळी भेटलांत!''

बाबा यावेळीं तेथें नाहींत याचें सर्वांनाच वाईट वाटत होतें; विशेषतः भाईंचें दुःख तर अगदी ताजें होतें -

: ८६१:

पण तो विषय तसाच टाकून, थोडा वेळ शांतता दाटली होती ती मोडीत भाई मधली हकीकत सांगण्यासाठीं म्हणाले, ''अरुण, तूं पुण्याहून एकाएकीं माझ्याकडून निघून गेलास; त्यामुळं मला प्रथम थोडं वाईट वाटलं. पण मग म्हटलं, झालं तें योग्यच झालं! तुझा जसा मला पत्ता माहित नव्हता तसा माझाहि पत्ता तुला न कळणंच बरं. म्हणून मी दोनतीन जागा बदलल्या होतो. पुण्यातच; तिथं आणि मधून मधून एकदोनदां तुला भेटावेसंहि वाटलं पण तुझ्याविषयीं मला तशी कांहींच माहिती नव्हती. तेव्हां हातीं घेतलेला व्यवसाय तिथंच कसाबसा चालवीत मी दिवस ढकलीत होतो.''

किंचित् काळ मध्ये थांबून, भाई पुढें म्हणाले, ''गेल्या आठवड्यांत पुण्याच्या एका पारशानं, सर एदलजीच्या घरांतली दोन तीन पोर्ट्रेटची कामं करण्यासाठीं मला मुद्दाम मुंबईस सांताक्रूझला आणलं. आठदहा दिवस मी तिथंच होतो. काल कांहीं कामासाठीं मी दादरला येत होतो, तों गाडींत मला शंकर दिसला. प्रथम तो बराच गोंधळला; पण मग मीच त्याच्याजवळ गेलो. काल माझ्याबरोबर तो मुंबईला 'एंपायर'मध्यें आला होता. त्यानं मला मधली सारी हकीकत सांगितल्यावर, शेवटीं, मीच ठरविलं, लागलीच तुम्हां सर्वांना येऊन भेटावं.''

बाबांच्या मृत्यूचा प्रसंग आठवून सारींच कांहीं वेळ गप्प बसलीं होतीं.

: ८६२ :

थोडा वेळ गेल्यावर, अरुण भावनापूर्ण शब्दांत म्हणाला, ''मी तुम्हाला पत्र पाठवलं होतं, भाई. पण तें माझ्याकडे परत आलं! - आणि, भाई, तुम्ही पुण्याला त्या वेळींच मला कां नाहीं सांगितलंत हो, हें सारं?''

एखाद्या अल्लड बालकासारखें अरुण हें सारें भरभर बोलत होता.

भाई काहींच बोलले नाहींत. त्यांचा चेहरा किंचित् त्रस्त झालेला दिसत होता.

त्यांच्या मनांतील तो भाव कमळामावशीनें ओळखून, ती अरुणला पटकन् म्हणाली, ''जाऊ देत, अरुण, त्या मागल्या गोष्टी! - आज आतां पुन्हा भेटल्यानंतर तुम्हाला किती बोलायचं असेल तें बोलून घ्या. तुम्ही दोघेहि आतां बाबांच्या खोलीत झोपा! - अंऽ? - ''

असें म्हणून कमळामावशीनें भाईंकडे अर्थपूर्ण दृष्टीनें पाहिलें.

भाईचा चेहरा प्रशांत गंभीर दिसत होता! -



: ८६३ :

त्यानंतर पुढच्या दोन दिवसांत, भाईंच्या आगमनामुळें, एक अगदीं नवीनच समाधानाचें वातावरण घरांत नांदत होतें. आणि त्यांच्याबरोबर गप्पा गोष्टी करतांना साऱ्यांना अतिशय आनंदहि होत होता. हिंदुस्थानांतल्या निरनिराळ्या भागांतील आपल्या प्रवासाच्या व तेथील अनुभवाच्या त्यांनीं सांगितलेल्या गोष्टी ऐकून, सारे, मनाला नवा आनंद आणण्याचा प्रयत्न करीत होते.

अरुणला तर बऱ्याच दिवसांनी, त्याच्या आवडीच्या चित्रकलेविषयीं चर्चा करणारें तज्ञ माणूस भेटलें होतें! - इतके दिवस धूळ खात पडलेल्या आपल्या साऱ्या कलाकृती, त्यानें झटपट साफसूफ करून अगदीं नव्या उत्साहानें, मोठ्या अभिमानानें, भाईपुढें ठेवल्या. वसंताहि त्यांच्यांत मिसळून, त्यांत भाग घेत होता.

भाईंना आतांपर्यंतच्या अरुणच्या साऱ्याच कलाकृती पहावयास मिळाल्या नव्हत्या. तरीहि ज्या त्यांच्यापुढें होत्या तेवढ्यादेखील त्यांना अत्युत्कृष्ट वाटून त्यांना अगदीं मनस्वी आनंद झाला.

: ८६४ :

त्यांनीं अरुणकडे प्रेमानें पाहून, त्याची कौतुकानें पाठ थोपटली. आणि ते त्यांच्या संवयीप्रमाणें, हळूहळू अगदीं गंभीर आवाजांत म्हणालें, ''अरुण, बाळ, आतांपर्यंत मला अशी कल्पनाहि नव्हती. इतकी कला तुझ्या अंगांत असतांना तिची अशी हयगय करून, तिच्याकडे वेड्यासारखं दुर्लक्ष करून, चालणार नाहीं मुळींच! - ''

क्षणभरानें किंचित् विचार करून ते पुढें म्हणाले ''एकदा माझ्या मनाच्या असल्याच आकांक्षा होत्या, बाळ! जणूं काय, त्याच माझ्यापुढं अशा मूर्त स्वरूपांत तूं आणल्या आहेस! हें सर्व पहातांना मला असंच वाटलं. छे, छे, अरुण, तुझे मधले गेलेले दिवस आतां साफ विसरून जा. तुला आतां पुन्हा नव्या उद्योगाला लागलंच पाहिजे! आणि हें पहा - गेलीं वर्षे पुरेपूर भरून काढली पाहिजेत हो अगदी! - ''

: ८६५ :

इतक्या जिव्हाळ्यानें आपला चुलता आपलं कौतुक करीत आहे, हे पाहून अरुणला अंगावर मूठभर मास चढल्यासारखें झालें.

त्या गौरवानें आनंदून जाऊन त्यानें कृतज्ञतेनें त्यांच्याकडे पाहिलें व तो सद्गदित कंठानें त्यांना म्हणाला, ''भाई, माझ्या कृतींना कुणी तरी माझं माणूस वाखाणील, अशी मी किती दिवस वाट पहात होतो! - शेवटीं आज कुठं तुम्ही मला लाभलांत! तुम्हाला खरंच असं वाटतं का हो भाई? तर मग मी पुन्हा एकदां कसून प्रयत्न करतोच तर! - ''

आणि या नव्या आनंदांत तो रंगला असतां, एकदम आठवण होऊन, तो आपल्या गुरुजींना - त्रिनिदादसाहेबांना बऱ्याच दिवसांनी भेटावयास जाण्यासाठीं, लागलीच बाहेर पडला.

जातांना तो भाईंना अगदीं पुन्हां पुन्हां बजावून म्हणाला, ''भाई, तुम्ही इथून नका हं कुठं जाऊं. मी उद्यां सकाळी नक्की परत येतो. मग आपण खूप बोलूं आणि पुढले सारे बेत ठरवूं.''

त्या वेळीं त्याचे डोळे नव्या आशेनें, आनंदानें चकाकत होते. भाईनींहि त्याच्याकडे पाहून मंद स्मित केलें -

: ८६६ :

या दोन्ही दिवसांत कमळामावशी बहुतेक मागें मागेंच होती. - ती साऱ्या मंडळींत मधून मधूनच मिसळे, आणि बोले देखील अगदीं जेवढ्यास तेवढेंच!

अरुण मुंबईस निघून गेल्यावर संध्याकाळीं, भरूच्यानें बोलावणें पाठविल्यामुळें एका नव्या कॉन्ट्रॅक्टच्या कामासाठीं, अरविंद घाईघाईनें तिकडे गेला होता.

वसंतहि, नाशिकहून थेट माटुंग्यास आल्यामुळें, मधले कांहीं दिवस कल्याणास फिरकला नव्हता. तेव्हां तोहि 'उद्या परत येतो,' असें सांगून, घरीं सुहास, मंजुळा एकटीं होतीं, म्हणून तिकडे गेला होता.

आणि भाई - घरी एकटेच कांहींतरी वाचीत, बाबांच्या खोलींत बसले होते.

कमळामावशीला त्यांच्याबरोबर कांहींतरी बोलावें असें सारखें वाटत होतें. पण ती दारापर्यंत जाई, तेथेंच घुटमळे व परत येई...असें दोनतीनदां झालें होतें.

भाईचेंहि लक्ष वाचनाकडे नव्हतेंच. त्यांच्या मनांत जुन्याजुन्या गोष्टींचें सारखें काहूर उठत होतें. आपला ऊर भरून आल्यासारखें त्यांना वाटलें. डोळ्यांत जमलेलें तें पाणी, त्यांना शेवटी कांहीं वाचूंच देईना.

इतक्यांत, कमळामावशी आंत आलेली त्यांनीं पाहिली.

पटकन् नीट सांवरून बसत, हळूच डोळ्यांतील पाणी पुसून, ते तिला स्मित करून म्हणाले, ''काय कमल?...ये, ना बस इकडे!...''

थोड्या संकोचानेंच, भाई बसलेल्या खुर्चीजवळच्या कॉटवर कमळामावशी निमूटपणें जाऊन बसली.

: ८६७ :

थोडा वेळ शांततेंत गेला.

प्रथम कोणी बोलावें ते त्यांना समजेना.

प्रत्येकाला गेल्या पंचवीस तीस वर्षांच्या वियोगांतील व त्यापूर्वीचेहि प्रसंग आठवत होते.



शेवटीं, कमळामावशी भाईंकडे पाहून म्हणाली, ''मग गेल्या दोन दिवसांत अरुणला सांगितलंत का?''

तिच्या प्रश्नाचा मुख्य रोख कशावर होता हें भाईंना समजत होतें पण तरी त्यांनी धडधडत्या छातीनें कमळामावशीकडे पाहून हळूच विचारलें, ''कुणाला? अरुणला?...कशाविषयीं म्हणतेस?''

''असं काय वेड पांघरल्यासारखं करतां अहां? - त्याच्या जन्माविषयीं!'' कमळामावशी संथपणें भाईंकडे पहात म्हणाली.

भाई एकदम दचकले!

त्यांना वाटलें होतें, आपल्या सीतावहिनीबरोबरच, तें सारें नाहींसें झालें असेल. त्यामुळेंच त्यांनी भीतियुक्त अंतःकरणानें कमळामावशीला एकदम सरळ प्रश्न केला, ''तुलाहि ठाऊक आहे ते सारं?''...

''हो आणि बाबांनाहि!'' कमळामावशी म्हणाली; व थोडा वेळ गप्प राहिली.

नंतर तीच पुढें सांगू लागली, ''भाई, लहानगा जयंत गेल्यानंतर तुम्हीं एकाएकीं आम्हांला सोडून निघून गेलांत. बाबांना तें समजल्यानंतर घाईघाईनें ते फिरतीवरून आले, पण त्या वेळीं, किंवा माईच्या मृत्यूपर्यंतसुद्धां मला अगर बाबांना सीतामाईनं अरुणविषयीं कांहींच सांगितलं नव्हतं!''

भाई तिच्याकडे उत्कंठतेनें पहात असतां मावशी पुढें म्हणाली, ''शेवटच्या दुखण्यांत मात्र, ती जेव्हा अगदीं अत्यवस्थ झाली, तेव्हां, तिनं आम्हां दोघांनाहि जवळ बोलावून तें सारं सांगितलं; आणि म्हणाली, 'आतां मला समाधान वाटलं. या माहितीचं, तुम्हांला वाटेल तें करा. मी जर जगले असतें तर भावोजींच्या म्हणण्याप्रमाणं, तें तुम्हांलाहि मी कदाचित् सांगितलं नसतं. पण हें पहा - कांहींहि असलं, तरी अरुण माझाच आहे बरं! जें त्याच्या खऱ्या हिताचं असेल, तेंच तुम्ही करा.''

: ८६८ :

या मागील वृत्तांताचें चित्र डोळ्यापुढें उभें राहून, भाई गप्पच होते; तोंच मावशी म्हणाली, ''नंतर आठ दिवसांनीं सीतामाई वारली. माईच्या मृत्यूनंतर बाबा एके दिवशी मला हळूच म्हणाले, 'कमळे, तुझ्या बहिणीनं तुला व मला जें जातांना सांगितलं, तें मी तुला पुन्हां स्वतः सांगेपर्यंत साफ विसर''-

मावशी पुन्हा क्षणभर थांबून पुढें म्हणाली, ''मध्यें इतकीं वर्षे गेलीं. पण शेवटपर्यंत त्याविषयीं कधीं कांहीं बाबांनीं कुणालाहि सांगितलं नाहीं कीं लिहिलं नाहीं. बाबा गेले त्याच दिवशीं, ते मला याविषयींच कांहींतरी सांगणार होते, मला वाटतं. कारण ते बोलतां बोलतां खांकरले आणि...''

कमळामावशीनें एक आवंडा गिळला व ती थोडा वेळ स्तब्ध राहिली.

तिला बाबांच्या सहवासांतला तो शेवटचा प्रसंग प्रत्यक्ष समोर घडत असल्याप्रमाणें आठवत होता.

: ८६९ :

तरी पण थोड्याच वेळांत, मनाला सांवरून, ती भाईंकडे पहात म्हणाली, ''बाबांनीं शेवटीं लिहून ठेवलेलं सारं अरुणनं तुम्हाला वाचायला दिलं होतं का?''

'हो' भाई गद्गदित आवाजांत म्हणाले, ''पण त्यांत कुठंच त्याबद्दल उल्लेख केलेला दिसला नाहीं.''

''हं आणि याचंच मला राहून राहून आश्चर्य वाटतं आहे!'' बोलतां बोलतां भावनांनी कमळामावशीचा कंठ जड झाला होता.

नंतर दोघेंहि मधूनमधून निमूटपणेंच एकमेकांकडे पहात होतीं.

मग पुन्हा धीर आणून, कमळामावशीनें भाईंना विचारले, ''आतां तुम्ही आलांत, त्याला भेटलांतहि, मग अजूनदेखील त्याला तें सांगायची वेळ आली नाहीं का?''

भाई, थोडा वेळ तंद्री लागल्याप्रमाणें विचार करीत बसले. शेवटीं शेवटीं तर त्यांच्या डोळ्यांतून अश्रु ओघळूं लागले.

ते पुशीत कमळामावशीकडे पाहून ते म्हणाले, ''नाहीं कमल, बाबा तुझ्यामाझ्यापेक्षां जास्त विचारी होते. त्यांनीं केलं तेंच योग्य, असंच मला विचारांती वाटतं!''

त्यावर, कमळामावशीला काय बोलावें तें समजेना. भाईंची ती अढळ वृत्ति व श्रेष्ठ हेतूनें आजपर्यंत झालेली बाबांची ती छपवाछपवी, यांची एकदम जाणीव होऊन तिला वाटलें ''खरोखर हे दोघेहि भाऊ किती श्रेष्ठ प्रतीचे! एकमेकांस अगदीं शोभणारे!''

परंतु जगापासून, निदान अरुणपासून, ते सारे प्रसंग लपवून ठेवावे अशा तऱ्हेनें तिला तिचें मन कांहीं केल्या वळवतां येईना. तिला सारखें वाटत होतें, हा त्या तिघांच्याहि विरुद्ध होणारा अन्यायच ठरेल.

: ८७० :

असले विचार मनांत सारखे येत असूनहि, ती स्वस्थ बसली होती.

इतक्यांत, भाईंनींच शांतता मोडून तिला एकदम म्हटलें, 'कमल, अरुणला आणि त्याच्या त्या दोघां दोस्तांना, आपल्याविषयीं समजलं असेल तर सगळं आतां!...''

''हंऽ'' कमळामावशी सलज्ज चेहऱ्यानें, मान फिरवून म्हणाली; आणि तिनें एक मोठा सुस्कारा सोडला.

पुन्हा बराच वेळ दोघेंहि कांहींच बोललीं नाहींत.

मग भाईंच एक निःश्वास टाकून विचारी मुद्रेनें हळूच म्हणाले, ''विसरले पाहिजेत आपल्याला ते पूर्वीचे दिवस, आतां!...बरंऽ! तुझा तरी संसार कसा काय चालला आहे?''



''ठीक!'' कमळामावशी हंसल्यासारखें करून भाईंकडे पहात म्हणाली पण त्यांत बरीचशी कृत्रिमताच होती.

''मला फसवू नकोस हं, कमल'' भाई तिच्याकडे तीव्र दृष्टि रोखून म्हणाले. ''अरुणकडून मला त्यांतलं मागंच पुष्कळंस समजलं आहे. आता तर वस्तुस्थिती बदलणं आपल्या पूर्णपणें आटोक्याबाहेरचं आहे. तुला तुझ्या जबाबदाऱ्या आहेत. तुझ्या आयुष्याला उतार लागला. माझंहि आयुष्य संपत आलं. मग, इतक्या दिवसांनी आपण एकमेकाला भेटल्यानंतर, आपापसांत असली ही दांभिक लपवाछपवी तरी कशाला ग?...दोन साध्या स्नेह्यांप्रमाणं बोलण्याचाहि हक्क नाहीं का आपल्याला, कमल?''

पुढे दोघेंहि कांहीं बोलली नाहींत. पण दोघांनी एकदम सोडलेल्या दीर्घ निःश्वासांत, हजारों अर्थपूर्ण शब्दांचा अर्थ भरला होता. तो त्या शांत वातावरणांत पसरला.

: ८७१ :

कांहीं वेळानें भाई कमळामावशीकडे पाहून म्हणाले, ''तरी पण, कमल, असल्या या त्यागांतहि कितीतरी आनंद भरलेला असतो, असं नाहीं तुला वाटत आतां? आणि म्हणूनच पूर्वस्मृतींच्या आणि सुखस्वप्नांच्या आठवणींची ती हिरवळ, आपल्या कांहींशा सुकलेल्या हृदयांना वारंवार सुखविते; नाहीं?-''

किंचित् हंसल्यासारखें करीत, एकदां भाईंकडे स्नेहानें पाहून कमळामावशीनें जमिनीकडे दृष्टि लावली.

त्या दोघांच्याहि आयुष्याच्या सुरवातीस भावनाप्रधान, ध्येयवादी भाई असल्याच असंदिग्ध, तुटक वाक्यांत आपल्या हृदयांतील भाव भरून आणण्याचा प्रयत्न करीत असत. आजहि, ते तसेच आपल्या तुरळक रुपेरी दाढीवरून हात फिरवीत, आपल्या स्निग्ध अंतःकरणांतून निघणाऱ्या प्रेमळ शब्दांत, तो भाव आणूं पहात होते. आकाशाला गवसणी घालण्याचा प्रयत्न करणारें त्यांचे भरारणारें हृदय, त्यांच्या आयुष्याच्या शेवटींहि, तसेंच कायम आहे, याची कमळामावशीला जाणीव होऊन, तिनें त्यांच्याकडे, अगदी प्रेमपूर्ण नजरेनें, सारखें निरखून पाहिलें.

तेवढ्यांत भाई एकदम म्हणाले, ''कमल, मी उद्यां सकाळीं जाणार!''

: ८७२ :

कमळामावशीनें दचकून त्यांच्याकडे दृष्टि वळवली. तिला त्यांच्या त्या बेताची तोपर्यंत जरादेखील कल्पना नव्हती. भाईंच्या प्रेमळ पण गंभीर दृष्टींत, निश्चयीपणाची झांक भरलेली दिसत होती.

''जाणार? - कुठं?'' कमळामावशीनें किंचित् अडखळत विचारलें.

''कुठं तरी! -'' भाई बेफिकीरीनें म्हणाले; व थोडा वेळ गप्प बसले. कांहीं क्षण तसेच स्तब्ध

राहून, नंतर ते मावशीला म्हणाले, ''आतां माझे जगांत राहिलेले थोडे दिवस तुमच्यापासून दूर राहूनच घालवावे हें योग्य! नाहीं वाटत तुला असं, कमल? यापूर्वीच तुमच्या साऱ्यांच्या आयुष्याचा मार्ग व माझ्या आयुष्याचा मार्ग कायमचे भिन्नभिन्न ठरलेले आहेत. मग आतां हा वेडा मोह तरी कशाला पाहिजे मला अगर तुम्हाला? आणि पुन्हां...''

भाई बोलतां बोलतां मध्येच अडखळून थांबले-

तेव्हां कमळामावशी त्यांच्याकडे पाहून निश्चयी स्वरांत म्हणाली, ''नाहीं, भाई, मला नाहीं वाटत...आतां अरुणला तरी तुमच्याशिवाय तसं कोण आहे हो? तुम्ही त्याच्याजवळच रहावं हें चागलं नाहीं का?''

कमळामावशीच्या या सूचनेनं, भाईंच्या मनांत एकच गोंधळ उडाला.

तरी शेवटीं ते नवा धीर आणून तिला म्हणाले, ''नको, कमल, सध्यांतरी ठरल्याप्रमाणेच, अरुण परत घरीं येण्यापूर्वी उद्यां सकाळींच उठून मी जाणार आहे. मी कुठं जात आहे? कां जात आहे? तें त्याला मुळींच कळवूं नकोस. मी तुलाहि सांगत नाहीं तें!...कमल, माझ्यासाठीं एवढं तुला...आणि...''

भाई बोलतां बोलतां मध्येंच घुटमळले. त्यांचा कंठ भरून आला होता. अनेक विचारांचा कल्लोळ त्यांच्या मनांत उठत होता.

: ८७३ :

थोडा वेळ गेल्यावर, कमळामावशीकडे, आपल्या प्रेमळ गंभीर दृष्टीनें पहात भाई म्हणाले, ''आणि कमल, बाबांनी केलं तेंच योग्य असं मला वाटतं. तूंहि अरुणला कांहीं न कळवशील तरच बरं!...''

भाईकडे प्रेमादरानें पाहून, कमळामावशीनें कांहीं न बोलतां एक सुस्कारा सोडला.

इतक्यांत तिला आठवण झाली -

त्या दिवशीं, दुपारीं, मृत्यूपूर्वी बाबांनीं भाईंना लिहिलेलें पत्र, तिच्याजवळ दिलें होतें, तें देण्यासाठींच मुख्यतः ती तेथें आली होती! -

म्हणून ती जाग्यावरून उठली व ओच्यांतून तें पत्र बाहेर काढून भाईंना देत, ती म्हणाली, ''अगदीं शेवटच्या दिवशीं बाबांनीं हें माझ्या हातीं दिलें. मला म्हणाले, 'तो कधीं परत आला व तुला भेटला तर हें त्याला दे.' आणि मग -''

बोलतां बोलतां मावशीचा कंठ दाटून आला होता.

तिच्या हातून तें पत्र घेतांना, आश्चर्य, उत्कंठा, कुतूहल या भावनांनीं प्रेरित होऊन, भाई त्या पत्राकडे व कमळामावशीकडे टकमक पहात होते!

: ८७४ :



दोघेंहि थोडा वेळ गप्पच होतीं.

भाई आपल्या हातांतील बंद पाकिटाकडे पहात राहिले.

कमळामावशी विविध भावनांमुळें गोंधळून, मंद पावलें टाकीत खोलींतून हळूच बाहेर गेली.

कमळामावशी घरांत निघून गेल्यावर भाईंनीं ईझीचेअरवर अंग टाकिलें, हातांतील पत्र उघडलें व हळूहळू वाचावयास सुरवात केली -

माटुंगा; ता. -

''चि. श्रीनिवास यांस अनेक आशीर्वाद - विशेष -''

तुझी भेट मला तर होणें अशक्यच; पण इतरांना तरी होईल कीं नाहीं कोणाला ठाऊक! पण कधीं आलास तर हें पत्र तुला द्यायला चि. कमळीला सांगणार आहे,

तुझा अरुण म्हणजे तुझ्या इतिहासाची जणुं पुनरावृत्तिच! तुझ्या नैराश्याचा, तुझ्या अज्ञातवासाचा एकदां चांगला अनुभव आल्यानंतरसुद्धां आम्ही अरुणबरोबर आमच्या मनोवृत्तींप्रमाणें, आमच्या कल्पनेप्रमाणेंच, त्याच्या हितार्थ कां होईना, झटत वागलों. तो घरांतून नाहींसा होईपर्यंत, कल्पनाहि नव्हती मला माझ्या त्याच्याबरोबरच्या त्या एकमार्गी वागणुकीची! मला वाटलें, तो आतां मला पुन्हां भेटणार नाहीं. पण काल तो आला आहे. रात्रीं मी माझ्या मनांतील सारें त्याला सांगितलें. आतां मात्र मला मृत्यूसमयीं दुःख होणार नाहीं.

कोणी सांगावें, तूंहि कदाचित् केव्हां तरी असाच परतून आपल्या माणसांत येशील!- अशी मला आशा वाटली आणि म्हणूनच शक्ति नाहीं तरी घाईघाईनें हें लिहून ठेवीत आहे.

श्रीनिवास, अरुणसाठीं माझ्या आयुष्याची सारी धडपड मी खर्ची घातली. त्याच्याबरोबर अनेक वेळां त्याच्याच हितासाठी मतभेद करून झगडलो. आज जातांना त्याची आयुष्यांतील स्थिरता माझ्यापेक्षां मी चांगली केली. त्यांतच मला समाधान वाटतें.

तूं आलास तर तुलाहि त्याबद्दल समाधानच होईल. पण मी माझ्या हृदयाचें सारें हितगूज सांगूनहि त्याला त्याच्या जन्माची गोष्ट सांगितली नाहीं. आणि तूं पूर्ण विचार करशील तर तुलाहि तेंच योग्य वाटेल.

म्हणूनच म्हणतो, श्रीनिवास, तूं, मी, आतां जुनी खोडें! त्या तरुण मंडळींच्या आयुष्यांत तितक्या उत्कटतेनें वावरून उपयोगी नाहीं! तींहि विचारी आहेत. त्यांचा तींच योग्य मार्ग काढतील! मग त्यांचीं यशें लांबून पहाणेंच आपल्याला आतां योग्य!-

क्षणभर तुला एक प्रकारचा मोह उत्पन्न होईल. पण तो बाजूला सार. त्याच्या - तुझ्या संबंधाचें गूढ तूं उकलण्याच्या भानगडींत पडूं नकोस! तूं काय किंवा मी काय, आपल्याला असं मागं रहाण्यांतच

जास्त समाधान लाभतें!

स्वभावतांच मी व्यवहारी माणूस! आणि मला वाटतें, मी माझें कर्तव्य केलें. अरुणचा जड पाया तरी मी थोडाफार तयार केला.

पण तरीहि त्याचें आयुष्य केवळ व्यवहारिक व्हावें असें मात्र मला मुळींच वाटत नाहीं. हें मी अगदीं मनापासून लिहीत आहे. श्रीनिवास, त्याच्या मनाची ही दुसरी बाजू तशी उत्कटतेनें कायम ठेवण्याची जबाबदारी आतां तुझ्यावर आहे!

माझा हात जास्तच कांपू लागला आहे. येथेंच थांबतो- यापेक्षां जास्त, मनांत जें वावरत आहे, तें तूं कल्पनेनें जाणशील-

- तुझा वडील भाऊ

जनू ठाकूर

बराच वेळ हातांतील त्या पत्राकडे पहात, डोळ्यांतून ओघळणारे अश्रु आवरीत, डोक्यावर हात घेऊन भाई बसले होते.

शेवटीं रात्रीं, अगदीं सामसूम झाल्यावर त्यांनी अरुणच्या टेबलावरचा एक कागद घेतला. त्यानंतर, किती तरी वेळ त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंचे व लेखणींतून शब्दांचे, सर कागदावर गळत होते!-

: ८७५ :

दुसऱ्या दिवशीं, मुंबईहून परत आल्यापासून अरुण, एकटाच, उगी उगी बसून होता.

आधींच त्रिनिदादसाहेबांच्या आजाराची व पायाच्या ऑपरेशनची बातमी ऐकल्यावर, तो अत्यंत खिन्न मनानें घराकडे वळला होता. त्यांत पुन्हा घरीं आल्यावर भाई कुठं आहेत म्हणून त्यानें मावशीला प्रश्न विचारला. त्यावेळी ती त्याला म्हणाली ''ते गेले निघून! 'पुन्हा केव्हांतरी येईन' असं म्हणाले जातांना!''

''पण कुठं?'' तें तिलाहि ठाऊक नव्हतें! थोड्या वेळानें ती पुन्हा त्याच्याकडे येऊन फक्त एक लहानशी चिठी त्याच्या हातीं देत म्हणाली ''जातांना एवढं दिलं आहे त्यांनीं तुझ्यासाठीं!''

अरुणनें ती चिठी भरभर उघडून वाचली.

: ८७६ :

''प्रिय अरुण,

तुला मी कबूल केलं खरं, तूं परत येईपर्यंत मी थांबेन म्हणून! - पण मी पुष्कळ विचार केला. तुम्हां साऱ्यांविषयीं, पूर्वीइतकंच प्रेम वाटत असून ही तुमच्यामध्यें जास्त दिवस रहाणं मला प्रशस्त वाटत



नाहीं. त्यामुळं तुला कदाचित् वाईट वाटेल; पण मागं तूं निघून गेल्यानंतर, तुझ्या वियोगाचं दुःख, मी जसं सोसलं तसं तूंहि आतां सोसशील अशी मला आशा आहे.

अरुण, बाळ, पुण्यांतील तुझ्या अचानक भेटीच्या पहिल्या दिवशीं, तुझा माझा खरा संबंध, मला समजून आला होता. पण मी त्यावेळीं तें मनातल्या मनांत ठेवलं! तुझ्या वियोगानन्तर, आपली ही आतांची पुन्हा भेट होईपर्यंत, मधल्या काळांत तर मला तुझी सारखी सारखी आठवण होत होती.

अगदी परक्या जगांत सारं आयुष्य घालविल्यानंतरहि, तुझ्या एकाएकीं झालेल्या भेटीमुळं, माझ्या मनांत, एक नवीनच आशा, एक नवाच उत्कट जिव्हाळा उत्पन्न झाला होता. तो अजूनहि तसाच कायम आहे. पण मला वाटतं, तुझ्या, माझ्या, साऱ्यांच्या, हितासाठीं आपण दूर-दूर असणंच योग्य!-

तुला नव्यानेच समजलेले तुझे भाईकाका, प्रत्यक्ष तुझ्याजवळ नसले तरी त्यांची आठवण तू मनांत ठेवलीस म्हणजे पुरे! त्यांतच मला अतिशय समाधान होईल, बरं बाळ!

आणि म्हणूनच अरुण, मी तुला न सांगतां जात आहे! आतां लांबूनच तुझ्या उज्ज्वल भवितव्याकडे, आशापूर्ण व प्रेमानं भारलेल्या अंतःकरणानं पहात, माझे राहिलेले दिवस घालविण्यांतच मला जास्त समाधान हाईल!

मी माझी माणसं सोडून गेलो. नंतर माझं आयुष्य मी इकडे तिकडे बाहेर फिरत घालविलं. साऱ्या जगापासून दूर दूर एकटाच रहाण्याचा मी प्रयत्न केला!

तरी पण आयुष्याच्या शेवटीं, माझी मानवी सहवासाची तहान, पुन्हां तीव्र झाल्यावांचून मात्र राहिली नाही.

एक मात्र, माझीं पूर्वींची ध्येयें, माझ्या तारुण्यांतील भरारणाऱ्या अंतःकरणाच्या श्रेष्ठ आकांक्षा आज म्हातारपणींहि तशाच कायम आहेत! आणि तशा मी त्या जपून ठेवल्या आहेत याबद्दल मला तिळमात्र दुःख होत नाहीं. उलट अतिशय अभिमान वाटतो!-

एवढ्याचसाठीं तुझ्यापासून दूर होतांना, मला तुला आपुलकीनं थोडंसं सांगायचं आहे.

अरुण, बाळा, माझे ज्येष्ठ बंधू बाबा, खरोखर अतिशय श्रेष्ठ होते. ते आपल्या आयुष्यभर व्यवहारी जगांत वर मान करण्यासाठीं, आपला पाया स्थिर करण्यासाठीं जोमानं व एक प्रकारच्या त्यागी बुद्धीनं झगडले! त्यांची तुझ्यासाठीं झालेली अन्य सारी धडपड, सारं तुला त्यांच्याविषयीं मुख्यतः हेंच सांगेल. -

मला त्यांच्याबद्दल पूर्वी जो आदर वाटत होता, तो त्यामुळं आतां कितीतरी पटीनं वाढला आहे.

पण अरुण, जगाकडे पहाण्याची ती दृष्टि एक प्रकारची झाली. मला वाटतं ह्याच बाजूचा सर्वस्वी

आपल्या मनावर पगडा बसवून घेऊन प्रगतिपथावरील व्यक्तीचं मुळीचं चालणार नाहीं.

मनुष्याच्या स्वैर भराऱ्यांना जगाचे व्यवहार पायबंद घालतात हें अगदीं अक्षरशः खरं आहे. पण माणसाच्या मनाची स्थिति पतंगासारखी असते.

पतंगाचं सूत्र जमिनीच्या जड पायाला चिकटलेलं असतं. म्हणून तो जमिनीपासून लांबलांब जायचं थांबवतो का?..डौलदार पतंग क्षणाक्षणाला उंचउंच भराऱ्या मारायचं सोडतो का? जमिनीचा आधार घेऊनच, पण तो जितका वर जाईल तितकी त्याची शोभा-त्याची किंमत जास्त! 'जमीन आपला आधार' ही अगदी खरी खरी वस्तुस्थिती असली, तरी त्या जाणीवेनं गांगरून तो मध्येच गोता खाऊन एकदम त्या धरणीमातेकडे धांव घेऊं लागेल, तर तो फाटल्यावांचून रहाणार नाहीं! आणि मग हा त्याचा अधःपात, जास्तच भीतिप्रद, दारुण किंबहुना त्याच्या सर्वस्वाचा नाश करणाराच ठरेल!

या विचारसरणीनंच मला वाटतं, बाळा, कीं तुला गांगरण्याचं मुळीच कारण नाहीं! तुला तुझ्या जीविताचा जड पाया आतां समजलाच आहे. ह्या मूळ सूत्राच्या ओढीची जाणीव, तुझ्या मनांत, तूं जरूर जरूर कायम ठेव. पण तुझ्या ध्येयप्रवण मनाच्या आकांक्षापूर्ण भराऱ्या घ्यावयाचं मात्र तूं गांगरून जाऊन मध्येंच सोडून देऊं नकोस.

बाळ अरुण, माझं मन मला या क्षणीं साक्ष देत आहे, तुझं भवितव्य अगदीं कर्तृत्वपूर्ण व उज्ज्वल आहे. तुझ्या मनाप्रमाणं तूं धीरानं, उत्साहानं उद्योगाला लाग. माझा तुला मनापासून शुभ आशिर्वाद आहे.

माझ्याविषयीं चिंता करूं नकोस; योग्य वेळी मी तुला भेटल्यावाचून रहाणार नाहीं.

तुझा प्रेमळ

- भाईकाका

: ८७७ :

भाईंचें तें पत्र, आतांपर्यंत पुन्हां पुन्हां वाचून अरुण जास्त गोंधळून गेला.

बाबांची भेट त्यांचा अनपेक्षित मृत्यु, त्यांची स्मशानयात्रा, त्यांचें मृत्युपत्र, त्यांचें आत्मकथन! - एकामागून एक, त्याच्या मनावर असे नवे नवे आघात बसत गेले होते!- आणि हें सारें किती थोड्या अवधींत!

त्याच्या मनांत पेटलेल्या या विचारांच्या वणव्यांतून केवढ्या तरी मोठ्या ज्वाला बाहेर पडत होत्या!..

तोंच, भाई एकाएकीं येऊन भेटले आणि आश्चर्य हें की, तेच त्याचे प्रेमळ भाई, त्याचे अनेक वर्षांपूर्वी घरांतून नाहीसें झालेले त्याचे काका ठरले होते -



त्यामुळें, बाबांच्या एकाएकीं घडून आलेल्या भेटीमुळें व त्यानंतर लागलीच घडलेल्या त्यांच्या कायमच्या वियोगामुळें गांगरून गेलेल्या अरुणच्या मनाला विरंगुळा वाटूं लागला होता.

भाईंनीं त्यांचीं चित्रें पाहून केलेला त्याचा गौरव, त्याला दिलेलें उत्तेजन, यांमुळें तर त्याच्या अंगांत अगदीं नवीन उत्साह संचरूं लागला होता. बरेच दिवस लुप्त झालेली, त्याच्या मनाची कार्यप्रवणता, पुन्हा एकदां उसळी मारून वर येत होती.

आणि यामुळेंच, मुंबईस गेल्यावर त्याच्या गुरुजींच्या-त्रिनीदादसाहेबांच्या आजाराची बातमी ऐकून, तो प्रथम दुःखी झाला होता. तरीहि पुन्हां मनाला धीर आणून भाई तरी घरीं भेटतील या उत्कट आशेनें, आपल्या घराकडे त्यानें लगबगीनें धांव ठोकली होती!

पण बिचारा घरीं येऊन पहातो, तो भाई एकाएकीं कोठेंतरी निघून गेलेले! आणि त्यांनीं आपल्यासाठीं एक पत्र ठेवलेलें !

: ८७८ :

त्याला ही अकल्पित घटना सहनच होईना. पुन्हां पुन्हां त्यानें तें पत्र वाचलें; व कमळामावशीकडे, भाई कोठें गेले? केव्हां येतील? याची चौकशी करून पाहिली.

पण तिलाहि त्यांतलें कांहींच माहीत नव्हतें!

त्याला मिळालेल्या एकंदर माहितीवरून तर त्याला कसलाच बोध होईना.

'भाई आपल्याला सोडून असे एकाएकीं गेले तरी कां? आणि कोठें?' या एकाच विचारानें, त्याचें मन सारखें तळमळत होतें.

मधूनच तो उठे, ग्यालरींत जाई, शून्यपणें रस्त्यावर दृष्टि टाकी, पुन्हां हॉलमध्यें येऊन येरझारा घाली. पुन्हां खुर्चीवर शांतपणे पडे...

अशी त्याची सारी दुपार गेली होती. संध्याकाळ झाली, सांज दाटली, पण त्याच्या मनाचा अस्वस्थपणा कांहीं जाईना!...

कमळामावशीचीं उत्तरें प्रत्येक वेळी जास्तच गोंधळ्यासारखी येत होतीं. भाईंचें पत्र उत्साहजनक होतें तरी त्यांत बरीच संदिग्धता होती!

कां बरें?..

''ही सारी मंडळी आपल्याकडून कांहीं लपवून तर नाहीं ना ठेवीत?''

असला संशय त्याच्या मनांत शेवटीं हळूच डोकावूं लागलेला -आणि मग तर तो बराच दाट झालेला!-

त्यामुळेंच अगदी अस्वस्थ होऊन हतबलपणेंच बाबांच्या खोलींतील आरामखुर्चीवर तो विचार

करीत पडला.

: ८७९ :

ग्यालरींत उभी राहून, भाई लांब निघून जाईपर्यंत कमळामावशी रस्त्याकडे एकाग्रतेनें पहात होती.

डोळ्यांत जमणारे अश्रु हळूच पुसून, ती पुन्हां घरांत वावरूं लागली. पण तिचें मन अगदींच अस्वस्थ झालें होतें.

आणि आतां भाई गेल्यावर तास दीड तास होत नाहीं तोंच अरुण घरी परतला.

मनाच्या गोंधळलेल्या स्थितींत कमळामावशीनें अरुणच्या पहिल्या प्रश्नांना उत्तरें दिलीं. त्याच्या हातांत तिनें भाईचें पत्र ठेवलें व तो आणखी विचारील ते प्रश्न टाळण्यासाठीं, ती झटकन घरांतच निघून गेली.

पण अरुणच्या हालचालीवर मात्र तिचें लांबून सारखे लक्ष होतें.

तो दुपारीं मुकाट्यानेंच जेवला. कांहीं न बोलतांच विचारी त्रस्त चेहऱ्यानें घरांत इकडे तिकडे फिरूं लागला...पुन्हां पुन्हां दोनतीनदां आंत येऊन, भाईंविषयीं त्यानें तेच तेच प्रश्‍न तिला विचारले. तीहि त्याला तींच तींच संदिग्ध उत्तरें देत होती...

दुपार गेली, संध्याकाळ गेली, तरी अरुणची अस्वस्थ मनःस्थिति कांहीं केल्या पालटेना, हें मधून मधून जातां येतां पाहून मात्र, कमळामावशीला शेवटीं त्याच्या गुदमरलेल्या स्थितीचें मनस्वी दुःख झालें.

तिच्या डोळ्यासमोर सारखें अश्रूंचें धुकें सांचत होतें.

आणि यांत गतकालांतील अनेक दृश्यें तरत होतीं.

- अखेर कमळामावशीला रहावेना -

: ८८० :

बाहेर काळोख पसरला होता, तरी अरुणला त्याची दादहि नव्हती. बाबांच्या खोलींत तो अजूनहि अंधारांतच बसून असलेला पाहून ती जड अंतःकरणानें, मंद पावलें टाकीत, त्याच्याजवळ गेली.

अरुण तसाच ईझीचेअरवर उताणा पडून, काळोखांत आपल्या तंद्रीत विचार करीत होता.

कमळामावशीनें बटन दाबलें. तिच्या बांगड्यांचा व बटनाचा झालेला आवाज आणि खोलींत चक्कन पडलेला प्रकाश, यामुळें दचकून अरुण भानावर आला. तो खुर्चीवर उठला आणि कमळामावशीकडे केविलवाण्या मुद्रेने पाहूं लागला.

''कायरे, आज अजून फिरायलाहि बाहेर गेला नाहींस?'' कमळामावशी स्मित करून, त्याच्याकडे पहाण्याचा प्रयत्न करून म्हणाली.



पण तिच्या हृदयांत मात्र कालवाकालव होत होती!-

अरुण कांहींच बोलला नाहीं. तो क्षणभर मुकाट्यानेंच इकडे तिकडे फिरला व शेवटीं बाबांच्या पलांगावर जाऊन बसला.

त्याची ती तसली दुःखी कुढी मनःस्थिति जाणवून, कमळामावशीचें हृदय अगदीं कोंदाटलें! - कांहीं न बोलतां, ती त्याच्याजवळ जाऊन बसली आणि त्याच्या पाठीवर हात ठेवून त्याला एखाद्या लहानग्याप्रमाणें हळुहळू थोपटूं लागली.

अरुणनें तिच्याकडे एकदां प्रेमानें पाहिलें व तिच्या खांद्यावर आपली मान टाकली.

: ८८१ :

थोडा वेळ तसाच गेल्यावर, अरुण हळूच मावशीला म्हणाला, 'मावशी, भाई कां ग असे एकाएकीं माझ्यापासून दूर झाले? - सांग ना मला? त्यांनीं तुला कांहींतरी सांगितलं असलं पाहिजे!''

नको असलेलाच प्रश्न कमळामावशीपुढें उभा राहिला. डोळे अश्रूंनी डबडबले होते.

वत्सलतेचें भरतें येऊन, तिनें अरुणला थोडें आपल्याजवळ ओढलें; पण त्याच्या प्रश्नाचें उत्तर देण्याची मात्र टाळाटाळ करीत, ती शेवटीं म्हणाली, ''छेऽरे बाळ, मला तरी काय माहीत?'' -

आपलें गुदमरणारें हृदय आंवरीत, बिचारा अरुण तिच्याकडे आपली केविलवाणी दृष्टि रोखून म्हणाला, ''मावशी, नक्की तूं मजपासून कांहींतरी लपवून ठेवीत आहेस!''

त्याच्या त्या दृष्टीनें, व त्या अपेक्षित सवालानें कमळामावशी एकदम दचकली! काय करावें तें न समजल्यामुळें ती अतिशय गोंधळली! अरुणचा दुःखी चेहरा पाहून तर तिलाहि आपलें दुःख आवरेचना, आणि शेवटीं, तिच्या डोळ्यांतून सारखे अश्रूंचे ओघळ वाहूं लागले. -

: ८८२ :

अरुणला तर ह्याचा कांहींच अर्थ कळेना. त्यानें आपलें तोंड तिच्या कुशींत लपवले व तो दडपलेल्या आवाजानें तिला अडखळत म्हणाला, ''मावशी, सांग ना मला! तूं खासच कांहींतरी लपवते आहेस!''

मावशी थोडा वेळ घुटमळली; पण मग तिनें आपले अश्रु पुसले. अरुणची मान वर केली! तीं दोघें बसलेल्या बाबांच्या पलंगाकडे, जणूं काय, ते तेथेंच त्यावर बसले आहेत, अशा दृष्टीनें तिनें एकदां पाहिलें!

आणि मग आंवडा गिळून ती अरुणकडे पहात म्हणाली, ''बाळ, बाबांनीं तुझ्यापासून लपवलं...भाईहि तुला न सांगतांच तुझ्याजवळून अचानक निघून गेले! - पण बघ - तुला आतां मला सांगितल्यावाचून रहावत नाहीं! -''

मावशी आतां आपल्याला काय सांगते, याची कल्पना करीत, अरुण अगदीं धडधडत्या छातीनें तिच्याकडे सारखा टकमक पहात होता!

क्षणभर थांबून शेवटीं मावशीनें त्याला जवळ ओढलें व म्हटलें, ''अरुण! बाळा! खरं सांगायचं म्हणजे बाबा तुझे चुलते आणि भाई तुझे वडील!''

बाबांच्या पलंगावर बसल्या बसल्याच अरुण एकदम केवढ्यानें तरी दचकला!

त्यानें बाबांच्या उशाच्या बाजूस आपली गोंधळलेली दृष्टि फिरवली व तेथल्या उशींतच आपलें तोंड पटकन् लपविलें! -

: ८८३ :

घरांत एकत्र कुटुंबांतील बेफिकीरी व औपचारिक दांभिक अशा जुन्या समजुतींचा सासुरवास! - त्या कल्पनांनाच मूर्खपणानें चिकटून राहिल्यामुळें आपल्या कमळीचें लग्न भावोजींशीं - दोघेंहि एकमेकांना अनुरूप असतांनाहि झालें नाहीं! - याचें सीतामाईला मनांतल्या मनांत फार दुःख होत असे.

शेवटीं दोघांचींहि निरनिराळीं लग्नें झालीं! आणि माई पुन्हां दोघांच्या भवितव्याकडे नव्या आशेनें पाहूं लागली!...

आपल्या भावोजींकडे ती प्रेमळ धाकट्या भावाप्रमाणें पहात असल्यामुळें, तिला त्यांच्याविषयीं तर फारच आपुलकी...जिव्हाळा वाटे!...

आणि यामुळेंच, घरांतले काय, नोकरीचें काय व लग्नानंतरचें एकंदर सारेंच वैवाहिक आयुष्य काय,.. भाई अगदीं विरक्त मनानें व विषण्ण अंतःकरणानें घालवीत असलेले पाहून, त्यांची ती प्रेमळ वहिनी कष्टी होई! -

त्यांना पुन्हा उत्तेजित करण्याचा तिनें कितीतरी प्रयत्न करावा;.. आपली धाकटी जाऊहि सुशील व प्रेमळ आहे याची जाणीव होऊन, तिनें त्यांच्या संसारांत-खेळीमेळीचें आनंदी वातावरण निर्माण करण्याची धडपड करावी!

पण सारें व्यर्थ!..तिला कांहीं यश येईना.

: ८८४ :

याच सुमारास, त्या दोघी जावांचे दिवस भरत येत होते. भाईंच्या आगामी मुलाच्या भवितव्याविषयी व त्यांच्या पितृपदाविषयीं, सीतामाई त्यांची नेहमीं सौम्य थट्टा करी!

तरीपण भाई गांगरल्यासारखा चेहरा करून, त्यांत विशेष उत्साहानें कधीं भागच घेत नसत! -

शेवटीं, सीतामाई व त्यानंतरच आठ नऊ दिवसांत, भाईची बायको, दोघीहि प्रसूत



झाल्या;..दोघींनाहि मुलगेच झाले;..त्यांचीं नावें ठेवण्यात आलीं;... सीतामाईच्या मुलाचें नांव अरुण - भाईंच्या मुलाचें नांव जयंत.

भाई आपल्या व मुलाच्या जन्मानंतर तर जास्तच विचारी दिसूं लागले होते.

त्यांची बायको पूर्वीपासूनच, थोडी दुःखीकष्टी, रंजीस अंतःकरणानें वागत होती. त्यांत पुन्हा बाळंतपणानंतर तर ती बरीच आजारीहि झाली होती. त्यामुळें, आजारी आईजवळ मुलाला निजविणे बरें नव्हे, या विचारानें जयंताला आपल्या अरुणजवळच झोंपी घालण्यास सीतामाईंनें सुरवात केली.

घरांतील एकत्र कुटुंबाच्या बेफिकीर वातावरणांत, या दोन नूतन बालकांच्या जन्माविषयीं विशेष कसली असामान्य उत्सुकता नव्हती. आणि बाबा तर आपल्या नोकरीनिमित्त फिरतीवरच होते. त्यामुळें त्यांना आपल्या मुलाचा जन्म फक्त पत्ररूपानेंच समजला.

त्यानंतर, जवळ जवळ वीस दिवस असेच गेले. शेवटीं जयंताची आई अत्यवस्थ झाली व दोन तीन दिवसांतच, जयंताला भाईंच्या व सीतामाईच्या स्वाधीन करून निघून गेली!

भाई दोन दिवस तर अगदीं वेड्यासारखेच फिरत होते.

: ८८५ :

एके दिवशीं ते सीतामाईच्या खोलींत गेले; तेथें तिच्या कॉटजवळच्याच मोठ्या पाळण्यांत, जयंत व अरुण दोघेहि झोंपलेले त्यांना दिसले! भाईंनीं एक दीर्घ निःश्वास टाकून, पाळण्यांत डोकावून पाहिलें.

सीतामाईनें मोठ्या हौसेनें, दोघांनाहि सारखींच झबलीं, सारखींच टोपडीं घातलीं होती; आणि त्यांच्यावर तिनें एकच पांघरुण घातलें होतें. - त्यांचे कोवळे तांबडेबुंद चेहरे, जवळजवळ सारखेच दिसत होते!

भाई असे त्यांच्याकडे पहात असतांना, सीतामाई हळूच त्यांच्याजवळ पाळण्यापाशीं जाऊन उभी राहिली; आणि त्यांच्या खिन्न मनाला, प्रसन्नता आणण्यासाठीं ती हंसून म्हणाली, ''कां, भावोजी, नाहीं म्हणतां म्हणतां, बरं आपल्या मुलाचं गुपचूप कौतुक चाललं आहे! पाहिलं हं आम्ही! कसं पण पकडलं एका माणसाला!...

''हं !'' भाई एक निःश्वास टाकून उगीच हंसल्यासारखें करून म्हणाले.

पण मग तेंच गमतीचें आनंदी वातावरण ठेवण्यासाठीं ते पुढें म्हणाले, ''बघा वहिनी, तुमच्यामुळंच मला माझ्या जयंताची कांहीं काळजी वाटत नाहीं! पण एखाद्या वेळीं चुकाल हो ऽ!...माझ्या जयंताला म्हणाल तुम्ही आपला अरुण, आणि अरुणला म्हणाल जयंत! मला स्वतःला त्या दोघांत, आजतरी कांहीं निराळं असं दिसत नाहीं बा!''

सीतामाई त्या कल्पनेनें, क्षणभर थोडी हंसली व त्या दोघां झोपलेल्या मुलांकडे, एकाच वत्सल दृष्टीनें किंचित्काळ पहात म्हणाली, ''खरं आहे तुम्ही म्हणतां तें, भावोजी. - आणि दोघांचाहि माझ्या अंगावरील दुधावर, आजतरी अगदी सारखाच हक्क आहे!...तरी पण, आम्हां आयांना मात्र आपापली मुलं वेळ पडल्यास ओळखतां येतात, बरं का?...''

असें म्हणून, त्या झोपलेल्या बालकांच्या अंगावर घातलेलें पांघरूण सीतामाईनें हळूच बाजूस केलें; आणि भाईंकडे प्रेमळपणें हंसून पहात, ती म्हणाली, ''हें पाहिलंत भावोजी, जयंताच्या उजव्या मांडीवर हा लास्याचा मोठा तांबडा डाग आहे. आणि'' नीट पाहून, ''माझा अरुण थोडा रोडका दिसत नाहीं का तुम्हाला जयंतापेक्षा?''

यावर भाई आपल्या वहिनीकडे कृतज्ञतेचा एक कटाक्ष टाकून कांहीं न बोलतांच थोड्या वेळानें बाहेर निघून गेले होते.

: ८८६ :

त्यानंतर सात आठ दिवसांनींच घडलेली गोष्ट -

अरुण व जयंत दोघेहि आजारी झाले होते. अरुणला बराच कफ झाला होता. घरांतील इतर मंडळी आपापल्या कामांतच गुंतली होती!

सीतामाई व भाई, दोघेंच फक्त, त्या मुलांच्या शुश्रूषेंत, भारावलेल्या मनानें रात्रींच्या रात्री जागून काढीत होतीं.

भाईंचा चेहरा जास्तच विचारी झाला होता. ते त्या मुलांच्या आजारानें फार गांगरले होते.

जयंताच्या प्रकृतीस मात्र चांगला आराम पडला होता.

अरुणला अगदीं आस्थेनें शेकतां शेकतां भाईंनीं सीतामाईकडे वळून पाहिलें; तों ती मुकाट्याने मुळुमुळू अश्रु गाळीत होती.

भाईंना अगदी राहवेना. शेवटी आपल्या प्रेमळ वहिनीकडे पाहून ते हळूच म्हणाले, ''वहिनी, असं काय हो?.. कसलं दुःख होतं आहे तुमच्या मनाला? सांग ना -''

तरी सीतामाई थोडा वेळ कांहींच बोलली नाहीं.

: ८८७ :

पण मग अरुणच्या रसरसत्या अंगावर हात ठेवून ती अडखळत म्हणाली, ''भावोजी, मुलगा मुलगा म्हणून, इतक्या मुलींच्या पाठीवर, किती दिवसांनीं मला माझा हा छकुला झाला! - आणि तो आतां असा अत्यवस्थ!..बचडा दीनपणें अगदीं घटकाच मोजीत आहे हो! -''

भाईंच्या डोक्यांत आधींच पेटलेला वणवा, सीतामाईच्या त्या दीन शब्दांनी जास्तच भडकला! -



पण ते किती तरी वेळ तसेच विचार करीत, कांहीं न बोलतां अरुणला शेकीत होते.

शेवटीं, भाईंना शांतता असह्य झाली. कांहीं विचार मनांत डोकावून ते हळूच सीतामाईला म्हणाले, ''वहिनी, माझ्या जयंताची जन्मदात्री निराळी! पण आजतरी, त्याची आई म्हणजे तुम्हीच नव्हे का? माझी मनःस्थिती तुम्हाला ठाऊकच आहे! मग....''

बोलतां बोलतां, भाई घुटमळलेले पाहून, सीतामाईहि आपलें दुःख आंतल्या आंत दाबून, कांहींशा गोंधळलेल्या चेहऱ्यानें पाहूं लागली.

: ८८८ :

किती तरी वेळ सीतामाई भावोजीबरोबर हळूहळू बोलत होती. सारें बोलून झाल्यावर दोघांनींहि बरोबरच समाधानाचे सुस्कारे टाकले होते!

त्या अफाट अंदाधुंद मोठ्या कुटुंबांत, प्रत्येकजण आपापल्या कामांत गुंतला होता.

बाबांनीं तर बाहेर फिरतीवर असल्यामुळें आपल्या मुलाला अजून पाहिलेंहि नव्हतें. आणि त्या बालकांच्या आजारांत कुटुंबांतील असे सीतामाई व भाई दोघेंच फक्त, त्या असहाय्य बालकांची शुश्रूषा करीत होतीं!

तेव्हां, त्या दिवशीं सांजेला, सीतामाईचा अरुण शेवटीं निघून गेला. तरी पण, घरांत व सगळीकडे दुसऱ्या दिवशीं पहाटे बातमी पसरली, ''श्रीनिवासचा जयंत त्याच्या आईच्या मृत्यूनंतर - बिचारा आईविना पोर - वीस पंचवीस दिवसांतच आजारी होऊन गेला!-''

: ८८९ :

आणि बाबांनाहि गेलेल्या सीतामाईच्या पत्रांत, हीच बातमी होती! त्याबरोबरच श्रीनिवास भावोजी घरांतून अनपेक्षितपणें एकाएकीं निघून गेल्याचाहि वृत्तांत तिला त्यांत लिहावा लागला होता!

त्या साऱ्या घटनेची तिला एकटीलाच जाणीव होऊन, सीतामाई त्यानंतर लागलीच पाळण्याकडे वळली होती -

आपल्याला सोडून गेलेल्या आपल्या अरुणच्या रिकाम्या जागीं व त्याच्याच जवळ अरुण म्हणून आतां ओळखल्या जाणाऱ्या जयंताकडे मातेच्या वत्सलतेनें तिनें एकदां डोळे भरून पाहिलें!

आणि दुसऱ्याच क्षणीं, त्याच्या अंगावर आपल्या थरथरत्या हातानें, तिनें मातृप्रेमाचें पांघरूण घातलें! -

: ८९० :

कमळामावशी, अरुणला हें सारें हळुहळु सांगत होती. अरुण मुकाट्यानेंच तिच्याकडे पहात, उचंबळून येणारें आपले हृदय प्रयासानें दाबून धरीत होता.

कमळामावशी थोडा वेळ थांबली; आणि नंतर ती पुन्हा अगदी मंद आवाजांत अरुणला म्हणाली, ''आणि आश्चर्य हें कीं, अरुण, तूं चार वर्षांचा होईपर्यंत, हें एकट्या माईलाच तेवढं ठाऊक होतं! मग ती बरीच आजारी झाली, तेव्हां मात्र, तिनं मला व बाबांना हा सारा वृत्तांत सांगितला. - ''

ते मागील प्रसंग आठवीत कमळामावशी थोडा वेळ पुन्हां गप्प राहिली; आणि मग म्हणाली ''भाई असे एकाएकीं निघून जातील ही माईला त्या वेळीं कल्पना नव्हती. पण ते गेल्यावर तर तिला तुझ्याविषयीं जास्तच आपुलकी वाटली! आणि तिनें म्हणूनच, ती जबाबदारी आपल्या आयुष्याच्या शेवटापर्यंत अगदीं एकटीनेंच मोठ्या धीरानें पार पडली! तिनें स्वतः हें सर्व सांगेपर्यंत, तूं तिचा प्रत्यक्ष मुलगा नव्हेस, जयंत आहेस; असा कुणालाहि - किंबहुना बाबांना किंवा मलाहि कधीं संशय आला नव्हता!''

: ८९१ :

कमळामावशीनें सीतामाईच्या आठवणीनें एक दीर्घ निःश्वास टाकला व ती थोडा वेळ पुन्हां गप्प राहिली.

''भाई घरांतून निघून गेले! - माझंहि लग्न झालं होतं-'' कमळामावशी पुन्हा बोलूं लागली, ''पण तोपर्यंत मी माता झाले नव्हते. माझ्या विनूचा जन्म अजून व्हायचा होता! - मला आपला तुझ्याविषयीं प्रथमपासून कसला अज्ञात असा वत्सल जिव्हाळा वाटे. पण खरं सांगायचं म्हणजे तूं भाईंचा मातृविहीन मुलगा आणि भाई निघून गेलेले - या एकाच कल्पनेनं, माझं हृदय तुझ्याविषयींच्या वात्सल्यानं जास्त जास्त भरून येई..''

कमळामावशी अरुणकडे वत्सलतेनें पाहून पुढें म्हणाली- ''दुसरंहि होतं, अरुण! - मला माझी वैवाहिक जबाबदारी कळत होती, तरी, तूं भाईंचा मुलगा या जाणिवेनं समोर दिसलास कीं, माझ्या पूर्वींच्या साऱ्या कल्पना, सारीं सुख स्वप्नं माझ्यापुढं एकदम उभीं रहात. -''

मावशी मध्यें थोडा वेळ मुकाट्यानें अरुणकडे पहात राहिली; व मग पुढें म्हणाली, ''तुझ्यामुळं भाईंच्या, आतां त्यापुढं कायम नष्ट झालेल्या सहवासाच्या स्मृती पुन्हा जागृत होत; आणि मला त्यांतल्या त्यांत समाधान वाटे!-''

अरुण विजेचा धक्का बसल्याप्रमाणें तिच्याकडे सुन्न मनानें पहात राहिला होता-

आणि तुला माझ्याबरोबर माझ्या घरीं घेऊन गेले! - मात्र येतांना हें सारं गुप्त ठेवण्याचं बाबांनीं मला पुन्हां पुन्हां बजावलं होतं!-'' मावशीनें एक मोठा सुस्कारा सोडला व ती तुटक शब्दांत म्हणाली, ''आणि आजपर्यंत, तें माझ्याकडून तरी गुप्तच राहिलं.''...



: ८९२ :

बोलतां बोलतां आवाज जड झाल्यामुळें कमळामावशी थांबली.

अरुणनें तिच्याकडे अश्रूंनीं भरलेल्या दृष्टीनें पाहिलें.

...ज्यांच्या आयुष्यांत तो त्यांच्या दुःखासच कळत न कळत बराचसा कारण झाला होता, ते बाबा त्याचे वडील नव्हते...जिची त्याला अंधुक अंधुक आठवण होती व जिला, या क्षणापर्यंत, तो आपली आई समजत होता, ती त्याची जन्मदात्री नव्हती...ज्या कमळामावशीनें त्याच्या लहानपणी, त्याचें पोटच्या मुलाप्रमाणें कोडकौतुक केलें होतें, ती त्याची खरी मावशी नव्हती!...

या साऱ्या गोष्टी एकदम समजल्यामुळे तो अतिशय गांगरला होता.

तरी म्हणूनच त्याला त्या साऱ्यांविषयीं अगदीं कृतज्ञतेचें भरतेंहि येत होतें! - आपल्याला अचानक भेटलेले प्रेमळ भाई दोन दिवसांपूर्वी भाईकाका ठरले! - आणि आज तर ते आपले प्रत्यक्ष जन्मदातेच असें आपल्याला समजलें; त्यापूर्वीच ते एकदम निघूनहि गेले!-

कां बरें? -

आणि हा माझा मुलगा नव्हे, याची आपल्या आयुष्याच्या सुरवातीसच बाबांना माहिती झाली असूनहि, त्यांच्या साऱ्या आयुष्यांत, त्यांनी निरपेक्ष धडपड केली! एवढेंच नव्हे तर जगांतून निघून जातांनाहि त्यांनीं आपल्याला याची अगदीं दाद लागूं दिली नाहीं!...एवढ्याच बाबतींत ते मुग्ध राहिले! हे तरी कां?...

त्यामुळें तर अरुण आणखी जास्तच गोंधळला! -

: ८९३ :

''अरुण, बाळ'', तो असा एकदम गप्प राहिलेला पाहून, त्याच्या पाठीवरून प्रेमानें हात फिरवीत मावशी म्हणाली. ''बाबांनीं, तुला हें शेवटपर्यंत सांगितलं नाहीं! - आतां तुला यातलं कांहीं कळू नये अशीच भाईंचीहि फार इच्छा होती! - पण तें गौप्य मला मात्र चैन पडूं देईना! - ''

अगदींच मुका झालेल्या अरुणच्या केविलवाण्या चेहऱ्याकडे पहात कमळामावशी किंचित् थांबून पुढें म्हणाली,''जातांना 'त्याला कांहीं सांगूं नको,' असं मला भाईंनीं अगदी बजावून सांगितलं होतं! पण मलाच वाटलं, तुला हें केव्हांतरी समजणं जरूरच होतं! - त्यामुळं तुझ्या आयुष्यांत, तुझ्या भवितव्यांत, आतां तसा कांही फरक पडेल, अशी त्या दोघांसारखी मला तरी भीति वाटत नाहीं!..''

''बाबांच्या प्रेमांत, आपला त्यांचा खरा संबंध समजल्यानंतरहि, फरक पडला नाहीं! भाई आपले प्रत्यक्ष जनक! इतक्या वर्षांनीं, ते आपल्या जवळ येऊनहि आपल्या भावी आयुष्यांतील सौख्याच्या कल्पनेनं, पुन्हा दूर निघून गेले! - आणि कमळामावशीचं तरी आपल्याविषयीचं प्रेम किती निरपेक्ष!''

अरुणला या सर्व भावनांनी आपल्याला हृदयाचा अगदीं कोंडमारा झाल्यासारखें वाटलें !

जागचा उठून त्यानें एकदम मावशीला घट्ट मिठी मारली व आनंद, दुःख, कृतज्ञता,...असल्या साऱ्या उच्च भावनांनीं तुडुंब भरून आलेल्या हृदयानें, स्फुंदून स्फुंदून रडत, मावशीला अडखळत्या शब्दांत म्हणाला, 'मावशी मावशी! खरंच ग, आज मला नीट समजून आलं! माई, बाबा, तूं, भाई...हीं सारीं श्रेष्ठ...उदार मनाचीं ...मोठीं प्रेमळ...उपकारी माणसं!...''

: ८९४ :

कमळामावशीला इकडे येऊन बरेच दिवस झाले होते.

त्यांत पुन्हां, आधींच सारें ठरलें असल्यामुळें, गंधाच्या लग्नाची घाई होती.

भाऊ तर आपल्या पद्धतीप्रमाणें, गेल्या प्रसंगानंतर, दुसऱ्या दिवशींच अचानक आले व कमळामावशीला घाईघाईनें घेऊन गेले.

अरुण तिला स्टेशनपर्यंत पोहोंचवून नुकताच परतला होता. त्याच्या मनांत गेल्या महिना पंचवीस दिवसांच्या धांदलींत घडून आलेल्या साऱ्या घटनांबद्दलच्या विचारांचे एकच काहूर उठलें होतें.

त्याला वाटत होतें, ''त्यांच्या इतर भावांच्या मानानं व एकंदरींतच बाब व भाई किती श्रेष्ठ! माई, कमळामावशी, मंजुळा यांचा त्याग किती अव्वल दर्जाचा! खरोखर हीं सारीं आपलींच माणसं! पण आपल्याला मात्र त्यांची आजपर्यंत पूर्ण ओळख नव्हती. आपल्या मनाच्या एकाकी अनिर्बंध भराऱ्यापुढं, या साऱ्यांच्या मर्यादित पण श्रेष्ठ आयुष्यांची, आपण यथार्थ कल्पना करून घेण्याचा, आजपर्यंत कधींच प्रयत्न केला नव्हता!''

विशेषतः बाबांच्या मृत्यूमुळें तर त्याला फारच दुःख झालें होतें! पण त्यापेक्षां भाई - आपले प्रत्यक्ष वडील - इतक्या वर्षांनीं आपल्याला भेटूनहि पुन्हां एकाएकीं, त्याच्याच सुखाच्या अपेक्षेनें, त्यांच्या नैसर्गिक त्यागी व ध्येयप्रवणवृत्तीप्रमाणें, पुन्हां आपल्यापासून कोठेंतरी दूर दूर अज्ञात आयुष्य घालवण्यासाठीं निघून गेले होते...याचें तर त्याल मधून मधून मनस्वी दुःख होत होतें!

त्यांच्या थोडक्या पण प्रेमळ सहवासांतील, अनेक प्रसंग आठवून, अस्वस्थ चित्तानें तो स्वतःशीच म्हणत होता. ''भाई, भाई, तुम्हीं आज माझ्याजवळ असतां, तर मला या प्रसंगीं खात्रीनें जास्तच धीर वाटला असता. सारं, सारं अगदीं शक्य असतांना, तुम्ही मला कां हो सोडून गेलां पुन्हां?''...

: ८९५ :

या विचारानें त्यानें भाईंनी लिहून ठेविलेलें पत्र बाहेर काढलें व पुन्हां पुन्हां अनेक वेळां वाचलें.

त्यामुळें मात्र त्याला पुन्हां थोडा धीर आला, आणि त्यानें अर्धवट समाधानाचा एक सुस्कारा सोडला.



मिश्र भावनांनीं भरलेल्या मनःस्थितींतहि आपल्या म्हाताऱ्या वडिलांच्या ध्येयप्रवण, महत्त्वाकांक्षी हृदयाचें त्याला कौतुक वाटल्यावांचून राहिलें नाहीं! -

भाईंच्या थोडक्या सहवासांत, त्यांनीं मनापासून त्याला दिलेल्या उत्तेजनामुळें तर, त्याला एक नवाच उत्साह वाटला.

आणि त्यानें किंचित् मिश्र भावनांनीं आपल्याशींच हंसून म्हटलें, - ''होय, भाई, तुम्ही म्हणतां तेंच खरं! मी पुन्हां आतां उद्योगाला लागतो. माझ्यांतील सारे कांहीं गुण एकवटून मीं आतां अशा दोन तीन कलाकृती निर्माण करतो, कीं, त्या तुम्हीं असाल तिथं आनंदानं, अभिमानानं..पहाल - आणि मग माझं कौतुक करण्यासाठीं तरी आपण होऊन माझ्याकडे धांवत याल!''

: ८९६ :

त्याच मनोमय उत्साहांत तो पटकन उठला; त्यानें आपल्या आतांपर्यंतच्या साऱ्या कलाकृती आपल्यापुढें ठेविल्या. आणि त्यांच्याकडे स्वतःच अभिमानी कौतुकानें दृष्टि टाकून, तो विचार करूं लागला-

आपण उचलून घेतलेला मंजुळेचा लहानगा सुहास, आपल्या अगदीं लहानपणापासूनच कमळामावशीची आपल्याकडे पहाण्याची निरपेक्ष दृष्टि, माईंच्या वत्सल हृदयाची आपल्या बाल्यामध्यें आपल्यासाठीं झालेली त्यागी धडपड... मिरेचा भाबडा प्रेमा, जाईचा स्नेहशीलपणा - मंजुळेची उदात्तता - असल्या साऱ्या गोष्टी, त्याच्यासमोर एकवटून उभ्या राहिल्या.

आणि त्याला अगदीं आत्मविश्वासपूर्णपणें वाटलें, या साऱ्या श्रेष्ठ भावनांतूनच - त्यांच्या विविध अगम्य रंगांतून... आपल्याला एक सर्वोत्कृष्ट कलाकृति, सध्यांच्या आपल्या हळुवार मनःस्थितींत हलक्या हातानें निर्माण करतां येईल! -

आणि त्या नावीन्यपूर्ण कल्पनेनें आनंदून, गंभीर उत्साहानें त्यानें इकडे तिकडे पाहिलें तेव्हां, जणुं काय, त्याला एका बाजूनें त्रिनिदादसाहेब व दुसऱ्या बाजूनें कालच निघून गेलेले भाई, त्याच्याकडे कौतुकानें पहात असतांना दिसले; ते जणूं काय त्याला त्या वेळीं प्रेमानें म्हणत होते, ''होय, अरुण, लाग पाहूं आतां उद्योगाला!''

आणि त्यामुळें, त्यावरूनच, त्याला एकदम जाईची आठवण झाली! - हो, मातेचा सौजन्यपूर्ण, प्रेमळ, वत्सल, चेहरा व हृदयांतील हळुवार भावप्रतीत करणारे बोलके डोळे जाईकडेच आहेत. आणि ती आपल्याला अशा श्रेष्ठ चित्रकलेंत मनापासून मदत केल्यावांचून रहाणार नाहीं! -

इतके दिवस, इतर गोष्टींमुळें दडपून गेलेल्या त्याच्या अंतःकरणांत, थोडा वेळ बाजूस राहिलेल्या जाईच्या भेटीची इच्छा, अतिशय तीव्र झाली! आणि अत्यंत उत्कंठित अंतःकरणानें, आपल्या पूर्वीच्या

कलाकृतींचा पसारा झटपट नीट आवरून ठेवून व घरांत काकूला घाईघाईनें कळवून, जाईला भेटण्यासाठी तिच्या सांगण्याप्रमाणें जाधवबाबांकडे जाण्याकरिता तो घराबाहेर पडला!-

: ८९७ :

अरुण गेला तेव्हां जाधवबाबा घरींच होते.

प्रथम क्षणभर त्यांनीं त्याला ओळखलेंच नाहीं!-

पण मग कितीतरी वेळ, मोठ्या प्रेमानें ते एकमेकांशी गप्पा मारीत बसले होते. अरुणनेंहि, जाधवबाबांना मधली सगळी हकीकत सविस्तरपणें सांगितली-

गोपाच्या आईनें, शेवटीं जेवावयास आंत बोलवतांच, दोघेहि बोलत बोलतच बसल्या जागेवरून उठले.

जवळ जवळ तास दीड तास झाला तरी गोपा किंवा जाई कोणीच पुढें आले नव्हतें!- याचें मात्र अरुणला राहून राहून आश्चर्य वाटत होतें.

पण मग, तीं दोघें फिरावयास गेली असतील, अशी अरुणनें स्वतःच्या मनाची समजूत करून घेतली होती. आणि पुन्हां, 'जाई कुठं आहे?' असा सरळ प्रश्न, म्हाताऱ्या जाधवबाबांना एकदम विचारण्याचें अनेकदां मनांत येऊनहि, तो तसें करावयास लाजत होता!

: ८९८ :

आता जेवावयाची वेळ झाली, पण जाई दिसेना !- हें असें कां? त्याला कांहीं समजेना.

हातपाय पुसून, टॉवेल आंतल्या दारावर टाकीत, जाधवबाबांबरोबर तो आंतल्या खोलींत शिरल्यावर, प्रथम आपली चौकस नजर, त्यानें सगळीकडे फिरवली!...

त्यांच्या शेजारीं फक्त एकच पाट मांडलेला पाहून बसतां बसतां, त्यानें बाबांना आडून आडूनच प्रश्न केला, ''गोपा कुठं दिसत नाहीं तो, बाबा?''

''तो जाईबरोबर तिच्या मैत्रिणीकडे गेला आहे!-'' जाधवबाबा जेवावयास सुरवात करून म्हणाले. ''सुटी होती नाताळची! आणि त्याचीहि इच्छा होती तिच्याबरोबर जाण्याची!- तेव्हां म्हटलं, जा..कालच मोडक्या तोडक्या इंग्रजींत त्याचं पत्र आलं आहे मला पोचल्याचं!...मजेंत आहे म्हणे- जाईनंहि खाली लिहिलं आहे पत्रांत!-''

अरुण वरवर मुकाट्यानें जेवत होता. पण त्याच्या मनांत खूप विचार चालले होते. ''कोणती बरं मैत्रीण ही जाईची ? मिरा पाटील? म्हणजे आपलीच मिरा का? जाई त्या दिवशीं आपल्याकडे त्या बाबतींत कांहींच बोलली नव्हती. जाधवबाबांना कदाचित् यांतलं माहीत असेल!''

अशा मनांतील कल्पनांनी, त्यानें शेवटीं जाधवबाबांकडे पाहून पुन्हा सूचक प्रश्न केला, ''कोणत्या



गांवीं गेलीं आहेत तीं?''

''कोल्हापूरच्या जवळ कुठंतरी आहे वाटतं तें. मला नक्की माहीत नाही-'' जाधवबाबा पानांतील भाकरी संपवीत पुढें म्हणाले, ''तिनं कांहीं आपण होऊन सांगितलं नाहीं! एकदां विचारलं, तेव्हां ती म्हणाली, 'आल्यावर सारं सांगेन मी तुम्हाला, बाबा!' मग मींहि जास्त कांहीं विचारपूस केली नाहीं त्यावर!- तिला कांहींतरी थोडा वेळ लपवायचं असेल माझ्यापासून!...आपण तरी कशाला गळ घाला तिला? त्यांना तेवढं तरी स्वातंत्र्य पाहिजेच, नको का? सांगेल तीच आपण होऊन केव्हांतरी.''

''जातांना ती म्हणाली,-'' गोपाची आई वाढतां वाढतां अरुणकडे पाहून म्हणाली, 'अरुण आले तर त्यांना सांग, मीं सात आठ दिवसांत परत येईन,' ती गेल्याला पांच दिवस झाले, नाहीं?-

'हो' आपल्या बायकोच्या प्रश्नार्थक दृष्टीला जाधवबाबांनी उत्तर दिलें.

दोघेहि जेवून उठतां उठता, जाधवबाबा अरुणला म्हणाले, ''तिलाहि तुमच्याकडली अजून कांहीं माहिती नाहीं वाटतं?...''

''नाहीं!..'' हात धुऊन वर येत अरुण म्हणाला ''तिला माझा घरचा पत्ता ठाऊक नाहीं!.. आणि मलाहि तिनं आपला हा बेत व पत्ता सांगितला नव्हता.''

: ८९९ :

''मला तरी कुठं तिचा पत्ता माहीत आहे?'' जाधवबाबा ओटीवर येऊन खुर्चीवर बसत बसत म्हणाले.

अपेक्षेप्रमाणें जाई घरी भेटली नाहीं, म्हणून अरुण मनांत थोडा रंजीस झाला होता.

'आतां आपण जावं कीं काय?' असा तो विचार करीत आहे, इतक्यांत जाधवबाबा त्याला म्हणाले, ''अरुण, तुम्ही त्या दिवशीं जाईबद्दल फार आपुलकी दाखिवलीत त्यामुळं ती प्रेमळ पोरगीहि फारच आनंदित झालेली दिसत आहे तेव्हांपासून!- योग्य केलंत अगदीं...माणसानं आपली किंमत, आपला स्वाभिमान - साफ विसरून चालत नाहीं जगांत!- ''

अरुण कांहींच बोलला नाहीं.

त्याच्याकडे पाहून जाधवबाबा पुढें म्हणाले, ''आतां पुढं काय करायचं ठरवलंय् तुम्ही?''

त्या प्रश्नांत व त्यांच्या शोधक दृष्टींत, अरुणला पुष्कळ खोल अर्थ भरलेला दिसत होता.

पण अरुणनें जणुं साहजिक अशा तऱ्हेनें त्यांना उलट विचारलें, ''जाई काय करणार आहे? - माझं तर अजून तसं काहींच ठरलं नाहीं!'' -

''कुणाला ठाऊक? ती एवढंच म्हणाली कीं, 'माझ्या मैत्रिणीकडून जाऊन आल्यावर, अरुण भेटले म्हणजे मग काय ते ठरवीन!'' जाधवबाबांनी आपली सूचक दृष्टि अरुणकडे वळविली.

जाईच्या त्या शब्दांतील अर्थ अरुणला कांहीं स्पष्ट होत नव्हता. पण जाधवबाबा, ज्या दृष्टीनें त्याच्याकडे पहात होते, तींत मात्र त्याला एखादा प्रश्न विचारावासें वाटत असूनसुद्धां तो आंतल्याआंत ते दडपीत आहेत, असा भाव त्याला दिसत होता-

त्यानें पटकन् त्यांच्याकडील आपली दृष्टि दुसरीकडे वळवली व तो निमूट राहिला.

: ९०० :

जाधवबाबा मधूनच कितीतरी वेळ अरुणच्या गंभीर चेहऱ्याकडे टक लावून पहात होते.

शेवटी ते त्याला हंसून म्हणाले, ''अरुण, जाई काय, तुम्ही काय, आपापल्या भवितव्याला काय वळण लावणार आहां, याविषयीं आम्हाला उगीचच उत्सुकता वाटते! - तरी पण काळजी मात्र वाटत नाहीं! तुमचं तुम्ही एवढ्या अनुभवानंतर योग्य तेंच ठरवाल!-''

आणि थोडा वेळ, त्याच्याकडे अगदीं एकाग्र दृष्टीनें पाहून, ते पुढें म्हणाले,

''पण कांहीं म्हणा, अरुण!...एकंदरींत तुमच्या दाढीबरोबरच, तुमची ती पूर्वींची मनःस्थिति गेली, एवढं खास. खरं ना?''

जाधवबाबा सौम्यपणें हंसले त्या वेळीं अरुणनेंहि त्यांच्याकडे पाहून स्मित केलें.

: ९०१ :

थोड्या वेळानंतर, 'मला परत घरी गेलं पाहिजे' असें सांगून, अरुणनें त्या दोघां नवराबायकोचा निरोप घेतला व तो त्यांच्याकडून निघाला.

जातांना, जाई दोन तीन दिवसांत आली तर तिला माटुंग्यास पाठवून देण्याबद्दल त्यानें जाधवबाबांना सांगितलें होतें.

अरुण बाहेर पडल्यावर चालतां चालतां त्याच्या डोक्यांत दोघांविषयींचे विचार प्रामुख्यानें येत होते.

''मिरा पाटील इतके दिवस होती तरी कुठं? आतां ती करीत आहे काय? आणि तिचा आणि जाईचा स्नेह कुठं जमला असेल?''

आणि मग त्याला पुन्हां वाटलें, ''मिरेची इतक्या दिवसानंतर भेट झाली तर ती कोणत्या स्वरूपांत आपल्याला दिसेल? तिच्या आपल्याविषयींच्या भावना आतां कोणत्या प्रकारच्या असतील? जाईनं तिला आपल्याविषयीं कांहीं सांगितलं असेल काय? काय काय सांगितलं असेल?''

त्याचवेळीं त्याला आठवलें, ''जाईनं आपल्याला त्या दिवशीं, मिरेविषयीं सांगतांना, 'तुमची बालमैत्रीण!' असं कांहींसं म्हटलं होतं- म्हणजे तिला अर्थातूच, तिच्याबरोबरचा आपला संबंध ठाऊक होता - पण मग तिनं आपल्याला मिरेचा पत्ता वगैरे देण्याचं कां टाळलं? मिरेनंच तसं तिला सांगितलं



असेल का? आणि सांगितलं असलं तर मिरेचा त्यांत काय हेतू असावा?''

पण मग, ती विचारमालिका तशीच बाजूला सारून, तो आपल्या मनाला प्रश्न विचारूं लागला, ''समजा, मिरा आपल्याला पुन्हां भेटली व तिच्या आपल्याविषयींच्या भावना तशाच कायम असल्या - तर?'' -

त्याला त्या प्रश्नाचें मात्र उत्तर पटकन् देतां येईना!

एवढें मात्र त्याचें मन त्याला खास सांगत होतें, कीं तिच्याविषयींच्या त्याच्या मनांतील स्नेह तितकाच कायम होता. आणि तिच्या सुखासाठीं तो पूर्वीइतकाच उत्कटतेनें यापुढेंहि झटला असता--

आणि जाई ?

तिचें पूर्व आयुष्य तर त्याला मुळींच ठाऊक नव्हतें! तरी त्या प्रेमळ, स्नेहशील, खेळकर वृत्तीच्या मुलीबद्दल त्याला त्या वेळी तरी, जास्तीत जास्त आपुलकी वाटत होती.

तिनें आपल्या गोड स्वाभावामुळेंच एका महिन्यापूर्वी, अकस्मात् त्याच्या आयुष्याला, एक नवीन वळण लावलें होतें. त्या प्रसंगाची आणि त्यानंतरच्या अनेक घटनांची, आठवण व जाणीव होऊन, जाईविषयींच्या उत्कट स्नेहानें व कृतज्ञतेनें अरुणचें हृदय अगदीं आकंठ भरून आलें.

: ९०२ :

चालतां चालतां तो वरळी बीचपर्यंत येऊन पोहोचला होता. तेथें आल्याची जाणीव होतांच त्याला एकदम दुसऱ्या जुन्या आठवणी झाल्या.

ज्या ठिकाणीं, तो चणेकुरमुरे खात बसला असतांना, त्याला रवीन्द्र चतर्जी प्रथम भेटला होता, त्या खडकाजवळ पोहोंचेपर्यंत, त्याचे लक्ष इकडे तिकडे कोठेंच नव्हतें! जेथें त्या दोघांनीं, आपापल्या सुखदुःखाच्या गोष्टी बोलत, खिन्न मनानें चण्याचे फांके मारले होते, तेथेंच क्षणभर बसून, समोरच्या दगडांकडे व त्यावर आतांहि तशाच अव्याहत आपटत असलेल्या फेसाळणाऱ्या लाटांकडे दृष्टिक्षेप टाकल्यावर मात्र त्याच्या मनाला थोडेसें समाधान झालें!

आणि मग, सहज म्हणून त्यानें चौफेर दृष्टि फिरवली, तों त्याला आश्चर्य वाटलें!-

विचार करीत करीत, अगदीं पूर्ण गजबजलेल्या रस्त्यांतूनच तो येथपर्यंत येऊन पोहोंचला होता!...

पण आज येथें एवढा गोंधळ कसला?-

तो उठून उभा राहिला. वाहनांची लांबच लांब रांग लागली होती; स्त्रीपुरुषांचे मोठमोठे घोळके रस्त्यांतून इकडे तिकडे धांवत होते; मधून मधून पोलीस व सार्जंट शिट्या वाजवीत रस्त्यांतील वर्दळीला वळण लावीत होते; - आणि जिकडे तिकडे, जणूं काय, दिवाळीचीच बिजली - रोषणाई दिसत होती !-

: ९०३ :

हा नवा अपूर्व देखावा पाहून, त्याला अतिशय आश्चर्य वाटलें. त्यानें रस्त्यापलीकडील प्रदेशाकडे दृष्टि रोखून पाहिलें, तों त्याला ती पूर्वी अगदीं ओसाड पडलेली जागा आज विजेच्या दिव्यांनीं झगझगीत झालेली दिसत होती. लांबच लांबपर्यंत, जाहिरातीच्या लहान मोठ्या पाट्या दिव्यांनी तळपत होत्या व त्यांच्या आंत, जणु काय, नवी वसाहतच झाली आहे, असें त्याला तेथील देखाव्यावरून वाटत होतें!

आंत बाहेर जमलेल्या गर्दीचा कोलाहल त्याच्या कानावर आदळला आणि त्यानें तिकडे टक लावून निरखून पाहिलें, तों त्याला लहानमोठ्या दिव्यांच्या माळांनी शोभणाऱ्या कमानी व मध्येंच ताडापेक्षांहि उंच गेलेल्या खांबावर दृष्टि दिपवणाऱ्या विजेच्या झगझगीत प्रकाशांत तिरंगी निशाण फडफडतांना दिसले!...

त्याच्या अंगावर क्षणभरच शहारे उभे राहिले! ज्या निशाणासाठीं त्यानें मागें अत्यंत मनोभावानें त्याग करण्याचा प्रयत्न केला होता, - निमूटपणें लाठीमार खाल्ला होता, -तुरुंगवास भोगला होता.. तेंच त्याच्या देशाचें निशाण, तसें समोर फडफडतांना पाहून त्याचें हृदय क्षणभरच आदरानें भरून आलें!-

अलीकडे कित्येक दिवस त्यानें वर्तमानपत्र उघडूनहि पाहिलें नव्हतें; तरी, बरेच दिवस गाजत असलेलें, ते काँग्रेसचे मुंबई अधिवेशन आहे, हें समजण्यास त्याला फारसा वेळ लागला नाहीं! -

तो धक्का चढून वर आला व रस्त्यावरील गर्दीत मिसळला !-

आणि सारी गर्दी, त्या वेळीं, गोंधळ, गडबड करीत, काँग्रेसच्या आवाराच्या मुख्य दरवाजाकडे लोटत होती!...

: ९०४ :

दरिद्री नारायणाच्या हातांतील, दरिद्री हिंदुस्थानच्या, दरिद्री काँग्रेसची ती त्याच्यासमोरच दिसत असलेली उधळी, श्रीमंती, दिवाळी! अरुणच्या मनाला ती अगदीं शल्याप्रमाणें बोंचत होती! राजव्यवस्थेंतील उधळपट्टी, सरकारी अंमलदाराचे लठ्ठ तनखे वगैरे दाखवितांना, गांधीसारख्या महात्माला, आमचें सरासरी सात पेन्सचें दैनिक उत्पन्न दिसावें; आणि आमच्या या स्वतःच्या उधळपट्टीच्या धुंद रोषणाईच्या वेळीं मात्र, त्यांच्यासारख्यांचें दुर्लक्ष व्हावें, ही कल्पना अरुणच्या मनाला सहनच होईना!-

हे हजारों रुपये, त्याच्या डोळ्यादेखत देखत, जनतेच्या हिताच्या दृष्टीनें पाहिल्यास, धुळीस मिळत होते. सर्व व्यवस्था करणाऱ्या गबर कॉन्ट्रॅक्टरांच्या वैयक्तिक दृष्टीनें तर हा सरळ सरळ खिशाला ऊब आणणारा व्यापारधंदा होता!



या सर्व गोष्टींची जाणीव होऊन त्यानें एक दीर्घ निःश्वास टाकला.

पोट भरण्यासाठीं धंदा मांडून बसलेल्या भेळवाल्याच्या दुकानापासून, तों मोठमोठ्या कंपन्यांच्या स्टॉलपर्यंत साऱ्याच ठिकाणीं, अशाच दृष्टीनें नजर फिरवीत फिरवीत, अरुण, अधिवेशनाच्या सभामंडपाकडे हळूहळू पावलें टाकीत चालला होता.

: ९०५ :

गंमत पहावयास आलेल्या लोकांची ती गर्दी त्याच्या जीवाचा अगदीं कोंडमारा करीत होती!

अधिवेशनाचा तो दुसरा दिवस होता...स्वयंसेवकांचे थवेच्या थवे इकडे तिकडे फिरत होते, अगर मंडपाच्या दारांत सांखळी करून उभे राहिले होते.

त्यानें नुकतेंच आपल्या खिशांतील पैसे खर्चून विकत घेतलेलें तिकिट दाखविलें व तो आंत शिरला.

आंत शिरल्यावर त्यानें सहज चौफेर नजर फिरविली. देशप्रेमाच्या उमाळ्यानें नव्हे तर कदाचित् एका तिकिटावर चार चार लोक आंत शिरल्यामुळेंच एवढी गर्दी झाली असावी, असा कुत्सित विचार त्याच्या डोक्यांत आल्यावांचून राहिला नाहीं.

असल्या दांभिक सोहाळ्यासाठीं, जीवाची यातायात करून, क्षुद्र स्वार्थासाठीं व मोठेपणासाठीं चाललेली ती सामुदायिक लबाडी पाहून त्याला वाईट वाटलें.

आणि म्हणून आपल्या हातांतील तिकिटाकडे पाहून तो खिन्नपणें हंसला.

महात्मा गांधी काँग्रेस सोडून चालले, अशी दाट वदंता त्यानें यापूर्वीच ऐकली होती. ''सविनय कायदेभंगाचा उपयोग राष्ट्रीय शस्त्राप्रमाणें करायचा आतां थांबवा!'' सत्याग्रहाचा निर्माता व विधाता या दृष्टीनेंच महात्मा गांधीनीं हें मत दिलें होतें. आणि तसें सांगतांना भोंदूपणाची दांभिक टाळाटाळी, सारी नाहीं, तरी थोडीफार तरी, त्यांनीं बाहेर आणली होती - असें अरुणनें आतांपर्यंत ऐकिलें होते.

त्याला व्यक्तिशः महात्मा गांधीबद्दल जरी थोडासा आदर होता, तरी प्रत्यक्ष समोर पसरलेला, विस्तृत असा दंभाचा उगीच खवळणारा समुद्र त्याला त्या वेळींहि दिसत होता! - उथळ देशभक्तीच्या पाण्याचा तो खळखळाट, त्याला अगदी सहन होईना!...आणि म्हणून, थोड्याच वेळांत, तो एक दीर्घ खिन्नतेचा निःश्वास टाकून, निराश अंतःकरणानें पेंडालमधून बाहेर पडला.

: ९०६ :

बाहेर आल्यावर, समोरच त्याला राष्ट्रीय निशाण दिसलें! - तें पाहून मात्र त्याचें हृदय भरून आलें! तो झपझप पावलें टाकीत, अगदीं त्याच्याजवळ गेला! -

पायऱ्या पायऱ्यांचा एक मोठा धक्का केला होता; मध्यभागी एक उंचच उंच चढत आकाशांत गेलेला खांब होता; - आणि त्यावर तें निशाण वाऱ्यांत भराऱ्या मारीत होतें -

खालपासून वरपर्यंत त्या खांबावरून चढत चढत, त्याच्या दृष्टीनें तें निशाण गांठलें! किंचित्काळ ती तेथेंच स्थिर झाली.

आपल्या आयुष्यांतील ते जुने प्रसंग? ते त्याच निशाणभोंवतालचे होते! त्याच निशाणाविषयीचें त्याचें पूर्वीचें प्रेम व त्यासाठीं केलेला त्याग,..सारं झटकन् त्याला आठवलें. त्याचें हृदय क्षणभर त्याच भावनांनीं कोंदाटलें! -

आणि तसल्या विचारी पण भावनेनें खवळलेल्या मनःस्थितींत स्वसमाधानासाठींच त्या खालच्या धक्क्याजवळ जाऊन तो त्यावर बसला! -

सभामंडपांत जसा एक प्रकारचा शुष्क बकवा चालला होता, तसाच त्याच्या भोवतींहि स्वतःच्या सुखदुःखांतच रममाण होऊन, त्यासाठीं होत असलेला मानवी कोलाहल चालला होता.

मुलें आडदांडपणे खेळत होतीं! - कोणी गुजराथी मंडळी समोरच्या भेळीचा फन्ना उडवीत होतीं. जवळून जाणाऱ्या एकाद्या जोडप्याचा आपापसांत कुजबुजल्याचा मंद स्वर, भोवतालच्या गोंगाटांत गडप होत होता. आंत जावयास लागणाऱ्या तिकिटांचे पैसे खिशांत नसल्यामुळें, एखादा कामकरी बाहेरच्या बाहेरच 'हें काय गौडबंगाल' अशा स्तिमित, धाबऱ्या दृष्टीनें भोंवतालची ती दिवाळी अचंब्यानें तोंडांत बोटें घालीत...इकडे तिकडे फिरकत, पहात होता.

: ९०७ :

तेथें बसून अरुण इकडे तिकडे अशी नजर फिरवीत होता, इतक्यांत दोघे स्वयंसेवक त्याच्याजवळ आले; व त्या त्याच्या डोक्यावरील निशाणाकडे बोट दाखवून, तेथें बसावयास परवानगी नाहीं, असें सांगत, त्यांनीं त्या धक्क्यावरून त्याला उठावयाची विनंती केली -

एकदां त्यांच्याकडे व त्या निशाणाकडे चमत्कारिकपणें पाहून अरुणनें खालीं उडी मारली. -

आणि हळुहळु पुढें पावलें टाकीत व मागें वळून पहात, तो स्वतःशीं उपहासानें खिन्न हसून म्हणाला, ''बाबांनों, एका उंच लाकडी खांबाला व पाच-सहा हाताच्या रेशमी कापडाला तुम्ही असे सांभाळीत अहां! - सांभाळा बापडे. पण त्यामागं देशाच्या सामुदायिक कल्याणाची, त्याविषयींच्या स्वार्थत्यागाची व्यापक कल्पनाच दडलेली आहे, असं मला वाटतं! तसं माझ्या आयुष्यांत मला पूर्वी एकदां फारच उत्कटतेनं वाटल्यामुळं, मीं माझं सर्वस्व सोडून, त्यागहि केला होता! - त्याची तुम्हाला जाणीव नसेल! - मी तिथं बसलो; तेव्हां मला तुम्हीं त्याखालून उठविलंत - तुमच्या हुकमाबरहुकूम मी उठून आतां चालूंहि लागलो आहे! मला तुमचा मुळींच राग नाहीं! तुम्हीं बापडे केवळ दांभिक गैरशिस्तीचे ताबेदार! पण तुमचे लहानमोठे कोण असतील ते पुढारी; त्यांचीच मला या क्षणीं कींव वाटत आहे! तेच कशाला? अनेक पुढारी या क्षणीं माझ्या डोळ्यासमोर आहेत. मी कांहीं स्वतः



त्यांच्यासारखा पुढारी नाहीं! साधा सैनिक म्हणूनच मी धडपडलों! जिवाचे शक्य ते हाल व त्याग सहन केले! मला तुमच्या गांधींचे सत्याचे आध्यात्मिक प्रयोग व त्यासंबंधीं होणारे दैवी आग्रह समजत नाहीत. ''स्वराज्याचा एकच मार्ग तो व त्यासाठीं शेवटपर्यंत लढायचा लढा हाच!'' असं ते त्या वेळी म्हणाले आणि, तें त्या वेळीं तरी मला पटत होतं! - म्हणूनच आमच्यासारख्या सैनिकांची ती धडपड होती. आज त्यांचं त्या बाबतीत वैयक्तिक असं कोणतंहि समर्थन असलं तरी आम्हांलासुद्धा व्यक्तिशः जीवनकलहासाठीं चाललेल्या या भोंवतालच्या कोलाहलांतच पावलं टाकायचीं आहेत! आणि त्या वेळीं मात्र आम्ही अनाथ ठरतों; आमची पूर्वीची मनापासूनची धडपड आतां अगदी मूर्खपणाची वाटते...ठरते - पण आमच्या त्या त्यागापूर्वी, व त्यानंतर अजूनहि मान - सन्मान - कीर्ति मिळविणारे हे मधले दांभिक पुढारी, दिखाऊ व टाळाटाळीचे त्याग करूनदेखील, तितकेच श्रेष्ठ ठरत आहेत! आमचा देश तर आहे तितकाच अर्धपोटी व दरिद्री आहे...पण तरीहि आमच्यावर लादलेला आमच्याच लोकांचा हा दांभिक डोलारा...ही उधळपट्टी करणारी रोषणाई...हा बेजबाबदारपणा...सारं आमच्या इच्छेविरुद्ध हतबलपणें आम्हाला सहन करावं लागतं! - आणि तो जोंपर्यंत तसाच चालू आहे, तोपर्यंत हेहि असंच चालणार!! सर्व जगालाच जिथं वणवा लागला आहे तिथं त्याची झळ आमच्या देशालाहि लागायचीच! - तो विझवायला समतेचा - परिस्थितीच्या पूर्ण आकलनाचा.. सहानुभूतीचा, कळकळीचा अटोकाट प्रयत्नच एकटा समर्थ आहे.. ती सामुदायिक हितांची दृष्टि प्रथम पाहिजे! - असला शाब्दिक, दंभ भरलेला बकवा काय कामाचा? - ''

: ९०८ :

असलेच विचार करीत, अरुण काँग्रेसनगराच्या आवारांतून बाहेर येत होता! -

चालतां चालतां, या दृष्टीच्या विचारमालिकेमुळेंच, त्याला तुरुंगांत वर्ष दीड वर्ष त्याच्या सहवासाला असलेला रमणिकभाई, पटकन् आठवला! -

तुरुंगांतून सुटल्यानंतर त्या दोघांची आजपर्यंत भेट नव्हती -

'खरंच, तो उमद्या मनाचा त्यागी तरुण आज करीत तरी काय असेल?...

मधल्या काळांत त्याच्या हालचाली काय झाल्या असतील', अरुणच्या मनात हे नवेंच विचार-चक्र सुरू झालें!

- आणि शेवटीं...रमणिकचा पत्ता त्याला माहीत नव्हता, तरी त्याला भेटावयाची त्याच्या मनांत अगदी उत्कट इच्छा जागृत झाली!

: ९०९ :

गर्दीमुळे रस्ता पूर्वीप्रमाणेंच फुलला होता. दिसत नाहीं इतकी, लांबपर्यंत व पुढेंमागें, वाहनांची

लांबण लागली होती. तरी 'काँग्रेसनगरच्या' पाट्या लावलेल्या अनेक मोठमोंठ्या तांबड्या बसिस, स्त्री-पुरुष-मुलांनीं अगदीं फुलून...भरून येत होत्या! - त्यांतून उतरणारी व इतर गर्दी, अजूनहि काँग्रेसच्या आवाराकडेच सारखी लोटत होती.

- परत फिरणाऱ्या मोटारींच्या रांगेजवळून, या दांभिक सोवळ्याविषयीं व तत्त्वनिष्ठ रमणिकभाईविषयीं मनांत तसा विचार करीत, अरुण मंद पावलें टाकीत चालला होता! -

इतक्यांत, पुढें गर्दी बरीच वाढल्यामुळें तो जागच्या जागी थांबला...चालणें नाइलाजानें थांबल्यामुळें, त्यानें सहज मोटारींच्या रांगेकडे खिन्न पण चौकस दृष्टीनें पाहिलें!...

तेवढ्यांतच एका मोटारीकडून दुसरीकडे अरुण दृष्टि फिरवतो - तों किती आश्चर्यानें तो दचकला!-

त्या मोटारींत एक जोडपें बसलें होतें;..आणि त्या दोघांपैकी, ती मध्यम वयाची स्त्री, अगदी,...हुबेहुब रमणिकभाईच्याच चेहऱ्याची दिसत होती!

गर्दी पुढें लोटून गेली तरी अरुण आश्चर्यचकित दृष्टीनें त्या स्त्रीकडे पहात त्या मोटारीजवळच थबकून उभा राहिला! -

: ९१० :

प्रथम त्याला वाटलें, आपल्या डोक्यांत रमणिकभाईविषयीं विचार चालले आहेत, म्हणून आपल्याला तसा भास झाला! -

पण पुन्हां थोडा वेळ त्यानें तिकडे निरखून पाहिल्यावरहि त्याचें आश्चर्य कांहीं केल्या ओसरेना! - म्हणून तो तसाच त्या मोटारीजवळ थांबून, विचार करूं लागला -

ज्या रमणिकभाईची भेट घेण्याची, आपल्याला आत्तां या क्षणीं उत्कट इच्छा आहे, आणि ज्या आपल्याला त्या क्षणीं तरी मुळींच पत्ता नाहीं, त्याची ही बाई कोणीतरी नातलग खास असेल, अशी याची मनोदेवता त्याला पुन्हा पुन्हा ओरडून सांगू लागली -

एकदां त्याला वाटलें, ही अकल्पित आलेली संधि आपण अशी दवडूं नये. कदाचित् तिला ठाऊक असलें, तर आपली व रमणिकची लागलीच भेटहि होऊं शकेल - म्हणूनच काय करावें हें न समजून गोंधळलेल्या चेहऱ्यानें तिच्याकडे व तिच्याजवळच्या त्या गृहस्थाकडे पहात, अरुण जागच्याजागी थबकून राहिला. -

पण मन त्याला पुन्हा वाटलें, 'आपण पटकन् पुढे होऊन, तिच्याजवळ रमणिकविषयीं चौकशी केली, आणि कदाचित् तो तिचा कोणीच नातलग नसला, तर ती व तो गृहस्थ आपल्याला काय म्हणतील?'

त्यामुळे तर तो अधिकच गोंधळला!



इतक्यांत, त्याच्याजवळची ती मोटार रांगेमधून हळूहळू पुढे चालूं लागली. त्याच्या मनांत हुरहूर उत्पन्न करणारा विचार आला, 'रमणिकच्या भेटीची अनायासे आलेली ही संधि, आपण आपल्या हातानं गमावित आहों!' -

: ९११ :

क्षणभरच तो गांगरल्या चेहऱ्यानें त्या मोटारीबरोबर हळूहळू पावलें टाकीत चालला. आणि मग एकदम त्यानें ठरवलें, ''कांहीं हरकत नाहीं! चुकेल कदाचित्; पण आपण यांच्याकडे रमणिकची चौकशी करायचीच!''...

आणि तो दुसऱ्याच क्षणीं, त्या हळुहळू चालणाऱ्या मोटारीजवळ गेला -

त्याचा हात एकदम आपल्या मोटारीवर पडलेला पाहून, आंतील तीं स्त्री-पुरुष दोघेंहि, किंचित् दचकलीं; आणि त्याच्या मुग्ध, सौम्य चेहऱ्याकडे, आश्चर्यानें पाहूं लागलीं! -

पण आतां काय बोलावें, हे न समजल्यामुळें, अरुण तसाच गोंधळलेल्या चेहऱ्यानें मोटारीबरोबर चालत होता.

तोंच, त्याच्याकडे आश्चर्यानें पाहून, तो गुजराथी गृहस्थ मंद हास्य करीत गुजराथींत म्हणाला, 'सूं छे भाई? तमारुं कोई काम छे के?'

त्यामुळें तर अरुण जास्तच बावरला; त्याला काय व कसें विचारावें हें समजेना. शेवटी मोडक्या तोडक्या गुजराथींत तो त्याला म्हणाला, ''तमे रमणिकलालनु जाणूं छुं?''

त्याचें तें मोडकें वाक्य व त्याचा अर्थ दोन्ही समजून, तो गुजराथी गृहस्थ हंसून मराठींत म्हणाला, ''तुम्हांला कोण पायजे? रमणिकलाल कोन म्हनता तुम्ही?'' -

ती गुजराथी बाईहि अरुणकडे पाहून हसत होती.

अरुण दोघांकडे पाहून किंचित् लाजून पुढें म्हणाला, ''तुम्हांला रमणिकलाल ठाऊक आहे का?...यांचा चेहरा हुबेहूब त्याच्या सारखा दिसतो! जणूं काय भाऊ बहीणच? - तो माझा तुरुंगांतील स्नेही म्हणून विचारतो हं! माफ करा, चुकलो असेन तर!''

दोघेहि अरुणकडे आश्चर्यानें पाहून हंसली व ती स्त्री त्याला मराठींतच म्हणाली, ''हां हां! रमणिक माझा भाईच! तुम्हीं बरोबर ओळखलं!''

आणि तो गृहस्थ अरुणकडे पाहून पुढें म्हणाला, ''तो लय आजारी होता मदी, आतां बरं हाय! इस्पिताळमधून बेचार दाडामागें तो आमचेकडे आला! त्याची बायको, तो समदे...आमच्याकडंच हाय आज!'' -

: ९१२ :

अरुणला ही बातमी ऐकून केवढा आनंद झाला! विशेषत: रमणिकच्या बहिणीकडे पाहून तो स्मित करून म्हणाला, ''तुमचा पत्ता सांगतां का मला? मला त्याला लागलीच शक्य तितक्या लौकर भेटायचं आहे...''

रमणिकच्या बहिणीनें जवळ बसलेल्या आपल्या नवऱ्याकडे क्षणभर पाहिलें व मोटारचा दरवाजा स्वत:च उघडीत ती अरुणला म्हणाली, ''त्येला भेटाचं हाय? मग आमच्या संगत येतां तो चला! दुसरा काय काम नाय ना तुम्हाला?'' -

त्या दोघांच्या त्या अनपेक्षित सौजन्यामुळे तर अरुण अधिकच गोंधळला.

पण मग त्याला वाटलें, - 'आपल्याला आतां तसं विशेष कुठं जायचंहि नाहीं; पत्ता शोधीत मागून जाण्यापेक्षां, आतांच त्यांच्याबरोबर गेलं तर?' -

आणि लागलीच तसा बेत करून, मोटारच्या पायरीवर चढत, अरुण त्या दोघांकडे वळून हंसत म्हणाला, ''बरें तरऽ! चला रमणिकभाई भटकडे!''

: ९१३ :

रमणिकची बहीण व तिचा नवरा यांच्याबरोबर, त्यांच्या मोटारींतून, अरुण, त्या रात्रीच्या शांत वातावरणांत चौपाटीच्या रस्त्यानें वाळकेश्वराला जाऊन पोहोंचला -

लिफ्टने तीं तिघें एका बंगल्याच्या अगदीं वरच्या मजल्यावर गेलीं. प्रशस्त हॉलमधून त्या जोडप्यानें अरुणला पलिकडच्या तीन खणी दालनाकडे नेलें -

त्यापैकीं कोपऱ्याच्या हवेशीर खोलींत, खिडकीजवळ टाकलेल्या कॉटवर रमणिक पडला होता.

कोणाची तरी चाहूल लागल्यामुळें तो एकदम बिछान्यावर बसता झाला व आंतूनच आपल्या मेव्हण्याला उद्देशून म्हणाला, ''कोण छेऽ, साराभाई?'' -

साराभाई आपले कपडे काढून, त्याच्या खोलीकडे वळत म्हणाला, ''हां! - अरे रमणिक अजूं तूं जागोच के? - भाई, तमे कोण अरुण ठाकूरने जाणो छो केऽ? तूं एने जाणे छे के?''

''हां, हां. ए मारो घणो सरस मित्र छे! पेल्लो छे क्यां? अने ए मल्यो क्यां तमने? - क्यां, बोलोनी, बेन?'' असें रमणिक आंतून घाईघाईनें म्हणतो आहे, इतक्यांत, अरुणच पुढें त्याच्या खोलींत गेला! -

हंसत हंसत रमणिकच्या बिछान्याजवळ जाऊन रमणिकच्या उत्कंठित चेहऱ्याकडे पाहून अरुण हंसत म्हणाला, ''अरे काय रमणिकभाई! तूं मराठींतच बोल बुवा आतां! नाहीं तर मी एका वाक्यांत हजार चुका करीन! - तुझा पत्ता तरी कुठं आहे? ''



रमणिकहि आनंदून अरुणचा हात आपल्या कृश हातांत घेत, त्याला आपल्याजवळ बसवून म्हणाला, ''वा भाई! - माझा पत्ता नाहीं कीं तुझा?''

: ९१४ :

दोघेहि जवळ जवळ बसून प्रेमानें हंसले, व मग रमणिकभाई अरुणच्या खांद्यावर स्नेहानें हात टाकून म्हणाला, ''अरे, मी तर आपला एकमार्गीच मनुष्य! आमची जित्याची खोड मेल्याशिवाय जाणार थोडीच! - पण तुझी काय खबर आहे? हीं साडेतीन चार वर्षे केलंस तरी काय तूं ? - त्या दिवशीं एखाद्या पिसाटासारखी तळेगांव स्टेशनवर तूं एकदम उडी मारलीस आणि त्यानंतर जो गडप झालास, तो अगदीं या क्षणापर्यंत. मला कधीं कधीं भेटायचीदेखील इच्छा झाली नसेल ना तुला?''

रमणिकनें आपल्या अशक्त झालेल्या डाव्या हातानें, अरुणचा डावा हात दाबला, व उजव्या हातानें त्याला प्रेमानें खांद्यावर थोपटीत, तो त्याच्याकडे पाहून अगदीं सौम्यपणें हंसला.

अरुणला तो पूर्वीपेक्षां आजारामुळें बराच अशक्त दिसत होता; पण त्याच्या किंचित् निस्तेज झालेल्या डोळ्यांतहि तुरुंगांत दिसून येत असलेली, त्याच्या करारीपणाची व त्यागाची स्पष्ट झांक, आजहि तेथे पहावयास मिळत होती.

त्यामुळेंच, त्याच्याविषयीचा अरुणचा आदर द्विगुणित झाला! -

''माझी देशसेवा तर पार बाजूला राहिली होती'' अरुण खिन्नपणें हंसून म्हणाला, ''मी अगदी परवां परवांपर्यंत जीवनकलहासाठींच झगडत होतो सारखा!...माझं भडकलेलं मन! - मग कांहीं दिवस माझे वडील, त्यांचं कुटुंब!... आजची कॉंग्रेस अचानक समोर पाहीपर्यंत, भोवतालच्या जगाच्या इतर धडपडीकडे दृष्टि वळवायला मला वेळच नव्हता, रमणिक! माझी तशी अगदीं जरा देखील मन:स्थिति नव्हती!''

अरुण बोलतां बोलतां थांबला! -

दोघांनीहि एकमेकांकडे पाहून सौम्य स्मित केलें. -

: ९१५ :

बऱ्याच दिवसांनी भेटलेले ते दोघे मित्र कितीतरी वेळ तसेच बोलत बसले होते. अरुणनें रमणिकला आपल्या मधल्या आयुष्यांतील साऱ्या घटना सांगितल्या आणि नंतर एक दीर्घ नि:श्वास टाकून, तो खिन्न स्वरांत त्याला म्हणाला, 'असं हे वैयक्तिक सुखदु:खांच्या धडपडीतच गेलेलं आयुष्य, रमणिक! - यापुढं काय करायचं हें मात्र मोठं प्रश्नचिन्ह, माझ्यापुढं उभं आहे!''

रमणिक बराच वेळ कांहीं बोलला नव्हता. बोलतां बोलतां अरुण थांबलेला पहातांच, रमणिकनें त्याच्याकडे आपली मंद दृष्टि वळवली!

किंचित् विचार केल्यासारखे करून, रमणिक नंतर अरुणला म्हणाला, 'मी तरी तुला यांत कांहीं दोष देत नाहीं, अरुणभाई! तुझ्या कर्तृत्वाचा प्रांत- त्याची दिशा कांहींशी निराळीच आहे, मला वाटतं!..पण मग तसं पाहिलं तर आम्ही तरी काय विशेष केलं रे?'' -

किंचित् काल थांबून रमणिकनें एक निःश्वास टाकला; व थोडे श्रम झाल्यामुळें तो तक्क्याला ओडगला व अरुणकडे पाहून पुढें बोलूं लागला -

''तुला सोडून मी मुंबईत आल्यावर जवळ जवळ दीड दोन महिने इथंच बहिणीकडे होतो. - पण माझं मन मला स्वस्थ बसूं देईना. आमच्याच माणसांचा एक लहानसा संघ करून, मी खादीफेऱ्या सुरू केल्या. पिंजण - कांतण यांचं एक केंद्र उघडलं, ते थोडं यशस्वी होत आहे असं वाटून, ती धडपड कांहीं महिने कायम ठेवली -

इथपर्यंत, जवळ जवळ डिसेंबर उजाडला होता. गांधीजी नुकतेच गोलमेजापासून बाजूला झाले होते. तेव्हां वल्लभभाईंबरोबर मी बार्डोलीस गेलो होतो. - शेवटीं, अत्याचाराबद्दलच्या सरकारी चौकशीची पद्धति उघडउघड प्रतिकूल व एकांगी आहे असं दिसतांच, - त्यांनी त्यांतून अंग काढून घेतलं.

त्यानंतर गांधीजी परत हिंदुस्थानांत येईपर्यंत, वल्लभभाई वगैरे मंडळी भोंवतालच्या परिस्थितीविषयी विचार-विनिमय करीत होतीं. त्या वेळीं त्यांच्या इतर कामासाठी, त्यांच्या इच्छेवरून त्यांचा दुय्यम म्हणून, त्यांच्याबरोबर मी इकडे तिकडे फिरत होतो -

शेवटीं, गांधींचा सरकारशीं झालेला पत्रव्यवहार अयशस्वी ठरून फर्मानी कायद्यांचं राज्य पुन्हा जारी झालं!

काँग्रेस व काँग्रेसवाले, सारे एकदम सरकारच्या दृष्टीनं पुन्हां एकदां नालायक, राजद्रोही ठरले!

झालं! सरकारनं मुत्सद्देगिरीनं, क्षणभर खाली ठेवलेलीं दडपशाहीचीं सूत्रें पुन्हां हातीं धरली. आणि बापूजी, वल्लभभाई यांच्या चार जानेवारीच्या अटकेपासून फिरून सुरुवात झाली!-

फिरून एकदां काँग्रेसचा प्रयत्न सुरू झाला. पण चळवळीचा पुनरुद्धार करणं जरा कठीणच होतं! त्यामुळं विलिंग्डनसारख्या व्हाईसरायला ती हां हां म्हणतां जमीनदोस्त करीन, अशी उमेद वाटावी, यांत नवल नाहीं!

तरी पण सत्याग्रहींचा उत्साहहि कांहीं लहानसहान नव्हता! मधला विरामाचा काल आतां संपला, हें त्यांना पूर्णपणें समजत होतं. किंबहुना, सरकारनं 'जैसे थे' असा त्यांना हुकूम दिला असता, तरी ते त्याला लागलीच कबूल झाले असते! आणि त्यांनी आपण होऊनच निमूटपणें तुरुंगाची वाट धरली असती!



पण सरकारचं धोरण मात्र निराळं होतं.

त्यांनीं पुन्हां नवीन पकडापकडीच सुरू केल्या.

या वेळचा लाठीमार तर अत्यंत क्रूर होता; आणि तुरुंगांतील कैद्यांचा छळ तर कांहीं विचारूंच नकोस! आपण मागं होतों, त्यापेक्षां भयंकर प्रखर स्वरूपाचा!

आणि बाहेर रहाणाऱ्यांसाठीं, जारी कायद्यांचा अम्मल! तें जगणं तर तुरुंगापेक्षां जास्त वाईट व अपमानास्पद!-

कांहीं नाहीं तरी त्यांतल्या थोड्याफार गोष्टी त्या वेळीं तूं वाचल्या असशीलच म्हणा. मला तरी वाटतं, या वेळीं सामील झालेले सारे स्वयंसेवक, अधिक करारी व निश्चयी होते.

माझी या वेळची माहेरची पाठवणी नाशिकला झाली होती. अमृतलालला जेलरकडून मिळालेला मार! आमच्या देखत देखतचाच तो प्रसंग!-

पण कांहीं का असेना!- १९३३ ऑगस्टपर्यंत, मी तुरुंगांतच होतो. मधला गांधीजींचा तुरुंगांतील उपवास तुला आठवतच असेल, खरोखरच एकदां वाटतं, आध्यात्मिक दृष्टीनं जगाकडे पहाणारा, या काळांतला तो एक अद्वितीय महात्मा आहे! गांधीजींनीं शेवटीं साबरमतीचा आश्रम व त्याबरोबर त्यांच्या दृष्टीनें जगांतील शेवटचा परिगृहत्याग केला! या उपवासाच्या प्रयोगांचं भवितव्य काय आहे कुणास ठाऊक?-

असो. मी मध्यें एकदां बाहेर आलो; पण मग त्यामागून झालेल्या वैयक्तिक कायदेभंगानं पुन्हां आंत गेलो.

त्यावेळीं तुरुंगांत माझी प्रकृति बरीच नादुरुस्त झाली होती.

शेवटीं गेल्या मे मध्येंच चळवळ बंद झाली-तरी पावसाळा सुरू होईपर्यंत माझी सुटका झाली नव्हती.

त्यानंतर पाहिले तीन चार महिने, मी बराच अशक्त झालो असल्यामुळे इथं बहिणीकडेच राहिलो-

शेवटीं, ऑक्टोबर संपता संपता तर मी टायफाईडनं अत्यवस्थ झालों. जवळ जवळ दीड महिना हॉस्पिटलमध्येंच पडलो होतो. अगदी मरता मरतां वांचलो बाबा! आतां कुठं दहापंधरा दिवसच झाले, इथं येऊन अशी विश्रांति घेत पडलो आहे!!''

: ९१६ :

रमणिक पडल्या पडल्याच, हळुहळु हें सांगत होता.

''आपण ज्या वेळीं जगाकडे केवळ कुत्सित नजरेनं पहात, जीवनकलहाला तोंड देण्याची एक प्रकारें बेफिकीर धडपड करीत होतो, त्याच वेळीं हा आपला निकटचा मित्र,...धीरानं शांततेनं व

मोठ्या चिकाटीनं, आपल्या सर्वस्वाचा त्याग करून, आशापूर्ण अंतःकरणानं, अगदीं मृत्यूच्या दारांत पाऊल टाकीपर्यंत पाशवी सत्तेशी झगडत होता!'' या विचारमालिकेनं आपली कृतज्ञ स्नेहाची नजर अरुणनें रमणिककडे वळवली.

एकसारखा बोलल्यामुळें व आपल्या अयशस्वी धडपडीच्या आठवणीनें थोडासा श्रमित होऊन, रमणिक शांतपणेंच त्याच्याकडे पहात पडला होता.

आतां यापुढें रमणिक काय करणार, याबद्दलची उत्कंठा, अरुणच्या मनांत त्या वेळी डोकावून गेल्यावांचून राहिली नाहीं.

पण वेळ बराच झाला असल्यामुळें, रमणिकला जाग्रणानें त्रास होईल, या कल्पनेनें अरुण हळूच त्याला म्हणाला, ''अरे रमणिकभाई, झोंप तूं आतां! सकाळीं पुन्हां बोलूं या आपण.''

पण रमणिक त्याच्या हातावर प्रेमानें थोपटीत हंसून म्हणाला. 'अरे हो हो भाई, इतक्या दिवसांनी आपण भेटलों तर अशी आपली बडबड चालणारच! आणि खरं सांगायचं, अरुणभाई, म्हणजे तूं आलास तो अगदीं वेळेवरच!- माझ्या डोक्यांत पडल्या पडल्या असलंच काहूर उठलं होतं! ही आज चालू असलेली काँग्रेसची सभा! त्यांतील दांभिकपणा आणि दिवाळी याचं अपेक्षित भडक चित्र डोळ्यापुढं आणून, मला अगदीं भयाण-खिन्न-वाटत होतं- झोंपच येत नव्हती. आतां तुझ्याबरोबर थोडं बोलून तरी, मनाला समाधान मानून घेतो. अरे, झोंप काय? आहे नेहमींची!''

रमणिकच्या जिवाची ती तळमळ, त्याच्या तो प्रेमळपणा सारें प्रत्यक्ष दिसत असल्यामुळें त्याच्याकडे पहातांना अरुणची दृष्टिहि, आदर व प्रेम, यांनीं ओतप्रोत भरली होती!

: ९१७ :

''मी सांगूं, अरुणभाई!'' रमणिक पुन्हां पडल्या पडल्या बोलूं लागला. ''हा आपल्या स्वातंत्र्याचा लढा म्हणजे लांबच लांब असा सांघिक त्यागाचा मार्ग आहे! तो प्रश्न असा चुटकीसरसा सुटणं शक्य नाहीं....हजारों लोकांचे त्यागहि त्याच्या यशस्वीतेसाठीं पुरे पडण्यासारखे नाहींत...

आतां हीच चळवळ पहा! वीस सालापासून माझ्या कुवतीप्रमाणं यांत एक सैनिक म्हणून मी लढत आहे. या चळवळींनीं आत्मविश्वास, स्वतःच्या सामर्थ्याची कल्पना, यांची देशांत वाढ झाली, यांत मुळीच संशय नाहीं! पण यापेक्षां या तिन्ही झगड्यांतून विशेष काय निष्पन्न झालं सांग? आम्हीं जवळजवळ आहों तिथंच आहोंत!

मला तर वाटतं, शेवटीं आम्हाला पुन्हां मागं पाऊल घ्यावं लागणार ! आणि तुमच्या टिळकांच्या मताप्रमाणं सत्ता हातीं घ्यावी लागणार!

माझंच पहा ना, मी पहिल्या चळवळीनंतर मधला कांहीं काळ जसा बंगाल्यांतील दहाशतवाद्यांच्या बाजूला झुकलो, तसा तीस सालच्या लढ्यानंतर झुकलो नाहीं. हिंसेकडून अहिंसेकडे, शस्त्र या दृष्टीनं पहाण्याची माझ्यांत आतां बरीच कुवत आली आहे, असं खास वाटतं मला!-

ही चिकाटी जी आमच्यांत दिवसेंदिवस जास्त रुजत आहे, तिचाच आम्हांला काय तो खरा उपयोग होणार आहे. मला वाटतं आत्मशुद्धि, स्वतःच्या घराची सुधारणा, एकी, यांचीच आम्हांला आज विशेष जरूर आहे. गांधींच्या या अभिनव चळवळीचा जर कांहीं फायदा झाला असेल तर तो इतकाच! या साऱ्या गोष्टींची तीव्र जाणीव!-

नाहींतर तूं पाहिलंसच! गोलमेज परिषदेंत मांसाच्या तुकड्याच्या आशेनं, आपल्या बांधवावर कशी भों भों झाली! स्पृश्यास्पृश्यतेच्या लढ्यासाठी तर आपल्या देशातील एका श्रेष्ठ महात्म्याला प्राणांतिक उपवास करावा लागला!! तो प्रश्न त्यानंतर सुटला आहे असं माझं म्हणणं नाहीं! तात्त्विक दृष्टीनंच पहा तेवढं!- आणि तुझ्यासारख्या किंवा माझ्यासारख्या हजारों साध्या सैनिकांनीं, आपल्या त्यागाची पराकाष्ठा केली, त्यांचं तरी काय झालं?-

त्यांना सारेजण विसरले! आणि भोंदू, टाळाटाळी करणारे मधले काहीं अलबते गलबते पूर्वीइतकेच आतांहि आमच्यापेक्षा वरच्या उंचीवर उभे राहून मगरुरीनं व कांतडी पांघरून बकवा करीत आहेत! अरे भाई, जो मोठ्यानं ओरडतो तो आज शहाणा ठरतो -

पण खरोखर पाहिलं, तर देशाला आज मुग्ध, भरीव कामगिरीचीच जास्त जरूरी आहे. मी तर पूर्ण विचार करून या मतापर्यंत पोहोंचलो आहे की, तुरुंग भरण्यापेक्षां आज आपल्या कार्याचं क्षेत्र, बाहेरच जास्त पसरलेलं आहे! आपला सारा देशच तुरुंग आहे ही जाणीव ठेवून त्यांत जागरुकतेनं रहाणं हेंच तुरुंगी देशसेवेपेक्षां महत्त्वाचं आहे!- त्यामुळं आपल्याला एकदम देशभक्तीची कीर्ति मुळींच मिळणार नाहीं. कदाचित् साऱ्या आयुष्यभर आपण अज्ञातच राहूं. पण या असल्या उंच-वर किंवा खोल-खालीं जाणाऱ्या लाटांत आपण सापडणं कांहीं योग्य नाहीं. त्यानं आपलं किंवा देशाचं, कुणाचंच कसलं कल्याण होईलसं दिसत नाहीं! तुला नाहीं वाटत असं?-''

: ९१८ :

अरुणनें कांहीं न बोलतांच होकारार्थी मान हालवली. त्याला रमणिकचा तळमळीचा प्रत्येक शब्द, आपल्याच हृदयांतील विचारांचा प्रतिध्वनि वाटत होता.

एक निःश्वास टाकून रमणिक मध्यें थोडा वेळ शांत पडून राहिला.-

नंतर विचार करून, तो पुन्हां अरुणकडे पहात कांहीं वेळानें बोलूं लागला, ''गांधीजींचं पाटणाचं पत्रक वाचलं असशील ना तूं? सत्याग्रहाचं शस्त्र त्यांच्यापासूनच निर्माण झालं! अगदी खरी गोष्ट! पण तें केवळ आध्यात्मिक साधन अशी आमची तरी मुळींच समजूत नव्हती व नाहीं!- ही त्यांतील

आध्यात्मिकताच, आमच्या आजच्या या क्षणाला किंकर्तव्यमूढ वृत्तीला जबाबदार आहे. निदान मला तरी असं वाटतं!-

नाहींतर दुसऱ्या ३० सालच्या प्रयत्नाच्या वेळी गांधींनीं केवळ सौजन्यानं वाहून जाऊन, सरकारशीं मध्येंच समेट केला नसता, मला वाटतं! जे गांधी, संपूर्ण स्वातंत्र्य हातांत येईपर्यंत झगडण्याचा निश्चय करून बाहेर पडले,...'एकहि सत्याग्रही जिवंत असेपर्यंत लढा थांबणार नाहीं व थांबूं नये,' अशी ज्यांनीं घोषणा केली, त्यांना सरकारच्या वृत्तींत असा काय एकदम पालट दिसून आला, कीं त्यांच्याकडून उदार सौजन्याची त्यांनी अपेक्षा करावी?- असला लढा हिंसेच्या बाजूला जाईल, अशी त्यांना एकाएकी भीति वाटण्याचंहि तसं कांहीं कारणच नव्हतं त्यावेळी!

आणि त्यानंतर साऱ्या गोष्टी अपेक्षेप्रमाणेंच चुकीच्या व कांहींशा उतावीळपणाच्या ठरल्या नाहींत का? हीसुद्धां हिमालयाएवढीच चूक होती!- तेव्हां याच दृष्टीनं, मी म्हणतो, देशाच्या हातांतील शस्त्र म्हणून जें सत्याग्रहाचं साधन असेल, त्यांत ही आध्यात्मिकता नाही उपयोगाची! त्यामुळं अनेक अव्वल दर्जाच्या सैनिकांच्या आयुष्याचा मात्र चुथडा झाला.

या साधनाचे निर्माते या दृष्टीनं, त्यांची आम्हाला वाटणारी ही चूक कदाचित् नैसर्गिक असली तरी अव्वल दर्जाच्या, महत्त्वाकांक्षी व कर्तृत्ववान् तरुणांनीं तिच्याकडे कांहींशा निराशेनं पाहिलं तर त्यांत त्यांची मात्र चूक होणार नाहीं!-''

: ९१९ :

रमणिकची ही विचारसरणी अरुणला अगदीं मनापासून पटत होती. त्याला वाटत होतें आपण आपल्या निसर्गदत्त देणग्यांना उपेक्षून, एका श्रेष्ठ प्रकारच्या कां होईना पण भावनाप्रधानतेनेंच मधला कांहीं काळ, जी धडपड केली, ती आपल्या वैयक्तिक दृष्टीनें तरी अतिशय घाईघाईचीच होती!...

इतक्यात रमणिक पुन्हां म्हणाला, ''आणि तसं म्हटलं तर, आपली ही सारी धडपड तरी कशासाठी आहे? आपण याला स्वार्थत्याग म्हणतों! पण त्यामागलं ध्येय तरी काय? देशांतील प्रत्येक व्यक्तीचा स्वार्थ आणि सुख! हो नां-! आणि या साऱ्या धडपडीचं जर तेंच ध्येय असेल, तर मग इतर प्रांतांत आपल्या कर्तबगारीनं पुढारी ठरू शकतील, अशा कर्तृत्वशील व्यक्तींनीं इथं केवळ सैनिक होऊन, आपला देश व समाज यांच्या हिताच्या दृष्टीनं, श्रेष्ठ ठरणारीं यशं भिरकावून देणं हें योग्य ठरेल का?..त्यापेक्षां चालू काळांत त्यांची ती सापेक्ष स्वार्थी मर्यादित यशंच जास्त देशभक्तीचीं द्योतक ठरतील, मला वाटतं!...तुझंच उदाहरण घे! तुझ्यासारख्या श्रेष्ठ चित्रकारानं, आपल्या आयुष्याचा तो मधला काळ योग्य तऱ्हेनं वापरला नाहीं असंच मीदेखील म्हणेन! मात्र त्या साऱ्यांनी आपलं ते मर्यादित कर्तव्य करीत असतांना, राष्ट्रीय दृष्टि, सामाजिक हित, ही मात्र आपल्या मनांत सतत जागृत



ठेविली पाहिजेत!-''

''रमणिकभाई, तूं म्हणतोस ते सारं सारं मला पटतं.'' रमणिकच्या स्पष्ट विचारसरणीमुळं समाधान वाटून त्याच्याकडे स्नेहाळ कौतुकानें पहात अरुण म्हणाला, ''स्वार्थाच्या कक्षा, प्रत्यक्ष व्यक्तीला मोठ्या करतां येतातच असं नाहीं! म्हणजेच असला उधळा स्वार्थत्याग त्याला एकदम करतां येत नाहीं!- खरं आहे! आणि तुझ्यासारखा मनुष्यहि असं सांगतो. त्याचा अर्थ तुझं मन जात्याच उदार आहे पण मग आतां पुढं तूं करणार तरी काय आहेस, रमणिक? त्याची मात्र मला पटकन् कल्पना करता येत नाही!-''

रमणिकनें त्यावर कांहीं न बोलतां सौम्य गंभीर स्मित केलें!- पण त्याच्या डोळ्यांत अरुणला निश्चयीपणाच पुरेपूर भरलेला दिसत होता.

: ९२० :

तो हंसल्यासारखें करून शेवटीं अरुणला म्हणाला, ''अरे अरुणभाई! आपण तुरुंगांत असतांना, माझ्या आईची कहाणी तुला मी सांगितली होती! आठवते तुला? तिच्यांतला प्रत्येक शब्द माझ्या मनांत अजूनहि कोरलेला आहे. आजपर्यंत, मी माझ्या त्या सदसद्विवेकबुद्धीला जागलो!..तर यापुढेंहि आतां तेंच असा काय माझ्यांतच एकदम विशेष बदल पडणार आहे, अरुणभाई?''...

त्याच्या या शब्दांनीं, अरुणला तुरुंगांतील रकट्यावर पडल्या पडल्या झालेले त्या दोघांचें संभाषण आठवलें.

पण त्यामुळें तर तो जास्त गोंधळला; आणि आपली प्रश्नार्थक दृष्टि त्यानें रमणिककडे, जास्तच एकाग्रतेनें, रोखून धरली-

''आज तरी मला वाटतं, अरुणभाई!'' -रमणिक त्याच्याकडे सहास्य मुद्रेनें व करारी दृष्टीनें पाहून पुढें म्हणाला, ''माझ्या वैयक्तिक स्वार्थाच्या बाबी कितीतरी कमी आहेत!...लहानपणींच लग्न झाल्यामुळं माझी बायको माझ्यावर अवलंबून असली, आम्हां दोघांना एक दोनतीन वर्षाचा मुलगा असला, तरी पण मला गांगरण्याला तेवढंच कारण आहे, असं मला मुळींच वाटत नाहीं!''-

रमणिक थोडा वेळ शांत पडून राहिला. आणि मग अरुणचा हात प्रेमानें आपल्या हाती घेऊन तो आपल्या हातावर आपटीत आपटीत, थोडा वेळ विचारी चेहऱ्यानें, व आपल्या बिछान्याकडे शून्य दृष्टीनें पहात, थांबला-

पुन्हां तो एकदम पुढें म्हणाला, ''अरुणभाई, आज या क्षणी, तुला मी माझ्या श्रीमंत बहिणीच्या मालकीच्या बंगल्यांतील अगदीं वैभवशाली दिवाणखान्याजवळच्या एका हवेशीर खोलींत....असा मऊ गादीवर पडलेला दिसत आहे!- पण भाई, त्याला माझा अगदी नाइलाज आहे. आणि मी इथं असलो,

तरी माझं सारं लक्ष मात्र माझ्या हिंदुस्थानच्या, हो, माझ्या प्रांतांतील, माझ्याच एखाद्या खेड्यांतील - एखाद्या अगदी लहानशा गरिबाच्या झोपडीकडे - अहर्निश लागलेलं आहे! त्या जवळचाच तो गिरणीभोंवती पसरलेला मजुरांचा जमाव पहा!... मला प्रत्येक क्षणाला म्हणून वाटतं आहे, माझ्या आयुष्याचा गेला क्षण कायमचा गेला! - मला आपल्याकडे सारखं बोलावीत असलेला, त्या गरीब झोंपड्यांतील व त्या गिरण्याभोंवतालच्या कोंदट खुराड्यांतील मानवतेचाच माझ्या आयुष्यांतील या पुढील क्षणांवर अगदी जन्मसिद्ध हक्क पोहोंचतो! माझं या पुढील आयुष्य यामुळंच, अज्ञात गरीबांच्या सहवासांतील धडपड यांत जाणार!''-

: ९२१ :

इतक्यात, शेजारच्या हॉलमधून दोहोचे ठोके पडलेले ऐकू आले!- दोघांनीं तिकडच्या दाराकडे पाहिलें.

दारांतच एक पंचवीस सव्वीस वर्षांची तरुण स्त्री उभी होती! तिला उद्देशून रमणिक म्हणाला, ''केम् ? एवी-रीते संभाळवानुं एम्?-''

''हांच तोवरी! मने मग हुंग नथी आवती!'' ती त्याच्या बिछान्याजवळ येत, सौम्य हास्य करीत म्हणाली, ''आ भाईनो बिस्तारो क्याँ मुकवानो?-''

रमणिकनें तिच्या प्रश्नाचें उत्तर तिला दिलें; आणि नंतर अरुणकडे पाहून तो म्हणाला, ''ही माझी बायको, अरुणभाई! माझ्या आयुष्याचा पुढील कार्यक्रम, तिला मनांतून मुळीच पसंत नाही! जरादेखील चैन पडत नाही, बघ, तिला! आणि मग रात्रीच्या रात्री ती अशी माझ्यावर पाळत ठेवते, मी करतो काय- बोलतो काय- हें पहायला! पण मी तरी काय करूं, सांग-''

बिछाना घालीत असलेल्या रमणिकच्या बायकोकडे, अरुणनें एकदा स्नेहपूर्ण दृष्टीनें पाहिलें, आणि पुन्हां त्यानें रमणिककडे आपली शोधकदृष्टि फिरविली!-

तेवढ्यांत, रमणिक पुढें सांगूं लागला, ''आतां तूंच पहा ना, अरुणभाई! आपल्या संपूर्ण स्वातंत्र्याची कल्पना नीट लक्षांत घेतली, तर आपल्याला काय आढळतं?... स्वातंत्र्य, स्वराज्य म्हणजे प्रत्येक देशबांधवाच्या पोटभर भाकरीची शाश्वती, त्याच्या सुखासमाधानाच्या साऱ्या अपेक्षांची पूर्ती!- आणि यांचा लाभ व्हायला, नुसती सत्ता व राजव्यवस्था बदलून चालणार नाही. आज परके लोक असंख्य हिंदवासीयांना जसे पिळतात, तसेच त्यांना, आपणहि मदानं धुंद होऊन पुढं पिळीत राहूं!...हा सध्यांच्या समाजव्यवस्थेंत मानवी मनाचा धर्मच होऊन बसला आहे. सध्यांची समाजव्यवस्था हिंदुस्थानच्या आर्थिक परिस्थितीला योग्य अशा प्रकारें आमूलाग्र बदलल्यावांचून चालणार नाही- अशाच ठाम मताचा मी आहे!....



: ९२२ :

रमणिक थोडा वेळ थांबला. मग आपल्याजवळ उभ्या असलेल्या बायकोकडे पाहून तो अरुणला उद्देशून पुढें म्हणाला, ''पण तोपर्यंत?... आतां तू पाहिलंसच- या चळवळी थांबल्या व पुन्हां कौन्सिलप्रवेश सुरू झाले. कदाचित् पुढं असा काळ येईल की, काँग्रेसप्रधानमंडळ व काँग्रेसराज्यहि सुरू होईल!...तेव्हां आपल्या आयुष्याचा असला हा मधला काळ अगदींच मूर्खपणाचा तरी आपल्या कर्तबगारीच्या दृष्टीनें चुकीचाच ठरला!- मला वाटतं!..आणि म्हणूनच मी म्हणतो, झालं तेवढं पुरे!..यापुढं तरी असल्या क्षणभर वर चढणाऱ्या व पुन्हां खोल खालीं जाणाऱ्या चळवळीच्या लाटा, देशाच्या अंतिम हिताच्या कामीं उपयोगी पडणार नाहींत.''

किंचित् काळ थांबून, रमणिकभाई पुढें म्हणाला, ''आतां यापुढं हे सामुदायिक दिखाऊ देखावे नकोत आम्हांला! आज, वैयक्तिक कर्तबगारीचीच खरोखर जरुरी आहे! 'वर्षांत स्वराज्य' म्हणतांच, धावणाऱ्याइतकी क्षणिक स्वरुपाची त्यागाची कल्पना देशाला उपयोगी नाहीं! आयुष्येंच्या आयुष्यें अज्ञात योग्य धडपड करीत, जायला पाहिजे आहेत... आणि तीच, आज बऱ्याच विचारांतीं माझ्या मनाची मोठी धडपड आहे!''

: ९२३ :

अरुण त्याच्याकडे कौतुकानें पहातच राहिला! रमणिकच्या त्या त्रोटक पण ठाम शब्दांनी, अरुणच्या अस्पष्ट विचारांना योग्य स्वरूप मिळत होतें. रमणिकची बायको मात्र त्या दोघांकडे चिंतायुक्त पहात होती.

''म्हणूनच, मी म्हणतो, अरुण!'' रमणिक पुन्हां गंभीरपणें हंसून, त्याच्याकडे पहात म्हणाला, ''माझ्या आयुष्याचं क्षेत्र, यापुढं तुरुंगाबाहेरचं एखादं लहानसं खेडं आहे!- त्यांतील खालच्यात खालचा दरिद्री, निरक्षर, अर्धपोटीं बांधव व मी, दोघांची योग्यता मी सारखीच समजतो; आणि माझ्यांत व त्याच्यांत कांहीं विचारांनी मला जें अंतर आढळून येतं, तें सारं घालवून टाकण्याच्या कामीं मला माझं उरलं आयुष्य खर्ची घालायचं आहे! त्यासाठीं नशिबीं येणाऱ्या साऱ्या हाल-अपेष्टा भोगणं, हेंच आपलं आजच्या घटकेचं अवश्य कर्तव्य आहे!''

''केम? तूं वरी सूं सोचे छे?'' रमणिक बोलता बोलता एकदम थांबला व गंभीर चेहऱ्यानें त्या दोघांच्या संभाषणांत लक्ष घालून ऐकत उभ्या असलेल्या, आपल्या पत्नीकडे, हास्य-मुद्रेनें पहात म्हणाला.

''कहि नथी!...'' ती थोडी लाजूनच, दोघांकडे दृष्टिक्षेप टाकून हंसली व म्हणाली.

तेवढ्यांत रमणिक अरुणला म्हणाला, ''अरुणभाई, हिला माझा मार्ग तर कांहीं पसंत नाहीं

बुवा!''

''एम क्यारे थाय?'' ती रमणिककडे हंसून पहात मानेला गोडसा हिसका देत म्हणाली.

: ९२४ :

आणि मग थोडा वेळ थांबून अरुणकडे तोंड करून ती गुजराथींत म्हणाली, ''तुम्हींच पहा, अरुणभाई! मी आपली एक निरक्षर स्त्री आहे! लहानपणीं वेवाय झाला यांच्याबरोबर- त्यावेळीं मी पांच वर्षाची होते! नंतर दहाव्या वर्षी लग्न झालं. आणि ते दुसऱ्याच वर्षी गांधींच्या पहिल्या चळवळीस मिळाले. एखादं वर्ष कुठं ह्यांच्याबरोबर वागते न वागते, तोंच हे एकदम निघून गेले! पांच सहा वर्षे असेच भटकत होते. मी नेहमीं धडधडणाऱ्या छातीनं, रक्तपात करण्याच्या हेतूनं होणाऱ्या यांच्या हालचालींकडे, लांबून पहात होतें- त्यावेळीं मी जीव मुठींत धरून कसेबसे दिवस काढले. नेहमीं वाटे, कीं, हे एखादे दिवशीं कुणाचा तरी खून करणार! आणि मला कायमचे सोडून जाणार! पण ईश्वरानं मला तारलं!..''

अरुण दोघांकडे टकमक पहात होता;- तोंच रमणिकची बायको पुढें म्हणाली, ''तेथून आल्यानंतर पुन्हा दोन वर्षे चळवळ सुरू होईपर्यंत मी त्यांच्याबरोबर इथंच मुंबईत होते. कांहीं दिवस यानीं स्वदेशी कापडाच्या दुकानांत नोकरी धरली होती. मला त्या वेळी वाटे, आतां आपल्या वैवाहिक जीवनाची खरी सुरवात झाली... पण दुर्दैवाने पुन्हां उचल खाल्ली! गांधींचा सत्याग्रह सुरू झाला. एके दिवशी मला पुष्कळ सांगून ते चळवळींत सामील झाले!!-'' रमणिकची बायको एक दीर्घ निःश्वास टाकून, थोडा वेळ थांबली. दोघांकडे पटकन् पाहून रमणिक सौम्यपणें हंसला.

''हंसता काय?'' भाबी रमणिककडे थोड्या रागीट परंतु प्रेमपूर्ण नेत्रांनी पहात म्हणाली, ''अरुणभाई, माझा भाऊ मला आपल्या घरी घेऊन जायला आला. त्यावेळी हे म्हणाले, आपल्याला कुणाचे असे उपकार नकोत. तूंहि या स्वातंत्र्ययज्ञांतच उडी घे!''

आणि रमणिककडे तिरप्या नजरेनें ओझरतें पहात, भाबी म्हणाली - ''मला यांच्यावर प्रेम करण्याशिवाय दुसरं कांही एक राजकारण समजत नव्हतं. तेव्हा त्यांच्या सुखासाठीं , मी भावाला परत पाठवून तुरुंगांत पडले; एकदां लाठीमारांत सांपडले. तुम्हांला कदाचित् आठवत असेल, माझ्या त्या शौर्याचं वर्तमानपत्री वर्णन. पण हे संतुष्ट झाले. म्हणूनच मला अधिक समाधान वाटलं!- गांधीचा सरकारशीं करार झाल्यावर आम्ही दोघं बाहेर आलों. त्यानंतर इथंच पांचसहा महिने होतों. त्यांच्याबरोबर खादीफेऱ्या केल्या. हे सांगतील त्याप्रमाणे सर्व कांहीं केलं-''

अरुण भाबीचा जीवनवृत्तांत उत्कठेनें ऐकत होता. ती पुढें सांगू लागली, ''मग अरुणभाई, हे पुन्हां तुरुंगात गेले. त्या वेळीं मी लौकरच माता होणार होते. तेव्हां हे मला म्हणाले ''तुझ्यापुढं या वेळीं एक



गोड कर्तव्य आहे- तूं बाहेरच रहा!-'' मी इथंच होते. ह्यांनीं आपल्या जवळची होती नव्हती ती सर्व शिल्लक माझ्याकडे दिली. हे आतां पुन्हां तुरुंगांतून सुटले. मला वाटलं, बरं झालं, एकदांची चळवळ थांबली. आतां पुढं तरी आपल्याला भावी आयुष्यांत सुख व संपत्ति यांचा लाभ घेतां येईल.''

क्षणभर किंचित् रागानें आपल्या नवऱ्याकडे पाहून भाभी शेवटीं अरुणाला म्हणाली, ''अरुणभाई, पण आतां मला म्हणताहेत, आपल्याला खेड्यांत दरिद्री होऊन रहायचं आहे! सुख व संपत्ति आपल्या दरिद्री हिंदुस्थानासाठीं सध्यां तरी नाही. आपण दरिद्री नारायणाची लेकरं!''

: ९२५ :

अरुण कांहीं न बोलतांच आपल्या मित्राच्या बायकोकडे व त्याच्याकडे आळीपाळीनें पहात, तें सारें ऐकत होता.

इतक्यांत, ती पुढें एक दीर्घ सुस्कारा सोडून म्हणाली, ''मला यांच्याविषयीं किती आदर वाटतो तें मी शब्दांनीं कसं सांगूं?... यांच्या सुखासाठीं, यापुढील आयुष्यांतील साऱ्या सुखदुःखाच्या गोष्टी करायला मी तयार आहे!...पण एकेकदां मात्र वाटतं,- ही यांची धडपड कशासाठी आहे?..मनांत जें खरं वाटतं तें सांगावं, म्हणून हे मला नेहमीं सांगतात; आणि म्हणून मीं त्यांना गेले कांहीं दिवस सागत आहे, तुमच्यासाठीं वाटेल तें करायला मी तयार आहे. पण आपल्याला वैभव, सुख मिळावं ही माझ्या मनाची आकांक्षा कांहीं अजून गेलेली नाहीं! तर-''

''मी तरी काय करूं रे, अरुणभाई?'' रमणिक आपल्या बायकोकडे सहानुभूतीच्या दृष्टीनें एकदां पाहून, अरुणकडे वळून बऱ्याच वेळानें म्हणाला,

''मला हिच्याविषयीं फार प्रेम वाटतं. अशिक्षित असली तरी ही अतिशय सुसंस्कृत आहे!...तिच्या दुःखाला मी कारण व्हावं असं मला जरादेखील वाटत नाहीं. पण माणसांच्या हातांत, त्याचं असं एकच आयुष्य असतं, नाहीं का? मग सांग, - मनाला जी सारखी तळमळ लागली आहे, तिलातरी मी केव्हा वाव द्यायचा?- आयुष्याच्या शेवटीं? गङितगात्र झाल्यावर? हिची मजवरील भक्ति पाहून खरोखर माझं हृदय भरून येतं. हिच्याविषयीं मलाहि प्रेम वाटत नाहीं का?...जगातील सुखी, साधं, सरळ, जीवन तिला मिळवून देतां आलं असतं, मला मिळालं असतं तर, मलाहि त्यांत सुखच झालं असतं! पण मग माझीं ध्येयें? माझ्या सदसद्विवेकबुद्धीची धडपड?...केवळ प्रेम हेंच कर्तृत्व-शील माणसाच्या आयुष्याचं इतिकर्तव्य होय, असं निदान मला तरी वाटत नाही!-''

: ९२६ :

रमणिकनें, पडल्या पडल्या, आपला हात पुढें करून, आपल्या बायकोचा हात प्रेमानें हाती धरला - तीहि त्याच्या उशाजवळ जर पुढें येऊन उभी राहिली.

ती स्तब्धच होती; पण तिच्या बोलक्या सौम्य डोळ्यांत त्याच्याविषयी ओतप्रोत प्रेम दिसत होतें. -आणि तिच्या डोळ्यांतील अश्रु, मनांत चाललेली मोठी खळबळ मोठ्याच प्रयासानें ती आतल्या आंत दडपीत असल्याचें दाखवीत होते.

अरुण हळूच दोघांकडे पहात होता!- शेवटीं, तो रमणिकच्या बायकोकडे वळून थोडें हंसल्यासारखें करून म्हणाला, ''भाबी, तुम्हीं म्हणतां, ते सारं खरं! पण, रमणिकसारखा श्रेष्ठ दर्जाचा तरुण तुमचा पति आहे, याबद्दल तुम्हांला आनंदच वाटतो कीं नाही?...त्याच्या सहवासांत तुम्हांला सुखच वाटतं ना?- मग त्यासाठीं व त्याच्यासाठीं तुम्हांला असला त्याग करणं अगदीं आवश्यक आहे, नाही कां?''

रमणिकची बायको त्याच्याकडे पाहून थोडा वेळ स्तब्धच उभी राहिली. नंतर अरुणचें म्हणणें आपणांस पटलें, अशा अर्थानें मान हलवून, तिने आपल्या प्रिय पतीकडे अगदी प्रेमळ दृष्टिक्षेप टाकला.

त्या एकमेकांकडे पहाणाऱ्या नवराबायकोच्या डोळ्यांत, अरुणला त्याग अगदी ओतप्रोत भरलेला दिसत होता!

त्यांच्याकडे आदर व कौतुक यांनी मिश्र अशा दृष्टीनें पहात तो आपल्याशींच म्हणाला, ''खरंच हीं दोघंहि, मोठीं उदारहृदयी व त्यागी माणसंच नव्हत का? ....''

***





# -- आकाश गङ्गा --

# विभाग ३ रा

: ९२७ :

दुसऱ्या दिवशीं सकाळीं, अरुण रमणिककडून निघाला. त्या प्रेमळ जोडप्याबद्दलच्या आदरानें आणि स्नेहानें त्याचें मन अगदीं तुडुंब भरलें होतें. - विशेषतः, रमणिकवर असलेलें त्याच्या बायकोचें उत्कट निरपेक्ष प्रेम, अरुणच्या मनाला एक नवाच चटका लावीत होतें.

आणि त्यामुळेंच, - त्यानें मागें मनांत केलेल्या वैवाहिक सुखाच्या कल्पना त्याला पुन्हा आठवूं लागल्या. मंजुळेबरोबरचा त्याचा संबंध, त्यांच्यापुढें प्रथम उभा राहून, त्याला तिची आठवण झाली-

आज तिच्या आयुष्याला सारेंच निराळें वळण लागलें आहे. ती आपल्या आयुष्यांत, आतां पुन्हां त्या दृष्टिनें तरी कधीच निगडित होऊं शणार नाहीं, हें जाणून, त्याच्या मनानें, त्याच्या तारुण्याच्या अगदीं सुरवातीच्या काळांत एकदम उडी मारली.

आपली बालमैत्रीण, मिरा पाटील. हो! तिच्याबरोबरहि आपण आपलें आयुष्य घालविण्याची एकदा कल्पना केली होती. - नंतर एकाएकीं तिचा वियोग झाला. तेव्हा आपण मनांत कितीतरी चरफडलों होतों! पण त्यानंतर मात्र गेल्या महिन्यांत जाईनें तिचें नांव उच्चारलें, तोपर्यंत अगदीं अपाण तें सारें जवळ जवळ विसरलोच होतो, असें म्हटल्यास अधिक शोभेल.

मंजुळा काय अन् मिरा काय!...त्यांच्या वियोगानंतर, कांहीं काल आपल्याला त्यांच्या आठवणी होऊन, चुटपुट लागली, दुःख झालें!- पण तें सारें तितक्याच उत्कटतेनें ठाण देऊन न रहातां एखाद्या चमकत्या विजेप्रमाणें क्षणभरच टिकलें त्या वियोगानें आपल्या व्यक्तिगत आकांक्षाना, हालचालींना, कसली बधिरता अगर मर्यादा म्हणून उत्पन्न झालीच नाहीं! - प्रेम आणि मरण, यांचा निकटचा संबंध लावणारे कदाचित् मोठे असतील! पण त्या कोटींतले आपण तरी खास नाहीं!

कां?...

त्याला वाटलें, रमणिक काल म्हणाला तेंच खरें, - ''केवळ प्रेम हेंच कर्तृत्वशील माणसाच्या

आयुष्याचं इतिकर्तव्य नव्हे!....''

: ९२८ :

पण अरुणला लगेच वाटलें, ''असं असलं, तरी प्रेमाला माणसाच्या आयुष्यांत महत्त्वाचं असं कांहीं तरी स्थान आहेच, हें मात्र खास. माणसाला, असं कायमचं निष्प्रेम आयुष्य कंठणं शक्य तरी होईल का?...

निदान त्याला स्वतःला ते शक्य होईल किंवा नाहीं, याविषयीं त्यावेळी तरी तो साशंक होत होता! -

या विचारसरणीनेच, त्यावेळीं त्याला असल्या सात्विक व प्रेमळ स्त्रीसहवासाची वाढती उत्कंठा लागली. आणि म्हणूनच कीं काय कोणास ठाऊक, तो तसल्या गोंधळलेल्या मनःस्थितींत, आपल्या घराकडे चालला असतांना त्याच्या दृष्टिक्षेपांत स्नेहशील प्रेमळ जाईची मूर्ति क्षणभर चमकून गेली!-

''काल आपल्याला ती जाधवबाबांकडे भेटली असती, तर आपल्या मनाला किती समाधान झालं असतं!...त्या वेळीं ती कोल्हापूरजवळच्याच कुठल्याशा गांवी मिरेकडे गेली असावी'' वगैरे विचार एखाद्या चित्रपटाप्रमाणें त्याच्या मनांत इतक्या भराभर येऊन गेले कीं हें लिहिण्यास त्याच्या शतपटीनें वेळ लागला.

लगेच त्याला जाईजवळच मिरेचीहि मूर्ति दिसूं लागली!-

अरुणच्या मनांत पुन्हां विचारांचें काहूर माजूं लागलें, ''खरंच, दोघीहि पोरी किती प्रेमळ!''

असले कैक विचार त्याच्या मनांत पुन्हां पुन्हां डोकावूं लागले, तरी जणुं काय, जाई त्याच्याकडे आपल्या नेहमींच्याच बोलक्या प्रेमळ डोळ्यांनी पाहून हंसत आहे, असा त्याला भास होत होता!-

मिरेची सध्यां काय हकिगत आहे हें जाणण्याची उत्कंठा, तिच्या स्नेहाची अजूनहि जीव धरून असलेली आकांक्षा,....या भावनांनीं त्याच्या मनांत थैमान घालूनहि त्या क्षणीं जाईचीच मूर्ती त्याला जास्त उठावदार दिसत होती.

: ९२९ :

तो घरी येऊन पोहोंचतो तों तेथें, त्याची वाट पहात, एक वृद्ध गृहस्थ हॉलमध्यें बसलेले त्याच्या दृष्टीस पडले -

त्या गृहस्थानें त्याच्याकडे पाहून, हास्यमुद्रा केली, त्यामुळें, त्यानेंहि किंचित् गोंधळूनच, त्यांच्याकडे उलट पाहून नमस्कार व औपचारिक स्मित केले.

कपडे वगैरे काढून तो आंतल्या खोलींत गेल्यावर , त्याला काकूंच्या सांगण्यावरून समजलें, कीं, ते एक सधन असे स्वज्ञातीय गृहस्थ आहेत. आपल्या मुलीसाठी खटपट करावयास, ते मागें एकदोनदां



बाबांकडे आले होते व आजहि बहुतेक त्याच कामासाठीं, अरुणला समक्ष भेटण्यास दीडदोन तासांपूर्वी येऊन वाट पहात बसले आहेत.

ती बातमी ऐकून अरुणच्या मनाचा गोंधळ उडाला. - आतां, त्यांना काय व कसें उत्तर द्यावयाचें हें त्याला समजेना. त्यामुळें तो अधिकच त्रस्त झाला.

पण मग, ही समाजांतील प्रचलित पद्धति आहे, हें लक्षांत घेऊन, त्यांना सभ्यपणें कांहींतरी सौम्य उत्तर द्यावें हें बरें, असें त्याला वाटलें; आणि शेवटीं तो त्यांच्याजवळच्या खुर्चीवर येऊन बसला.

: ९३० :

प्रथम थोडाशा इकडच्या तिकडच्या गप्पा करून आणि अरुणला आपला थोडासा परिचय करून देऊन, आपला विषय सुरू करण्यासाठीं, ते (गृहस्थ) म्हणाले, ''मागं एकदोनदां, आमच्या मुलीविषयीं, मी बाबासाहेबांच्या कानांवर गोष्ट घालून ठेवली होती. पण ते त्या वेळीं म्हणाले होते, 'या बाबतींत मला तसं कांहींच सांगतां येत नाहीं! - तुम्हीं अरुणलाच प्रत्यक्ष विचारलेलं बरं.-' आज या प्रसंगी ते असते तर बरंच होतं!- झालं तें वाईटच !- पण दुःख विसरून माणसानं काळाला धरूनच पुढचा मार्ग स्वीकारला पाहिजे!- एवढ्यासाठीं तुम्हांला समक्ष विचारून काय तें ठरवावं याकरितां आज आलो आहे मी-!''

ते अरुणकडे पहात थांबले. अरुण कांहींच बोलत नाहींसें पाहून, ते पुढें म्हणाले, ''अर्थात् बाबासाहेबांना मी सांगितलं होतंच, तुम्हीं जें काय सांगाल तें सारं आम्हीं करायला तयार आहोंत!.. मला वाटतं,..मी त्यांना त्या वेळीं सहा हजार व खर्च अशी आमच्या ऐपतीची साधारण कल्पना दिली होती.-'

बोलतां बोलतां ते पुन्हा थांबले. आपल्या बोलण्याचा परिणाम अरुणवर होत आहे कीं नाहीं तें आजमावण्याचा त्यांचा हेतु होता!-

तसल्या बाबतीत, लक्ष घालण्याची अरुणला कांहीच इच्छा नव्हती. त्यांनी सांगितलेल्या बाबांच्या मागल्या उद्गारांनी मात्र, त्याला क्षणभर समाधान वाटले व आपल्या मृत चुलत्याच्या त्या व इतर साऱ्याच प्रेमळ कृतींची स्मृति होऊन, त्याचे हृदय हेलावलें.

ते गृहस्थ प्रथम मुलीविषयीं कांहीं सांगण्याऐवजी, रकमांच्याच गोष्टी बोलत असलेले पाहून मात्र त्याला तसल्याहि मनःस्थितींत थोडेसें हंसूं आल्यावाचून राहिले नाही!-

जणूं काय, त्या मोहाच्या जोरावरच, आपण या पोराला, चुटकीसारख्या आपला जांवई करून घेऊं असें त्यांना वाटत आहे, अशी त्यांच्या बोलण्यांतील झांक, अरुणच्या लक्षांत आली व त्याबद्दल त्याला त्यांचा थोडासा रागहि आला-

तथापि सध्यांच्या समाजव्यवस्थेत, मुलींचे बाप विशेष अडलेले असतात, याची अरुणला जाणीव झाल्यामुळें त्याला त्याबद्दल थोडेंसें वाईटहि वाटलें. तेव्हा त्यांना सहानुभूतीच्या शब्दांतच नकार दिला पहिजे,...असेंच शेवटी अरुणच्या जात्या प्रेमळ स्वभावाला वाटलें.-

पण त्या वृद्ध गृहस्थाला कोणत्या शब्दांत आपलें मनोगत सांगावें हें ठरवीत अरुण क्षणभर थांबला. मग खिन्न पण हास्ययुक्त गंभीर चेहऱ्यानें त्यांच्याकडे, उत्तर देण्याच्या तयारीनें तो पाहूं लागला...

तोंच तो गृहस्थ त्यास हसत म्हणाले, ''मग काय? ठरतं आहे ना तुमचं?''

त्या प्रश्नानें तर अरुण जास्तच गोंधळला!

एका अज्ञात तरुण मुलीचें भवितव्य, आज या क्षणी आपल्या हातून ठरत आहे! कदाचित् लांब अंतरावरून याविषयींच, आतां ती विचार करीत असेल! आणि आपण तिला निराश करण्यास आपल्या या पुढील शब्दांनी कारण होणार आहोंत!- असल्या विचारमालिकेनें त्याच्या मनाची तारांबळ उडाली!

: ९३१ :

पण निदान प्रत्यक्ष तिच्या किंवा तिच्या फोटोच्या हृदयहीन प्रदर्शनास - परीक्षेच्या फार्साला - तरी आपण कारण झालों नाहीं, असें वाटून अरुणनें हळूच आपल्याशींच एक समाधानाचा सुस्कारा सोडला.

मग मनाला जरा नवा धीर आणून, तो त्या पाहुण्या गृहस्थाकडे कष्टी चेहऱ्यानें पहात, त्यांना म्हणाला, ''हे पहा! - मी आपला जरा चमत्कारिक स्वभावाचा मनुष्य आहे! तुम्हांला एकदम सांगितलेलं बरं, कीं, हें कांहीं शक्य नाहीं! सध्यांच्या मनःस्थितींत तर - मी तुम्हाला सरळ, नाहींच म्हणून सांगणं बरं!- पण रागावूं नका हं मात्र!-''

''छे! छे! असं करून कसं चालेल बरं?'' ते गृहस्थ अरुणकडे पाहून कांहींसे कृत्रिम हास्य करीत म्हणाले. ''तरुण मंडळीनींच नको का याचा विचार करायला? - काय? संसार थाटायची अजून किती दिवस वाट पहाणार तुम्हीं?...आणि असं पहा,... मी म्हटलं त्याहून निराळी कांहीं तुमची इच्छा असली, तर तिचाहि आपण विचार करूं या कीं!... पण''

अरुणला त्यांच्या शब्दांचा एकंदर रोख कळून चुकला. त्यांच्या चिकाटीची त्याला थोडी गंमतच वाटली. त्याच्या मनांत विचार आला, ''कांहीं झालं तरी, त्यांच्या मुलीच्या आयुष्याचा प्रश्न तो. त्यामुळें त्याचं हें वागणं अगदीं स्वाभाविकच आहे.''

त्याकरितां अरुणनें आपली सहानुभूति तशीच कायम ठेवून, नकारात्मक मान हालवीत, अगदी



शेवटचा एकच विचार सांगावा, अशा धीरानें तो म्हणाला, ''नको, आपण या बाबतींत मला जास्त कांहींएक विचारूं नये!..मी अगदीं पूर्ण विचार करूनच, आपल्याला सांगितलं आहे!...''

: ९३२ :

''असं म्हणतां?..बरं तर! आम्ही काय अधिक सांगणार?'' असें म्हणत ते गृहस्थ खुर्चीवरून उठले.

नंतर राऊंडटेबलवरील आपल्या बॅगेचें हँडल हातीं धरीत व अरुणकडे पहात, ते क्षणभर थांबले. आणि मग एकदम जानव्यांतील किल्ली काढून, बॅग उघडण्यासाठीं, दोन्ही हात तिच्यावर ठेवीत, ते म्हणाले, ''जरा आमच्या मुलीचं रूप, गुण प्रत्यक्ष पहा तर खरं!...''

आपण प्रथमच दिलेल्या स्पष्टोत्तराचा परिणाम या भल्या गृहस्थावर कांहींच न होतां अजूनहि याचा लघळपणा चालूच आहे, असें पाहून अरुणला बराच राग आला.

अजूनहि आपल्या मुलीचे फोटो दाखवून प्रदर्शन करण्याचा व तिच्यासाठीं, पैशाच्या रकमा सांगून आपल्याला मोह पाहण्याचा त्यांचा क्रम चालूच आहे, असें पाहून त्यांच्याबद्दल आतांपर्यंत अरुणाला वाटणारी नैसगिर्क सहानुभूति, एकदम निघून गेली, आणि किंचित् कुत्सित व बेफिकीर अशा नव्या वृत्तीचा संचार त्यांच्या मनांत एकदम झाला.

आणि म्हणूनच तो गंभीर मुद्रेनें त्यांच्या त्या निष्फळ धडपडीकडे पहात चटकन् कुचेष्टेनें म्हणाला, ''कां? तुम्हीं आपली मुलगी बॅगमध्यें भरून आणली आहे कीं काय मला दाखवायला?-''

या त्याच्या आकस्मिक कठोर शब्दांनीं मात्र तो गृहस्थ दचकला, ओशाळला, थोडासा रागावलाहि!- आणि शेवटीं कांहीं न बोलतांच, चारपांच मिनिटांत रागारागानें निघून गेला.

तो असा निघून गेल्यानंतर मात्र, अरुणला फार वाईट वाटलें. त्याच्या मनांत ''आपल्या मुलीच्या भावी सुखाच्या मोहानं त्यानं आपल्याला मूर्खासारखा त्रास दिला हें खरं! पण त्याच्याबरोबर आपण एवढे कठोरपणेंच, कांहीसे अमानुषपणेंच वागायला नको होतं!- '' असा विचार आल्यावांचून राहिला नाहीं.

: ९३३ :

आज कितीतरी वर्षांनी अरुण कमळामावशीच्या घरीं चालला होता.

जाईकडे मोठ्या आशेनें गेला, पण तीहि मिरेकडे गेलेली!...रमणिककडे गेल्यांवर त्याच्या इतक्या अवधीनंतरच्या भेटीमुळें त्याला आनंद झाला. पण मग तेथील विचारविनिमयामुळे तर त्याच्या मनांत नव्याच विचारांचा वणवा पेटला होता!...तेथून तो तसल्या विमनस्क स्थितींत घरीं येतो, तों त्या मुलीच्या बापाबरोबर घडलेला तो प्रसंग! त्यामुळें तर, शेवटीं, त्याला अगदींच अस्वस्थ वाटत होतें.

तेव्हा आपल्या एकलकोंड्या मनाचें समाधान करण्यासाठीं, कमळामावशीकडे जावें असें त्याला सारखें वाटूं लागलें!

आणि म्हणूनच, लौकर लौकर जेवून, शरदूला सांगून, अरुण घरांतून बाहेर पडला.

: ९३४ :

सोनगांव स्टेशनवर उतरून, तो बाहेर आला, तेव्हां त्याला त्याच्या लहानपणाचे कांहीं प्रसंग एकदम आठवले!

''अरुण, माझी आठवण ठेवा हं?'' असें गाडी वळवीत वळवीत हात वर करून, मिरा त्याला जेथें म्हणाली होती, तेथें तो आपली लहानशी बॅग घेऊन क्षणभर थबकला. त्यावेळीं त्या व त्याबरोबरच इतर साऱ्या पूर्वस्मृती जागृत होऊन, त्याचें हृदय फार अस्वस्थ झाले!-

''मिरा, आपली बालमैत्रीण, खरोखर किती भावनाप्रधान ती ! किती प्रेमळ!! त्यावेळीं तर आपलं प्रेम, आपला सहवास, हेंच जवळ जवळ तिच्या आयुष्याचं एकीएक ध्येय होतं!...आणि आज? कुणाला ठाऊक? -ती कुठं तरी आहे, एवढंच नव्हे तर पुष्कळसं शिकून कांहींतरी करीत आहे, हें तरी आपल्याला अगदी अलिकडे अलिकडेच समजलं!...पण मग तिच्या आपल्याविषयींच्या भावना? त्या तशाच कायम असतील का?'' -

तिची भेट झाल्याशिवाय, त्याला यांतलें कांहींच समजण्यासारखें नव्हतें. जड हृदयानें त्यानें एक निःश्वास टाकला.

: ९३५ :

तो असल्याच विचारांत पुढें जात होता. - 'साहेब, एक स्वारी' - असें कांहींतरी बडबडत, तोंपर्यंत त्याच्याभोंवती चारपांच टागेवाल्यांनीं गिल्ला केला होता. त्यापैकीं एकानें त्याची बॅग नेऊन आपल्या टांग्यांतहि ठेवली होती. त्याच्या मागून जाऊन, तो पुढच्या बाजूस बसलाहि होता.

जवळ जवळ दीड मैल असले विचार करीत, टांग्यांतून वाटचाल झाल्यावर, त्यानें एकदां सहज, चारी बाजूस दृष्टि फिरवली आणि मग, धांवणाऱ्या समोरील घोड्यांकडे थोडा वेळ पहात, त्यांच्या मागील फळीवर बसून, त्यांना हांकलणाऱ्या टांगेवाल्याकडेहि त्यानें उगीच दृष्टि टाकली.

आपण त्याला पूर्वी कधीं तरी पाहिलें असावें असें अरुणला एकदां वाटलें. म्हणून त्यानें आणखी एक दोनदां त्याच्याकडे निरखून पाहिलें.

मग मात्र तो आश्चर्यानें दचकला!- तो त्याचा व मिरेचा बालमित्र शिनवारच होता! -

: ९३६ :

खूपशा मोठ्या झुपकेदार मिशा ठेवल्यामुळेंच अरुणला तो प्रथम ओळखतां आला नव्हता.



आपल्या केसांच्या अस्ताव्यस्त झिपऱ्या डोळ्यावरून बाजूस करीत डोक्यावरील वांकडी टोपी त्यानें जरा मागें केली. विडीचा एक मोठा झुरका घेऊन, धुराचा लोळ सोडीत व ती दोन घोड्यांच्या मध्ये थांवत्या रस्त्यावर टाकीत, त्यानें जोरानें चाबूक ओढला व घोड्यांना चुचकारलें.

आपल्या त्या बालमित्राकडे अरुण, विस्मित नजरेनें पहात होता. अरुणनें त्याला पूर्ण ओळखिले होते. आणि शिनवारहि, मधून मधून मागें वळून त्याच्याकडे पहात होता.

अगदीं बरोबरीच्या नात्यानें बाळपणीं ज्याच्याबरोबर आपण स्वतः टांगेवाला होऊन 'टांगा - टांगा' खेळलों, तो आज खराखुरा टांगेवाला झाला आहे आणि त्याच्याच टांग्यांत आपण त्याचें गिऱ्हाईक-शेट म्हणून बसलों आहों या घटनेमुळे अरुणच्या मनाला थोडें दुःख झाल्यावाचून राहिलें नाहीं.

काळ व परिस्थिति यांनीं केवढी मोठीं घडामोड केली? आपल्यामध्यें केवढें मोठें अंतर निर्माण केलें. हें कळन आल्यामुळें त्याला अगदीं चमत्कारिक झालें. पण पूर्वीच्या आठवणींमुळें, त्याला वाटलें, इतक्या दिवसांनी आपला बालमित्र आपल्याला असा भेटला असतां, त्यानें आपल्याला ओळखलें नाहीं या सबबीवर, आपण त्याच्याकडे दुर्लक्ष करणें, त्याच्याबरोबर बोलणेंच टाळणें, हे मात्र योग्य होणार नाहीं.

: ९३७ :

अशा विचारानें, त्याच्या पाठीवर हळूच थाप मारून अरुण म्हणाला, ''कायरे, शिनवार, ओळखलंस का मला?''

''कसा नाहीं ओळखणार तुम्हाला, अरुणदादा?'' त्याच्याकडे आदबीनें हसून पहात शिनवार म्हणाला, ''पण तुम्हाला मी माझी जुनी ओळख द्यावी इतकी माझी पुण्याई कुठं आहे?...तुम्ही कुठं - मी कुठं!''

''चल! वेडा आहेस!'' त्यावर काय म्हणावें तें न समजल्यामुळें, अरुण पुढें म्हणाला, ''बरं हल्लीं काय टांग्याचा धंदा करतोस होय?...हा तुझा स्वतःचा टांगा वाटतं?...''

शिनवारचा चेहरा अगदीं गोरामोरा झाला. त्यानें एक निःश्वास टाकून खिन्न हास्य करून म्हटलें, ''स्वतःचा होता; - आतां नाहीं, अरुणदादा!- तुम्ही गेल्यावर मराठी पांचवींतूनच शाळा सोडली!-

आम्ही काय, दादा, कोळी लोक! व्यसनं लागलीं मला! ताडी, दारू, सगळं !- मग बाप मेला! खोपटं आन जमीन विकून हौसेनं टांगा घेतला. माझी गाडीजोडी हांकण्याची लहानपणीची हौस आठवत असलच, दादा तुम्हाला? आन् टांग्यांत पैदास बी वाईट नव्हती सुरुवातीला! पण, बघा, दारूंत बुडालो!.. शेवटीं कर्जात टांगाघोडे नाम्या पाटलाचे झालं. आन् त्याच्याकडेच, हल्ली, नोकर

आहे पंधरा रुपयाला! - बायको पांचसहा रुपये मजुरीचे मिळविते... पण अरुणदादा-''

शिनवार त्याच्या बाजूस तोंड फिरवून, निराश चेहऱ्यानें पाहूं लागला. इतक्यांत, अरुणला त्याच्या तोंडातून ताडीचा उग्र वास आला. त्यामुळें अरुणनें सहजिकच एक क्षणभर तोंड वाकडें केलें.

''मी करतों तें सारं वाईट, हे सगळं समजतं मला अरुणदादा -''

अरुणकडे पाहून शिनवार म्हणाला, ''पण माझा इलाजच चालत नाहीं, - त्याला मी काय करूं? बायकोची आणि माझी मिळकतदेखील मला पुरत नाहीं! मारवाड्याचं थोडं कर्जहि आहे? चाललंय..हें असंच आतां आमचं आयुष्य, अरुणदादा!-''

शिनवारनें एक मोठा निराशेचा निःश्वास टाकलेला पाहून, अरुणला अतिशय दुःख झालें पण त्यावर, त्याच्याकडे काहीं इलाजहि नव्हता! तो काहींच बोलला नाहीं.

: ९३८ :

''आतां कुठं मावशीकडे चाललां, दादा?'' शिनवारनें, आपला टांगा त्या बाजूच्या फाटकाकडे वळवीत अरुणकडे विचारलें, ''फार दिवसांनी आला आपल्या गावाला!-''

अरुणनें त्याच्या त्या नंतरच्या पांच चार प्रश्नांना अर्धवट उत्तरें देत आजूबाजूस पाहिलें. सोनगांवचा तो परिचित प्रदेश, त्याच्या लहानपणीं होता तसाच आतांहि अगदीं शांत, एकाकी दिसत होता.

याच प्रदेशांत ते तिघे खेळगडी अनेकवेळां, बालिश गप्पा मारीत, फिरत असत-

त्यांच्यातला एक शिनवार- तो त्या क्षणीं त्याच्याजवळ होता!

पण त्यावरून, त्याला मिरेची आठवण झाली!- आणि त्यानें पटकन् शिनवारला विचारलें, ''कायरे, त्यानंतर कधीं तुला पाटलांची मिरा भेटली होती का, शिनवार?-'

कमळामावशीचें घर समोरच दिसत होतें!

शिनवारनें टांगा थांबविला- आणि अरुणकडे पाहून तो एकदम म्हणाला, ''आज दुपारपर्यंत नव्हत्या पहिल्या, दादा; पण आज स्टेशनवर अगदीं त्यांच्यासारख्या कुणी दिसल्या- मीं त्यांना ओळख न देतांच गाडीचे पासिंजर धरायला गेलो!-''

''म्हणतोस तरी काय, शिनवार?'' अरुण टांग्यांतून, बँग घेऊन उतरतांना अतिशय आश्चर्यानें त्याच्याकडे पाहून म्हणाला.

''होय अरुणदादा!'' शिनवार टांगा वळवीत म्हणाला, ''जातांना मिराताईनें एकदम माझ्याकडे चमकून पाहिलंहि. त्यांच्याबरोबर आणखी कुणी बाई आन् बुवा बी व्हते!- त्या चांगल्या झाल्यात!- पांडरं पातळ न्येसल्या व्हत्या!- पण....दादा....आज त्या इथं कुणाकडे आल्या असतील, कुणास ठाऊक!... कुणी सांगावं? - कदाचित मला भरमबी झाला असेल तसा!...बरं, अरुणदादा, माझे



पासिंजर खोटी आहेत टांग्यांत!...ओळख ठेवा!''

शिनवारच्या लांब जाणाऱ्या टांग्याकडे पहातां पहाता, अरुण आश्चर्यानें मिरेविषयीं विचार करीत होता.

इतक्यांत त्याला एकदम आठवण झाली, शिनवारनें आपल्याकडून भाडेंहि घेतले नाहीं. पण तोंपर्यंत त्याचा टांगा लांब निघूनहि गेला होता!-

त्यानें एक निःश्वास टाकिला व तो कमळामावशीच्या घराकडे वळला!-

: ९३९ :

दारांत टांगा उभा राहिला, म्हणून भाऊ व मुलें लगबगीनें, दारांत योऊन पहातात तों अरुण आपली बॅग हातांत घेऊन, त्या सगळ्यांकडे हास्यमुद्रेने पहात येत होता.

''कायरे, येईन असं कुठं म्हणाला नाहींस काल, आमच्याकडे?'' भाऊ त्याच्याकडे पाहून प्रेमानें म्हणाले, ''गाडी नसती का आली स्टेशनवर? असा एकाएकींसा आलास?''

काय उत्तर द्यावें तें अरुणला समजेना.

''आलोंऽ! झालं...'' असें कांहीं तरी म्हणून, त्यानें हातांतील बॅग बाकावर ठेवली.

बऱ्याच दिवसांनीं तो सोनगांवला आला होता! त्याच्याभोंवतीं जमून, त्याला सत्रा प्रश्न विचारणाऱ्या, कमळामावशीच्या मुलांना, कौतुकानें उत्तरें देत देत, अरुण थेट स्वयंपाकघराकडे वळला!-

चुलीजवळ कमळामावशी व गंधा बसल्या होत्या. मावशीजवळ एका बाजूस वाटलेल्या पुरणाचें पातेलें होतें. दुसऱ्या बाजूच्या ताटांत एकावर एक ठेवलेल्या पुरणपोळ्यांचा उंच थर पडला होता. आणि समोरच्या मळलेल्या गोळ्यांतून घेतलेल्या थोड्या थोड्या कणकेंत पुरण भरून, ती गंधाकडे लाट्या करून देत होती!- गंधा पोळ्या लाटीत होती. मावशीजवळच्या चुलीवरील चपटा तवा तापला होता!-

अरुणला अकस्मात् आलेला पाहून, बसल्या बसल्या त्याच्याकडे प्रेमानें हंसून पहात, कमळामावशी म्हणाली, ''कुठं बुवा आम्हां गरीबांकडे, आज एकदम, इतक्या दिवसांनी उंबराचं फूल उगवलं?- फार वर्षांनीं आठवण झाली आमच्या खेडेगांवची म्हणायची!...''

तव्यावरील पोळी हळूच फिरवून, तिच्यावरील पीठ फडक्यानें झाडीत झाडीत, कमळामावशीनें, अरुणला पुन्हां प्रश्न केला, ''काल सांगितलं नाहींस तें, मला, अगदी गाडींत बसेपर्यंत?''

''तुला असंच चकित करायचं होतं मला!'' असें अरुण हंसून म्हणाला.

: ९४० :

अगदी संध्याकाळ होत आली, तरी आपल्या मावशीच्या जिवाची, धगधगत्या चुलीजवळील, ती

धडपड पाहून, त्याचें हृदय पिळवटल्यासारखें झालें होतें, म्हणून तो शेवटीं तिला पुन्हां म्हणाला,- ''काय ग हें मावशी? कशाला एवढा त्रास घेतेस? साऱ्या दुपारभर हीच यातायात चालली असेल ना तुझी?''

अरुणच्या त्या सहानभूतीच्या शब्दांनी कमळामावशीला थोडें बरं वाटलें.

ती त्याच्याकडे हंसून पहात म्हणाली, ''वेडा आहेस अरुण! आम्हा बायकांचा जन्म हा असाच! बाळा, त्रास होतो खरा कमीजास्त; पण आपल्या माणसांसाठीं नको का करायला सारं? श्रम झाले तरी मनाला समाधान लाभतं बाळा!''

तिच्या त्या शब्दांतील प्रेमळपणा पाहून, अरुणला गहिवरल्यासारखें झालें तरी पण त्यानें तिला मुद्दामच खोंचक विनोदी स्वरानें विचारलें, ''हो हो तर! 'आपली माणसं' म्हणजे कोणकोण ग मावशी?''

त्याच्या त्या शब्दांतील मावशीच्या घरच्या सावळ्या गोंधळी कारभाराविषयींची विनोद खोच, कमळामावशीला समजून आली. पण ती सरळपणेंच त्याला म्हणाली, ''दुसरी कोणरे, बाळा? तूंच पहा- आतां घरांतलीं हीं सारीं मुलं आहेतच! 'आईऽभूक!' केलें त्यांनीं कीं, त्यांना दोनतीनदां तरी हातावर घालायला पाहिजे!- बरं पाहुणे मंडळी घरांत कुणीना कुणीतरी असतातच! तेव्हा पंगतींत जास्त कमी लागतंच कधींमधीं! आणि मग आपण एकदां कधीं करणार; तर गल्ली,...गड्यांची पोरं, हींसुद्धां आपलींच नव्हेत का? त्यांना दोनदोन तरी हातावर घालायला पाहिजेत!...झालं, आतां तूंच पहा ना! हिशेब कर!- पहाटापासून, हा उद्योग चालला आहे! जेवल्याबरोबर पुन्हा बसलों आम्ही दोघी! आतां ह्या एवढ्याच राहिल्या आहेत. त्या मुलांना नकोत? उद्या सकाळी बघ चट साऱ्या संपतील!- मग आतां कमी कमी म्हणजे किती करायचं सांग बरं? आम्हाला बाबा हल्लींच्या लोकांसारखं एवढंच तेवढंच करीत, डब्यातलीं जेवणं आणि घडीचे संसार नाहीं मांडता येत!''-

पोळ्यासारख्या क्षुल्लक खाद्य पदार्थाबाबत, कमळामावशीचा तो आपल्या माणसांचा लांबलचक तपशीलवार हिशेब ऐकून, अरुणला क्षणभर हंसू आलें!

पण त्या मागची, तिची श्रेष्ठ त्यागी वृत्ति पाहून, तिच्याविषयींच्या आदराने त्याचें हृदय उचंबळलें. त्याला पटकन् वाटलें, ''हा सुद्धां मोठा स्वार्थत्यागच नव्हे का? कीं स्वार्थत्याग म्हणजे वर्तमानपत्रांत फोटोसह छापूनच यावा लागतो?''

: ९४१ :

इतक्यांत ''घे रे अरुणदादा, गरम गरम!'' असें म्हणत गंधानें पोळी व दूध त्याच्यापुढें आणून ठेविलीं-



भिंतीला ओडगून ठेवलेला जवळचाच पाट त्यानें स्वतःच मावशीजवळच ठेवला; त्यावर तो बसला. बशींतील पुरणपोळ्या दुधांत बुडवून तो मावशीबरोबर इकडच्यवा तिकडच्या गप्पा मारूं लागला-

तेवढ्यांतच सुधीरनें, हंसत हंसत, एका हातांत अरुणची व एका हातांत दुसरी बॅग, उचलत नव्हती तरी फरफटत घेऊन, तो अरुणजवळ आला; व येतां येतां खिदळून तो मोठ्यानें म्हणाला, ''ओऽऽ! आमच्याकडे दोन पाहुणे! आमच्याकडे दोन पाहुणे!''

अरुणनें आपली बॅग ओळखली व त्याच्या दुसऱ्या हाताकडे त्यानें कुतुहलाने पाहिलें; तों त्यावर लिहिलें होतें - ''मेरी होप, एम.ए. एस.टी.सी.''-

अरुणनें खातां खातां आश्चर्यानें एकदा आश्चर्यानें एकदां त्या अक्षरांकडे व एकदां कमळामावशीकडे पाहिलें व तिला जिज्ञासेनें विचारलें, ''कोण ग मावशी? कोण ही पाहुणी?''

''तुझ्या ओळखीचीच आहे ती, - अरुण!'' कमळामावशी पोळीची एक नवी लाटी तयार करतां करतां, अरुणकडे पाहून, सौम्य हास्य करीत म्हणाली, ''झालीच तिची आतां परत येण्याची वेळ! कसल्या तरी कामाला गेली आहे, स्टेशनवर आपली सारवट गाडी घेऊन!''

''मेरी होप? आपल्या ओळखीची? ?''...अरुण, हात धुवून, चहा पितां पितां गोंधळलेल्या नजरेनें, कमळामावशीकडे पहात, हातांतील कप हातांतच ठेवून, थबकला!-

इतक्यांत ओटीवरुन, पुन्हा सुधीरचा मोठ्यानें आवाज ऐकू आला, ''गाडी आली! गाडी आली!''-

''म्हणजेच 'मेरी होप' आली!- '' या कल्पनेनें, अरुण भरभर चहा पिऊन उठला; आणि ही आपल्या ओळखीची बाई कोण असावी? याचा विचार करीत, उत्कंठित मनानें स्वयंपाकघराच्या दाराकडे पाहूं लागला-

: ९४२ :

मुलांच्याबरोबर बोलत बोलत, मेरी होप स्वयंपाकघराकडे येत होती- अरुण अगदीं अधीर झाला होता. त्याची दृष्टि दारावर खिळलेली होती.

इतक्यांत, ती दाराजवळ येऊन, कमळामावशीला हंसत हंसत म्हणाली, ''मावशी, काय करते आहेस ग?''-

पुढें येता येतां कमळामावशीजवळ बसलेला व आपल्याकडे भांबावल्या नजरेनें पहात असलेला अरुण अनपेक्षितपणें दिसतांच, - ती केवढ्यानें तरी दचकून गप्प बसली!

अरुणहि तिच्याकडे पाहून तितकाच दचकला. समोर मेरी होप म्हणून आतांपर्यंत मावशीसकट सगळी संबोधित असलेली उंचनीच, मोहक तरुण स्त्री दिसत होती खरी; पण त्याला समजावयास वेळ

लागला नाहीं - ती त्याची बालमैत्रीण - मिरा पाटीलच होती!-

: ९४३ :

''मिरा पाटील म्हणजेच मेरी होप?-'' त्याला प्रथम तें अगदीं अशक्यच वाटलें! पण मिरा तर समोर प्रत्यक्षच दिसत होती! - मग ती होती तरी कोठें आतांपर्यंत? ख्रिश्चन झाली कीं काय?

कशी? केव्हां? कां? -

अरुणला आपल्या मनाच्या त्या साऱ्या भरभर उड्या मारणाऱ्या प्रश्नांना, उत्तरें देतांच येईनात!- म्हणून तो मिरेकडे विस्मय, आनंद वगैरे सर्व भावनांनीं पण आनंदित चेहऱ्यानें पहात राहिला.

मिरा पांढरें शुभ्र पातळ नेसली होती. किंचित फिकट गुलाबी रंगाचा पोलका तिच्या सावळ्या वर्णालाहि शोभत होता. काळ्यासावळ्या पण रेखीव चेहऱ्यावरील पूर्वीचा पोरकटपणा जाऊन, तेथें प्रेमळ गांभीर्य दिसत होतें...

दोघेंहि एकमेकांकडे पाहून अशी गोंधळलेलीं दिसतांच, कमळामावशी क्षणभर गप्पच राहिली. नंतर ती मिरेला म्हणाली, ''काय ग मिरे, अशी लांब लांब कां उभी राहिली आहेस? ये ना!--माझं कांहीं एवढं सोवळं नाहीं बाई!- तिथं पाट घेऊन बस कीं अरुणजवळ!-''

तसें पाहिलें, तर कमळामावशी लौकिकदृष्ट्या एका खेडेगांवांतील अशिक्षित स्त्री! पण तिच्या शब्दांतील ह्या उदार दृष्टीनें मिरेला तिच्याविषयीं अतिशय आदरभाव वाटला.

तिनें नुसतें हंसत हंसत, खिडकीजवळ भिंतीला ओडगून असलेला पाट खाली ठेवला व ती त्यावर बसली.

: ९४४ :

बसतां बसतां, कमळामावशी व अरुण यांच्याकडे मिरेनें आपली दृष्टि वळवली. आपल्याकडे उत्सुक प्रेमळ दृष्टीनें पहात असलेल्या अरुणकडे, स्नेहानें पाहून ती एकदा मंद हंसली.

पण फार दिवसानंतरच्या भेटींत वाटणाऱ्या संकोचामुळें, कमळामावशीलाच तिनें प्रथम प्रश्न केला, ''हे केव्हां आले? काल तर तूं म्हणालीस, अरुणनां पत्र लिहून बोलावलं पाहिजे आपल्याला म्हणून..! एकाएकीं आले वाटतं? अस्सं!..बरं झालं चला! आम्हांला तरी तेंच पाहिजे होतं!''

आपल्याला ह्या बोलावणार होत्या!...याचा अर्थ मिरेची आपल्याला अगदीं चालू घटकेपूर्वीच भेटण्याची इच्छा होती कीं काय?...कां? कशाला? या मनाला पडलेल्या प्रश्नामुळें किंचित् गोंधळलेल्या नजरेनेंच मिरेकडे पहातां अरुण म्हणाला, ''हो मी येणार, हें मावशीला ठाऊकच नव्हतं!...पण तूं कां बोलवणार होतीस मला मुद्दाम इतक्या वर्षांच्या अज्ञातवासानंतर?''--

''म्हणजे तुम्हांला केवळ भेटण्याचीसुद्धां इच्छा नसावी वाटतं आम्हांला?'' मिरेनें हंसून अरुणला



प्रश्नरुपानेंच उत्तर दिलें.

तिचा चेहरा पूर्वीसारखाच गंभीर होती. पण त्यांत अरुणच्या भेटीविषयींचे अगत्य व तिचा नैसर्गिक प्रेमळ स्वभाव अरुणला स्पष्ट दिसत होता.

त्यामुळें तिच्या त्या एकदम विचारल्या गेलेल्या उलट प्रश्नानें तर त्याला एकदम बावरल्यासारखेंच झालें!...

पण तरी तो मंद स्मित करीत थोडें गोंधळून कां होईना...म्हणाला,-''तसं नाहीं ग!...तूं इतके दिवस होतीस तरी कुठं? कांहीं पत्ता नव्हता! आणि आतां एकदम मला भेटण्याची तरी इच्छा तुला, इतक्या दिवसांनी कशी...कां झाली? हें कोडं कां पडणार नाहीं बरं मला? दुसरं म्हणजे मावशीला तरी तुझ्याविषयीं हे सारं काय माहिती?''

अरुण प्रत्येक क्षणाला खरोखर जास्त जास्तच गोंधळला जात होता!...त्याची ती गांगरलेली स्थिती पाहून, मिरा व कमळामावशी कांहीं न बोलतांच, त्याच्याकडे पहात मंद मंद हंसत होत्या.

: ९४५ :

असेंच एकमेकांकडे शांततेनें पहाण्यांत थोडा वेळ गेला; - तेवढ्यांत मिराच आपली स्नेहपूर्ण दृष्टि अरुणकडे रोखून त्याचा गोंधळ दूर करण्यासाठीं म्हणाली, ''त्याचं असं झालं आहे, अरुण,...तुम्हाला जशी मी आज प्रत्यक्ष भेटले, तशीच कमळामावशीलाहि कालपरवांच प्रथम भेटले!- पण मावशीला मात्र माझ्याविषयीं- सगळंच जरी नाहीं तरी थोडंफार- माझ्या पत्रांमुळें समजलं होतं आतांपर्यंत!...एवढंच!- परवां, आमच्या मिशनमधल्याच येथील मिस्. आयर्व्हिंगबाईला, आमच्या शाळांच्या बाबतींत भेटायला म्हणून, मी एकाएकीं इकडे आले!- इतक्या जवळ आल्यानंतर, मावशीला भेटल्याशिवाय मला कांहीं रहावेना. इथल्या मुक्कामाच्या तीनचार दिवसांत, दोनतीन वेळां इकडे येऊन गेल्यावर, काल संध्याकाळींच कुठं मावशी आल्यावर मला भेटली...मुद्दाम आले होते तें माझं इथलं कामहि संपलं होतं अनायासं! आणि भेटल्यानंतर मावशी कांहीं ऐकेना! म्हणून शेवटीं, तिला कबूल केल्याप्रमाणं, आज तिच्याकडे एक दिवस पाहुणी रहायला आले आहे!...इथं येते, तों तुम्ही अचानक भेटलां!...समजलं सारं आतां?''

''मिरेविषयीं तुला इतकी माहिती होती, मावशी!'' अरुण किंचित् रागानेंच मावशीकडे वळून पहात म्हणाला, ''तर मग, मला इतके दिवस, त्यातंलं कांहींच कसं कळवलं नाहींस ग तूं?''

कमळामावशीनें एकदां मिरेकडे पाहिलें; मग ती अरुणकडे वळून, सौम्य स्मित करीत, त्याला म्हणाली, ''माझी सगळी कैफियतच तुला देते हं आतां, अरुण ! मग तर झालं ना?..सांगू ना ग मिरे याला सगळं?''

: ९४६ :

आपल्याकडे पहात असलेल्या मावशीकडे एक प्रेमळ कटाक्ष टाकून, बसल्या ठिकाणावरून उठत उठत, मिरा हंसून म्हणाली, ''हं...सांग सांग!..मलाहि दोन तीन पत्रं लिहून टाकायची आहेत...आणि मावशी, हें बघ!..एक तार देते महत्त्वाची लिहून!..ती पोस्टापर्यंत पाठवायची व्यवस्था करशील ना ग? गेलीच पाहिजे अगदीं आतां''....

''हो, हो, पुन्हां गाडी पाठवू दुसरी जोडी जोडून, म्हणजे झालं!'' कमळामावशी ओटीकडे वळत असलेल्या मिरेकडे पाहून म्हणाली.

आणि मग, गंधाकडे वळून ती म्हणाली, ''जा पाहूं, गंधा, तूं! तिची लिहिण्याची व्यवस्था कर. किती? थोडं राहिलं आहे ना पीठ? मी करीन सारं-''

गंधा व मिरा निघून गेल्यावर, कमळामावशीनें, कांहीं न बोलतांच एकदां अरुणकडे हंसून पाहिले. तो रागानें पण गोंधळूनच तिच्याकडे पहात होता-

आपल्या समोरील पसारा मावशीनें पटकन् थोडासा आवरता घेतला; आणि मग, एक लहानसा निःश्वास टाकून, सस्मित चेहऱ्यानें, अरुणकडे पुन्हां पहात, ती म्हणाली, ''हं! आतां सांगते हं सारं तुला, हळूहळू!- रागावूं नकोस''-

नंतर राहिलेल्या पोळ्या करीत करीत मावशी सांगत होती; अरुण सारें गप्प राहून उत्कंठेनें ऐकत होता!-

: ९४७ :

''मावशीभाच्यांचं हितगुज संपलं का?'' स्वयंपाकघरांत शिरता शिरतां मिरा मोठ्यानें म्हणाली.

''हो, हो. हितगुज संपले आणि माझं कामहि संपलं!''- कमळामावशी पोळ्यांचें ताट कपाटांत ठेवून, हात धुण्यासाठीं पाणेऱ्याकडे जातांना, हंसून म्हणाली.

''मिरा घरांतून एकाएकी बाहेर पडली, ती थेट लहानपणीं ओळख झालेल्या त्या प्रेमळ मिशनरी बाईकडे-काइंड होपकडे- कोल्हापुरजवळील तिच्या गांवीं गेली. काइंड होपच्या मदतीनें तिनें सारें शिक्षण संपवले. काइंड होपच्या समाधानासाठींच, शेवटीं, ती मृत्युशय्येवर पडली असतांना, मिरेनें आपण होऊन बाप्तिस्मा घेतला आणि तिची मुलगी ''मेरी होप'' बनली! - आज तेथील सर्व संस्थांची सूत्रें मिरेच्याच हातीं आहेत...'' वगैरे कमळामावशीनें सांगितलेल्या माहितीवर विचार करीत करीत, अरुण पूर्वीसारखाच निमूटपणें जवळच्या पाटावर बसला होता. -

मिरेला आंत आलेली पाहून, त्यानें तिच्याकडे पाहिलें. ती हास्यमुद्रेने त्याच्याकडे पाहूं लागली पण तो कांहींएक बोलला नाही.



मिरेची दृष्टि अरुणच्या हृदयाचा ठाव घेत होती.

नंतर पुढें येऊन, खिडकीजवळ उभी रहात, कमळामावशीला मिरा म्हणाली, ''मावशी, झालं ना तुझं काम? माझ्या चहा वगैरेच्या भानगडींत कांहीं पडू नकोस- इकडे येण्यापूर्वीच, माझं सारं यथास्थित झालं आहे. माझं कामहि कांहीं आतां राहिलेलं नाहीं!- चल पाहूं!-आपण आपल्या मागल्या आवारांत, इतक्या दिवसांनंतर गप्पा मारीत जरा पाय मोकळे करू या थोडा वेळ!- चल!- अरुण...तुम्हीहि चला हो!'' -

जवळ जवळ अकरा, बारा वर्षे मध्यें लोटलीं होतीं. तरीहि आपल्याला प्रेमानें हुकूम करण्याची मिरेची पद्धत, अजून बदलली नाहीं, असें अरुणला वाटलें व तो आपला राग विसरून तिच्याकडं स्नेहानें पहात, उठून म्हणाला, ''चल कीं ! पुरे झालं हं, मावशी, तुझं काम आतां!'' -

''हो, तुम्ही दोघं, इतक्या दिवसांनी, माझ्याकडे एकदम आल्यावर, मला तुमच्याबरोबर गप्पा मारण्याशिवाय दुसरं रे कसलं काम आहे?- असंच ना?''- अरुण मिरा यांच्याकडे, प्रेमळपणें हंसून पहात, कमळामावशी लुगड्याचे ओचे, पदर नीट करून म्हणाली.

तिघेंहि एकमेकांकडे स्नेहानें पाहून, सौम्यपणें हंसली!

नंतर स्वयंपाकघराच्या मागल्या दारानें पाठीमागच्या परसांत व आंबराईत फिरावयास जाण्यासाठीं, तशीच खेळीमेळीनें पुढें बोलत, तीं तिघें विहिरी जवळील गच्चीवर उतरलीं.

: ९४८ :

इतक्या वर्षांनंतर आपल्या लहानपणच्याच वातावरणांत, आतां असें फिरतांना, मिरा व अरुण दोघांनाहि, एक अगदीं अननुभूत असा नवाच उत्साह वाटत होता. आणि तीं दोघेंहि जुन्या स्मृती आठवून आठवून, हंसत खेळत, कमळामावशीला मोकळ्या मनानें प्रश्न विचारून भंडावून सोडीत होतीं.

आतां तीं दोघें मोठीं झालीं होतीं, पण त्यांचें बालपण जवळ जवळ कमळामावशीच्याच नजरेखालीं गेलेलें असल्यामुळें, त्या जुन्या आठवणींनीं तिच्याहि प्रेमळ हृदयाला वात्सल्याचें भरतें येत होतें.

मिरा गच्चीवर उभी राहून, मागून येत असलेल्या कमळामावशी व अरुण यांच्याकडे पहात होती.

चालतां चालतां, अरुण जागच्या जागींच थबकला व आपल्या बालमैत्रिणीला मनमोकळेपणानें म्हणाला ''मिरे, खेळतां खेळतां एकदां तुझ्यामागं लागलो होतो! या गच्चीवरून धांवता धांवतां, तू एकदम पाय निसटून, धपकन इथंच पडलीस! तुझं भोकांड पसरलेलं पाहून, काम करतां करतां, मावशी एकदम आली आणि रागानं, माझ्या पाठींत तिनं एक धबका दिला! मग काय? एकाबरोबर दुसऱ्याचं रडणं आणखी सुरू झालं...आठवतं? आठवतं ग तुला मावशी?''

तिघेंहि मोठ्यानें हंसूं लागलीं.

ते हंसूं ओसरल्यावर मावशी लटक्या रागानें व लडिवाळपणें अरुणकडे पाहून म्हणाली, ''आतां देऊं का रे एक धबका पाठींत तुझ्या?..''

''हो, हो!'' अरुणहि हंसून म्हणाला व त्यानें मावशीकडे पटकन् आपली पाठ केली.

''अहो पण मी तुमची दोघांची वाट पहात इथं हंसत उभी आहे! पडलेली नाहीं आणि माझं भोकांडहि पसरलेलं नाहीं!'' मिरा देखील मोठ्यानें हंसून, विनोदानें म्हणाली, ''आतां धबके देण्याघेण्यापेक्षां, चालूं लागा पाहूं पुढं!''

तिघेंहि मोठ्याने हंसत हंसत पुढें चालूं लागलीं.

: ९४९ :

विहिरीजवळील लिंबाचं झाड पाहून, मिरेनें थांबून मावशीला चौकसपणें विचारलें, ''याला कुठं लिंबं नाहीं ग दिसत? आम्ही तर, त्या वेळीं, हिरवी कोवळींच तोडून, तिकडे बेड्यांत जाऊन, सरबत करीत असूं! - दुसऱ्या कुणाची नाहीं, पण आजोबांचीच भीति आम्हांला फार! ते केव्हां काठी ठेकीत टेकीत येतील याचा नेम नसे! - पण तोंडानंच हो त्यांची सारी बडबड! काठीचा व त्यांचा असलेला नेहमींचा संबंध, आमच्यापर्यंत कधीच येऊन पोचला नाहीं!...नाहीं का हो, अरुण?...''

''हं'' म्हणत असलेल्या अरुणकडे व मिरेकडे पाहून कमळामावशी कौतुकानें तिला पुढें म्हणाली, ''आणि तुमच्या सरबताला लागणारी साखर? ती हळूच पुरवणारा हाच ना ग चोर तुमचा? - पण तुमच्या या चोरीचा राग येत नसे मला कांहीं! चोरून करंदं आणायला काट्याकुट्यांत शिरलांत, कीं मग मात्र मला खूप राग येई! खरं म्हणजे त्यापेक्षां भीतिच वाटे जास्त!''-

बोलत चालत विहिरीशेजारच्या कुंडीजवळ, तीं तिघें आलीं होतीं.

टोणगा रहाट फिरवीत होता. माळेला लावलेल्या बांड्या क्रमाक्रमानें भरत व रिकाम्या होत होत्या!- आणि सदू टोणग्याला काठी मारून हाकलीत होता.

''हा माझा अगदी आवडता उद्योग बरं त्या वेळचा. माझ्या शब्दांनीं काठीशिवाय देखील टोणगा चालत असे!'' अरुण हंसून, रहाटकडे व त्या दोघींकडे पाहून खेडवळ अभिमानानें म्हणाला.

मिरा व कमळामावशी, दोघी त्यावर कांहीं न बोलतांच हंसल्या. सदूहि त्या आनंदांत सामील झाला होता.

पण मिरेचें लक्ष, चोपेंतून वहात वहात खालीं येणाऱ्या पाण्यावरून, भरत असलेल्या कुंडीकडे व त्यांतील पाणी गटागटा पीत असलेल्या, चार पांच गुरांकडे लागलें होतें.

त्यांतील एका, खूर आलेल्या, रोडक्या, म्हाताऱ्या बैलाकडे पाहून, शेवटीं, ती कमळामावशीला



एकदम म्हणाली, ''कोण ग मावशी? आमच्या वेळच्या गाडीच्या जोडींतील डौल्या वाटतं हा?- अगदींच निकामी आणि म्हातारा झाला आतां हं!''

अरुणला, त्यांतलें कांहीं मुळींच ओळखतां आलें नव्हतें! पण मिरेनें मात्र बैलाचीसुद्धां इतक्या वर्षांनंतर ओळख ठेवली, हें पाहून त्यानें तिच्याकडे आपली दृष्टि, कौतुकानें वळवली.

: ९५० :

इतक्यांत, कमळामावशी मिरेकडे पाहून म्हणाली, ''हो. अगदीं बरोबर ओळखलंस, मिरे! डौल्याच ग तो! मामंजींच्या वेळची, त्यांच्या आवडीची जोडी ती गाडीची! आतां कोण तशी निगा राखतंय, मिरे, त्यांची?..यांची आपली कारकीर्द ही अशीच!- आमच्या बोलण्याला कांहीं किंमत आहे का घरांत? आपणच बोलावं आणि आपणच ऐकावं!- बरं खर्च कमी होतोय, अशांतलाहि प्रश्न नाहीं! चाललंय् - चाललंय् आपलं...झालं!''

असें म्हणून मावशीनें एक लांबच लांब निःश्वास टाकला.

मिराच पुन्हा मावशीला म्हणाली, ''आणि याच्याबरोबरचा हौशा बैल ग?''

''तो गेल्या वर्षीच पावसाळ्यांत मेला!'' कमळामावशीनें तिला कांहींशा दुःखानें उत्तर दिलें. ''म्हातारे झाले ग ते फार! आता हा डौल्या; तोसुद्धां आपले दिवस कसेबसे मोजतोय, एवढंच! जाईल केव्हां तरी लौकरच, आपल्या जोडीदाराला भेटायला, झालं!- अगं पेंडसुद्धां त्याला आतां चाववत नाहीं!- चाललंय!- इतकीं दुसरीं रोडकीं गुरं आहेत दारांत, त्यांत हा एक! त्यांत पुन्हा निकामी पडलेलाना तो?''

अरुणचा मागें वियोग झाला. त्या वेळीं त्या दोघांनीं हीच जोडी एकमेकांशीं प्रेमळ गप्पागोष्टी करीत, स्टेशनपर्यंत, हांकलीत नेली होती?-

मिरेच्या मनांत, पुन्हां पुन्हां, तीच स्मृति जागृत होत होती.

त्या रमणीय प्रसंगाच्या स्मृतीचा मधला दुवा असा हा आतां एकटा डौल्या बैलच राहिला! आणि तोहि बिचारा लौकरच, कमळामावशी म्हणते तसा, नाहींसा होईल!-

या विचारानें मिरा, चालता चालतां आपल्याशींच किंचित् दचकली!

''अरुणच्या व आपल्या ऐतिहासिक पूर्वसंबंधाचीहि, त्या क्षणी अशीच अवस्था आहे का?'' असा प्रश्न मिरेच्या मनांत, त्या वेळीं डोकवल्यावांचून राहिला नाहीं.

: ९५१ :

अरुणलाहि, त्या प्रसंगाची व त्या बैलाच्या जोडीची त्या वेळीं आठवण होत होती!

पण आजोबांच्या वेळची सारी शिस्त, निगा, आता भाऊंच्या वेळीं, साफ नाहींशी झाली! या

जाणिवेनें रंजीस झालेल्या, कमळामावशीच्या चेहऱ्याकडे, किंचित् सहानुभूतीनें पहात, तो गप्पच राहिला.

आंबराईतून तीं तिघें इकडे तिकडे फिरत होतीं. आजोबांनी लावलेली बरीचशीं कलमें, खुरटलेलीं व सुकलेलीं पाहून, अरुणला एक जुना प्रसंग आठवला!-

त्या वर्षीं, सारीं झाडें आंब्यांनीं अगदीं लवलीं होतीं. हजारांनी आंबा घरांत पडला होता. आजोबांच्या पद्धतीप्रमाणें अर्थात्च एकहि फळ विकावयाचे नव्हतें! साऱ्यांना- अंमलदार, सावकार, मित्र यांच्यापासून तों घरच्या गड्यांच्या पोरापर्यंत- आंब्यांच्या पाट्याच्या पाट्या वाटूनहि, शेवटीं, बरेच कुजलेले आंबे मागल्या शेणखईत भिरकून द्यावे लागत होते! - आणि त्यानंतर, पावसाळ्यांतील बाठे फोडून आपली सोनेरीं पिंगट चकाकणारीं कोमल पानें हलवीत शेंडा बाहेर काढणारी आंब्यांची रोपटीं!-

तें दृश्य, जसेंच्या तसें त्याच्या डोळ्यांसमोर उभें राहिलें; आणि त्यानें कमळामावशीला विचारलें, ''हल्लीं पूर्वीसारखीं धरतात का ग कलमं?''

कमळामावशीनें, न बोलतांच गंभीरपणें एक मोठा सुस्कारा टाकला. मिरेकडे व अरुणकडे पाहून, खिन्नपणे हंसून, ती शेवटीं कळवळून म्हणाली, ''बाळांनो, कितीतरी वर्षांनी, तुम्ही माझ्याकडे अशीं अचानक आलांत! माणसं, गुरं, झाडं, साऱ्या-साऱ्याकडे, सहज पहातां पहातां... तुम्हांला जें दिसतं आहे,...मामंजींच्या आणि यांच्या वेळच्या साऱ्या व्यवहारांत जी मोठी तफावत तुम्हांला आढळते आहे...ती सारी परिस्थिति दिवसाचे चोवीस तास व वर्षांचे बारा महिने, याच उघड्या डोळ्यांनी मला पहावी लागते! तुम्हीं मघांपासून सहज म्हणून, मला एकामागून एक प्रश्न विचारतां अहां! पण प्रत्येक वेळीं, मी हे असले निःश्वासच टाकते आहे! - मला समजत का नाहींत या गोष्टी? सारं समजतं! पण करायचं काय? सांगायचं कुणाला? आणि कशाला? कसली सत्ता का आहे माझ्या हातांत? आम्हीं आपल्या काय? -सकाळपासून संध्याकाळपर्यंत, घरांत आणि चुलीजवळ, मरमर काम करणाऱ्या, क्षुद्र अशिक्षित बायका! आमची कुणाला किंमत का आहे, वेड्यांनों - ?''

: ९५२ :

कमळामावशीनें पुन्हां एक मोठा निःश्वास टाकला, व ती थोडा वेळ अगदीं गप्प राहिली.

अरुण व मिरा एकमेकांकडे व कमळामावशीकडे खिन्न चेहऱ्यानें मुकाट्यानेंच पहात होतीं !-

''आतां आमचं आयुष्य तें काय? गेलंच सगळं जवळ जवळ!'' कमळामावशीनें हळूच एक लहानसा निःश्वास टाकला व ती पुढें म्हणाली, ''मुलागा चांगला सधन आहे! शिकला आहे कॉलेजपर्यंत! माझ्या पोरीलाहि मी माझ्या हातांत होतं आणि मला येत होतं तेवढं गृहकृत्य शिकवलं



आहे!''

पुन्हां एक उसासा टाकून मावशी थोडा वेळ थांबली; व मग पुढें म्हणाली, ''तरी पण, या सगळ्या नवीन पोरींचं काय होणार आहे ग, मिरा, यापुढं?..का त्यांच्याहि आयुष्याचा इतिहास आमच्याच सारखा तसाच आणि तोच ठरणार आहे? बायकांनीं पोरं सांभाळायचीं, हेंच आमचं आयुष्य ना? आम्हांला आमच्या स्वतःच्या अशा लहानसहान सुखांची, आयुष्याची कल्पनाच नाहीं का? मी तर निरक्षर नसले तरी आपली बोलून चालून एक अशिक्षित असहाय स्त्री! आम्हांला कसले आले बाई विचार, या चाकोरींतूनच, एक एक दिवस ढकलतांना?...पण काय ग मिरा? तूं आतां खूपशी शिकलीस आहेस. तेव्हां तूं कधीं याचा विचार केला आहेस का?''

मिरा कांहींच बोलली नाहीं थोडा वेळ! मावशीचा तो प्रश्न साधा वाटला तरी अतिशय गहन होता.

मग किंचित् विचार करून आपल्याकडे एकाग्र दृष्टीनें पहात असलेल्या मावशीकडे उलट पहात, ती थोडी गंभीर होत म्हणाली, ''मावशी, आहे खरी अशी स्थिती! फार चमत्कारिक प्रश्न विचारते आहेस, तूं मला? तरी पण मला वाटतं, विचारशक्तीवर आधारलेलं आर्थिक स्वातंत्र्य, स्वसंरक्षणक्षमता हींच स्त्रीच्या आयुष्याची सध्यांच्या काळांतील दोन चाकं आहेत! - आणि त्याला जोडणारा आंस म्हणजे शुद्धमनस्क, प्रेमळ, व्यक्तित्वाची वाढ व जोपासना, ती सारीं बळकट व्हायला मदत करणं हेंच आईबापांचं त्यांच्या बाबतींतील आजचं परिस्थित्यनुरूप ठरणारं कर्तव्य मला वाटतं....याउपरच्या गोष्टी त्यांच्या किंवा तिच्या कुणाच्याहि हातीं नाहीत!- मला वेडी म्हटलंत तरी मी म्हणेन, तें भवितव्याच्या अज्ञात परिस्थितीच्याच हातचं सारं-

: ९५३ :

इतक्यांत, विहिरीजवळून, गंधाची लांबची हांक ऐकूं आली-''ए आईऽ...ही वासंती बघ टेबलावरून पडली खालीं! आणि सारखी रडते आहे भोकांड पसरून! माझं कांहीं ऐकतच नाहीं आहे! ए आईऽ..''

''आले हं बाईऽ!'' कमळामावशी मिरेचें बोलणें ऐकतां ऐकतां, मध्येंच घराच्या बाजूस वळून, कांहींशा खिन्नतेने हंसून, गंधेला उद्देशून मोठ्यानें म्हणाली!

आणि मग, मिरेकडे वळून तिला ती म्हणाली, ''मला बाई तुझं हे गहन विचारशास्त्र कांहीं समजत नाहीं!- आतां या पोरी मात्र बघ...त्यांना आपल्या आईचं एखादं मूल थोडा वेळ सुद्धां सांभाळतां येत नाहीं! अगदीं घटकाभर देखील! लागलीच चिडतात, ओरडतात, आपल्या! त्याचं म्हणणं काय? सारं कांहीं आईनं, रहाटाला जुंपल्यासारखं, करीत रहावं सारखं!...आतां, असल्या या चिरचिऱ्या,

अशक्त, दुर्बल मुली! त्यांना उद्यां मुलंबाळं झाली म्हणजे त्या काय ग करणार आहेत स्वतःचं?...त्या वेळीं कोणता पुरुष का धांवून येणार आहे त्यांच्या मदतीला? येईल म्हटलं तरी आईहि धांवून येण्यासारखी नाहीं! मग सांग मला, पुरुषांना बाई आपली सुखं असतात! आणि आम्हांला ग?...अशा स्थितींत या मुलींचं भवितव्य तरी काय?-''

: ९५४ :

कमळामावशी, चालतां चालतां पुन्हां एकदां खिन्नपणानें हंसली! मिरा आणि अरुण त्यांच्याकडे पहात, शेवटीं, ती लांब जात म्हणाली, ''पण आम्हांला ते करावंच लागतं! आतां सारं आयुष्यंच गेलं तसं! त्यामुळं मन रहात नाहींना मेलं!...आमचं हें आतां आपलं असंच सारखं धांवाधांवीचंच आयुष्य चालायचं!...कांहीं का असेना! तुम्हांला तरी आज वादविवादाला विषयी झाला एक माझ्यामुळं नाहीं? बऱ्याच दिवसांनीं भेटलां अहां एकमेकांला!- तेव्हा चालूं द्या तुमचं!...त्यांतून कांहीं झालंच निष्पन्न, तर त्याचा उपयोग तरी होईल पुढल्या पिढीला वागायला!...आमच्या अरुणची कोण बायको होणार असेल ना, तिच्या बाबतींत तरी त्याला तसं वागतां येईल! नाहीं रे, अरुण?- मग जाऊं मी? जातें हं!...संध्याकाळच्या स्वयंपाकाची आणि तयारी करायची आहे मला.''

अगदी प्रेमानें त्या दोघांकडे पाहून, कमळामावशी मोठ्यानें हंसली!...आणि आपल्या रडणाऱ्या मुलीला व वाट पहाणाऱ्या चुलीला समजावयाला घराकडे लगबगीनें चालूं लागली-

अरुणच्या लग्नाचा उल्लेख व त्यांतील कमळामावशीची खोंच, मिरेच्या पटकन् लक्षांत आली. त्यामुळें ती दचकली व तिनें अरुणकडे चमकून वळून पाहिलें. पण अरुणचें तिच्याकडे लक्षच नव्हतें!..

लांब जात असलेल्या आपल्या कमळामावशीकडे एकाग्रतेनें तो टक लावून पहात होता...

त्या क्षणीं त्याला अगदीं सारखें सारखें वाटत होतें- मावशीचें सारें आयुष्यच सहनशीलपणाचें, अगदी त्यागी वृत्तीचें, प्रेमळ व उज्ज्वल उपकारांचेंच; नव्हे का?...

: ९५५ :

''आपली मावशी अगदीं आहे तशी प्रेमळ, नाहीं मिरे?- मावशी लांब निघून गेल्यावर अरुण त्या तंद्रींतच, गहिंवरून येऊन मिरेला म्हणाला.

''हं!'' मावशीविषयींच्या सहानुभूतीनें उचंबळून येणाऱ्या त्याच्या हृदयाची धडपड मिरेला प्रतीत झाली. ती थोडी हंसूनच पुढें म्हणाली, -

''आणि अरुण तुम्ही?''

त्या तिच्या अनेपक्षित प्रश्नानें; अरुण एकदम गोंधळला. बावरलेल्या चेहऱ्यानें, त्यानें मिरेकडे दृष्टि फिरविली. तों, आपल्या चेहऱ्यावरील मघांपासून दिसत असलेले गांभीर्य, तसेंच कायम ठेवून,



अरुणकडे प्रेमळ नजरेनें ती पहात होती. तो काहींच न बोलतां खालीं पाहूं लागला!

ती दोघेंहि थोडे वेळ अशींच मुकाट्यानें बसली होतीं - मिराच शेवटीं अरुणला म्हणाली, ''चला, अरुण, आपण त्या पलीकडच्या गवताच्या गंजीजवळ जाऊन बसूं - अजून सूर्यास्त व्हायला पुष्कळ वेळ आहे!....'' कांहींएक न बोलतां अरुण तिच्यामागून चालत होता. त्याला मिरेचें आतांपर्यंतचें चमत्कारिकपणें गेलेलें एकाकी धीरगंभीर, महत्त्वाकांक्षी पण आशानिराशेनें भरलेले आयुष्य आठवत होतें. त्यामुळें मधल्या कांहीं काळांत सुप्त असलेले तिच्यावरचें प्रेम, आपुलकी, त्याच्या मनांत पुन्हां वेगानें दाटत होती. मिरेचा पूर्वीचा प्रेमळ मोकळेपणा तसाच असलेला पाहून त्यांच्या मागील सहवासांतील अनेक प्रसंग त्याच्यापुढें फिरून उभे राहिले!- विशेषतः अत्यंत उत्कट भावनाप्रधानतेनें त्याच्याबरोबर ती वागली, तो त्यांच्या पूर्वायुष्यांतील वियोगाचा शेवटचा प्रसंग तर त्याला पुन्हा पुन्हा आठवूं लागला!-

: ९५६ :

वईच्या पलीकडे, मिरेला आपलें खोपटें दिसत होतें. पण तें आतां तिच्या मालकीचें नव्हतें. त्यांत तिचा बाबा नव्हता, आई नव्हती, दोघेंहि निघून गेलीं होतीं!...

आईबापांच्या आठवणीनें तिच्या डोळ्यांत, किंचित् काळ पाणी दाटलें. पण तें, चालतां चालतां, हळूच पुसून तिनें पुढें पाहिलें.

अगदीं बालपणीं, अरुण, ती व शिनवार, ज्या जागीं पेंड्यांत लपंडाव खेळत खिदळत असत, त्या ठिकाणाजवळ आल्यावर त्या तिघांच्याहि मनोमय बालिशमूर्ती, तिला डोळ्यांसमोर दिसूं लागल्या.

त्यानंतरच्या थोड्या मोठ्या अल्लड आयुष्यांत, अरुणबरोबर याच आंबराईतील पेंड्यांत अनेकदां, कांहींना कांहींतरी, मराठी-इंग्रजी वाचीत,- त्याच्या सहाय्यानें त्या वाङमयाचा रसास्वाद घेत, त्यांतील पात्रांशीं हंसत रडत तिनें दिवसच्या दिवस घालविले होते!

: ९५७ :

अरुणलाहि तो समोर पसरलेल्या पेंड्यांचा थर व त्यामागील गसड्या, यांवरून एक लहानपणाची आठवण झाली.

एकदां याच ठिकाणीं, शिवाशिवी खेळतांना, मिरेचें 'बोचकें,' एकदम वरून दोनतीन गसड्यांच्या उंचीवरून, धाडकन् खालच्या पेंड्यांत आदळलें होते. स्वतःला लागलें म्हणून नव्हे तर त्या गंमतीमुळें शिनवार व अरुण खुदकन् हंसले, म्हणून मिरा खट्टू होऊन रडूं लागली होती!...त्यामुळें आपल्याला एकदम वाईट वाटलें आणि आपण तिला अगदीं निर्विकार प्रेमानें जवळ घेऊन, कुरवाळीत, तिची समजूत घातली होती.

हे आठवून अरुणला वाटलें, आज त्या प्रसंगाच्या अगदीं उलट घडत आहे! - परिस्थितीनें आपण एकदम गांगरलों आहों, आणि मिरा आपण होऊन आपणांला काहींतरी सांगण्याचा विचार करून, आपल्याला समजावण्याकरिता येथे येऊन धडपड करीत आहे.

मनांतील असल्या या विचारांमुळें पुन्हां भानावर येऊन त्यानें उगीउगीच मिरेकडे, दृष्टिक्षेप टाकला-

: ९५८ :

मिराहि, त्याच्याकडे मुकाट्यानेंच पहात होती. पण साऱ्या पूर्व स्मृती जागृत होऊन, ती आपल्या मनांतल्या मनांत तिच्या त्या बालसंवगड्याच्या मधल्या आयुष्याचा विचार करूं लागली! - तिला आपलें आयुष्य आठवत होतें! - अरुण तर त्या वेळीं तिच्या समोरच बसला होता व त्याच्या मधल्या आयुष्याची कमळामावशीमुळें तिला काल थोडीफार जास्त माहिती झाली होती!

आज दुपारींच, टांगा हांकलीत जात असलेला शिनवार, तिनें स्टेशनवर पहिला होता. त्याच्याविषयीं सहज बोलणें निघाल्यावर, कमळामावशीनेंच शिनवारच्या आयुष्याला लागलेलें वांकडें वळण व त्याचा झालेला अधःपात, यांविषयीं तिला सांगितले होतें! -

या तीनहि प्रकारच्या पण विशेषतः शिनवारविषयींच्या विचारानेंच, तिनें हळूच शांतता मोडीत, अरुणला म्हटलें, ''अरुण, तुम्हांला आपला शिनवार भेटला होता ना?...त्याच्याच टांग्यांतून आलां म्हणे तुम्ही दुपारी?''

तिच्याकडे पाहून अरुण म्हणाला, ''हो...त्यानंच सांगितलं मला स्वतःविषयीं सारं!''

दोघेंहि थोडा वेळ कांही बोलली नाहींत. मग मिरा म्हणाली, ''आतां राहिलीं आपली दोघांची आयुष्यें!... तीं अजून ठरायचीं आहेत!...''

: ९५९ :

त्या संदिग्ध उद्गारांनी अरुणला तिच्या मनांतलें, कांहींच नीट समजेना.

त्याला क्षणभर वाटलें, त्या तिच्या उद्गारांत पूर्वीच्याच स्मृती जास्त भरलेल्या आहेत! -

आणि त्या उद्गारांचा रोख, पूर्वीसारखा भावनाप्रधानतेनें रसरसलेला नसला, तरी त्यांत त्या दोघांचीं आयुष्यें एक करावीं असें तिनें सुचविलें असावें!

एवढ्यावरूनच त्याच्या प्रेमळ हृदयाला लागलींच वाटलें, तसें कां होऊं नये?

तिच्या-आपल्या सहवासामुळें, तिच्या योग्यतेमुळें, प्रेमळपणामुळें, निष्ठावंत त्यागांमुळें, तिला तो हक्कच आहे!...

: ९६० :

तसल्याच स्वरूपाचा तिचा यापुढला प्रश्न असला, तर त्याला उत्तर काय द्यावयाचें, याविषयीं



विचार करीत तो मधून मधून तिच्याकडे पाही व इकडे तिकडेच पहात असल्याचा बहाणा करी.

तेवढ्यांत मिरा ती शांतता मोडून एकदम म्हणाली, ''त्यापैकीं अरुण, माझं तर आयुष्य आतां बहुतेक ठरलंच आहे! - माझ्या वैयक्तिक कर्तृत्वाला आतां पूर्ण वाव आहे, आणि माझ्यावर, माझ्या मनाप्रमाणं चालवितां येण्यासारख्या एका संस्थेची जवळजवळ सर्वस्वी जबाबदारी येऊन पडली आहे...आतां, माझी पूर्वीची, फाजील भावनाप्रधानता गेली, अरुण! - मधली निराशाहि बरीचशी ओसरली!- माझ्या यापुढील आयुष्याकडे, मी अगदीं आशावंत हृदयानं कर्तव्यदृष्टीनंच पहात आहे!..''

या तिच्या अगदींच निराळ्या व अनपेक्षित शब्दांनी अरुण किंचित् दचकला. आयुष्यांतील मधल्या घडामोडी व वाचावयास दिलेलीं, मावशीला मागें आलेली एक दोन पत्रें यामुळें वास्तविक हें त्याला थोडें आधींच समजावयास पाहिजे होतें! - तिच्या हृदयाचा प्रेमळपणा केवळ वैयक्तिक सुखाकडे पहाण्यापेक्षां आता जास्त व्यापक झाला होता, हें त्यानें जाणलें होतें.

: ९६१ :

मिरा ख्रिश्चन कां झाली याचा मात्र त्याला अजून पूर्ण उलगडा झाला नव्हता. त्या घटनेमुळें त्याची तिच्याविषयींची आपुलकी, अगर स्नेह, कमी झाला होता, असें नव्हे! पण, तिच्या मनाची धांव तरी त्या बाजूस कशी गेली, तें त्याला समजून घ्यावयाचें होतें.

म्हणूनच त्यानें तिला विचारलें, ''मिरे, मला तुझ्या मोठेपणाविषयीं, लहानपणीं ज्या अपेक्षा वाटत असत, त्या आतां माझ्यासमोर मूर्त स्वरूपांत दिसत आहेत!- त्या वेळीं तुझ्याविषयीं जें प्रेम वाटे-तुझ्या अंगच्या गुणाविषयीं जो आदर वाटे तो कांकणभर वाढलाच आहे. - पण तरी, तूं धर्मत्याग मात्र कसा व कां केलांस हें कोडं मला अजून जरा देखील सुटत नाहीं!...''

मिरा त्यावर थोडा वेळ उगीच राहिली.

नंतर म्हणाली, ''अरुण, कोडं पडण्यासारखीच ती गोष्ट आहे!..आज मी ज्या पदाला, ज्या चांगल्या स्थितीला पोहोचले आहे, त्याला मी तरी दोन व्यक्ति प्रत्यक्षाप्रत्यक्ष कारण समजते. एक सुरुवातीचें तुम्ही व इथून निघून गेल्यानंतर, दोन वर्षापूर्वीपर्यंत, जिनं एखाद्या बालकाप्रमाणें माझा हात धरून, धीर देत देत, मला इथपर्यंत आणून सोडलं ती माझी ममा-काइंड होप!''

थोडा वेळ थांबून मिरा पुढें म्हणाली, ''तुमच्यामुळं, माझ्या मनांत, महत्त्वाकांक्षा रुजल्या. तुमच्यामुळंच माझ्या आयुष्याला त्या वेळीं दुःखदायक वाटणारं व आता समाधान प्राप्त करून देणारं, निराळं वळण लागलं.-''

मिश्र भावनांनी अरुण तिच्याकडे पहात होता.

मिरा पुढें सांगूं लागली, ''पण त्यानंतर माझी ममा! ..परधर्मीच, परकी, हाडामासांचा जरासुद्धा

संबंध नसलेली ती साध्वी!.. तिनं माझ्यावर निरपेक्षपणें, पोटच्या गोळ्याप्रमाणं प्रेम केलं! - मी तिच्या अगदीं हातांतील बाहुली होते! ती क्षुद्र बुद्धीची असती, तर-तर काय?- तिनं जरा जरी आपली इच्छा प्रकट केली असती, तरी माझ्या अगदीं सुरवातीच्या असहाय्य, दीन, अनाथ परिस्थितींत मी तिच्या येशूच्या कोकरांच्या कळपांत गेले असते!-''

मिरा, बोलतां बोलतां थांबली. तिची प्रेमळ ममा, तिच्यासमोरच तिला दिसत होती जणुं. तिच्या अदृश्य मूर्तीकडे व अरुणकडे एकदम पहात ती झटकन् पुढें म्हणाली, ''पण माझ्याकडे पहाण्याची तिची दृष्टि ती नव्हती!- अगदीं मरणाची पाळी येईपर्यंत ती तसं कांहीं, एकदांहि बोलली नाहीं मला!- तिच्या धर्मावर, तिचा स्वतःचा मात्र फार विश्वास! ...श्रद्धाच तशी दांडगी?-''

क्षणभर निःश्वास सोडीत मिरा थांबली आणि मग अरुणला म्हणाली, ''मग, आतां सांगा, अरुण, अगदीं मरतांना, 'आपल्यामागं आपलं सर्व जीवितकार्य चालवणारी, आपल्याच धर्माची आपली एखादी मुलगी असती तर? ' असं मनांत उत्कटतेनं वाटून, ती सारखी तळमळत असलेली, मला प्रत्यक्ष दिसत होती. त्यावेळीं मी तरी काय करावं? ...आणि तिचं जगाकडे पहाण्याचं उदार धोरण तिचा प्रेमळपणा पाहून, तिची इच्छा पुरी करण्याचा माझा हेतु तिला मीच होऊन कळवला यांत काय चुकलं माझं? माझ्यासाठीं तिनं एवढं सारं केल्यावर, तिचा एवढादेखील माझ्यावर हक्क नव्हता का? सांगा?-''

: ९६२ :

मागची आठवण होऊन, थोडा वेळ मिरेचा कंठ दाटून आला. ती बोलतां बोलतां एकदम गप्प झाली!- तिच्या डोळ्यांतून, ममाच्या प्रेमळ सहवासांतील सारे प्रसंग आठवल्यामुळें अश्रू ओघळूं लागले!

थोडा वेळ दोघेंहि शांतपणे बसली होतीं. मग मिरा अश्रु पुसून पुढें म्हणाली, ''पण, आपण केलेल्या उपकारांची फेड अशा रीतीनं करून घ्यावी, इतकी क्षुद्र दृष्टि तिची कधीच नव्हती!- तिचा धर्म मी स्वीकारते, असं सांगितल्यावरहि, तिनं मला विचार करायला एक दिवसाचा अवधि दिला!- पण मग, तिला यामुळं अतिशय आनंद, समाधान लाभेल, याची मनाशीं पूर्ण कल्पना असल्यामुळं, माझा तिच्यासारखा त्या धर्मावर विशेष विश्वास नसतांनाहि, मी तिला दुसऱ्या दिवशीं सांगितलं, ''ममा, माझी श्रद्धा आहे त्या धर्मावर! - माझा विश्वास कायम झाला!''

त्यामुळे ममाला किती आनंद झाला होता; तें आठवून मिरा क्षणभर थांबली. त्या वेळीहि तें प्रत्यक्ष पाहून, तिला तिच्या आयुष्याचें एकटेंच एक समाधान लाभलें होतें!

सुरवातीस साऱ्या जगांत विशेष उत्कट भावना तिला जर कोणांविषयी वाटल्या असतील, तर त्या



अरुणविषयीं!- म्हणूनच त्याला ती प्रेमानें म्हणाली, ''आपल्या वियोगानंतर, साऱ्या भावना प्रयासानं बाजूस सारीत, त्या साऱ्या मी जिंकीत आले होते...आणि त्या नव्या चिमुकल्याशा माझ्या जगांत मला एकटी ममाच होती!- तेव्हां अरुण तिच्यासाठीं असला धर्मत्याग अगदींच तुटपुंजा होता! मला त्या तिच्या शेवटच्या दिवसाच्या मनस्थितीची आठवण झाली कीं वाटतें, एकट्या त्या प्रसंगावरच माझा सारा उत्साह, माझ्या मनाचा सगळा धीर, माझ्या पुढल्या साऱ्या आयुष्यांत कायम राहतील!''

: ९६३ :

ममाविषयींचें मिरेचें निरपेक्ष प्रेम, तिचा आयुष्यांतील धीर, त्याग, यामुळें अरुणच्या हृदयांत मिरेविषयींचा आदर तुडुंब भरून येत होता.

तो तिच्याकडे त्या दृष्टीनें पहात होता, इतक्यांत, मिराच पुन्हां त्याच्याकडे अगदी गोड हंसून पहात म्हणाली, ''मला माझा हल्लींचा धर्म हिंदुधर्मापेक्षां श्रेष्ठ वाटला, अशांतला हा प्रश्न नाहीं! कारण, नाहींतरी धर्म म्हणजे काय हो, अरुण? आपला आचारधर्म बाजूला ठेवला क्षणभर, तर मग मला तरी वाटतं, प्रत्येक खऱ्या विचारी माणसाचा स्वतःचा असा एक निराळाच धर्म असतो.''

मिरा आपल्या मनांतील सारा गंभीर भाव शब्दांत ओतण्याचा प्रयत्न करीत, थोडा वेळ थबकून पुढें म्हणाली, ''तो अगदीं उघड्या डोळ्यांनी, जगांतील प्रत्येक गोष्टींतील, प्रत्येक धर्मांतील, श्रेष्ठ, सर्वव्यापी तत्त्वं, स्वतःच्या मनाच्या प्रगतीसाठीं उचलीत असतो! तीं पचविण्याचा व कृतींत आणण्याचा प्रयत्नहि करीत असतो!- आतां जन्मानं मात्र कुणी हा, कुणी तो धर्म आपला असं सांगत असतात. आणखी, त्यांच्या मनाच्या प्रगतीप्रमाणं त्याला पटणाऱ्या तत्त्वांपैकीं, जास्तीत जास्त तत्त्वं ज्या धर्मांत सापडतील, तो धर्म त्याला आपलासा वाटतो, एवढंच!- म्हणून त्या वस्तुस्थितीला, मी तरी महत्त्व देत नाहीं!...मी आज धर्मानं ख्रिश्चन असले, तरी मला हिंदुधर्मांतील पुष्कळ गोष्टी आकलन करतां येत असतील, पटतहि असतील! तशीच दुसऱ्याहि धर्माच्या कांहीं बाबींविषयीं मला आपुलकी वाटत असेल! आणि म्हणून, मी कोणता एक धर्म दुसऱ्याहून कमी जास्त श्रेष्ठ ठरवीत नाही, की असल्या धर्मांतराला 'बाटणं' हा हलका शब्द वापरूं शकत नाही.''

: ९६४ :

अरुण गप्प बसून मिरेचा प्रत्येक शब्द आपल्या मनांत सांठवीत होता. मिरा थांबली केव्हां, तें विचारांत गुंग असल्यामुळें त्याला समजलेंसुद्धा नाहीं.

तोंच मिरा पुन्हां, त्याच्याकडे हंसून पहात म्हणाली, ''तुम्हांला काय वाटतं या बाबतींत, अरुण?''

मिरा त्याला मनापासून सांगत असलेले आपले विचार, अरुणला आवडत होते, पटतहि होते! आपल्यासमोर असलेल्या आपल्या बालमैत्रिणीकडे, श्रेष्ठ-कनिष्ठ असल्या दृष्टीनें, आतांपर्यंत त्यानें

पाहिलेंच नव्हतें पण तिच्या या सर्व प्रकारच्या उदार मतप्रणालीमुळें व विषयाविष्कारामुळें त्याचा तिच्याबद्दलचा मनांतील आदर मात्र जास्तच वृद्धिंगत झाला होता.

म्हणूनच, तो क्षणभर असल्या विचारांत व्यग्र होऊन शेवटीं म्हणाला ''मिरे, माणसाच्या आयुष्यांत चमत्कारिक घटना उत्पन्न झाल्या, तर तो आपलं श्रेष्ठत्व, आपल्यांतील नैसर्गिक सत्त्व, जास्तच उत्कटतेनं, उठवदार रीतीनं, प्रकट करतो, असं म्हणतात! तें मला तुझ्या उदाहरणावरूनच जास्त खात्रीपूर्वक पटत आहे!...ही माझी बालमैत्रीण मिराच मला हे सारं सांगत आहे का? याविषयी माझं मन मघांपासून सारखं शंकित होत राहिलं आहे!''

त्यावर मिरा व अरुण एकमेकांकडे पाहून अतिशय स्नेहानें हंसली!

मिरेचा मोठेपणा अरुणला त्याचक्षणी, त्याच्या साऱ्या आयुष्यांत पूर्णपणें समजून आला!-

***



# उपकारी माणसें

# -- आकाश गङा --

# विभाग ४ था

: ९६५ :

''आतां-माझ्या पुढील आयुष्याविषयीं तर तुम्हांला कल्पना आलीच!'' थोडा वेळ विचार करीत मिरा गप्प राहिली; आणि नंतर तिच्याजवळ बसलेल्या अरुणकडे हंसून पहात ती म्हणाली, ''पण तुमच्याविषयीं तुम्ही काय ठरविलं आहे?''

''माझ्याविषयीं?'' असें एकदम गांगरलेल्या स्वरांत म्हणून अरुण अधिकच गोंधळला. त्यानें एकदां मिरेकडे व सभोंवार पाहिलें, आणि पुन्हा मुकाट्यानेंच तो खालीं पाहूं लागला.

सूर्यास्त होत आला होता. हळूहळू काळोख दाटत होता.

अरुणला मिरेच्या सरळ प्रश्नाचें कांहींच उत्तर सुचेना. जणूं काय त्याला वाटलें, आपल्या दृष्टीसमोर फक्त काळोख पसरला आहे!

अशा अस्थिर मनस्थितींत त्याने समोर बसलेल्या मिरेकडे पुन्हा पाहिलें! पसरलेल्या गवतांत ती ऐसपैस बसली होती; आणि मधून मधून, हातांतील पेंड्याची एकादी काडी तोंडानें कुरतडीत, अरुणकडे शोधक दृष्टीनें पहात होती.

पेंड्यांत बसलेल्या मिरेवरून, अरुणला एकदम जाईची आठवण झाली. घालविलेल्या त्या रात्रीविषयींची त्याची स्मृतीहि पटकन् जागृत झाली.

''रवीन्द्र चत्तर्जी!- खरंच, मोठा उमदा, ध्येयवादी तरुण!- त्याला सिनेमांत लागलीच नोकरी लागली; म्हणून आपला फारसा सहवास होण्यापूर्वीच त्याची आपली फाटाफूट झाली!...त्यानंतर आजपर्यंत आपण तर आपल्याच सुखदुःखांत बेफिकीरीनें रममाण झालो होतो. आपली त्याची भेटहि झाली नाही? - आणि आतां ? छे! आतां ती कधींच होणं शक्य नाहीं!

आजच मुंबईहून येतांना गाडींत एक वर्तमानपत्र चाळतानांच तो त्याच्याविषयींचा चमत्कारिक मजकूर -

‘‘रवींद्र चत्तर्जी नांवाचा, येथील ‘‘सरडातिरडी प्रॉडक्शन्स्’’ मधील तरुण सारङ्गीकार, दहा दिवसांपूर्वी, संशयित परिस्थितीत मरण पावल्याचें वृत्त आम्ही या पूर्वी दिलेंच होतें!

जास्त माहितीवरून, आज असें समजतें कीं, मृताच्या शरीराजवळ पडलेल्या फुटक्या सारङ्गीच्या आंत एक लहानशी चिठी होती. त्यांत त्यानें अरुण नावाच्या आपल्या कोणा स्नेह्याला उद्देशून बंगालींतच दोन ओळी लिहिल्या होत्या.

‘‘अरुण, माझ्यासाठीं हें येथील वातावरण नव्हे! माझी गगनचुंबी ध्येयें मूर्खपणाची व निष्फळ आहेत, अशी आतां माझी खात्री झाली. मला जगणेंहि असह्य होत आहे. मी जातो. तूं तरी माझी आठवण ठेव.’’

या त्याच्या बंगाली स्नेह्याच्या पत्ता नाहीं. तरी त्यानें आत्महत्या केली हें आतां निश्चित ठरलें आहे. कंपनींत त्याला चांगला पगार मिळत होता असें समजतें. मग या आत्महत्येचें कारण काय?- याचा मात्र उलगडा होत नाहीं.’’

भावनाप्रधानतेमुळें त्यानें आपल्या आयुष्याला निराळेंच वळण लावलें! आणि आपण?...आपलेंहि तसेंच? आपलें तरी भवितव्य काय?

त्याच्या मनांतील असला गोंधळ जास्तजास्तच वाढत जाऊन, त्याला डोकें सुन्न झाल्यासारखें वाटलें.

: ९६६ :

आणि चत्तर्जींप्रमाणेंच आतां आठवण झालेली जाई!-

आजपर्यंत त्याच्या आयुष्यांता मिरा, मंजुळा व जाई या तिघींना निरनिराळ्या वेळीं स्थान मिळालें होतें. तिघींच्याहि सहवासानें, त्याच्या मनाला, त्या त्या वेळीं बरेंच समाधान प्राप्त झालें होतें.

त्यापैकीं मंजुळा व मिरा यांच्या चिरसहवासाविषयींच्या कल्पना तर त्याच्या मनांत, दोन भिन्न भिन्न वेळीं, कांहीं काळ तरी अगदीं स्थिरच झाल्या होता!- मंजुळा? खरोखरच प्रेमल तितकीच त्यागी!...तिच्या आयुष्याला तर आतां निराळें वळण लागलें होतें. त्यामुळेंच तिच्याविषयींचे त्याचें विचार अंधुक अंधुक होत गेले होते!-

या कारणानें त्याच्या मनःचक्षूंपुढें त्या क्षणीं मिरा व जाई या दोघीच प्रेमळ हास्य करीत उभ्या राहिल्या.

पण मग मधला सारा वियोगाचा काळ क्षणार्धांत नजरेआड होऊन त्याला वाटूं लागलें, ‘माझी मिरा व मी, आम्हां दोघांनाहि अजून चिरकाल प्रेम करण्याचा हक्क आहे.’

: ९६७ :



या विचारांतहि तो पुन्हां दचकला- मिरेची ती पूर्वीची भावनाप्रधानता आतां कोठें गेली? आतां ती इतकी गंभीर, शांत कशानें झाली? जी भावनावश होऊन वियोगापूर्वी आपल्याला अगदी घट्ट मिठी मारूं शकली तीच ही आपली बालमैत्रिण ना? - मग तिच्यामध्यें हा असला भयंकर फरक तरी कशामुळें घडला?

पण मग त्याला वाटलें, ‘याचं कारण तिचं हे धर्मान्तरच असेल!.. आधींच तिला तिच्या सामाजिक कनिष्ठतेमुळें, आपल्याविषयींच्या तिच्या प्रेमांत कांहीं गौणपणा वाटत होता! त्यांत आतां तर ती परधर्मांत गेलेली!- हेंच कारण असेल का तिच्या या साऱ्या गांभीर्याचं?-’’

पण तेंहि त्याला तसें विशेष खरें वाटेना.

कोणतेंहि कारण असलें तरी, आजच्या प्रसंगीच्या मिरेच्या त्या तसल्या त्यागी मौनाचें, तिनें दडपलेल्या तिच्या प्रेमळ हृदयाचें त्याला मनांतल्या मनात जितकें कौतुक वाटलें तितकाच रागहि आला.

तसल्याच भावनाप्रधान मनानें तिच्याकडे पहातां पहातां त्याचें हृदय उचंबळून आलें आणि तिचा हात एकदम हातीं घेऊन तो तिला अडखळत म्हणाला. ‘‘मिरे, मिरे, तूं स्वतांला व मला अशी फसवूं नकोस!...आपणां दोघांनाहि अजून एकमेकांची आयुष्यें पूर्वीप्रमाणेंच निगडित करतां येतील!...’’

: ९६८ :

मागें, याच खेडेगांवांतून एकाएकीं निघून जातेवेळीं वाटत होतें तितकेंच अरुणविषयींचें उत्कट प्रेम मिरेच्या मनांत आजहि वसत होतें! - पण मग तिनें त्याच वेळीं मोठ्या धीरानें आपल्या मनाशीं जो निश्चय केला होता तो अजूनहि तसाच कायम होता!-

मिरा दूर झाली! - त्या वेळीं प्रथम तिच्या भावनाप्रधान मनाचें दुःख थांबेना! एका निश्चयामुळेंच ती हळुहळू मनावर ताबा मिळवीत गेली, आपल्या आयुष्याला नवें वळण, नवें ध्येय लावण्यासाठीं इतकें दिवस झगडत आली.

ममांच्या अंतिम आनंद - समाधानासाठीं तिनें धर्मांतर केलें त्या वेळी दुसराहि एक विचार तिच्या मनांत डोकावून गेला होता! - तिच्या दृष्टीनें या धर्मांतरांने अरुण व ती या दोघांत अनायासेंच आणखी एक मोठा तट आपोआप उभारला जात होता!

त्या नव्या मनोमय समाधानामुळें व धैर्यामुळेंच, ममानंतर सर्वस्वी आपल्यावर पडलेल्या संस्थेच्या जबाबदारीकडे ती भावी आयुष्य या दृष्टीनें पाहूं लागली होती!

पण अरुणला आज तिनें समोर पाहिलें! त्या वेळीं त्याची तिच्याविषयींची स्नेहाळता पूर्वीं इतकीच कायम असलेली पाहून ती अगदीं विरघळली! -

ती बोलत होती; पण तिला आपले मन आवरण्यास प्रयास पडत होते. तिने मघां शेवटचा प्रश्न अरुणला विचारला होता; पण तिची छाती त्यावेळी धडधडतच होती.

: ९६९ :

आणि आतां तर बऱ्याच वेळच्या मुग्धतेनंतर, अरुणनें तिचा हात एकदम हातीं घेऊन तिच्या मनाचा तोलच घालविला होता! जी मनःस्थिती लपविण्याचा ती सारखा प्रयत्न करीत होती, जें टाळण्यासाठींच ती गेली दहा अकरा वर्षें सारखी धडपडत होती, तें सारेंच अरुणनें त्या आपल्या एकट्या प्रश्नानें व सहज हस्तस्पर्शानें डळमळीत करून टाकलें!

क्षणभरच तिच्या मनांत अतिशय मोह उत्पन्न झाला!-

पण मग, तिच्या विचारी मनानें पुन्हा तिच्या नबळ्या वृत्तींचा ताबा घेतला! तिचें विरघळलेलें हृदय पुन्हां स्थिर करतां करतांसुद्धां त्याचे कांहीं पाट तिच्या डोळ्यांतून ओघळूं लागले!

शेवटीं आपल्या हातांतील अरुणचा हात किंचित दाबून - ती घुटमळत्या शब्दांत त्याला म्हणाली, ‘‘ अरुण, तुम्ही किती उदार मनाचे हो!...तुमचा हा हात माझ्या हातांत असाच कायम रहाता तर मला किती आनंद झाला असता!’’

मिरा बोलतां बोलतां मध्येंच थांबली व तिनें एक निःश्वास टाकला.

‘‘मग?...’’ अरुणच्या दाटलेल्या कंठांतून हा प्रश्न बाहेर पडला व तो तिच्याकडे आशापूर्ण नजरेनें पहात राहिला.

‘‘पण नाहीं, अरुण!...’’ मिरा मन आवरून अस्पष्टपणें रुद्ध स्वरांत म्हणाली, ‘‘आतां तें शक्यच नाहीं!...आज माझ्या आयुष्याला त्याहून निराळी मोठी ओढ आहे!...माझ्यावर दुसरी एक जबाबदारी आहे!..दुसरंहि सांगतें,

अरुण!..माझ्यापेक्षां दुसऱ्या एका व्यक्तीच्या आयुष्यालाच आज तुमची जास्त जरुरी आहे!-’’

‘‘काय? म्हणते आहेस काय तूं हें मिरे?’’ अरुण अधिकच गोंधळून तिच्याकडे पहात ओरडला. त्यावर मिरेनें कांहीं न बोलतांच अरुणच्या हातांतील आपला हात सोडवून घेतला व त्याच्याकडे खिन्न दृष्टि टाकून ती सौम्यपणें हंसली.

त्या हास्यामागें तिच्या मनांत कल्लोळ करणाऱ्या अगणित भावना धडपडत होत्या. आणि त्यामुळें क्षणांतच तिचें हास्य विरलें; व तिच्या हृदयांतून निघालेला अफाट फोंफावणारा पूर बाहेर वाहूं लागला. दोन्ही डोळ्यांतून येणारे ओघळ मन्द मन्द खालीं उतरत एक झाले व तिच्या वरच्या ओठाशीं तो प्रबळ प्रवाह येऊन क्षणभर थबकला.

जणुं काय, तीनचार दिवसांपूर्वींच, आशानगरीला जाईबरोबर बोलतांना तिच्या ओठांतून बाहेर



पडलेला प्रत्येक शब्द, अजून तेथेंच रेंगाळत, त्या प्रवाहाला थबकवीत होता!

: ९७० :

आणि त्यांतच तो मागला मधला सारा इतिहास दडला होता!-

गेल्या आठवड्यांत जाई मिरेकडे आली त्या वेळीं तिनें तिला अगदीं मोकळ्या मनानें आपल्या हृदयाच्या अरुणविषयींच्या हळुवार भावना सांगितल्या होत्या.

मिरेच्या प्रेमळ मनाला, तिच्या आयुष्याच्या मधल्या काळांत, अरुण, ममा, जाई ही तीन महत्त्वाचीं केन्द्रें वाटत असत. त्यांतील जाई हीच मिरेची आशादेवी! पण मग त्याच जाईच्या त्यापुढील आयुष्यांत अकल्पित पालट झाला होता! तिच्या जीवनाला अगदीं अनपेक्षित असें नवें वळण लागलें होतें!-

मागें अकल्पितपणें आशानगरीहून जाई निघून गेली. त्या वेळीं तिचा वियोग मिरेच्या पोळलेल्या मनाला सुरवातीस बराच जाचला. त्यानंतर जाईचें भाबडें भावनाविवश स्खलन, शान्तारामाचा स्वार्थी व दुबळा विश्वासघात, अनैतिक मातृत्वास तिनें धिटाईनें दिलेलें तोंड, नन्दाचें चिमुकलें आयुष्य...या साऱ्या घटनांनीं त्या प्रेमळ गोड पोरीच्या मनांतील साऱ्या सुखस्वप्नांचा झालेला चुराडा व तिच्या आयुष्याला लागलेली भलतीच दिशा!...तें सारें ऐकून मिरेला आपल्या त्या प्रेमळ मैत्रिणीविषयीं अतिशय दुःखपूर्ण सहानुभूति वाटे!...तिच्या परिस्थितीबद्दल अतिशय दुःख होई!-

- त्यानंतर जाई मुंबईस आली. अचानक व अकल्पितपणें तिची व अरुणची गांठ पडली. ती स्वभावतःच प्रेमळ व आशावादी मुलगी...मागलें सारें विसरून ती अरुणकडे जास्त जास्त ओढली जाऊं लागली.

जाईनें पुढील पत्रांत तर मिरेला, अरुणविषयींचे आपले मनोव्यापार अगदीं उघडपणें कळविले होते. तिचा तो मोकळा स्वभाव पाहून, मिरेला त्या वेळीं वाटलें होतें, ‘‘बरं झालं आपण आपला जुना वृत्तांत जाईला सांगितला, त्या वेळीं अरुणचं नांव आपण तिला सांगितलं नव्हतं!...त्यामुळं आज तिच्या या सुखद भावनांत तरी आपण सहज वाटेकरी होऊ शकत आहों! आणि तिच्या सध्यांच्या एकाकी पण आशावादी मनाला....आयुष्यात...आपण आपली साधी सहानुभूति, उत्तेजन यांची तरी जोड देऊं शकतों!....’’

या मिश्र भावनेनें तिनें त्या वेळी, आपल्याशींच सुखदुःखाचा एक सुस्कारा टाकला होता खरा!... पण तरीहि तिच्या मनांत सुरवातीस कांही वेळ विचारांचें तुमुल युद्धच झालें होतें! तिच्या तोपर्यंतचें मनावरील सारें दडपण, मनाचा सारा निश्चय क्षणभरच डळमळला होता!

तिला वाटूं लागलें होतें, ‘‘आपल्या आयुष्यांत कधीं काळीं अरुणशीं आपलं मीलन होण्याचा

येणारा सुयोग आतां यापुढं आपण कायमचा नाहींसा करायला तयार होत आहों...जाई अरुणांना आपल्या देखत आपल्याकडून हिरावून घेत आहे...आणि आपण देखतां डोळां तें सारं सहन करीत आहों!...''

: ९७१ :

पण मग तिला मनापासून वाटे, ''आतांपर्यंत अशा त्यागासाठीं आपण आपल्या मनाची तयारीच करीत आलों आहों! - तीच वृत्ती कायम ठेवणं आपल्याला कांहीं जड जाणार नाहीं!...पण आपल्याला पुन्हां आशावादी करणारी जाई...ती स्वतः मात्र नव्या परिस्थितींत सध्यां एककीपणेंच घोटांळत आहे! - तिच्या आयुष्यांत यदृच्छया निर्माण होत असलेल्या या नव्या प्रेमाचा दुवा, आपण आपली रडकथा व आपल्या मनाचे प्रांजल व्यापार, तिला सांगून तिच्यापासून हिरावून घेणं, म्हणजे तिचे हातपायच लुले करण्यासारखं....तिचं पुढील सारं आयुष्य दुःखी करण्यासारखं होईल!....आपल्या मधल्या असहाय्य परिस्थितींत व मनस्थितींत जाईनंच आपल्याला कर्तव्याची व आशावादाची नवी दृष्टि दिली! तीच आपल्या भोंवतालच्या प्रेमळ वातावरणाचं त्या वेळीं एकमेव स्थान होती! तिच्या प्रेमळ व भाबड्या स्वभावामुळंच ती स्वतः मात्र दुबळी राहिली आहे. प्रेमाशिवाय ती आपल्यासारखी जगणं शक्य नाहीं; आणि म्हणूनच, दोघांनाहि दुःखी करण्यापेक्षां तिला तिच्यापुढं ओघानं चालून आलेल्या सुखाची धनीण होऊ देणं हेंच आपलं या वेळचं कर्तव्य!..''

आणि त्याच दृष्टीनें आपल्या आयुष्यांतील जाईचें स्थान पाहून, मिरेला वाटलें ''जाई म्हणजे आपल्याच तनमनधनाचा एक तुकडा आहे. तिच्या सुखदुःखांतच आपल्या सुखदुःखाचा समावेश होऊं शकेल!-''

: ९७२ :

याच विचारमालिकेंतून प्रवास केल्यावर, तिनें पुढील पत्रांत जाईला अरुणविषयींच्या तिच्या प्रेमांत अगदीं स्नेहपूर्वक उत्तेजन दिले होतें.

पण तरीहि उमद्या जाईला मिरा पूर्ण ओळखून होती. ''आपला व अरुणचा पूर्वसंबंध तिला अन्य रीतीनं मागाहून कधीं समजला तर ती उदार मनाची प्रेमळ पोर आपल्याला मागाहून दोष देईल. स्वतः दुःखी होईल! एवढंच नव्हे तर- शक्य तर आपल्या मार्गांतून बाजूस होण्याची ती आटोकाट व धाडशी धडपडहि करील. त्यापेक्षां आपणच तिला त्याविषयीं आधीं कळवून, अरुणविषयींच्या आपल्या मनःस्थितींतील पालट तिला सौम्य शब्दांत कळविणं हेंच जास्त हितकर!'' असें मिरेनें ठरविलें व जाईला त्यानंतरच्या तिच्या पत्रांत तें सर्व मोकळेपणें लिहिलें होतें.

या थोड्या दुःखी, दडपलेल्या हृदयानेंच जाईच्या अरुणविषयींच्या स्नेहशील शुद्ध प्रेमाकडे ती



आतांपर्यंत पहात आली होती.

जाईशीं वागतांना सुरवातीच्या अरुणच्या कठोर व बेफिकीर वृत्तीची तर मिरेला प्रथम भीतीच वाटली होती. पण मग त्याच्या वृत्तीशीं एकरूप होऊन विचार केल्यानंतर तिला त्यांत विशेष चमत्कारिक कांहींच वाटेना. तेव्हां तिनें जाईला आतांपर्यंत वारंवार अरुणवरील तिच्या मुग्ध प्रेमांत धीरच दिला होता.

अशी जवळ जवळ तीन साडेतीन वर्षे गेलीं होतीं. मधून मधून मिरेच्या मनांत स्वतःच्या उत्कट भावनांचे वणवे पेटत. पण तरीहि आतांपर्यंत दिवसेंदिवस आपल्या मनांतील त्या साऱ्या उत्कट भावनांवर ती जास्त जास्त ताबा मिळवीत आली होती.

: ९७३ :

नोकरी सुटल्यावर अरुणला स्टेशनवर पोहोंचवून, जाई जाधवबाबांच्या घरीं गेली, त्याच दिवशीं तिनें मिरेला उघड्या मनानें एक पत्र लिहून पाठविलें. आणि नंतर मिरेनेंच आग्रहानें बोलावल्यावरून जाई लहानग्या गोपासह आशानगरीला येऊन पोहोंचली होती.

बऱ्याच दिवसांनी दोघी मैत्रिणी एकमेकींना भेटल्या.

त्या दिवशीं रात्रीं तिच्या संस्थेच्या लहानशा खाजगी सभेला हजर राहून मिरा जरा उशीरांच परत आली होती.

जाई घरीं एकटीच काय करीत असेल, असल्या विचारांत ती आपल्या खोलींत गेली. तिनें लुगडें बदललें. आणि पलीकडच्या खोलींत डोकावलें तों गोपा कॉटवर गाढ झोपला होता, व जाई टेबलाजवळ दिवा लावून कांहींतरी लिहितां लिहितां, टेबलाजवळ डोकें टेंकून, खुर्चीवरच स्वस्थ बसली होती.

हळूच जवळ जाऊन तिनें पाहिलें, तो जाईच्या डोळ्यांतून हळुहळू पाणी ठिबकत आहे, व मधून मधून ती उसासे सोडीत आहे.

मिरेला तिच्या दुःखाचें कारण समजलें नाहीं तरी आपल्या मैत्रिणीचें तें दुःख पाहून, तिचें हृदय अगदीं भरून आलें.

: ९७४ :

ती हळूच तिच्याजवळ गेली. तिच्या पाठीवर तिनें हळुवारपणें हात ठेवला व तिला म्हणाली, ''जाई, वेडे पोरी, किती वेळ अशी बसली आहेस ग?... आणि काय चाललं आहे एवढं तुझ्या मनांत? मला सांग ना ग!...''

जणूं काय असले प्रेमळ शब्द व हळुवार स्पर्श यांचीच जाईला भूक लागली होती. तिनें एकदम मान वर करून मिरेला घट्ट मिठी मारली. आणि ती स्फुंदत व अडखळत म्हणाली, ''मिरे, मला आतां

वारंवार वाटतं...तूं माझी जिवलग मैत्रीण! पण तुझ्याच अरुणांना मी तुझ्याकडून हिरावून घेण्याचा प्रयत्न करीत आले आहे आणि करणार आहे!''

''जाई, काय वेड्यासारख्या कल्पना डोक्यांत आणते आहेस ग आज तूं ह्या?...'' मिरा आपल्या मनांतील चलबिचल तशीच आंतल्या आंत दडपून जाईला म्हणाली होती, ''मी तुला पहिल्यापासून नाहीं का सांगत आलें आहे सारं कांहीं?....खोटं कशाला सांगूं?...होय, मला अरुणांविषयीं एकदां अगदीं उत्कट आकर्षण होतं खरं!...त्यांचं प्रेम हेंच मी माझ्या आयुष्याचं केंद्र म्हणत होते!...

जाई भेदरल्या हरिणीसारखे डोळे करून मिरेकडे पहात होती.

- तोच मिरा पुढें म्हणाली, ''पण आतां!...तुझ्यामुळं आणि माझ्या ममामुळंहि....माझ्या आयुष्यांत एक प्रकारची क्रांती घडून आली आहे!...माझे डोळे आतां निराळ्याच भवितव्याकडे अगदी आशेनं लागले आहेत... आतां मला माझीं अशीं निराळीं स्वतंत्र ध्येयं आहेत....कर्तव्यं आहेत, असं वाटतं!...आणि जाई, तुझ्या प्रेमळपणा, तुझं सौंदर्यं...तुझा खेळकर उत्साह! हे सारं पाहिलं की मला तर वाटतं तूंच खरोखर अरुणांना जास्त योग्य आहेस!....''

''मिरा, मला पक्कं ठाऊक आहे कीं, तूं फसवते आहेस स्वतःला आणि मला!'' जाई तिला स्नेहानें बिलगून हळुहळू म्हणाली, ''तूं म्हणशील पुष्कळ ग!..पण अरुणांना मी योग्य तरी आहे का?....माझ्या आयुष्याच्या इतिहासाचीं मागली पानं पहा बरं! कुठं तूं आणि कुठं मी!... आणि खरं सांगूं का मिरे, मी तुला? माझा स्वीकार अरुणांच्याकडून होणंच मुळीं अशक्य!...त्यांच्यासारख्या उदात्त प्रेमळ जीवांना केवळ बाह्यांगाच्या सौंदर्याची मातब्बरी कधींच वाटत नसते, बाई! तें सौंदर्य, आज दिसतं, उद्यां विरूनहि जातं!...त्यापेक्षां श्रेष्ठ अशा आत्मिक उदात्ततेचीच त्यांना जास्त तहान लागलेली असते!...मिरा...मिरा...माझ्या समजुतीसाठीं, तूं मला फसवते आहेस! मी अरुणांच्या चिरसहवासाला अगदींच अयोग्य आहे!...

''जाई...''मिरा असहायतेनें बोलण्याचा प्रयत्न करीत होती. पण उचंबळून येणाऱ्या भावनांमुळें तिच्या तोंडून एकहि शब्द बाहेर पडत नव्हता!-

''कांहीं बोलूं नकोस अगदीं!...''जाई पुन्हां तिला सांगूं लागली, ''तूं त्यांच्या आयुष्यांतून बाजूला झालीसच पण आणखी माझ्या त्यांच्याविषयींच्या मुग्ध प्रेमाला, धीरानं व मोठ्या मनानं मदत केलीस! म्हणून ते तुला विसरेल असतील असं का तुला वाटतं?...आणि तुझ्या मनाच्या भावना तरी मी ओळखत नाहीं म्हणतेस मिरे?....आजपर्यंत अनेक वेळां आपल्याशींच एकटी बसून काय करावं...अशा विचलित मनानं मी विचार करीत आले आहे. हो...मला अगदी मनापासून वाटतं, मिराताई, मला अरुणांच्या प्रेमाशिवाय जगतां येणार नाहीं!... खरं आहे तें!...अरुण माझे झाले, त्यांनीं माझा



स्वीकार केला तर माझ्यासारखी सुखी मीच!...पण हा स्वार्थी विचार जरा बाजूस केला कीं, मग पुन्हां वाटतं, मी माझ्या मिरेच्या अरुणांना तिच्यापासून स्वार्थानें हिरावून घेत आहे!...आणि मग अशीं अरुणांना लिहिलेली पत्रं अश्रूनीं पुसून जातात....वाहून जातात!...''

''मागं माझ्या निराश मनःस्थितींत धीर देणारी ती तूंच का ग जाई?....'' मिरा तिला आपल्याजवळ घट्ट ओढीत म्हणाली, ''तुला माझ्या मनांतील अगदीं खरं खरं तेंच आतां सांगतें!- मला आपलं वाटतं...माझ्या आयुष्याच्या सुरवातीला ही एकच कल्पना दृढ झाली होती कीं, आपणां स्त्रियांना उत्कट प्रेमाशिवाय जगणं शक्य नाहीं!...''

मिरा थोडा वेळ थबकून, आपल्याकडे उत्सुकतेनें पहाणाऱ्या जाईला पुढें म्हणाली, ''पण जाई, आतां तूंच पहा...माझ्या आयुष्यांत आतां त्या इतकंच निराळं महत्त्वाचं असं कार्यक्षेत्र उभं आहे! त्या कर्तव्यांकडेहि मला तितक्याच आशावंत मनानं पहातां येत आहे!''

मिरा थोडा वेळ निमूट राहिली व जाईकडे पहात पुन्हां पुढे म्हणाली, ''अरुणसारख्या श्रेष्ठ...उमद्या मनाच्या तरुणावर मी एकदां उत्कट प्रेम केलं.... त्यांनींहि मला आपली म्हटलं, या एकाच विचारावर साऱ्या आयुष्याचं समाधान वाटेल आतां मला. मी कुठं आणि ते कुठं?...पण ही दोन टोकं...हे दोन ध्रुव...एकदां एक झाले होते हेंच मला यापुढं कायमचं समाधान आहे!...या मुग्ध अपूर्ण प्रेमावरच मला माझ्या पुढील साऱ्या आयुष्यांतील उत्साह मिळविता येईल!...''

: ९७५ :

''मला वाटलं होतं, अरुण तरी त्यांच्या बालमैत्रिणीला...मिरेला कायमचे विसरले!...'' मिराच एक निःश्वास टाकून नंतर पुढें बोलूं लागली, ''तुझं त्यांच्यावरील उत्कट प्रेम...आणि माझ्या दृष्टीनं तुझी त्या प्रेमाची ठरत असलेली श्रेष्ठ योग्यता...यामुळं तर मी मुकाट्यानं तुमच्या मीलनांतच माझं सुख मानून समाधान पावत होते. तोंच तूं परवां आल्यावर मला सांगितलंस कीं, तूं माझ्या नांवाचा उल्लेख करतांच अरुण कावरेबावरे होऊन मजविषयीं जास्त चौकशी करूं लागले! मला किती आनंद वाटला!...अरुण मला अजूनहि विसरले नाहींत तर?....''

मिरेचे डोळे अभिमानानें चमकत होते. किंचित् थांबून ती पुढें म्हणाली, ''पण जाई, अरुण अतिशय भावनाशील, हळवे आहेत!...तसे अतिशय प्रेमळहि आहेत!...पण त्यामुळंच ते असे जास्त गोंधळतात ग!...त्यांच्या मनाच्या या गोंधळांत माझ्यासारखी तर जास्तच गोंधळून जाईल!...त्यांना सुखी करायला, वेळोवेळीं त्यांच्या निराश, निरुत्साही मनःस्थितींत त्यांना नवा उत्साह द्यायला तूंच एकटी समर्थ आहेस, मला वाटतं!...म्हणूनच म्हणते, जाई, तुमच्या दोघांच्या सुखी, कर्तृत्वपूर्ण भावी आयुष्याकडे, माझ्या आयुष्यांतील मागील कांहीं त्रुटित सुखी क्षणांकडे व अमर्याद सुखस्वप्नांकडे

पाहूनच, मी आपली समाधान पावेन!..माझ्या उत्साही कर्तव्यशीलतेला त्यांतच उगमस्थानं सांपडतील!...''

: ९७६ :

''पण...''जाई मिश्र भावनांनी भांबावून बोलण्याचा प्रयत्न करीत होती. ''थांब जाई!...आतां तूं कांहीं बोलूं नकोस!'' मिरा तिला मध्येंच थांबवून म्हणाली; ''मी समजले, तूं काय सांगणार आहेस तें....पण...माझ्यामध्ये जर तेवढी मनाची शान्ति नसती, जाई...मला माझं आजचं हें एकाकी आयुष्य असंच शेवटपर्यंत समाधानी वृत्तीनं कंठण्याचं धैर्य नसतं, तर तुला मी असा प्रथमपासून माझ्या अरुणांवर प्रेम करायला धीर दिलाच नसता! स्त्रियांच्या मनाचे हे खेळ फार गहन असतात!- मला ठाऊक आहे!- आपल्या सौजन्यानं, खेळकर वृत्तीच्या स्वभावानं, तूं दुसऱ्यांना उत्साहाचा जिवंत झरा वाटशील!.. पण तुला स्वतःला मात्र असलं हल्लीचं एकाकी आयुष्य कायमचं कंठणं शक्य नाहीं...त्या बाबतींत तरी, तूं अगदींच दुबळी आहेस!''....

अगदीं जिव्हाळ्यानें जाईकडे पहात, बोलतां बोलतां मध्येंच थबकून मिरा कांहीं वेळानें प्रेमळ स्वरांत म्हणाली, ''म्हणूनच म्हणते मी, जाई...आपण दोघी जिवलग मैत्रिणी अगदीं एका हृदयानंच यापुढं जगूं या! माझ्या वैयक्तिक सुखदुःखांचा समावेश मी तुझ्यांतच केला आहे! तूं अरुणांना व अरुणांनीं तुला सुखी केलं कीं माझं सुख आपोआपच त्यांत जन्म घेईल!...तुम्हां दोघांच्या सुखमय जोड आयुष्यांमधूनच मी माझ्या यापुढील कर्तव्यशील भावी आयुष्याला जरूर असलेला उत्साह शोधीन!''

जाईला जवळ ओढून मिरा पुढें म्हणाली, ''अरुणांचा व माझा एकदां खंडित झालेला जीवनसंयोग आता यापुढं कधींच होणार नाहीं...त्याला मी कधीं पात्र नव्हतें व आतांहि नाहीं..ही वस्तुस्थिती आतां मला नवीन नाहीं, पोरी! त्यासाठीं मी गेलीं कित्येक वर्षें माझ्या मनाची तयारी केली आहे!...आणि आतां तर मी परधर्मांत गेले आहे!...एकमेकांना आकर्षक वाटणारे हे आमचे दोन ध्रुव असेच एकमेकांना न मिळतां दूर दूर राहिलें...तर आमच्या...निदान माझ्या चिमुकल्या जगाचं रहाट-गाडगं जास्त सुरळित व कर्तृत्वपूर्ण चालण्याचा संभव अधिक! जाई...खरंच अगदीं मनापासून सांगते मी, तूंच अरुणांना खरोखर योग्य सहचारिणी आहेस!...आणि ज्याला तूंच सर्वस्वीं कारण आहेस तें त्यांच्या मनाचं हें अलीकडचं वर्तन पाहिलं तर तो तुझा हक्कच ठरतो, माझ्या मतं!''

''पण मिरे....माझं मागलं आयुष्य....'' जाई अश्रुभरित नेत्रांनी अडखळत बोलण्याचा प्रयत्न करीत होती. आपल्या प्रिय मैत्रिणीला यावेळीं आपल्या मनांत कल्लोळ उडवून देणारे भाव कसे व्यक्त करून दाखवावे, हेंच तिला कळेना!...



''चूप...कांहीं एक सांगूं नकोस मला...'' मिरेनें आपल्या डोळ्यांच्या कडा पुसल्या, हृदयांतील उरल्यासुरल्या भावना आंतल्या आंत दडपल्या व किंचित् स्मित करून जाईचे डोळे हळुवार हातानें पुशीत ती म्हणाली, ''पाहूं बरं, काय लिहिलं आहेस अरुणांना पत्रांत तें?...''

आणि अश्रु ठिबकलेलें जाईसमोरील पत्र उचलून, तें दोनदां वाचल्यावर, लज्जेनें आरक्त झालेल्या जाईच्या गालावर, मोठ्या बहिणीप्रमाणें तिन प्रेमानें हळूच चापटी मारली!

पण प्रत्यक्ष अरुणांची भेट झाल्यानंतर आणि त्यानें विशेषतः तिला पूर्वीच्याच प्रेमानें आपली म्हटलेलें पाहून तर तिची मति पुन्हां दोलायमान झाली होती-

ज्या धीरानें ती आतांपर्यंत इतकी वाटचाल करून आली होती तो धीर एका क्षणांत ढासळून किंचित्काळ ती गांगरली.

आपल्या भावी सुखाच्या कल्पनेनें व अरुणच्या चिरसहवासाच्या आकांक्षेनें ती कांही क्षण अगदीं मोहित झाली-

या मिश्र भावनांमुळेंच ती अश्रूंच्या पुरांत त्या वेळीं नहात होती!

इतक्यांत तिनें पुन्हा आपल्या मनावर धीरानें ताबा मिळविला!...ती इकडे येण्यापूर्वी, जाईच्या सान्निध्यांतील शेवटचा प्रसंग तिला आठवला व तिच्या डोळ्यांतून ओघळणाऱ्या अश्रूंचा प्रबळ प्रवाह वरच्या ओंठाजवळच येऊन थबकला.

जणुं काय, तीनचार दिवसांपूर्वीच्या त्याप्रसंगी जाईबरोबर भरून आलेल्या हृदयानें पण शांतपणें बोलतांना तिच्या ओंठातून बाहेर पडलेला प्रत्येक शब्द अजून शेवटचा म्हणून तेथेंच रेंगाळत, मोह, दुःख, आशा यांमुळें सुरू झालेल्या त्या प्रवाहाला तेथेंच थबकवीत आहे!...

थोड्या वेळापूर्वीचा अरुणचा हस्तस्पर्श व त्याचा भावनोत्कट प्रश्न यांनीं तर तिच्या मनोभूमिकेंत एकदम चलबिचल झाली.

तरी झटकन् एका निःश्वासाबरोबर ती सारी खळबळी दूर सारून तिनें मनाची पूर्वीची शांति मिळविली आणि ती अरुणला म्हणाली, ''खरंच सांगते, अरुण, जाई पै फार गोड पोर आहे!...तिच्या मनांत तुमच्याविषयीं किती उत्कट प्रेम आहे याची तुम्हांला कल्पनाहि नाहीं!...गेल्या कांहीं वर्षांच्या तुमच्या तिच्या मुग्ध सहवासांत तुम्ही कधीं विचारहि केला नाहीं का?..तर मग प्रथम आपल्या मनाचा पूर्ण ठाव घ्या, अरुण....आणि मग- तिच्यासाठींच हा आपला हात पुढं करा! तेंच तुमचं आजचं कर्तव्य माझ्या मतं!-''

: ९७७ :

जाईविषयींच्या तिच्या त्या शब्दांनीं अरुणच्या मनांत पुन्हां एकच नवा गोंधळ उडाला! अगदीं

भांबवलेल्या नजरेनें त्यानें मिरेकडे पाहिलें.

तो आपल्याशींच तसा विचार करीत असतां, प्रेमळ जाईचा सुंदर, हसतमुख चेहरा त्याला दिसूं लागला. तिच्या अबोल सहवासांतील अनेक प्रसंग, सारे एकदम त्याच्यापुढें उभे राहिले!

पण जाई जितकी त्याला आकर्षित होती त्यापेक्षां त्याच्यासमोर सध्या बसलेल्या त्याच्या बालमैत्रिणीच्या...मिरेच्या हृदयाची उदारता,...उत्कट स्नेहशीलता.. व त्यागी ध्येयप्रवणता...त्याला जास्त मोह पाडीत होती...त्याच्या हृदयाची पकड घेत होती!-

त्यामुळेंच अरुणच्या मनाच्या तिच्याविषयींच्या साऱ्या उत्कट भावनांनी पुन्हा एकदां जोरानें उसळी मारली. तो मिरेचे दोन्ही हात पटकन् आपल्या हाती घेऊन तिला अधीरपणें म्हणाला, ''मिरे...मिरे..तूं अशा आपल्या मनाच्या भावना दडपून आपणां दोघांनाहि फसवूं नकोस ना!...माणसाच्या आयुष्याच्या अगदीं सुरवातीस रुजलेल्या असल्या उत्कट भावना किती प्रबळ असतात, मिरे! कसं सांगू मी तुला? आपण किती किती वर्षांनीं अशी स्वतंत्रपणें पुन्हा भेटतो आहोंत!...आतां आपल्यामध्यें पूर्वी असलेले व आपल्याला अगदीं दूर दूर सारणारे सारे तट उल्लंघून जायला आपण पूर्ण समर्थ आहों!...माझं ऐक. आपण आपलीं इतके दिवस दुरावलेलीं आयुष्यें आतां कायमची निगडित करूं या!...''

मिरा अगदीं खालीं मान घालून मुकाट्यानें ऐकत होती.

अरुणनें आपलें उष्ण कपाळ मिरेच्या कपाळावर टेकलें.

तो थोडा वेळ गप्प राहून तिच्याकडे अनिमिष नेत्रांनी पहात होता.

दोघांच्याहि डोळ्यांतून मिश्र भावनांमुळे अश्रु ओझरत होते!-

: ९७८ :

शेवटीं मिरेनें जवळच, पण आपल्या डोळ्यांतील अश्रूंच्या धुक्यापलीकडे असलेल्या अरुणकडे एकदां प्रेमळपणें पाहिलें व त्याला ती म्हणाली, ''जरा शांत व्हा ना अरुण! असं काय? - वेडे!... मी काय म्हणते आहे तें तुम्हाला कसं हो समजत नाहीं अरुण, माझा हेतु?''

''हेतु! चूप ! बोलूं नकोस अगदीं!..'' अरुण मिरेच्या खांद्यावर आपले दोन्ही हात ठेऊन, तिला गदागदां हलवीत एकदम म्हणाला, ''मिरे...मिरे!...तुला काय, झालं आहे तरी काय आज, तेंच मला समजत नाहीं!...तूं मला काय सांगायला धडपडत आहेस तें मला समजलं. तूं सांगणार...आपण एकमेकांना योग्य नाहीं!...आपल्यांत अनेक प्रकारचे सामाजिक दृष्टीनं अनुल्लंघनीय तट उभे आहेत!...आपल्याला समाजाच्या दृष्टीकडे डोळेझांक करतां येणार नाहीं!..''

अरुण एक निःश्वास टाकून क्षणभर मिरेकडे पहात थांबला.

पण मग ती कांहींच बोलत नाहीं हें लक्ष्यांत येतांच, तो पुन्हां अधीरपणें तिला म्हणाला,



''हं!..समाज!...हेतु!..सर्व गोष्टी अगदीं गणिताच्या प्रमेयांनींच मांडायच्या ना ग जगांत?...असेल कदाचित्! त्यांचंच खरं असेल!..आमचीच विचारसरणी कनिष्ठ दर्जाची असेल! पण...खऱ्या भावनांच्या आविष्काराला जगांत कांहींच का ग स्थान नाहीं मिरे?...माणसाचं आयुष्य त्याला खरंखुरं वाटतं तसं कधींच का असूं नये?...मिरे, लहानपणीं आपली ताटातूट झाल्यावर कांहीं वर्षांनीं मध्ये मंजुळा माझ्या आयुष्यांत आली होती! ती प्रेमळ, उदात्त मुलगी माझ्यावर अगदीं उत्कट प्रेम करीत होती! पण मला-माझ्या आयुष्यांत मनापासूनचं कसलं आकर्षण जर कुणाविषयीं कधीं वाटलं असेल तर तें तुझ्याविषयींचंच!..मधला कांहीं काळ तें माझ्या मनांत अगदीं सुप्त होतं. कधीं कधीं तें माझं मन आंतल्या आंत जाळी!''

मिरा कांहीं वेळ अरुणकडे टवकारून पाहूं लागली.

अरुणहि किंचित् काळ थांबला.

मग तो पुन्हां बोलूं लागला, ''आणि आतां, - विविध परिस्थितीचे मानसिक, शारीरिक टक्केटोणपे खाऊन झाल्यावर, माझ्या एकाकी, प्रवाहपतित आयुष्यांत तूं पुन्हा मला भेटते आहेस!...आपण दोघंहि अगदीं स्वतंत्र आहों!...मग आतांहि आपल्या खऱ्याखुऱ्या भावनांना वाव द्यायचा वेळ आलेला नाहीं का, मिरे?

: ९७९ :

मिरा त्याला मध्येंच थांबवून प्रेमळ शब्दांत म्हणाली, ''पण अरुण...'' तिला मध्येंच थांबवून अरुण अधीरपणें म्हणाला, ''मिरे, तूं आज काय बोलते आहेस, तेंच समजत नाही मला! हो! जाई! मला ठाऊक आहे ती! खरोखरच अतिशय प्रेमळ पोरगी आहे!...पण त्याव्यतिरिक्त तिच्याविषयीं आजपर्यंत माझ्या मनांत कसल्याच भावना रुजलेल्या नाहींत!... तिलाहि माझ्याविषयीं कसलं विशेष आकर्षण वाटत असेल असं मला वाटत नाहीं!...मिरे, खरंच सांग, आपल्या मागल्या वियोगाच्या वेळची ती तुझी प्रेमळ भावनोत्कटता आज कुठं लोपली आहे?...''

''अरुण, खऱ्याखुऱ्या भावनांवरच जगाचे व्यवहार चाललेले आहेत, हें खरं!''...मिरा आपले व अरुणचे अश्रु पुसून किंचित् स्मित करीत म्हणाली, ''पण केवळ भावनांवरच ते चाललेले आहेत असं नाहीं!...''

अरुण भांबावलेल्या चेहऱ्यानें तिच्याकडे मुकाट्यानेंच पहात होता.

''आणि अरुण...'' मिरा, अरुणचा हात आपल्या हातांत घेऊन, तो हळुवारपणें दाबून, तेवढ्यांतच पुढें म्हणाली, ''जाईविषयीं तुम्ही म्हणालांत!...त्यावरून मला तर वाटतं...तुमच्यासारखे भावनाशील मनाचे प्रेमळ पुरुष, स्त्रियांना आपल्याकडे अतिशय उत्कटतेनं आकर्षित करतात खरे; पण

त्यांना मात्र स्त्रियांच्या मनाची खरी कल्पनाच नसते!...ते आपल्याच भावभावनांत सारखे रममाण असतात!..''

मिरेच्या या शेवटच्या वाक्यावरून मात्र अरुणला, मागें मंजुळेनें त्याला लिहिलेल्या शेवटच्या पत्रांतील एका वाक्याची आठवण झाली.

तो एकदम दचकून, भांबावलेल्या दृष्टीनें मिरेकडे पाहूं लागला!...

: ९८० :

मिरा आतां म्हणते आहे तसें किंवा मंजुळेनें मागें म्हटलें होतें तसें, आपण खरोखर केवळ आपल्या भावभावनांतच रममाण असतों का?....

जाई!...आपल्या मधल्या बेफिकीर बेजबाबदार आयुष्यांत तिनेंच आपल्या निरपेक्ष स्नेहानें एकाएकीं क्रान्ति घडवून आणली!...पण तरीहि तिच्या आपल्याविषयींच्या प्रेमभावना मिरा म्हणते आहे, तशा खोल रुजलेल्या...स्थिर...उत्कट असतील असें अरुणला वाटलें नव्हतें...वाटेना! निर्भेळ स्नेहाशिवाय, आपण तिच्या मनांत आपल्या चिरसहवासाची...आपल्याविषयींच्या प्रेमाची कसलीहि कल्पना रुजण्यास कधींच प्रत्यक्षाप्रत्यक्ष कारण झालेलों नाहीं. मिरेच्या सहवासाच्या कल्पनेची पूर्ति सफल होण्याची संधि मात्र बऱ्याच दिवसांनीं ही आज आलेली आहे.

''मिरे, मी अगदींच गोंधळलो आहे!..'' मनांतील असल्या विचारांमुळे बावरलेल्या चेहऱ्यानें मिरेकडे पहात, अरुण पुन्हां तिला म्हणाला, ''जाईविषयीं तूं म्हणतेस तें खरंहि असेल!- पण मनुष्याला जन्म आणि मृत्य एकदांच असतात! त्या दरम्यानचं त्याचं आयुष्य त्याच्या मनाप्रमाणें जगण्याचा त्याला हक्क आहे ना?...माझ्या मिरेबरोबरच माझं आतां यापुढील आयुष्य निगडित करावंसं मला वाटत असलं तर त्यालाहि मी मोकळा नाहीं म्हणतेस, मिरे?...तूं तुझ्या संदिग्ध बोलण्यानं आज माझ्या मनाचा नुसता गोंधळ तेवढा उडवून दिला आहेस!....''

बोलतां बोलतां अरुण एकदम थांबला. त्याचा चेहरा अगदीं गोरामोरा झाला होता!

मिरेलाहि त्याच्या मनांतील तो कल्लोळ समजत होता. ती त्याच्या उष्ण कपाळावर आपलें डोकें टेकून तसेच अश्रु ढाळीत थोडा वेळ मुग्ध राहिली.

पण नंतर अरुणचा चेहरा वर करून ती त्याला म्हणाली, ''अरुण...अरुण...तुमच्या असल्या शब्दांनीं माझंहि हृदय उंचबळून येतं! माझ्यासारख्या क्षुद्र जीवाला तुमच्या चिरसहवासाची नुसती कल्पनाहि किती आनंददायक वाटते म्हणून सांगू! तुम्ही मला पूर्वी आपली म्हणालांत... इतक्या वर्षानंतरहि आणि माझ्या व तुमच्या आयुष्यांतील इतक्या विविध घडामोडीनंतरहि अजून तसंच म्हणत अहां!...ही एकच कल्पना आतां माझ्या मनाची, मध्ये मघां थोडा वेळ ढळलेली शांतता पुन्हा माझ्यांत



आणीत आहे!... आतां आयुष्याच्या शेवटापर्यंत, मी माझं कर्तव्यांनी व्यापलेलं एकाकी जीवन समाधानानं घालविण्यात समर्थ झालें आहे पुन्हां!...''

त्यामुळें तर अरुण अगदींच निःशब्द, खिन्न होऊन बसला.

: ९८१ :

मिरा एक मोठा निःश्वास टाकून पुढें म्हणाली, ''हं, आतां मी म्हणते तें शांत चित्तानं सारं ऐका पाहूं, अरुण!...तुम्ही म्हणतां तें खरं!...हो, माणसाला आपलं आयुष्य आपल्या प्रांजल समजुतींप्रमाणं निरुपद्रवी रीतीनं घालविण्याचा पूर्ण हक्क असतो! पण तरीहि त्याला बंधनं आहेत. आणि अरुण, त्यागाची कल्पना तुम्हांला माझ्यासारखीकडून नव्यानंच समजली पाहिजे का?...हें पहा, नीट विचार करा, अरुण....तुम्हांला जाईचं मागलं आयुष्य ठाऊक नाहीं!...तुमच्याविषयींच्या तिच्या उत्कट भावनाहि ठाऊक नाहींत!...तिची जगांत वावरतांनाची भाबडी आशावादी वृत्ति ठाऊक नाहींत!...आणि माझ्या पुढील व्यापक कार्यक्षेत्राचीहि कल्पना नाहीं! म्हणूनच मी मघांपासून म्हणतें आहे, तें तुम्हांला अजूनहि समजत नाहीं!-''

शांतपणें मिरेकडे पहात तिचें सारें बोलणें अरुण ऐकत होता.

''आणि दुसरं तुम्हाला, अरुण, सांगूं का?...'' मिरा पुढें करार स्वरांत म्हणाली, ''जाई माझी नुसती जिवलग मैत्रीण आहे, एवढंच नव्हे, तर आजच्या माझ्या आशावादी कर्तव्यशीलतेलाहि ती बऱ्याच अंशानं कारण आहे! बायकांची मनोरचना तुम्हांला स्पष्ट करून कशी सांगूं मी, अरुण?...तुम्हां पुरुषांना जसं कुणाचं ओशाळं रहावंसं वाटत नाहीं तसंच आम्हां स्त्रियांनाहि आपल्यावर कुणी निरपेक्ष व नकळत उपकार केले तर त्यांची परतफेड केल्यावांचून समाधान वाटत नाहीं!...आज माझ्यासमोर ध्येयपूर्ण असं कार्यक्षेत्र उभे आहे. त्या जबाबदारीला मनापासून तोंड द्यायला व माझं कर्तव्य, अंशतः देखील यशस्वी तऱ्हेनं पार पाडायला मला माझं आयुष्य पुरं पडणार नाही!- मला खात्री आहे त्याची! इतकी व्यापकता माझ्या कार्याविषयीं मला वाटते! आणि असला...हा आजचा माझा आशावाद, माझ्या मधल्या किंकर्तव्यमूढ निराश वृत्तींतून निर्माण झाला. माझ्या मनांत आतां तो स्थिर झाला! कुणामुळें?...हो. अरुण, जाईचा सहवास...तिचाच उत्साही आशावाद...तिची जगांत वागतांनाची खेळकर वृत्ति...हींच सर्वस्वी त्याला कारण आहेत असं मला वाटतं?''

अरुण अगदीच गोंधळला होता. त्याच्या तोंडून शब्दच बाहेर पडत नव्हता

: ९८२ :

मिरा त्याच्याकडे पहात क्षणभर गप्प राहिली.

मग अत्यंत स्नेहाने भरलेल्या शब्दांत ती अरुणला पुढें म्हणाली, ''अरुण, तुमच्या प्रेमाच्या

गतस्मृतींवर, गतसुखस्वप्नांवर...असल्या सुखद सहवासाच्या क्षणापळांवर मला माझं आयुष्य माझ्या पुढील कार्यासाठी एकाकीपणेंहि समाधानानं घालवितां येईल!...केवळ प्रेममय आयुष्य ही माझ्या आयुष्यांची पूर्वीची भावनाप्रधान कल्पना आतां मुळींच राहिलेली नाहीं!...पण उलट माझी जाई!...ती प्रेमळ खेळाडू वृत्तीनं वावरणारी आशावादी पोर...तिचं मधलं चमत्कारिक वळण लागलेलं आयुष्य विसरून... जगाच्या व्यवहारांना तोंड देत देत...धीरानं व आशेनं...तुमच्याविषयींच्याच उत्कट प्रेमावर...तुमच्या चिरसहवासाच्या आशेवरच..ती जगत आहे!...हो, अरुण, ती सुंदर, उत्साही, प्रेमळ पोरगी...कर्तबगार पुरुषावर प्रेम करण्यासाठींच जन्माला आली आहे!...आणि म्हणूनच तिला तुमच्यावर प्रेम करण्याचा माझ्यापेक्षां जास्त हक्क आहे!...''

थोडा वेळ दोघेंहि अगदीं गप्प राहिलीं.

मिराच पुढें म्हणाली, ''आणि खरंच सांगते मी, अरुण, आज ज्या नव्या उत्साहाची तुमच्या आयुष्याला जरुरी आहे, तो तुम्हांला जाईच्याच सहवासांत जास्त मिळेल. आणि तुम्ही तिला आपली म्हटलंत म्हणजे तिचंहि आयुष्य पुन्हा कसं उत्साहाचा जीवंत झरा बनेल तें तुमचं तुम्हीच पहा!...अरुण, माझी जाई म्हणजे एक मंद मंद सुगंध आपल्याभोंवतीं दरवळून टाकणारं फूलच आहे!..तें तसंच रानावनांत कोमेजून जावं असं वाटतं का तुम्हाला?...''

: ९८३ :

आणखी बराच वेळ मिरा व अरुण तेथें बोलत होती.

नंतर दोघेंहि कितीतरी वेळ मुकाट्यानेंच जवळजवळ बसलीं होतीं.

जाईचें मागचें सारें आयुष्य अरुणला नुकतेंच समजून आलें होतें. त्यामुळें प्रथम तो दचकला. पण मग इतकें असूनहि ती धीरानें, उत्साहानें आशावंत अंतःकरणानें, गेलीं कांहीं वर्षे अगदीं एकाकीपणें, जबाबदार आयुष्य प्रांजलपणें जगांत कशी जगूं शकली, याचेंच त्याला आश्चर्य वाटलें. - जाधवमंडळींत रहाणारी बिचारी जाई त्याच्यापुढें उभी राहिली!

मिरेच्या उदार मनाची आपल्या जिवलग मैत्रिणीकरतां झालेली व होत असलेली धडपड, त्याला प्रथम बैचेन करीत होती. पण नंतर परिस्थिीमुळें पतित व प्रवाहपतित झालेल्या प्रेमळ जाईच्या मनाची आशापूर्ण धडपड...आपल्याविषयींचे उत्कट स्थिर प्रेम त्याला समजून आलें.

आणि त्यामुळेंच जाईविषयीं त्याला पूर्वीपेक्षांहि जास्त आपुलकी वाटली! -

आपल्या चिमुकल्या आयुष्यांत कल्पनातील अशा किती चमत्कारिक घटना उभ्या रहात गेल्या, या विचारानें त्याला अतिशय आश्चर्य वाटलें. व तो हळूहळू अंतर्मुख होऊन जाईच्या गेल्या तीन वर्षांच्या मुग्ध सहवासांतील तिच्या मनाची मूक धडपड व घडून आलेले सारे लहानसहान प्रसंग आठवूं लागला.



: ९८४ :

इतक्यांत मिरा अरुणचा हात धरून त्याला उठवीत प्रेमानें म्हणाली, ''हं चला बरं, अरुण बोलता बोलतां केव्हांच रात्र झाली. पाहिलंत का?...चंद्राचे सौम्य किरण आपल्याभोंवती पसरलें आहेत!...मावशी आपली वाट पहात असेल जेवणासाठीं!...

अरुण आपल्याच विचारांत गढला होता.

मिरेच्या त्या शब्दांनीं एकदम भानावर येऊन जमिनीवर पसरलेल्या पेंड्यांच्या राशीवरून तो उठला; व तिच्याकडे उलट सौम्य हंसून पहात, चालतां चालतां किंचित् खिन्न स्वरांत म्हणाला, ''मग माझी भावनाप्रधान बालमैत्रिण मिरा पाटील, या खेड्यांतून मागं मला सोडून नाहींशी झाली, ती आतां कायमचीच हरवली म्हणायचं का?...''

''हो, अरुण.''मिराहि मागें वळून अरुणकडे स्नेहपूर्वक पहात किंचित् विनोदी वातावरण उत्पन्न करण्यासाठीं म्हणाली, ''मिरा पाटील आहेच कुठं मुळीं आतां?...माझं नांव तर मेरी काइंड!...''

अरुणहि आपलें भावनांनी भरून आलेलें हृदय प्रयासानें दडपून, तिच्या स्मितयुक्त, सौम्य व प्रशांत चेहऱ्याकडे पाहून हंसला; व मुकाट्यानें तिच्याबरोबर पुढें चालूं लागला.

''आपली आजची — मिरा अरुणांची ही भेट एवढ्याचसाठीं मुद्दाम घडवून आणलेली जणूं काय!.. मिरा चालतां चालतां त्याच्याकडे पाहून म्हणाली ''पण तसं जाईचं नाहीं!..ती यदृच्छया तुमच्या आयुष्यांत चालून आली आहे. तिच्या प्रेमळ मनानं आतांपर्यंत तुमच्याभोंवती नव्या आशांचं, उत्साहाचं नाजुक जाळं प्रयासानं विणलं आहे!...यापुढं तुमच्या भोवतालचे हे सर्व पाश ती बळकट करील!..तुमच्यासाठीं जास्त खेळकर असं जग निर्माण करील!...तुम्हांला त्यांतून सुटून दोघांच्या आयुष्याचा नाश करणं आतां अशक्य आहे अरुण!...तिचा तो हक्क तुम्हांला किंवा मला हिरावून घेणं योग्यच होणार नाहीं!...''

: ९८५ :

नंतर दोघेंहि हळूहळू चाललीं होतीं. दोघेंहि न बोलतांच आपापल्या पायाखालीं पहात होतीं.

''आणि अरुण...तुम्हींच पहा!...'' मिरा पुढें हळुवारपणें म्हणाली, ''तुमचं मधलं आयुष्य तुम्हीं जरा डोळ्यापुढं आणलंत तर तुम्हांला हेंच आढळेल!...तुम्ही इतके प्रेमळ अहां...कीं, कुणालाहि आपल्या सहवासांत तुम्ही सुखी कराल!.. आणि त्याच्या सुखांत स्वतःला सुखी मानाल!...खरं ना मी म्हणतें तें सारं?...मग आतां एकदां मनापासून हंसा पाहूं!

मिरा अरुणकडे पाहून हंसली. तिचा गंभीर व सौम्य चेहरा पाहून तिच्या विषयींच्या स्नेहानें अरुणचें हृदय अगदीं भरून आलें. त्यानें तिचा हात आपल्या दोन्ही हातांत क्षणभर घट्ट धरला; तो

आपल्या हृदयाशीं आणला व तो मान हलवून मिरेकडे पाहून स्निग्धपणें हंसत म्हणाला...''हो...मिरे..तूं म्हणतेस तें खरं!.. तूं एक शापभ्रष्ट देवताच आहेस जणूं काय!...''

दोघांनींहि जागच्या जागीं थबकून एकमेकांकडे अगदीं प्रेमपूर्ण दृष्टीनें चमकून पाहिलें. दोघांचेहि डोळे अश्रूंनी डबडबले होते!

चंद्र, जणूं काय, उंच आकाशांतून दोघांकडे पाहून सौम्यपणें हंसत होता!...

शेवटीं मिरेनें अरुणला क्षणभरच आपल्याजवळ ओढलें. आपल्या वर खालीं होणाऱ्या वक्षःस्थलावर त्याचें डोकें घट्ट दाबून धरलें - त्याच्याकडे एकदां अगदीं प्रेमपूर्ण व अश्रुभरित नेत्रांनीं तिनें पाहिलें व ती झटकन् बाजूस झाली.

आणि लगबगीनें चालतां चालतां म्हणाली, ''चला...चला, अरुण! मावशीनं हांका मारण्यापूर्वीच घरांत जाऊन दाखल झालेलं बरं!...''

: ९८६ :

मिरेबरोबर आणखी थोडा वेळ तसेंच बोलत रहावें असें अरुणला फार वाटत होतें. पण ती तितक्यांतच भरभर चालत स्वंयपाकघरांत शिरून, मावशीबरोबर गप्पा मारूं लागली होती.

अरुण विहिरीजवळ थांबला. रहाटाचा पोहऱ्या आंतील पाण्याच्या खोल गेलेल्या पृष्ठभागापर्यंत सोडून त्यानें ताजें पाणी काढलें. हातपाय व तोंड धुवून तो नव्या हुशारीनें घरांत शिरला.

तोंच कमळामावशी त्याला आंत येतांना पाहून म्हणाली, ''अरे अरुण, ते अण्णा वैद्य मघांपासून तुझी दोनतीनदां चौकशी करून गेले!...आणि म्हणाले 'अरुणदादा अगदीं फार दिवस भेटले नाहींत. थांबतो तो येईपर्यंत...' बसलेहि असतील कदाचित् तुझी वाट पहात अंगणांत अजून!...''

''कोण? आपले अण्णासाहेब का?'' अरुण मंद स्मित करीत ओटीकडे वळून कमळामावशीला खेळकर शब्दांत म्हणाला, ''खरंच हं, कुठं आहेत म्हातारबुवा? फार फार दिवस भेट झाली नाहीं बुवा त्यांची!-''

अरुण ओटीच्या दारांत आला. पाहतो तो दोरीनें बांधलेल्या चाळीशीच्या भिंगांतून जरा किलकिले डोळे करून, समोर धरलेल्या वर्तमानपत्रांतील कांहीं मजकूर, अंगणांतील कंदिलाच्या उजेडांत, स्वतःशींच मोठ्यानें पुटपुटून अण्णा वैद्य वाचीत होते. त्यांनीं जुन्या खुर्चीवरच बैठक घेऊन आपलें शरीर जरा ऐसपैस सोडलें होतें.

अरुण दारांतच उभा राहिला व त्यानें त्याच्याकडे अगदीं कुतूहलदृष्टीनें पाहिलें.

अण्णा वैद्यांच्या चेहऱ्यावर वाढत्या वयामुळें थोड्या जास्त सुरकुत्या दिसत असल्या तरी त्यांच्या एकंदर देहयष्टींत तसा फारसा फरक पडला नव्हता. त्यांचा तो परिचित असा किंचित् स्थूल देह,



दिवसेंदिवस तांबड्या रंगावर झुकणारें गुडघ्याइतकें मळकें धोतर, अंगांतील रेघारेघांचा सैलसा सदरा, आणि त्यांच्या कांहींशा हंसऱ्या पण गंभीर म्हाताऱ्या चेहऱ्याला शोभून दिसणाऱ्या दाभणकांठी पांढऱ्या मिशा,..असा सारा अगदीं पुरातन काळापासून चालत आलेला त्यांचा थाट, जशाचा तसा तेथल्या तेथें होता!-

अरुणला वाटलें, नव्या व धांवत्या जगाकडे अण्णा वैद्यांनीं आपल्या जुन्याच चष्म्याच्या जाड भिंगांतून, आपली मंद स्थिर दृष्टि रोजरोज टाकल्यामुळे त्यांच्यात फारसा फरक पडलेला नसावा!-

: ९८७ :

पंधरा वर्षांपूर्वी आपल्या पन्नाशीनंतर सरकारी नोकरीचें पन्नास रुपयांचें पेन्शन घेऊन वासुदेवराव भाऊंच्या समोरच्या लहानशा घरांत अण्णा वैद्य येऊन राहिले होते आणि तेथेंच एकाद्या ग्रहाप्रमाणें स्थिर राहून, आपल्या नित्याच्या ठराविक कक्षेंत ते शांतपणें फिरत होते.

वास्तविक वैद्यकी हा त्यांचा केवळ आवडता शोक. पण त्यांनीं तो आपल्या पेन्शनच्या जोडीला येथें आल्यापासून बसल्याबसल्या सुरू केला होता!- आणि या बाबतींतील त्यांचें मोठें तत्त्व - (पण मग, या तत्त्वालाहि त्यांच्या स्वतांच्या स्वार्थी दृष्टीनें त्यांनीं कांहीं मर्यादा-मुरडी घातल्या होत्याच म्हणा) - म्हणजे, जगांत प्रत्येक गोष्टीला प्रत्येक कालखंडांत कांहीं तरी कमीजास्त किंमत ही असतेच!- तेव्हां अर्थातच, तेथलीं जवळपासचीं दहापंधरा खेडवळ घरें व आसपासच्या कक्षेंतील पांचदहा लहानलहान खेडीं, यांच्यावर अण्णा वैद्य आपल्या त्या फावल्या वेळांतील धंद्यांतूनहि, दहाबारा रुपये सहज जागच्या जागीं उभे करीत असत!-

याशिवाय अण्णांना आतां आणखी तीन प्रकारचे उद्योग असत. एक म्हणजे सारें घरकाम स्वतः करावयाचें. दुसरें जवळपास शेजाऱ्यापाजाऱ्यांकडे मिळतील तीं सारीं इंग्रजी, मराठी वर्तमानपत्रें-मासिकें वाचावयाचीं आणि तिसरें - सर्वात महत्त्वाचें - म्हणजे चुरशीचे वादविवाद करायचे!-

: ९८८ :

अण्णांच्या घरगुती कामांत हजारों गोष्टींचा समावेश होई -

येथे रहावयास आल्यानंतर, पाहिलीं पांच वर्षे तर त्यांना फावला वेळहि सापडत नसे.

संधिवाताच्या विकारानें आजारी असलेल्या आपल्या पत्नीची अत्यंत दक्षतेनें सेवाचाकरी करण्यांत ते अगदीं गुंग असत. तिच्या आजाराच्या बाबतींत मात्र ते स्वतांच्या साऱ्या मात्रा गुंडाळून ठेवीत. डॉक्टर, वैद्य, मांत्रिक, ताईत, अंगारे, धुपारे यांपैकीं कोणतीच गोष्ट-विश्वास असो नसो - अण्णांनीं त्या वेळीं वगळली नव्हती आणि खरोखरच अतिशय शारिरीक व मानसिक हाल सोसून त्यांनीं तिची इतकी अव्याहत शुश्रूषा केली होती कीं, तो त्यांचा उच्च त्याग पाहून कोणत्याहि साध्या काल्पनिक

कादंबरीकाराच्या उथळ प्रेम करणाऱ्या नायक मानसपुत्रानें लाजेनें पटकन् मान खालीं घालावी.

पण त्यांचे हे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. आणि शेवटीं त्यांची पत्नी त्या आजारांतच झिजून झिजून त्यांना सोडून गेली.

मूल ना बाळ; एकटा जीव. प्रथम अण्णांना वाईटच वाटलें त्या घटनेचें. पण मग, त्यांच्या पत्नीबरोबरच तिच्या व त्यांच्या मधल्या साऱ्या तनमनधानाच्या दगदगींचा एकदां कामयचा शेवट झाला, हाहि विचार त्यांच्या मनांत पुन्हां पुन्हां डोकावल्यावांचून राहिला नाहीं.

आणि या नव्या विचारानेंच त्यांनीं आपल्या मनाशीं त्या वेळीं समाधानाचा एक निःश्वास टाकला होता.

: ९८९ :

या घटनेनंतर मात्र, गेलीं दहा वर्षे त्यांचें हें नवीन एकाकी आयुष्य अखंड चालू होतें.

सकाळी उठलें कीं, मागें बाळगलेल्या गाई-म्हशींची स्वतः सेवा-चाकरी करायची; त्यांच्या धारा काढावयाच्या; त्यांना पाळीपाळीनें आलटून पालटून स्वच्छ धुवायचें...शेणगोठा करायचा...आपलीं घरांतील भांडीं धुणीं स्वतां सांभाळायचीं...असें सारें चाललें होतें. - सकाळीं एका ठरलेल्या जांबानें दोन मापें दूध प्यायचें...त्यानंतर इकडे चूल-वाइल-शेगडी यांवर भाजी-आमटी-भात अशी स्वयंपाकाला सुरवात करून, मागील परसांत स्वतां हौसेनें लावलेल्या भाजीपाल्याला मधून मधून खतपाणी करायचें...तेवढ्यांतच मध्यें कोणी पेशंट आला तर त्याची 'हजेरी', त्याच्या औषधाचें 'काम्पाउंडिंग'- आणि शेवटीं बारा साडेबाराला स्वतःच केलेलें जेवण...पुढले दोन तास वामकुक्षी...मग जवळपास सांपडतील तेवढीं नवीं जुनीं नियतकालिकें चाळणें...पांच संडेपांचच्या सुमारास चरावयास गेलेल्या गुरांच्या परतण्याची, वर्तमानपत्रांतून मधूनमधून दृष्टि काढून, वाट पहाणें...आणि तीं आल्यावर पुन्हां मागील परसांत त्यांची व भाजीपाल्याची निगा-संध्याकाळीं सूर्यास्ताला त्या सकाळच्याच जांबानें चार मापें दूध घेतलें कीं, कोणाबरोबरहि, जसा मनुष्य भेटेल तसा, तो म्हणेल तेथें जाऊन, त्याला आवडेल त्या विषयावर, - रात्रीं साडेआठपर्यंत वादविवाद - चर्चा; - आणि शेवटीं बरोबर साडेआठच्या ठोक्याला झोंप.

- झालें - दिवस संपला!-

हा सारा कार्यक्रम अण्णांच्या इतका अंगवळणीं पडला होता कीं, त्यांत जरादेखील फेर करणें कोणालाच - त्यांना स्वतःला देखील - शक्य नव्हतें.

अण्णा आले तेव्हां त्यांच्या मागें एक गाय व एक म्हैस एवढाच परिवार होता. पण आतां नाहीं म्हटलें तरी तीन म्हशी, चार गाई आणि लहानमोठीं अनेक वासरें रेडकें झालीं होतीं. तरी पण त्यांतलें



एकहि रोडकें नव्हतें, हें विशेष. पूर्वी ओसाड दिसणाऱ्या परसांत आतां तीन सीताफळी, दोन मोठे शेवगे, एक दोडक्याचा मोठा वेल, एक तोंडलीचा मांडव, कागदी लिंबाचें भरगच्च झाड, आंब्याचीं मोहरलेलीं दोन कलमें,...सारें सारें होतें.

-आणि म्हणूनच, अण्णा मालकाला कधीं कधीं थट्टेनें म्हणत असत, ''अगदीं बारा वर्षांवर वहिवाट झाली आहे, बरं का माझी! - आतां या साऱ्यांतील कश्शा कशावर म्हणून तुमचा कांहीं हक्क नाहीं! - समजलं?''

आणि या त्यांच्या धमकींत अगदींच तथ्य नव्हतें असेंहि नव्हे -

: ९९० :

वर्तमानपत्रें वाचण्याच्या बाबतींत तर अण्णा वैद्यांकडे नवेंजुनें, आपलें दुसऱ्याचें हे भेदभाव फारसे कधींच नसत.

एकादें वर्तमानपत्र त्यांनीं स्वतः पूर्वी चाळलेले नसलें म्हणजे झालें. त्यांचें आपलें काम होई. पूर्वी पूर्वी तर ते एखादें वर्तमानपत्र स्वतः विकतहि घेत असत. पण मग, पुढें पुढें हीं महाराष्ट्रांतील नियतकालिकें दिवसेंदिवस संख्येनें बेटीं इतकीं झपाट्यानें वाढूं लागलीं...सनातनी-नवमतवादी, जहाल-मवाल-शिवराळ, असले व आणखीहि कित्येक त्यांतल्यात्यांत इतके विविध गट पडूं लागले- कीं, एका माणसाला तीं सारीं विकत घेणें किंवा सांभाळणें शक्य होईना.

तेव्हां शेवटीं...अण्णांनीं एके दिवशीं एकदम त्राग्यानेंच स्वतःशीं ठरविलें कीं-कोणतेंच पत्र स्वतः म्हणून विकत घ्यावयाचें नाहीं.

कारण ते स्वतः तसे अगदीं उदारमतवादी होते. त्यांना हीं सारीं चालत व सारीं पाहिजे होतीं.

तेव्हां अण्णांनी आपल्याला एक दंडकच घालून घेतला होता कीं, जें जें दुसऱ्याकडे जवळपास म्हणून सांपडेल; मग तें मालकानें स्वतःचें वाचून झाल्यावर त्यांच्या हातीं सावकाश अर्धेमुर्धे लागूं दिलें तरी चालत असे त्यांना- तें तें सर्व हस्तगत करायचें व शक्यतर जाहिरातीसकट पाहिल्या पानापासून शेवटापर्यंत, सारें ओळ न् ओळ वाचून काढायचें - आत्मसात् करायचें!-

: ९९१ :

अर्थात् इतक्या सामुग्रीनंतर अण्णांच्या दिनचर्येत वादविवादाला विशेष स्थान मिळावें यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

म्हणूनच दुसरें कसलें नसलें तरी अण्णा वैद्यांना पाहिल्यापासूनच वादविवादाचें एकच एक मोठें व्यसन होतें!...

आणि या बाबतींतहि लहान मोठा, विद्वान् गांवढळ, असले कांहीं त्यांना भेदभाव नसत!-

ते लहान मुलांबरोबर इसापनीतीच्या किंवा पंचतंत्राच्या तात्पर्यात्मक गप्पागोष्टी करीत तर तरुणांबरोबर आवेशानें चढ्या आवाजांत व आवाज चढवीत...'बंगाल फाळणी,'..'दहशतवादी कट,'...'महायुद्ध,'...'सहकार-असहकार,'...'गांधीजींची हिमालयाएवढी चूक,'...'समाजसत्तावाद,' ..'साम्यवाद,'...असले लहान मोठे सारे जोरदार व जाडेभरडे शब्द वापरून त्यांच्याबद्दल गोष्टी करीत!-

प्रौढ, संसारी गृहस्थांना, आपल्या व इतरांच्या सुखदुःखमिश्रित संसारी अनुभवांचे दासबोधाचा आधार घेऊन व ज्ञानेश्वरीची पुष्टि जोडून बरे वाईट घुटके पाजीत, तर आपल्या बरोबरीच्या उतार वयाच्या माणसाबरोबर एकदां 'ईश्वर आहे' ही बाजू घेऊन आणि एकदां 'ईश्वर बिश्वर सब् झूट...' अशी बाजू घेऊन, एकदां कपाळावर आठ्यांचें जाळें पसरून 'धर्म बुडाला' 'समाज मेला' असें म्हणत एकदां 'अस्पृश्यांचा मंदिरप्रवेश' या गोष्टीला पाठिंबा देत, ते तावातावानें तास तास चर्चा करीत.

आणि वादविवादाचे हे सारे प्रकार संपल्यावर तेच सारे विषय कधीं कधीं आलटून पालटून निरनिराळ्या वयांच्या व्यक्तींबरोबर, बोलतां बोलतां, सूक्ष्म गणितशास्त्राच्या आधारें लादून, चर्चेला विविधता आणणें, हाहि त्यांचा एक मोठा वैयक्तिक शोक असे!-

: ९९२ :

पण असला कडाक्याचा वाद चाललेला असला तरी अण्णा आपल्या दिनचर्येच्या लहानसहान ठराविक व्यवहारांना मात्र विसरत नसत, कीं, कधीं फांटा देत नसत!-

'कांसव सशाच्या पुढें कां गेला?' याविषयीं तात्पर्यात्मक चर्चा करतां करतां, अण्णा मध्येंच थांबून, समोर बसलेल्या त्या लहानग्या बाळगोपाळांना एकदम सांगत, - अरे बाळांनों, म्हशीचं शेण भरून टाकायचं आहे माझ्या! मला मदत करायला चला पाहूं मागल्या गोठ्यांत...तुमच्यांतले कोण कोण येता ते''...

'हॉटसनवर गोगट्यानं गोळी कशी झाडली?' किंवा 'भगतसिंगानें असेंब्लींत बॉंब व हॅंडबिलें कशी उधळलीं?' याविषयीं अगदीं गरमागरम चर्चा चालूं असूं द्या; ते मध्येंच आपल्याजवळ बसलेल्या तरुणाला म्हणत, 'थांब हं! मला तर अजून तांदूळहि वैरायचे आहेत आधणांत! आणि माझं सकाळचं दूध घ्यायचंहि राहिलं आहे तसंच!''

'पूर्वीचा मॅट्रिक व आतांचा बी.ए.' अगर 'पूर्वीचा बी.ए. व आतांचा एम.ए.' त्यांची बसल्याबसल्या अगदीं आवर्तदशांशचिन्हापर्यंत देखील समीकरणें मांडून तुलना करीत; अण्णा चालू जमान्यांतील बेकारीविषयीं बोलत;...किंवा आजच्या नवमतवादी तरुणांच्या हल्लींच्या 'कवि-विवाहा' विषयीं अगर एकंदरींतच चालू असलेल्या प्रेमाच्या पाणचट चाळ्यांविषयीं बोलतांना, ते आपलीं सडेतोड मतें



अगदीं स्पष्टपणे बोलून दाखवीत!

पण मग, तसें करतां करतां आपल्यासमोर बसलेल्या प्रौढ माणसाला अण्णा एकदम म्हणत, 'तें कांहीं नाहीं; जग, बघा, - आपण म्हणतों त्यापेक्षां झापट्यानं बदलत आहे. दिवसेंदिवस हा अस्सा उथळपणा दिसतो. खोटं सुख व पशुवृत्ति या बाजूसच साऱ्या समाजव्यवहाराच्या तराजूचा कांटा झुकूं लागला आहे. पशूंत व माणसांत आतां भेद कसला राहिला, सांगा! हो! बरी आठवण झाली! माझीं गुरं चरून परतायची वेळ झाली. गेलं पाहिजे मला!!'

किंवा थोडें पुढें जाऊन- 'बाठ्यांतून झाड व झाडांतून बाठा' असली जगाच्या उत्पत्तिलयाच्या गहन तत्त्वज्ञानाची चालू असलेली शृंखला, ते तेथल्या तेथेंच, मध्येंच तोडून, स्वतःलाच जणुं काय लागलेली त्या वेळची निर्विकल्प समाधि एकदम भंग पावल्यासारखे खडबडून जागे होत.

आणि आपल्याबरोबरीच्या समोरील वृद्धाला सुस्कारा सोडीत म्हणत ''हं! हें कोडं असं एकदम सुटणारं थोडंच आहे, महाराजा? - आजपर्यंत कितीकांनी हात टेंकले आहेत या वादापुढं!- हं! असो. चला आतां माझी झोपेची वेळ झाली.'

आणि मग अण्णा एक मिनिटभरहि तेथें थांबत नसत.

पण मग दुसरा दिवस उजाडला, कीं अफूच्या गोळीचा अंमल उतरल्यावर दर्दी अफूबाज जसा पुन्हां आपल्या अफूच्या डबीकडे नव्यानें वळतो, तसेच अण्णा वैद्यहि आपल्या एकंदर कार्यक्रमाकडे व एखाद्या नव्या चर्चेकडे आदल्या दिवसाइतकेच उत्साहानें वळत!-

: ९९३ :

या साऱ्या गोष्टींचा अरुणला पूर्वीपासूनच चांगला अनुभव होता. यापूर्वी अनेक वेळा लहानमोठ्या विषयांवर त्याचे अण्णांशी असले लहान मोठे वादविवादहि झाले होते - आणि अण्णाहि, दोघांच्या वयांतील अंतर आपल्या स्वाभावानुसार विसरून, न रागावता, खेळकर मनानें, त्याच्याबरोबर बोलत असत. त्यामुळेंच अरुणला इतरांप्रमाणेंच अण्णांविषयीं अतिशय स्नेहभाव वाटे.

तेव्हां, अरुणला वाटलें, 'आज बऱ्याच दिवसांनी आपण कमळामावशीकडे आलों, असे समजताच अण्णा वैद्य, येऊन जावे हे अगदीं सहाजिकच होतें!'

त्या दिवशीं संध्याकाळीं, आयुष्याच्या अगदीं जिव्हाळ्याच्या विषयावर मिरेबरोबर बोलण्यांत घालविलेल्या कांहीं चमत्कारिक क्षणांनंतर, त्याच त्याच विषयाचें चर्वितचर्वण करीत अण्णांबरोबर मोकळ्या मनानें घालावयाच्या एखाद्या वितंडवादाची त्याला जास्तच जरुरी भासत होती!-

आणि म्हणून अरुण अंगणांत - किंबहुना त्या रणांगणांत - आपण होऊन उतरला.

त्यानें जवळची खुर्ची अण्णा वैद्यांसमोर ओढली व तीवर बसत अण्णांकडे पाहून हंसत हंसतच तो

थोड्या विनोदानें, त्यांना म्हणाला, ''काय अण्णासाहेब, आतां म्हातारे झालांत तुम्ही! - तुमच्या मोरोपंतांप्रमाणेंच 'कृतांतकटकामलध्वजजरा'...वगैरे वगैरे!- पण मग अजून जगाचीं हीं वर्तमानपत्रं, वर्तमानकाळ व जगाचीं हीं कोडीं सोडविण्याचं तुम्ही कांहीं सोडीत नाहीं कीं, तीं सोडवीतहि नाहीं! अंऽ?-''

: ९९४ :

वाचतां वाचतां अरुणच्या त्या अचानक कानीं आलेल्या शब्दांनी अण्णा किंचित् दचकले. पण मग त्यांनी पटकन्, वर दृष्टि करून त्याच्याकडे पाहिलें. किंचित् स्मित करून, कंदिल दोघांच्यामध्यें ओढून ठेवीत अण्णा म्हणाले, ''अरे अरे! कोण? अरुणदादा? या या! तुमचीच वाट पहात, वाचीत बसलो होतो! मघाशीं दोनदां चौकशी करून गेलो!- हं काय?...ठीक सर्व मंडळी?- पण आतां तुम्ही काय म्हणालां? वर्तमानपत्र ना?...अहो तें कांहीं विचारूं नका अगदीं! हल्लीं अन्नपाण्याइतकीच जरुरी भासूं लागली आहे या गोष्टींची माणसाला!- खरंच पण काय हो, हें जगाच्या व्यवहाराचं कोडं तर दिवसेंदिवस मोठं गहन होत चाललं आहे, बुवा! आपलं तर डोकं शिंचं अगदीं सुन्न होऊन जातं-''

'हंऽ' त्यांनींच विषय सुरू करावा म्हणून अरुण मुद्दाम एक दीर्घ सुस्कारा टाकून थांबला -

''आतांच तुम्ही इथं येऊन बसण्यापूर्वी हें मुंबई काँग्रेसअधिवेशनाविषयीं वाचीत होतों!'' एकाच मोडक्या काडीचा आपला चष्मा डोळ्यावरून काढून हातांत घेत अण्णासाहेब म्हणाले ''काय...काय..होणार आहे तरी काय हिंदुस्थानचं...जगाचंच म्हणतों मी...तुम्ही आतां तरुण मंडळीनीं बरंच वाचन केलं असेल ना?...विचारहि केला असेल चांगला सखोल?...आणि तुम्ही तर, अरुण! सत्याग्रह केला...तुरुंग पत्करला! आम्ही आपलं काय? त्याविषयींचं हेन्री स्मिथचं वर्णन घरीं बसून वाचलें तेवढंच. मग अरुण, तुम्ही तरी आम्हांला कांहीं सांगूं शकतां का या साऱ्या धडपडींचा अर्थ? हें जगाचं कोडं सोडवायचं कसं हा मोठा डोकं खाणारा प्रश्न आहे!- नाहीं?''

: ९९५ :

शेवटीं अपेक्षेप्रमाणें अण्णा वैद्यांनी 'कोडें' या रूपानें चर्चेला तोंड फोडलें हें पाहून अरुण आपल्याशींच थोडें मिस्किलपणें हंसला व मग त्यांना म्हणाला, ''अहो, ही कांहीं लहानसहान गोष्ट नाहीं, अण्णासाहेब!...आमचे हे कसले त्याग घेऊन बसलांत?....देशाच्या स्वातंत्र्यास आवश्यक असलेल्या सामुदायिक त्यागांच्या मानाने ते तर अगदी 'दर्यामें खसखस' ठरतील!- पण तुम्ही एक मात्र गंमत पहा, अण्णा! मनुष्य तत्त्वांच्या मागं उत्साहानं खूप खूप लागतो. तरी शेवटीं ...त्याची निष्ठा अखेरपर्यंत कांहीं इतक्या अढळपणें टिकत नाही!- बिचारा मध्येच गांगरतो...हातपाय गाळतो. तरी पण आपल्या अर्धवट, अयशस्वी धडपडीनं, त्यांच्या मानानं जास्त उंची पोषाख चढवून, आपण



दुसऱ्याहून कांहींतरी...कसेतरी श्रेष्ठ असल्याचं प्रतिपादन करायला मात्र तो डगमगत नाहीं!- त्यांतच तो आपल्या मनाचा विरंगुळा तयार करतो!-''

''खरी गोष्ट! असेलहि तुम्ही म्हणतां तसं!'' अण्णा वैद्य आवेशानें हात पुढें करून म्हणाले, ''पण समाजाला काय उपयोग त्याचा, अरुण?...अहो जगायचीहि मारामार झाली आहे पहा! अर्ध्या भाकरीची देखील भ्रांति वाटूं लागली आहे प्रत्येकाला!- जागतिक आर्थिक मंदी ही अशी! प्रत्येकजण सुरक्षिततेसाठी आपल्या बँकेंतील हिशेबाचे आणे पै तपाशीत आहे. उलट हुषार डोकीं भांडवलाअभावीं सडून चाललीं आहेत!- शिक्षण वाढत आहे पण तें निरुपयोगी...बेकारीचं प्रमाण तर आजच्यापेक्षां उद्यां जास्तच! देशी धंदे खलास होत चाललेले!...हा यंत्रांचा धांगडधिंगा तर गरीब माणसांच्या पोटाला अधिकाधिक चेंगरू पहात आहे...विजेचा खोटा झगझगाट-दारुण अंधःकार घालवून टाकण्यास आज असमर्थ आहे. चैन, काय म्हणतात ती पोझिशन- यांची वाढती चटक आणि लाखो दीनदुबळे अशिक्षित, अर्धशिक्षित, अर्धपोटी! ते बिचारे असल्याच स्वत्वहीन व सत्त्वहीन निरुपयोगी सुशिक्षितांकडेच आशेनं डोळे लावून बसलेले! पण मग मला सांगा; अहो, लंगड्यापांगळ्याला काय मदत करणार? छे! छे! ही परिस्थिती सुखासुखी पालटणं शक्यच दिसत नाहीं. फारच डोकं खणायला पाहिजे. नाहीं वाटत तुम्हांला?-''

: ९९६ :

'' पण याला कारण कोण, तुम्हांला वाटतं अण्णासाहेब?'' गंमतीनें सुरवात झाली होती तरी शेवटीं अरुण आपल्या मनांतील सारी खळबळ हळूहळू बाहेर टाकूं लागला. आणि त्या हेतूनें तो अण्णांकडे गंभीरपणें पहात पुढें म्हणाला, ''आतां तुम्हीच पहा अण्णा! विसाव्या शतकांतील सुशिक्षित, सुसंस्कृत माणसंच ना तुम्ही-आम्ही? पण अजून केवळ पाशवी शक्तीवर साऱ्या प्रश्नांच्या निर्णयाच्या कामीं आमचा भर!...नवे नवे शोध होत आहेत खरे! पण त्याचा उपयोग सुखापेक्षा मानवसंहार जास्त सुलभ कसा होईल इकडेच ! बाहेरचे शांततावादी दांभिक डोलारे उंच चढले म्हणून फसूं नका...मनांत प्रत्येक राष्ट्र विचार करतें आहे, दुसऱ्याला लवकर कसं गिळतां येईल- '

क्षणभर आपल्याशींच विचार करीत अरुण थबकला.

पुन्हा तो बोलूं लागला, ''आतांच तुम्ही म्हणालां, अर्धपोटी दीनदुबळे अर्ध्या भाकरीची भ्रांत वाढत गेल्यामुळें तडफडून मरत आहेत. असं कां हो, अण्णासाहेब? सृष्टि अन्नाचा पुरवठा काय कमी करते? छे! विपुल पैदास होत आहे. मग असं कां?...पण त्या पुरवठ्याची वांटणी...हं, तीच उधळपट्टीची, विषम आणि स्वार्थी! पण मग, 'ह्या समाजव्यवस्थेंतच कांहींतरी दोष आहेत... माणसांनी सुखासाठीं निर्माण केलेलीं बंधनंच शेवटी माणसांना दुःखी करीत आहेत'...असं कांहीं जर

कुणी म्हटलं तर गेली तुम्हां लोकांच्या पायाची तिडीक मस्तकाला! कुठं नव्या समाजरचनेची उभारणी झालेली...होत असलेली दिसली, कीं तिकडे तुमची दोषैक काकदृष्टि तेवढी वळलीच म्हणून समजावं!- पण मग या चालू जमान्यांतील दोष?...निष्फळ कष्टांमुळं निघणारे केवळ रक्ताच्या घामाचे निरर्थक पूर?...पाठीला चिकटलेल्या उपाशी पोटांतील, चोचीनं प्रत्येक क्षणीं बोचणारी कावळ्यांची कावकाव? निराशेनं तडफडणाऱ्या आर्त जीवांची मरतां मरतांची पायझडणी?...तें पहा सारं, तुमच्यासमोरच प्रत्यक्ष दिसत आहे. तुमच्याच, अगदीं तुमच्याच, हल्लींच्या समाजव्यवस्थेंतील हीं करुण दृश्यें, ना अण्णा?...पण तिकडे मात्र तुम्ही डोळेझांक कराल...हो...तुमचा स्वार्थ येतो ना तिथं आडवा?...मग सांगा, असल्या तुमच्या जातभाईंच्या हातीं स्वराज्य आलं तरी तें सुराज्य होणार आहे थोडंच, अण्णासाहेब?..हें पहा, कृपा करा, जरा पायांखालपर्यंत दृष्टि टाका!...आणि...प्रथम म्हणजे,...तुमचा मोडका चष्मा आधीं बदला पाहूं!'' -

: ९९७ :

'' पण मग यावर उपाय - मात्रा काय सुचवतां तुम्ही, अरुण?-'' आपल्यावर मारलेला टोला व क्षणभर ओघानेंच आलेला मिश्र-विनोद बाजूस सारून, हंसत हंसतच अण्णासाहेबांचा पुन्हा नवा प्रश्न पुढें आला -

''हं!.. मात्रा?.. तुमच्या वैद्यकींतील कोणती आण्यादोन आण्यांची मात्रा नाहीं उपयोगी पडणार इथे यावर, अण्णा!'' अरुण थोडें खिन्नपणें हंसून एकदम पुढें म्हणाला, 'तुमच्या वेदान्तांत मात्र सांपडेल एकादी मात्रा!- कोणती म्हणून विचारणारच तुम्ही आतां! अहो..ती...आपली...पुनर्जन्म आणि नैसर्गिक विषमतेची! डोळ्यांवर कातडं ओढून अदृष्टावर सारी जबाबदारी ढकलणं, कांहीं नवं करून दाखविण्यापेक्षां खास सोपं असतं, अण्णासाहेब! पण उलट-'ही हल्लींची विषम समाजव्यवस्था उघड उघड दोषपूर्ण आहे असं पटकन् कबूल केलं -म्हणजे सारे दोष काढून टाकण्याची एक नवी जबाबदारी आणंखी आणखी नाहक आपल्या अंगावर येऊन पडते ना उगीच? आणि मग तिथं मात्र लहान मोठ्या त्यागाची जरुरी भासते व असते! पण तेंच--'हें सारं अज्ञात अगम्य...अदृष्टांतलं आहे' असं म्हटलं म्हणजे...सारंच अगदीं सहजासहजी तिथल्यातिथं संपतं-''

''खरंहि असेल कदाचित् तुम्ही म्हणतां तें पण मग काय हो अरुण, तुमच्यासारखे लोक इतका विचार करतात तर त्यांनीच एकदम पुढाकार नको का घ्यायला?'' अरुणचें मन पहावयास व वाद तसाच पुढें चालू ठेवण्यासाठीं अण्णा वैद्य म्हणाले.

''पुढाकार...पुढारी!'' किंचित् चिडूनच अरुण त्वेषाने म्हणाला, ''शब्द हल्लीं फार सवंग झाले आहेत, अण्णासाहेब! त्यांच्या आहारीं जाऊन त्या उथळ बकव्यांत कशाला सामील व्हायचं? त्यापेक्षा



साध्या संसारी मनुष्याचा निर्भेळ निरुपद्रवी स्वार्थ पुरवला. आणि अण्णासाहेब, हे एकट्यादुकट्याच्या पुढाकारानं चुटकीसरशी सुटणारे प्रश्न नव्हेत. कांहीं महाभागांना वुइकली टाइम्समधलं 'क्रॉसवर्ड पझल्' आवडतं तसंच मला वाटतं.. तुम्हांला खुर्चीवर बसून सहजासहजीं सुटणारं हे करमणुकीचं कोडं वाटतं!.. पण आमच्यासारख्या सध्यांच्या लाखों तरुण जीवांचा हा जन्ममरणाचा प्रश्न आहे, अण्णा!''

: ९९८ :

कपाळाला किंचित् आंठ्या घालूनच अण्णा अरुणचे सारे शब्द गंभीर मुद्रेनें ऐकत होते!

तेवढ्यात त्यांच्या चेहऱ्यावर एक मोठी थोरली हास्याची छटा उमटून गेली.

''कां, तुम्ही हंसता कां?...अरुण पुढे जोरानें म्हणाला, 'हं, मला ठाऊक आहे- आतां यापुढं तुम्ही मला कोणता प्रश्न विचारणार आहांत तो!...क्रांति, हो ना?...आगामी क्रान्तीविषयींच असेल! आणि माझ्याकडून तुम्हांला तें खरोखरीच पाहिजे असलं तर मी सांगतो. ती प्रत्येक राष्ट्रांत कशी ना कशी तरी उद्भवणारच, अण्णा!...या साऱ्या अर्धवट धडपडींना सगळे जर्जर प्राणी आतां कंटाळले आहेत. अगदीं ही धर्माची आणि अदृष्टाची अफू जालीम असली तुमची, तरी ती गुंगी आणायला किती दिवस लागू पडत राहणार? संवयीनं तिचा अतिरेक झाल्यामुळं तीहि आतां पचनीं पडली आहे... अगदीं चढेनाशी झाली आहे!- अहो अण्णा, पोटच भरलं नाहीं...जगण्याचीच मुष्किल झाली, म्हणजे मनुष्य मरतां मरतां हातपाय हे झाडणारच! आणि क्रान्ति म्हणजे निराळी कांहीं चीज नाहीं आणखी- आज नाइलाजानं केव्हां ना केव्हां तरी अचानक पतंगाप्रमाणं जीवनज्योतींत होरपळून मरण्यासाठीं, कसाबसा जीव धरून मनुष्य जगत आहे!...तोच उद्या खरंखुरं जगण्यासाठीं पटकन् मरायला तयार होईल एवढंच! - हीच ती क्रान्ति!-''

: ९९९ :

''असा मोठा आणिबाणीचा प्रसंग मनुष्याप्राण्यावर आजच्या घटकेला आला आहे म्हणतां, - नाहीं?...खराच!...'' अण्णा वैद्य, गंभीर चेहऱ्यानें थोडा वेळ अरुणकडे पहात म्हणाले, ''पण कशी परिस्थिति प्राप्त झाली म्हणजे मानवी जीवनाचं हें अगम्य कोडं तुम्हांला सुटलंसं वाटेल, अरुण?-''

''पण तो एकट्यादुकट्या दुबळ्या प्राण्याचा प्रश्नच नव्हे, अण्णासाहेब!-'' अरुण त्यांच्याकडे गंभीर दृष्टि फिरवून, किंचित् अंतर्मुख होत आणखी पुढें म्हणाला,''या साऱ्या अर्धवट धडपडींच्या लाटा अगदीं निरुपयोगी आहेत आतां. त्याला जागरुक घटकांच्या पिढ्यानुपिढ्या गेल्या पाहिजेत तरच मानवी प्राण्यांत सामुदायिक हिताची, सामुदायिक सुखाची जाणीव- एक प्रकारची सामान्य उपजत बुद्धीच उत्पन्न होईल- आणि मग त्या वेळीं केवळ शरीर जगवणं हीच त्या समाजाची, त्यांतील व्यक्तिगत घटकांच्या आयुष्याची एकमेव धडपड राहणार नाहीं! - त्या वेळीं...शरीरापासून उंच, लांब

अशा अज्ञात भराऱ्या हेंच मानवाला त्याचं कर्तृत्व, जीवनाचं इतिकर्तव्य वाटेल!- आणि अर्थात् त्यासाठीं...'सारं जग हें साऱ्यांचं, -सारे प्राणी, -विशेषतः मनुष्यमात्र तरी-रक्ताचे बांधव; साऱ्या सृष्टीचं उत्पन्न, साऱ्या सृष्टींतील मानवांचं ...असंच प्रत्येकाला वाटायला पाहिजे व वाटेल! केवळ जगण्यासाठीं मरेमरेतो चाललेले अविश्रांत श्रम, - व मग त्यांचे परिणाम घालविण्यासाठीं लागणारी विश्रांति अगर गुंगी,...याच गोष्टी माणसाच्या जीवनाचा हल्लींचा मंत्र!- पण तो त्या वेळीं साफ लोपेल आणि त्याहून अन्य धडपडींना, उच्च ध्येयांना मानवी उद्योग ही संज्ञा दिली जाईल!- हें महान् कार्य घडवून आणायला तुमच्या जुन्या पुराणांतले महान् अवतारी पुरुष नकोत कांहीं. साऱ्या मानवी प्राण्यांच्या मनांतील एकवटलेली जागृत सदसद्विवेकबुद्धि हीच एकटी त्याला समर्थ आहे!...

अण्णा वैद्य आपल्याकडे पाहून किंचित् थट्टेखोर हास्य करीत आहेत, हें दिसतांच थोडा उसळूनच अरुण पुढें म्हणाला, ''तुम्ही या सुखस्वप्नांना अशक्य कोटींतील समजून हंसतां अहां, नाहीं का, अण्णासाहेब?...हो खरंच! कदाचित् तीं असतीलहि अशक्य..पण या मानवी...जीवंत अशा-भावना आहेत!...त्या चांगल्या आहेत...हितकरहि आहेत!...आणि तसं पाहिलं तर भावनांमागं कोण नाहीं लागलेलं, अण्णा? तुम्ही जुनी मंडळीहि तशीच आणि आम्ही नवीन मंडळीहि तशीच. फरक फक्त ध्येयांच्या विविधतेचा अगर उच्चनीचत्वाचा!...माणसानंच आपल्याभोंवतीं घातलेल्या क्षुद्र विचारांच्या कांटेरी वईमध्यें आम्ही अडकून रहात नाहीं. राहूहि इच्छित नाहीं!...तुम्हांला ते कांटेकुटेच भयंकर तट वाटतात. पण, 'मळ्यास अमुच्या कुंपण पडणें अगदीं न अम्हां साहे!'

: १००० :

''अहो, सारं ठीक! पण हें सगळं तुम्ही तरुण मंडळी घडवून कसं आणणार आहांत-हेंच आमच्यापुढें मोठं कोडं आहे, अरुण!-'' अण्णा वैद्यांनी संवयीप्रमाणें पुन्हां एक कोडें केलें व तेवढ्यांतच माजघरांतील घड्याळाचा लांबून साडेआठाचा ठोका पडलेला ऐकून, त्या बाजूस मान वळवीत, तोंडावर हात घेऊन, त्यांनीं हळूच एक जांभई दिली. -

''त्याला मुग्ध कामगिरी करीत अप्रसिद्धपणें धडपडत आपली आयुष्येंच्या आयुष्यें संपविणाऱ्या अनेक पिढ्या उत्पन्न व्हाव्या लागतील. आपापला लहानसा कार्यभाग, घाईघाईनं-अर्धवटच का होईना-उरकून घेऊन...त्या नाहींशा व्हाव्या लागतील!-'' एक दीर्घ निश्वास टाकून अरुण खिन्न स्वरांतच म्हणाला,' 'मग पण त्याचं तुम्हांला काय, अण्णासाहेब?- या नव्या जगाची नुसती सुरवात करणं हेंहि आमच्याच पुढलं कार्य आहे!- वास्तविक तुम्ही जांभई देत म्हणत अहां, तें आम्हांलाच पडलेलं कोडं आहे! हीं आमचीच सुखस्वप्नं...त्यासाठी अनेक प्रकारें हालअपेष्टा भोगणं, हेंहि आमच्याच ललाटीं!- यापुढं असल्याच मंद पण दृढ प्रगतीवर खऱ्या विचारी माणसाची सारी भिस्त असणार!...



यासाठीं आम्हांला आमचे अनेक जीव गमवावे लागतील. निबिड व विदारक कांट्याकुट्यांतून आम्हाला नागमोडी वाट काढावी लागेल!- पण अण्णा, त्याचं तुम्हांला हो काय? - तुमची आतां झोपेची वेळ झाली. आणखी पांच मिनिटांनीं तुम्हीं आपले आपल्या उबदार मऊ गादीवर घोरत घोरत गाढ झोंपीं जाल. आणि उद्यां सकाळीं उठलांत कीं, - 'चला!...आपल्या आयुष्यांतील शेवटच्या कांहीं दिवसांपैकी एक तर बरा गेला!...आतां हा नवा आलेला कसा जाणार तें पहायचं!..' अशी तुमच्या मनाची भूमिका असणार!...तुमचं यापुढलं सारं राहिलेलं आयुष्य अगदीं सूर्याप्रमाणं ठरलेलंच आहे!.. आम्हांला तें अजून कणखर दगडांत, रक्त सांडीत सांडीत कोरायचं आहे!...नाहींतर जगणारच कसं मुळीं?-तुमच्या सुखाची कल्पना आतां अगदीं स्थिर आहे. पण आमच्या अस्थिर आयुष्याप्रमाणंच त्या कल्पनादेखील अजूनहि अस्थिरच आहेत!- तुमचं सुख आतां गांठायला व त्याप्रमाणं जगायला-तुम्हांला जरादेखील तुमचं शरीर हलवायला नको कीं कसला त्रास सोसायला नको!- तुमचं दरमहाचं पेन्शन चुकणार नाहीं...कीं सकाळ संध्याकाळच्या भाकरीची तुम्हांला भ्रांत नाहीं!...पण आम्ही!!..आमचं रक्त उसळत आहे व आमच्या साध्यासुध्या सुखासाठीं ते घळघळणार...अगदीं सगळंच्यासगळं वाहून जाणार कीं काय...अशी आम्हांला भीति वाटून आमचे चेहेरे त्या कल्पनेनं आधींच फिके पडले आहेत!-''

: १००१ :

अरुण बोलतां बोलतां विचार करीत अंतर्मुख होऊन पहात होता.

अण्णा उठण्याचीच वाट पहात होते.

इतक्यांत-अरुण त्यांच्याकडे आपले डोळे रोखून पुन्हां म्हणाला, ''तेव्हां...खरं कोडं...जगण्यामरण्याचा प्रश्न...जो आहे...तो, अण्णासाहेब, आमच्यापुढंच!- ते आक्राळविक्राळ भूत पहायची आम्हीं संवय केली आहे! करीत आहों!...पण केवळ रुळलेलं सुरक्षित आयुष्य कंठणाऱ्या अविचारी प्रवाहपतित जीवांना तर त्याची जाणीवहि नाहीं! - परवांच एक फिल्म पाहिली, अण्णा!...अगदीं कल्पना आहे नुसती; हजारों वर्षांपूर्वीचा एक जुनाट, अजस्त्र किंगकाँग वानर रानांत भटकतां भटकतां या विसाव्या शतकांतील माणसांना सांपडला...त्यांनीं त्याला लंडनला धरून आणला. त्यांची कल्पना...त्याचं केवळ प्रदर्शन करण्याची, रुपये आणे पै ची...व्यवहारी होती!- पण अगदीं अचानक, अकल्पित रीतीनं तो एका रात्रीं एकाएकीं मोकळा सुटला!..मग काय विचारतां! विसाव्या शतकाच्या मानवी संस्कृतींतील..आपापल्या खुराड्यांत झोंपलेल्या साऱ्या दुबळ्या जीवांची काय ती धडपड! प्रत्येकजण, आपला जीव वांचविण्यासाठीं सैरावैरा धांवत होता. तो आक्रोश त्या मर्मभेदक किंकाळ्या, किती भयंकर देखावा तो!- अगदीं तसंच या चाकोरींत वागणाऱ्या दुबळ्या जीवांचं

अनेक वर्षे जगलेल्या अमर तत्त्वांच्या असल्या महान्, अजस्र समूहाला मोकळा सुटून वावरतांना पाहून होणार आहे...''

अरुण पुन्हां थोडा वेळ आपल्या कपाळावर हात चोळीत तसाच शांत बसला. आणि मग समोर बसलेल्या अण्णांची चुळबुळ लक्षांत येऊन, तो खुर्चीवरुन उठत घाईघाईनें पुढें म्हणाला, 'तुमचा तर आतां तोहि प्रश्न राहिलेला नाहीं, अण्णा! तुम्हांला हें कोडं- आक्राळविक्राळ भूत-कदाचित् मधूनमधूनच दिसत असेल!- पण मग -तेंहि तुमच्या आयुष्यांत कसली क्रान्ति घडवून आणण्यासाठीं म्हणून नव्हे, तर अगदीं केवळ करमणुकीसाठीं. - हो ना हो अण्णासाहेब? - तुम्हांला उगीच माझ्या या वेळाबाहेर गेलेल्या बडबडीमुळं झोंपायला मात्र उशीर झाला आज. बोलून नाहीं दाखविणार तुम्ही म्हणा-पण मनांत माझ्यावर अगदीं रागावलां असाल!- चला तर आमचंहि जेवण तयार असेल.''

: १००२ :

अरुणबरोबर खुर्चीवरून उठतां उठतां, आपल्या नेहमींच्याच पद्धतीनें मोठ्या मोठ्यानें तोंडभर हंसून, अण्णा वैद्य त्याला म्हणाले, ''काय तुम्ही तरुण मंडळी आम्हां पिकल्या पानांची थट्टा कराल, अरुण, तेवढी थोडीच आहे!- बरं, चला! हें न उलगडणारं कोडं न सोडविलेलंच बरं!- आमच्या तर काय, गोवऱ्या केव्हांच गेल्या आहेत पुढं; - आम्ही दिवसां दोन दिवसांचे जगाचे सोबती!- आतां तुमच्या तरुण मंडळीविषयींच्या सहानुभूतीनं असं कांहीं आम्ही विचारावं-- तर उलट तुम्हांला ती आमचीं केवळ करमणुकीचीं साधनं वाटतात! - मग आतां आम्ही आमच्या या शेवटच्या दिवसांत वागावं तरी कसं, अरुण? हेहि एक मोठं कोडंच!...''

''नका, अण्णा, या नव्या कोड्यांत आणखी उतरूं नका! उगीच खोड्यांतच पडल्यासारखं होईल मागून तुम्हांला !- आधीं घड्याळाकडे पाहिलंत का? पावणेनऊ वाजूनहि वर तीस पस्तीस सेकंद झाले असतील!-'' अरुण पटकन् अण्णांना मध्येंच थांबवून मोठ्यानें हंसत म्हणाला.

अण्णा वैद्यहि, कंदिलासह फाटकांतून बाहेर पडतां पडतां अरुणकडे मागें वळून पहात, आपल्या उत्साही स्वभावाप्रमाणें मोठ्यामोठ्यानें खदाखदां हंसत होते! हातांतील कंदील त्यांनीं पुढें धरला होता, व ते लांब लांब जात होते. त्यांच्या भोंवतालचें मागून दिसणारें- अंधुकच कां होईना- प्रकाशवलय, अरुणच्या मनात त्या जुन्या जात्या पिढीविषयीं अनेक मिश्र भावना उत्पन्न करीत होतें!-

त्याच मनःस्थितींत दारांतून आंत येतां येतां, अण्णा वैद्यांच्या म्हाताऱ्या शरिरांतील आनंदी, खेळकर तरुण मन आठवून त्यांच्याविषयींच्या स्नेहाचें अरुणला भरतें आणीत होतें!--

: १००३ :

आंत जेवणाची तयारी झाली होती. पानांची पंगत मांडली होती.



मिरा मघांसारखीच भिंतीजवळच्या पाटावर बसून कमळामावशीबरोबर खुल्या दिलानें गप्पा मारीत होती.

''चला रे! जेवायला बसा.'' अरुणला आंत येतांना पाहून कमळामावशी प्रेमळ शब्दांत म्हणाली.

''आणि भाऊ ग?'' अरुणनें सभोंवार पाहून विचारलें.

''ते संध्याकाळींच केव्हां गेले आहेत स्टेशनवर!'' कमळामावशी वाढावयास सुरवात करून म्हणाली, ''जेवायला नाहींत ते;... येतील चांदण्यांतून चालत चालत हळुहळू!- पाहुण्यांसाठीं तांबड्या सालीचीं केळीं आणि इतर फळफळावळ मात्र मुद्दाम पाठवलीं आहे स्टेशनवरून गड्याबरोबर.''

भाऊंची भिडस्त वृत्ति व मुग्ध पाहुणचार याविषयीं कौतुकानें व प्रेमानें विचार करीत अरुण पाटावर बसला.

''हं, चल, मिरे!- त्या पाटावर बस पाहूं. सगळीं एकदम बसणार आतां;- उगीच वेळ कशाला करायचा?'' कमळामावशी भाताची परात चुलीजवळून उचलतांना ओणाव्याओणव्याच म्हणाली.

खेड्यांत रहाण्याऱ्याहि मावशीच्या मनाचा तो उदार सुसंस्कृत प्रेमळपणा व त्यामागील आपुलकीचा अधिकारी स्वर जाणून, मिरेनें तिच्या सौजन्यपूर्ण चेहऱ्याकडे एकदां कौतुकानें पाहिलें आणि ती अरुणच्या जवळच असलेल्या रिकाम्या पाटावर जाऊन मोकळ्या मनानें बसली.

जेवणें सुरू झालीं. समोरच्या लांब पंक्तींत मावशीचीं मोठीं मुलें बसली होतीं आणि मावशी अधून मधून एक एक पदार्थ आणून साऱ्यांना वाढीत होती.

भोंवतालचें तें सारें घरगुती वातावरण पाहून, जेवतां जेवतां, अरुणचें हृदय अगदी भरून येत होतें.

अशिक्षित खेडवळ मावशी मिरेसारख्या विधर्मी मुलीला अगदीं एकाच पंक्तींत बसवून स्वतां वाढूं तरी कशी शकते?- तिच्या मनाला ही सहिष्णुता इतक्या नैसर्गिकपणें शोभून कशी दिसते?-'

याच विचारांचा अरुणच्या मनांतला त्या वेळचा पहिला कल्लोळ होता.

: १००४ :

''मघांची ती अण्णा वैद्यांची आपल्याबरोबरची जगाचें कोडें सोडविण्याची वाचाळ बडबड व कमळामावशीची आतांची ही, सारें कांहीं प्रत्यक्ष कृतींत आणण्याची मुग्ध गडबड, किती अगदीं परस्परविरोधी!-''

त्यामुळेंच अरुणला मनांत वाटलें, - ''जगांतलीं अर्धी अधिक कोडीं या प्रत्यक्ष मार्गानंच लवकर सुटतील!- पण मग जगांतले बहुतेक व्यवहार प्रेमापेक्षां भीतीवरच जास्त चालत आले आहेत; चालले आहेत आणि म्हणूनच हीं कोडीं कांहीं सुटत नाहींत!...सहाजिकच आहे. आपणच निर्माण केलेल्या

जाळ्यांत आपण आपल्याला अडकवून घेतों आणि मग त्यांतून सुटण्याची व्यर्थ, निरर्थक धडपड करीत, आयुष्येंच्या आयुष्यें मातीमोल करतों... नाश करतों- ''

आपल्या पलीकडेच बसलेल्या मिरेकडे ओझरती दृष्टि फिरवितांनाहि तसल्याच भावभावनांमुळें अरुणला दाटून येत होतें.

: १००५ :

किती दिवसांनीं त्याला त्याची मिरा भेटली! पण आपले वैयक्तिक मोह, सुखस्वप्नें बाजूस सारून, आपल्या श्रेष्ठतर आयुष्यांत शोभणाऱ्या गांभीर्यानें तिनें उलट त्याच्याच भावनांना आळा घालण्यांत, शेवटीं यश मिळविलें होतें!...

त्यांना उच्चतर बांध घातले होते! आणि आज एका नव्या धीरगंभीर दृष्टीनें व आशापूर्ण मनानें जगाकडे पहावयास आतां अरुण समर्थ झाला होता.

या शेवटच्या विचारानें त्याला त्याच्या दुसऱ्या प्रेमळ मैत्रिणीची- जाई पैची- आठवण झाली.

ती अशी मुकाट्यानें आपल्यावर इतकें उत्कट प्रेम करीत असेल अशी त्याला आजपर्यंत जरादेखील कल्पना नव्हती. विशेषतः मिरेकडून त्याला आतां समजून आलेलें तिचें पूर्वायुष्य, तिचें दुर्दैव, त्यांतील तिचा धाष्टर्याचा त्याग जगाच्या दुष्ट प्रवृत्तींना तोंड देण्याची तिची चिकाटीची व धिटाईची धडपड-

सारेंच नवनवीन त्याला समजून आल्यामुळें, आजपर्यंतच्या अनेकविध घटनांमुळें पोळलेल्या व तावून सुलाखून निघालेल्या त्याच्या अंतःकरणाला, जाईविषयीं तिटकारा वाटण्याऐवजीं तिच्या आयुष्यांतील आशावादी चढाऊ वृत्तीचें त्याला कौतुकच वाटलें.

याच विचारमालिकेमुळें शेवटी, त्याच्या मनांत आलें, ''तिच्या भावी आशापूर्ण आयुष्याचं तिला आपणच एकमेव केन्द्र वाटतो, - हें एका अर्थी किती चांगलं आहे!''

असा मनांत विचार करतां करतां जाईचा प्रेमळ, हंसणारा, सुंदर चेहरा त्याच्यापुढें उभा राहिला व तो तिला उद्देशून मनांतच म्हणाला, ''जाई, पोरी, अगदीं घाबरूं नकोस. मी तुझ्या मनांतील आकांक्षा,- साऱ्या स्नेहाळ धडपडी, आतांपर्यंत स्वतांमध्येंच रममाण राहून दुर्लक्षिल्या!- पण यापुढं मात्र तुला मी मुळींच विसरणार नाहीं.-''

: १००६ :

प्रत्यक्ष अगर कल्पनेंतील, त्याच्या समोरील, या कमळामावशी, मिरा, जाई वगैरे मंडळींच्या अंतःकरणांतील, हा सौजन्याचा मोठा थोरला पाया त्या क्षणीं उत्टतेनें त्याला उमगून आल्यामुळें, त्यांच्या त्यागी धडपडींची त्याला पूर्णपणें जाणीव झाल्यामुळें, - मघांपेक्षां त्याला अधिकच जोरानें वाटलें - ''खरंच! यानंच जगांत हरघडी वाटणारीं, आपल्यासमोर पुन्हां पुन्हां पडणारीं हीं वेड



लावणारीं कोडीं-चुटकीसरशी सुटतील!-''

असल्या अंतमुर्ख मनःस्थितींत बराच वेळ अरुण मुकाट्यानेंच जेवीत होता! तें पाहून, शेवटचा भात वाढतां वाढतां, कमळामावशी त्याला हंसून म्हणाली, ''कायरे बाळा, असा गपगपसा जेवतो आहेस अगदीं? अण्णा वैद्यांबरोबर मोठा कडाक्याचा वाद चालला होता वाटतं तुझा मघाशीं कांहीं?''

''अं,'' एकदम भानावर येऊन किंचित् गांगरलेल्या चेहऱ्यानेंच बळेंच हंसत हंसत, मिरा व कमळामावशी यांच्याकडे पाहून अरुण म्हणाला, ''काय? अण्णा वैद्य?-हो!- जगाचीं कोडीं त्यांनीं माझ्यापुढं टाकलीं होती मघां.''

''मग काय? - सुटलीं तीं?'' जेवण संपवून पानावरून उठतां उठतां अरुणकडे थबकून खालीं पहात, आपल्या गंभीर चेहऱ्यावर क्षणभरच खेळकर हास्य आणीत मिरा म्हणाली.-

''हो, आतांच सुटली सारीं!''- अरुणहि घांस तसाच हातांत ठेवून, प्रेमानें तिच्याकडे वर पहात हंसून म्हणाला

: १००७ :

जेवणानंतर किती वेळ, मावशी, मिरा व अरुण, तेथेंच स्वयंपाकघरांत, एके ठिकाणीं पाटावर बसून, बऱ्याच दिवसांच्या सांचलेल्या गप्पा मारीत होतीं.

त्यांत साऱ्यांच्या आयुष्यांतील मधल्या अनेक वर्षांतील घटना,...अनेक निरनिराळीं पात्रं,...आपापलीं दर्शनें पुन्हां पुन्हां देऊन, त्यांना सुखवून, दुखवून, जात होतीं!-

इतक्यांत, बाहेरील फाटकाजवळच ब्रेक लावून मोटार थांबल्याचा आवाज झाल्यामुळें तिघेंहि दचकून भानावर आलीं व पटकन् उठून उभीं राहिलीं.

वाजलेल्या परिचित हॉर्नवरून कमळामावशीनें ओळखलें, स्टेशनवरील भाऊंचा स्नेही खोजाशेट- त्याचीच ती मोटार होती.

मधून मधून तो कधीं कधीं भाऊंकडे पैसे मागण्यास वगैरे येत असे. आज अशा अवेळीं कशाला आला असेल?- 'घरांत नाहींत' असें सांगण्यासाठीं मावशी उठून ओटीवर आली.

पण दार उघडून पहाते, तों फाटकांतून भाऊ, अरविंद, सुनीति, वसंत, मंजुळा आंत येत होतीं.

: १००८ :

निघून जाणाऱ्या मोटारीकडे, व आंत येणाऱ्या या आगांतुक जिव्हाळ्याच्या पाहुण्यांकडे, प्रेमभरल्या डोळ्यांनीं पहात, कमळामावशी जागच्याजागीं आश्चर्यानें खिळूनच राहिली.

'कोण आलं?'...म्हणून पहावयास तिच्या मागूनच मिरा व अरुण पुढें येतात तों त्यांनाहि ही सारी अचानक आलेली मंडळी पाहून अगदीं अचंबा वाटला.

तोच हंसतमुखानें साऱ्यांबरोबरच दारांत प्रवेश करणारा अरविंद, पायांतील चपला सोप्यांतील कोपऱ्यांत काढून ठेवीत म्हणाला, ''काय वहिनी, आमची अगदीं वाट पहात बसलां होतां कीं काय?- निदान आमचं जेवणबिवण तरी झांकून ठेविलं आहे कीं नाहीं?''-

''म्हणजे?'' कमळामावशी आपल्या अरविंदभावोजीकडे व साऱ्यांकडे भाऊंकडेहि - पहात क्षणभरच थबकली.

''अहो, तुम्ही माटुंग्याहून येण्यापूर्वी आपली कांहीं भेट झाली नाहीं आणि परवा मला भाऊंचं पत्र मिळालं!'' - नेहमींच्या अनुभवामुळें कमळावहिनीच्या प्रश्नांतील आश्चर्याच्या छटेची व त्याच्या कारणाची अंधुक कल्पना येऊन, अरविंद पुढें म्हणाला, 'गंधाच्या लग्नाची तयारी करायला हवी आहे. बायकोला घेऊन निघून ये,' हा भाऊंच्या कार्डातला पत्ता जमेस धरून होणारा सारा मजकूर. - पण बघा, काम फार होतें. नुकतींच दोन नवी कॉंट्रॅक्टं घेतलीं आहेत. तेव्हां त्या इमारतींचे प्रथम प्लॅन करायचे होते. भाऊंना पत्राचं उत्तरहि पाठवायला मला वेळ झाला नाहीं. शेवटीं जेमतेम आज संध्याकाळीपर्यंत सारं काम संपविलं. भरूच्यालाहि सांगितलं होतं - आणि आतां उद्यां इकडे येण्याची तयारी करणार होतों; - तोंच भाऊंची संध्याकाळीं एकदम तारच आली. तेव्हां म्हटलं, - निघावंच संध्याकाळच्या गाडीनं नक्की! - काय आहे कुणाला ठाऊक? - घरीं अरुण वगैरेंना सांगून सुनीतीला घेऊन यावं, म्हणून माटुंग्याला जातों - तों अरुण इकडेच तुमच्याकडे निघून आल्याचं तिथं समजलं!- वसंत आणि मंजुळाताई त्यालाच भेटायला म्हणून कल्याणहून तिथं आलीं होतीं दुपारीं! -तेव्हां मग मीच त्यांना म्हटलं, अनायासं आलांच आहांत इथपर्यंत अरुणचाहि इथं पत्ता नाहीं - तर चला दोन दिवस साऱ्या मंडळींना भेटायला आमच्याबरोबर'' -

'' -आणि मग पुढली गोष्ट म्हणजे हीं दोन जोडपीं आणि हीं दोन लहानगीं कोकरं- आमच्यासमोर आज या क्षणीं...वाट चुकून...गरीबाघरीं पायधूळ झाडीत उभी आहेत! - असंच ना भावोजी?'' मनांत उठलेल्या मिश्र भावना आंतल्या आंत दडपून,...सारी मंडळी आपल्याकडे फार दिवसांनीं अशी एकदम जमली...या घटनेमुळें आनंदून, कमळामावशी खेळकर विनोद करीत म्हणाली.

: १००९ :

''हो बाबा अरुण, वहिनींनीं बरी आठवण करून दिली.-'' अरविंद किंचित् चेष्टेखोर दृष्टीनें अरुणकडे पाहून म्हणाला, ''तो आमचा भरूच्या संध्याकाळीं विचारीत होता आज! म्हणे...तुझा मेव्हणा डबल केव्हां होणार आतां? आतां त्या म्हाताऱ्याला काय उत्तर देणार माझ्याच अधिकारांत? - म्हटलं विचारून सांगतों त्यालाच!- मग काय सांगायचं तो भेटल्यावर?''

अगदीं नकळतच, अरुणनें क्षणभर मिरेकडे वळून पाहिलें.



पण लागलीच, त्याच्या मनांत स्थिर झालेल्या नव्या विचारांमुळें, भरूच्याच्या शब्दांवरून त्याला परळच्या त्या लठ्ठ इराण्याचा मागला मिस्किल प्रश्न पुन्हां एकदां आठवला.

आणि मग आपलें भांबवलेलें मन स्थिरावून, अरुणहि थोड्या विनोदी शब्दांत अरविंदाला म्हणाला, ''तुझी कां उगाच लगीनघाई मध्यें?- आजच नको ना याचं उत्तर द्यायला त्याला?-''

मिरा अरुणच्या मनाची चलबिचल पाहून क्षणभरच मनांत रंजीस झाली. तिच्या चेहऱ्यावर विविध प्रकारच्या छटा येऊन गेल्या. - पण त्या सर्व आंतल्या आंत दडपून, शेवटीं आपलें धीरगंभीर सोज्वळ हास्य चेहऱ्यावर प्रतिबिंबित करून, ती सर्वांकडे, कांहीं झालेंच नाहीं असें भासवीत, पाहूं लागली.-

कमळामावशीच्या दृष्टींतून या दोघांचीहि चलबिचल सुटली नाहीं. आणि तिकडे सर्वांचें दुर्लक्ष व्हावें, म्हणूनच जणुं काय, तिनें वसंत, सुनीति, मंजुळा यांच्याकडे एकदां स्नेहानें पाहिलें व 'ये माझा बाबा ऽ!- असे लाडिक शब्द उच्चारीत, मंजुळेच्या हातांतील खेळकर सुहासला आपल्या हातीं घेऊन, त्याचे पटापट मुके घेत ती म्हणाली, ''चला ग पोरींनों,...आपण आपलं घरांत जाऊं या. यांच्या काय नादीं लागतं तुम्ही?-''

पण साऱ्याजणीं बरोबर आंत जातां जातां, कमळामावशीच्या मनांत भाऊंच्या मनाची आजची ती नवी सुप्त धडपडच सारखी येत होती.

आपल्याला कांहींएक न कळवितां त्यांनी हे सारे उपद्व्याप घाईघाईनें केले, याचा तिला मनांतल्या मनांत प्रथम बराच रागहि आला- कारण गंधेच्या लग्नाला अजून चांगला तीन आठवड्यांवर अवधि होता. इतक्या धांवपळीची आज तरी कांहींएक जरुरी नव्हती.

पण मग आज अचानकपणें निरनिराळ्या ठिकाणची ही सारी मंडळी, आपल्या घरीं एकाच वेळीं, एके ठिकाणी जमली आणि त्या गोड घटनेस कळत नकळत आपले भाबडे पतीच कारण झाले,...या विचारानें तिला त्यांच्या प्रेमळ मुग्ध मनाचें शेवटीं कौतुकच करावेंसें वाटलें.

: १०१० :

त्या दिवशीं सारी मंडळी कमळामावशीकडे जमल्यानंतर, पुढले दोन तीन दिवस वासुदेवरावभाऊंच्या घरांत एक नवेंच आनंदी वातावरण निर्माण झालें होतें. अरविंदसारख्या बड्या बडबड्या प्राण्यानें तर त्यांत जास्तच भर टाकली होती.

त्याच्या बोलण्यांत अनेक विषय येऊन जात होते. काल दुपारी वसंतानें बोलतां बोलतां पांडोबांच्या पहिल्या बायकोचा, तिच्या माहेरीं आठ दहा दिवसापूर्वी झालेल्या मृत्यूचा, सारा वृत्तांत सांगितला;... त्या वेळची- तेथें स्मशानयात्रेस पोहोंचण्याची धडपड...जीवंत असेपर्यंत जिच्या भावनांची त्यांनी किंवा घरांतील कोणीच कधीं कसली काळजी घेतली नव्हती, तिच्याच प्रेतावर मात्र पांडोबानें

स्वहस्तानें सौभाग्यालंकार चढविले होते व मग आंबाड्यावर शेवंतीची ताजी टवटवीत वेणी घातली होती.

अशाच प्रकारचा सारा पुढील करुण वृत्तांत वसंतानें त्या साऱ्यांना सांगितला होता, तेव्हां अरुणचे डोळे अनेक गतस्मृतींमुळें पाण्यानें भरून आले.

थेट विरोधी घटनांमुळेंच - सुधावहिनी व वसंत यांच्या विवाहित दुर्दैवी आयुष्यांतील, वसंताच्या त्यागी, प्रेमळ व कर्तव्यशील जागरुकतेचा सारा चित्रपट अरुणपुढें तेवढ्यांतच उभा राहिला!- आणि आपल्या स्नेह्याबद्दल अरुणला अभिमान व आपुलकी वाटून त्यानें मनांत म्हटलें, ''हीच ती निरपेक्षता!''

: १०११ :

त्यांतल्याच एका दुपारीं जेवण झाल्यावर अरुण व मिरा दोघेंच एके ठिकाणीं बसून कितीतरी वेळ बोलत होतीं.

जाईविषयीं मिरेनें अरुणला अगदीं सारें सारें उघड्या मनानें सांगितलें. त्याच वेळीं मिरेनें जाईच्या साऱ्या पत्रांचे भावनायुक्त हळुवार आवाजांत अरुणकडे वाचनहि केलें होतें.

थोडा वेळ दोघेंहि निःशब्द, निश्चल...तशींच विचार करीत बसलीं होतीं.

इतक्यांत, मंजुळेचा सुहास धांवत धांवत त्या दोघांजवळ येऊन उभा राहिला.

पण त्याच्या मागूनच ''थांब हं. दुपारचं थोडं झोंप म्हटलं, तर ऐकायचा नाहीं गुलाम अगदीं!'' असें लाडिकपणें म्हणत, मंजुळा तिकडे धांवत आलेली पहातांच, सुहास मोठ्यानें खिदळत, ''काका' करीत करीत एक झेंप टाकून अरुणला घट्ट बिलगला.

या त्याच्या बालिश चेष्टेनें तिघेंहि एकदम हंसलीं.

पण मग अरुण व लगबगीनें आंत शिरलेली मंजुळा मनांतल्या मनांतच एकदम चपापलीं!-

: १०१२ :

सुहासला उचलून घेऊन, ओशाळलेली मंजुळा हंसत तेथेंच उभी राहिली. त्या दोघांची तशी मुग्ध चलबिचल पाहून, मिराच शेवटीं शांतता मोडण्यासाठीं म्हणाली, ''या ना मंजुळाताई!- बसाना इथं जवळ.''

''ये ग मंजुळा!-'' अरुणहि मनांतील कल्लोळ दबकावून तिला म्हणाला, ''तुमची दोघींची ओळख झालीच आहे ना आतां चांगली? - मंजुळा, ही माझी जिवलग बालमैत्रीण...मिरा पाटील.''

''हं थांबा, अरुण!'' मिरा पुन्हां किंचित् विनोदानें म्हणाली, ''आतां मेरी होप!''

''बरं तसं कां होईना!-'' मिरेच्या शब्दांतील खोंच जाणून अरुण म्हणाला, ''आणि मेरी होप, ही माझी प्रेमळ मैत्रीण मंजुळा.''



''सौभाग्यवती मंजुळा ठाकूर-सुहासची आई!-'' मंजुळेनेंहि तेंच वातावरण कायम ठेवून किंचित् स्मित करीत म्हटलें.-

प्रत्येकाच्या डोळ्यांपुढें क्षणभर अभ्रें आलीं होतीं. - आणि त्या अभ्रांतूनच अनेक प्रसंगांचा चलत् चित्रपट वायुवेगानें सरकून पुढें जात होता.

: १०१३ :

''मिराताई-'' शेवटीं अरुणकडे व मिरेकडे पाहून मंजुळा, भावनापूर्ण मंजुळ आवाजांत म्हणाली, ''अरुणांचं हें एकाकी आयुष्य आतां आणखी किती दिवस चालणार आहे हो...? त्यांना विचारलंत का त्याविषयीं कांहीं? त्यांच्या मनांत गोंधळ उडाला असेल तर तो नाहींसा करायला जरा मदत करा ना तुम्ही!''-

''होय, मंजुळाताई'' मिरा धीरगंभीर मनानें, स्मित करीत म्हणाली, ''अरुणांनीं आतां ठरविलं आहे आपल्या लग्नाविषयीं!-''

''काय ठरवलं आहेस, बाळ अरुण? मला तरी सांग-'' भांबावून अरुण गप्प बसला होता; तेवढ्यांतच, खोलींत शिरणाऱ्या कमळामावशीनें मिरेचें शेवटचें वाक्य ऐकलें व ती हंसतच पुढें येऊन म्हणाली, ''पण हें पहा, आठवण झाली म्हणून सांगून टाकतें हं एकदां तुला? - आज उद्यां जाणार आहेस, अरुण...तो पुन्हां माझ्या घरीं येशील तेव्हां, माझी जी कोणी सून असेल ती घेऊन ये हो मात्र. नाहींतर घरांत यायला परवानगी मिळणार नाहीं.''

आपल्याला मनांतील निरनिराळे कल्लोळ विसरून, मावशीच्या त्या प्रेमळ शब्दांनीं सगळींच मोठ्यानें हंसली.-

आणि त्यानंतर किती तरी वेळ ती चौघें तेथेंच बोलत बसली होतीं.

: १०१४ :

अरुण सकाळीं कमळामावशीकडून निघतांना, अरविंद व सुनीति त्याच्याकडून पाहून, स्निग्धपणें हंसली होतीं.

कमळामावशी प्रेमळ मनानें हंसून, तो दारांतून बाहेर पडतां पडतां, त्याला पुन्हां म्हणाली होती, ''अरुण गंधाच्या लग्नाला येशील तेव्हां मी सांगितलेली गोष्ट आणायला विसरूं नकोस हं.''

वसंत गप्पच उभा होता. पण त्याच्याजवळ उभ्या असलेल्या मंजुळेनें, आपल्या कडेवरील सुहासचा चिमुकला हात हालवून, आपल्या मनांतील हृद्गत त्याच्याकरवीं, अरुणला कळवीत, त्याचा निरोप घेतला होता. त्या वेळी मंजुळेचें डोळे पाण्यानें तुडुंब भरले होते....

हे सारेच प्रसंग आठवून आज आगगाडींत अरुणला त्या साऱ्यांच्या प्रेमळपणामुळें गुदमरल्यासारखें

वाटत होतें.

: १०१५ :

आणि मिरा?...तिच्याबरोबर तो काल सोनगांवाहून मुंबईस आला होता. तिच्या प्रेमळ संगतींत काल प्रवासांत घालविलेले शेवटचे कांहीं क्षण...ते आठवून तर अरुणला वाटलें 'किती उदात्त मनाची मुलगी मिरा!'

जाधवबाबांकडे मिरेच्या तारेनेंच जाई आली होती. 'अरुणसह मी त्याच्या सींवच्या खोलीवर येत आहे' असें तिला पत्रानें जाधवांकडे कळवून, मिरेनें जाईला वरळीहून तेथें बोलाविलें होतें.

पण मग- 'संस्थेचंच कांहीं काम आहे; मी संध्याकाळपर्यंत येऊन तुम्हांला व जाईला सींवला भेटते; तुम्ही पुढं जा,' असें सांगून मिरा अरुणला आज सकाळींच एकाएकीं निरोप घेऊन आपल्या कामाला गेली.

तेव्हां कां कोणास ठाऊक, ती जरा दूर गेल्यावर अरुणला वाटलें होतें, 'मिरा आतां आपल्याला पुन्हां लवकर भेटणारच नाहीं-'

पण मग 'ते नुसते मनाचे खेळ!' असें स्वतःशींच पुटपुटून, त्यानें त्या वेळीं स्मित केलें होतें.

या व्यवस्थेप्रमाणेंच, त्या वेळीं लोकलमध्यें बसून अरुण एकटाच सींवला चालला होता. त्यामुळेंच त्याच्या मनांत विचार येत होते, ''जाई आपली दोघांचीहि वाट पहात असेल. पण आपल्याला एकटाच पाहिल्यावर तिला प्रथम थोड वाईट वाटलं, तरी इतक्या दिवसांनंतरच्या आपल्या भेटीनं ती किती आनंदित होईल! विशेषतः तिचं सारं मनोगत आपल्याला आतां पूर्णपणें समजलं आहे, या जाणिवेनं तर ती अगदीं धडधडत्या अंतःकरणानंच आपली वाट पाहील. दिसल्याबरोबर प्रथम...चौकस, शोधक, प्रेमळ दृष्टिक्षेप टाकील.-''

या शेवटच्या कल्पनेनेंच मिरेनें त्याच्याकडे त्या दिवशीं दिलेल्या, जाईनें त्याला अर्धवटच लिहिलेल्या-पत्राची पुन्हां एकदां आठवण झाली.

एक एक स्टेशन पुढें जाई तसतशी त्याची चलबिचल वाढत होती.

खिशांतील पत्र घाईघाईनें त्यानें बाहेर काढिलें.

आतांपर्यंत अनेक वेळां वाचलेलें तें पत्र, त्यानें पुन्हां पटकन् उघडलें;...आणि एकाद्या नुकत्याच आलेल्या पत्राप्रमाणें त्यानें तें अतिशय भावनाविवश अंतःकरणानें पुन्हां वाचावयास सुरवात केली -

: १०१६ :

आशानगरी, कोल्हापूर,
२८ ऑक्टोबर १९३४



प्रियतम अरुण,

इतके दिवस मनांतल्या मनांत ठेविलं. माझं हृदय अगदीं धुमसत होतं. पण आतां मुळीं राहावतच नाहीं...अगदीं सहन होत नाहीं. अरुण, मला कितीदां वाटत आलं आहे...अगदीं या क्षणींहि वाटत आहे...तुमच्यावांचून मला जगणंहि शक्य नाहीं. माझा मागचा वृत्तांत तुम्हांला कळला म्हणजे तर तुम्हांला ही जाई म्हणजे अगदीं निर्माल्यच वाटेल! पण अरुण, तुम्हांला पाहिल्यापासूनच मला पुन्हां वाटूं लागलं आहे, आपला असला नसला सारा सरता सुगंध पुन्हां एकवटावा; आणि तो तुमच्या सेवेसाठीं तुमच्या व माझ्याभोंवतीं पसरवावा.

या एकाच आशेवर माझं नवं आयुष्य मी जवळजवळ साडेतीन वर्षांपूर्वी पुन्हां सुरू केलं. अगदीं कुणालाहि नकळत मनांतल्या मनांत जगूंहि लागले.

कितीदां तरी, असल्या या वणव्याप्रमाणं अफाट पेटणाऱ्या विचारांनी माझ्या मनाच्या अगदीं चिंधड्या चिंधड्या उडविल्या आहेत. त्या जळून त्यांची राख होण्याचीहि पाळी आली आहे. अनेक वेळा माझ्या सरळ भाबड्या मनाला वाटतं, ''माझ्या आयुष्याच्या ह्या मागल्या प्रकरणावर अशीच धूळ सांचूं देऊन मला माझं नवं आयुष्य जगतां येणारच नाहीं का?''...

पण नाहीं!- अरुण, माणसाचा सारा इतिहास त्याच्या कातडीप्रमाणंच त्याला, जणुं काय, कायमचा चिकटलेलाच असतो. हे संस्कार माझ्याहि मनाची अनेक वेळां माती करताता. ते मला वारंवार बजावतात, 'तूं पतिता आहेस...तूं पतिता आहेस...तुझ्या अरुणांना तूं जरा देखील योग्य नाहींस!...'

आणि मग, अशा वेळीं...मी काय करावं हें न समजून निराशेचे नुसतें मोठमोठे सुस्कारे टाकते. माझ्या चुकल्या आयुष्याला काय, कसलं व कधीं वळण लागणार आहे?...माझं मलाच तें समजत नाहीं. अधिकाधिक विचार करूं लागलें कीं, माझ्या मनाचा अगदीं दगड होतो.

आपल्या मुग्ध सहवासांतहि माझं आशावंत हृदय, मला जगण्यापुरता तरी जीवनरस शोषून घेत होतं.- पण तेहि दिवस एकाएकी संपले, अरुण!-

आपल्या नोकरीनंतरच्या वियोगाच्या वेळीं, मी वरवर बेडरपणें तुम्हांलाच धीर देत होते. पण प्रत्येक पळाला मी स्वतः मात्र आंतल्या आंत खचत होते.

गाडींत बसून तुम्ही निघून गेल्यावर माझ्या साशंक मनाला वाटलं. ''माझे अरुण आतां मला कायमचेच दुरावले!''-

हो...या विचारमालिकेनं माझ्या डोळ्यांतून कितीतरी वेळ अश्रु ओघळले!- तशीच रस्त्यांतून फिरतांना कितीक लोक मला वेडीहि म्हणाले असतील;...पण माझ्या अंगावर अगदीं दारुण निराशेचे

शहारे उभे राहिले होते!- आणि वाटत होतं- 'आतां आपल्या या भकास एकाकी आयुष्याचं- आपण वाटेल तें करावं!- कोण आपल्याला जाब विचारणार आहे त्याचा?''

त्या वेळच्या तसल्या मनःस्थितींत त्या दिवशीं मी किती भटकले ते माझं मलाच ठाऊक.

- पण मग, - मला पुन्हां एकदां वेडी आशा वाटूं लागली!- वाटलं, 'मनांत आणलं तर अरुणच माझ्या आयुष्याच्या मातींतून आपल्या सहानुभूतिशील हळुवार व प्रेमळ हातानें कदाचित् एकादी सुंदर मूर्ति तयार करूं शकतील. ती ओबडधोबडच झाली तर ते तरी त्याला काय करणार?...मातीच तशी हिणकस!...''

आणि मग? तुम्हांला अशींच पत्रांमागून पत्रं रात्रभर वेड्यासारखी लिहीत बसावींत; आणि सकाळी उठल्यावर निराशेममुळें येणारं रडूं प्रयासानें आवरीत फाडून टाकावींत!

नोकरीनंतरच्या तुमच्या वियोगविरहाच्या माझ्या मधल्या आयुष्यांतील हा एकच एक विरंगुळा होता!-

आतां या वेळीं, तुम्हांला लिहावं तरी काय, हेंच मुळीं मला समजत नाहीं आहे, अरुण.

पण आतां अगदीं आड पडदा न ठेवतांच सांगते -

मी अगदीं अगदीं दुबळी आहे, अरुण- कां कोणास ठाऊक, मला वाटतं, माझं सारं भवितव्य अगदीं तुमच्या एकट्याच्याच हातीं आहे!- तुमच्या पायाशींच माझं स्थान आहे. या कोमेजलेल्या जाईला तेथून उचलून अगदीं उदार मनानं आपल्या हृदयाशीं धरलंत,- तर - तिचा उरला सुरला सुगंध अगदीं तुमच्यासाठींच आहे! -

नाहींतर....

: १०१७ :

शेवटच्या वाक्यावर व कागदाच्या उरल्यासुरल्या कोऱ्या कागदावर ठिबकलेले जाईचे उष्ण अश्रु, त्या लिहिलेल्या मजकुरापेक्षांहि गहन अशा - तिच्या अंतःकरणांतील अनेक अव्यक्त हळुवार भावना- अरुणच्या सहानुभूतीशील प्रेमळ मनाला, हळूच कुजबुजन सांगत होते!

माटुंगा स्टेशन फास्ट घेऊन अरुणची लोकल पुढें जातांना मोठा आवाज झाला. त्याबरोबर दचकून, भानावर येऊन, अरुणनें पत्राची घडी करून, खिशांत घातली; व तो जागेवरून उठला.

सींवला उभी रहावयास गाडी वेग मंदावू लागली, तसा तो धडधडत्या हृदयानें दाराजवळ जाऊन मधल्या बाकावर हात ठेवून उभा राहिला.

स्टेशनांत गाडी शिरली. हळुहळू उभी राहिली. तसतशी अरुणची उत्सुक शोधक दृष्टि मागें धांवणाऱ्या हालत्या प्लॅटफॉमवरून भरभर फिरूं लागलीं. -



क्षणभरच त्याला वाटलें,- ''जाई आपणां दोघांना भेटायला स्टेशनवरच आली असेल कदाचित्!- आपण दुपारीं येणार हें तिला ठाऊक होतं''-

''पण गाडी नक्की कुठं ठरली होतीं?-''

त्याच्या मनांत संशय डोकावलाच.

गाडी थांबली...तो खालीं उतरला, तोंच त्याला चमकल्यासारखें झालें पण मग तो लागलीच आनंदितहि झाला.

पुलाच्या दाराजवळ जाई उभी होती. तिचें लक्ष मात्र त्याच्याकडे नव्हतें. त्याला व मिरेला शोधण्यासाठीं, ती आपली सैरावरा फिरणारी दृष्टि, मागल्या डब्यांकडेच वळवीत होती.

तिच्या गोंधळलेल्या मनाच्या हालचालींची अरुणला लांबूनहि गंमतच वाटली.

आपली लहानगी बॅग हातांत घेऊन तो दाराकडेच हळुहळू चालत गेला.

तेवढ्यांतच जाईचेंहि लक्ष त्याच्याकडे गेलें.

लांबूनच त्याला पहातां पहातां ती अगदीं मनापासून तोंडभर मोहक हंसली. तिच्या चकाकणाऱ्या रेखीव दंतपंक्तीवरील हास्याच्या संसर्गानें अरुणहि न बोलतांच मनापासून हंसला.

: १०१८ :

मागें त्या रात्रीं ती परळजवळ अरुणला अचानक भेटली होती, त्या वेळचेंच तें काळें पातळ ती नेसली होती;- आपली लांबलचक वेणी तिनें तशीच पुढें आणून आपल्या वक्षःस्थळावर सोडली होती; - आणि शेपट्यावरच तिनें एक लहानसा सुरंगीचा दुहेरी हार अडकविला होता.

अरुण अगदीं जवळ आल्यावर, जाई पुन्हां हंसली त्या वेळीं पुन्हां तिचे रेखीव दांत किंचित् चमकले. लांबट चेहरा प्रफुल्लित दिसला - गालांना खळ्या पडल्या!- तें पाहून अरुणला अगम्य मौज वाटली.

पण तिच्याजवळ तो एकटाच जाऊन पोहोंचतांच, तीहि थोड्या आश्चर्यानें चमकली. बावरल्यामुळें गोड दिसणाऱ्या तिच्या त्या चेहऱ्याकडे अरुण पहात असतां, जाई स्वतःला पटकन् सांवरून घेत त्याला म्हणाली, ''आलांत? अगदीं चार-पांच गाड्या वाट पाहिली. अगबाई! एकटेच आलांत पण!- मग मिरा?-''

''ती नाहीं आली.'' जाईबरोबर हळुहळू पूल चढत अरुण म्हणाला, ''मागून संध्याकाळीं येईन म्हणाली आहे!-''

'' हं '' असें तुटकच म्हणून जाई पुढें चालली होती.

आपली मैत्रीण आली नाहीं म्हणून क्षणभरच जाईला वाईट वाटलें खरें;

पण मग- 'आपले अरुण अनेक दिवसांनीं, आतां असे अगदीं एकटेच आपल्याला प्रथम येऊन भेटत आहेत' या गोड विचारानें तिला शेवटीं अतिशय आनंद झाला.

: १०१९ :

त्याच पुलावरून वसंताला टाळण्यासाठीं, बाबांची शेवटची भेट घेण्यासाठीं, ...अरुण गडबडलेल्या अंत:करणानें उतरला होता- आज तोच पूल चढतां चढतां, आपल्या आयुष्यांतील त्या मागील घटना आठवून, अरुणच्या डोळ्याच्या कडा पाण्यानें क्षणभर ओल्या झाल्या. पण ती आपली मन:स्थिति जाईमुळेंच त्यानंतर पालटली; आणि आपण आतां प्रत्यक्ष तिच्याबरोबरच तो पूल चढत आहोंत - या जाणिवेमुळें, अरुणचें हृदय नव्या उत्साहानें तुडुंब भरून आलें होतें!-

चालतां चालतां, मधूनच, जाई, मुकाट्यानें त्याच्याकडे वळून पहात होती. 'अरुण येणार! अरुण येणार!' ही उत्कट उत्सुकता जवळ जवळ गेले दोन दिवस तिच्या मनाला लागली होती. पण आतां तो प्रत्यक्षच तिच्याबरोबर अगदीं एकटा चालला असतांनाहि- 'त्याच्याबरोबर काय बोलावं? त्याला काय विचारावं?' - हें तिला कांहींच समजेना.

पूल ओलांडून दोघें आग्रारोडपर्यंत आलीं; - तरीहि अरुणदेखील गोंधळल्यामुळें कांहींच बोलला नाहीं.-

तसेंच कांहीं न बोलतां, दोघेंहि गपगपच पोस्टाच्या बाजूस वळलीं; -आणि अगदी मुकाट्यानें घरापर्यंत येऊनहि पोहोंचली-

त्यांच्या त्या मौनांत...लाखों विचारांची देवाण घेवाण,...बेरीज- वजाबाकी, होत होती!-

: १०२० :

सभोंवार मोकळ आवार असलेल्या इम्प्रूव्हमेंट ट्रस्टच्या तेथील एका बैठ्या बंगल्याचा अर्धा भाग अरुणच्या ताब्यांत होता.

त्या ऐसपेस कांपाउंडांत चारहि बाजूंना मोहक रचनेनें लावलेलीं अनेक लहान मोठीं फुलझाडें व त्यावरील विविध रंगाचीं गोजिरवाणीं फुलें वाऱ्यावर डुलत होतीं... समोरील लांबच्या कोपऱ्यांत एक विस्तारलेलें आंब्यांचें मोठें कलम होतें. घराच्या दारांतील जाईचा मंडप धुळीनें थोडासा मलीन झालेला, सुकलेला होता; तरी फुलांना बहर आला होता. उमलत्या हंसऱ्या कळ्यांनी तो शोभून दिसत होता! व तेथून सुटणारा सुवास वाऱ्याबरोबर वातावरणांत लांबवर पसरला होता!-

वईजवळून जाणाऱ्या लहानशा पायवाटेनें, अरुण व जाई आंत आलीं. शिरतां शिरतां अरुणनें फाटकाजवळील पारिजातकाच्या सुकलेल्या मोठ्या झाडाकडे पाहिलें व अंगांतील कोट काढून हातांत घेत तो व्हरांड्यांत येऊन उभा राहिला.



जाई, कांहीं न बोलतांच तिच्याजवळच्या किल्लीनें कुलूप उघडण्यासाठीं दाराजवळ पुढें झाली होती.

शेजारच्या दाराला कुलूप पाहून जाईकडे पहात अरुण म्हणाला, ''आमचे शेजारी कुठं बाहेर गेले आहेत वाटतं?''

'' हं '' कडी काढून दार आंत लोटीत, मागें न वळतांच जाई म्हणाली, 'सकाळी किल्ली माझ्याकडे दिलीन् त्या बाल्यानंच आणि सांगितलंन् ती मंडळी सुटीसाठीं दहा दिवस बाहेरगांवी गेली आहेत म्हणून.-''

: १०२१ :

त्याच्या हातांतील कोट जाईनें आपल्याकडे घेतला, त्या वेळीं अरुणला एक निराळीच गंमत वाटली. तिच्या मागूनच तो आपल्या एकाकी वास्तव्याच्या त्या खोल्यांत शिरला; - आणि मग त्याला एकदम आश्चर्य वाटलें. त्याच्या दोन्ही खोल्यांचा साराच नूर एकदम आमूलाग्र पालटला होता.

बोळे बोळे होऊन कोपऱ्याकोपऱ्यांतून अस्ताव्यस्त पडलेले त्याचे सारे कपडे, ठाकठीक घड्या करून त्याच्या कॉटवर, एका बाजूस नीट रचून ठेवलेले दिसले. इकडेतिकडे उडालेलीं सिगारेटचीं थोटकें व राख आतां त्याला तेथें दिसत नव्हती. ठिकठिकाणीं बसलेला धुरळा सारा नाहींसा होऊन सगळें सामान आरशासारखें स्वच्छ दिसत होतें. त्याच्या आश्चर्याला पारावर राहिला नाहीं.

बाबांच्या आयुष्यांतील तसलाच एक प्रसंग त्याला आठवला. कमळामावशीची मूर्ति पटकन् त्याच्या डोळ्यापुढें उभी राहिली; आणि तेवढ्यांतच, कां कोणास ठाऊक, त्याच्या वडिलांची- श्रीनिवासभाईची प्रेमळ दृष्टि व गंभीर, तेजस्वी चेहरा हीं त्याच्यापुढून पटकन् सटकून गेलीं.

आपलें मन किंचित् आवरून अरुणनें तसेंच आंतल्या खोलींत डोकावून पाहिलें.-

नेहमीं अस्ताव्यस्त, गोंधळांत, उलटींसुलटीं पडून रहाणारीं त्याच्या खोलींतील भांडीं, चहासाखरेचे डबे, कपबशा, स्टोव्ह, स्पिरिटची बाटली, टांचण्या, पांच चार वापरलेले कांकडे, सारें सामान आज जागच्या जागीं अगदीं व्यवस्थित लावलेले दिसत होतें.

जणुं, त्याला वाटलें, आपल्या मन:स्थितीप्रमाणेंच आपल्या खोल्याचेंहि अंतरंग आतां आमूलाग्र पालटलें.

आणि या अलीकडील आपल्यांतील साऱ्या फरकाला कारण कोण?...

हो, ही समोर प्रत्यक्ष दिसणारी प्रेमळ निष्पाप पोरगी...जाई!- आपली जाई!

: १०२३ :

असल्या अंतर्मुख विचारांनीं अरुणच्या मनाला समाधान झालें, आनंद वाटला, त्यानें अगदीं

मुकाट्यानेंच पण प्रेमपूर्ण नेत्रांनीं जाईकडे पाहिलें.

खिडकींतून येणाऱ्या वाऱ्याच्या झोतानें तिच्या विशाल कपाळावरील रेशमी केस भुरभुरत होते. आपला पदर उजव्या हाताखालून घेऊन तिनें डाव्या बाजूस खोंविला होता व स्टोव्ह पेटवून चहा करण्यांतच ती गुंगली होती.

आतापर्यंतच्या साऱ्या एकाकी आयुष्यांतील अनेक विविध प्रसंग अरुणच्या मनांत एकाएकीं नवा कल्लोळ उडवून देऊं लागल्यामुळें तो तसाच पुढील खोलींत गेला व आपल्या कॉटवर ऐसपैसपणें आडवा झाला.

पडल्या पडल्या प्रथमच त्याच्या मनांत विचार आला, ''खरंच, या प्रेमळ पोरीभोवतीं, मिरा म्हणाली तसं, ती जिथं जाई तिथं, अशा उत्साहाचं खेळकर वातावरण अगदीं कोनांकोनांतून पसरलेलं सापडतं.''

असल्याच विचारांत गुंगून, अरुण किती तरी वेळ तसाच पडला होता. त्याला भोंवतालचें कांहींहि भान नव्हतें.

पण थोड्या वेळानें जाई एका हातात चहाचा पेला व दुसऱ्या हातांत शिऱ्याची बशी घेऊन पुढें गेली; आणि आपलें हंसरें मुख त्याच्याजवळ करून मोठ्यानें म्हणाली, ''चित्रकारांची तंद्री लागली आहे वाटतं? घ्या अरुण! घ्या ना!-''

एकदम भानावर येऊन तिच्याकडे पहातांच, तिच्या डोळ्यांत तरंगणारा अहेतुक प्रेमळपणा पाहून, चटकन् उठून बसतांना, अरुणला अगदीं अगम्य आनंद वाटला.

तिच्या हातांतून चहाचा कप व ती बशी घेतां घेतां, हंसून आस्थेनेंच अरुण तिला म्हणाला,- ''आणि तुम्हांला?''-

''आहे ना घरांत; घेते.'' जाई मोहक हंसून, आंतल्या खोलीकडे वळत म्हणाली.

''इथंच या हं बाहेर तें घेऊन!'' अरुण प्रेमळ स्वरांत म्हणाला,

जाई दुसरा चहाचा कप व शिऱ्याची बशी घेऊन बाहेर आली; आणि थोडी लाजतच अरुणसमोरच्या खुर्चीवर बसली.

त्यानंतर कितीतरी वेळ कांहींएक न बोलतांच मधून मधून एकमेकांकडे पहात तीं समोरासमोर बसलीं होतीं.

: १०२३ :

इतक्यांत पोस्टमन आला. व त्याने एक पातळसें पाकीट अरुणच्या हाती दिलें.

ते मिरेचेंच होते; आणि मजकूर अगदी त्रोटक होता.-



''मला अत्यंत निकडीच्या कामासाठीं आशानगरीला एकाएकी निघून जावं लागलं; उदार मनानं क्षमा करावी.

अरुण, जाई, माझ्या प्रेमळ मित्रांनों, तुम्हां दोघांनाहि अगदी मनापासून सुख व यश चिंतिते.

- मिरा''

अरुणचे डोळे अनेकविध भावनांमुळें पाण्यानें तुडुंब भरले होते. त्यानें काहीं एक न बोलतां तें पत्र जाईपुढें केलें.

तें वाचतां वाचतां जाईच्याहि डोळ्यांतून अश्रूंचे सर ओघळूं लागले. थोडा वेळ तीहि अगदीं गप्प राहिली.

मग पुढले कांहीं क्षण...कांहींतरी बोलण्याचा ती आटोकाट प्रयत्न करीत होती!

शेवटी कंठ दाटून आला असल्यामुळें, ती अडखळत अडखळतच अरुणला म्हणाली, ''अरुण, माझ्यासाठीं माझ्या मिरेनं काय हो केलं हें? आणि तुम्हीहि?-''

''जाई, आपली मिरा...प्रेमळ तितकीच मोठी धूर्त आहे.'' किंचित् काळ अरुण मध्येंच अगदीं थांबला. मग विचार करीत, तो गंभीरपणें पुढें म्हणाला, ''पण तुला त्यांत वाईट वाटायला नको कांहीं. तीं तुझ्यामाझ्यापेक्षां कितीतरी श्रेष्ठ दर्जाचीं माणसं!- त्यांचा हा उच्च प्रकारचा आनंद, हें मोठं समाधान, असं दुसऱ्यावर अगदीं निरपेक्ष प्रेम, उपकार करण्यांतच...सामावलेलं असतं!- आणि म्हणूनच- जाई, त्यांच्यासारख्यांच्या मोठ्या उपकारांत राहूनहि आपल्यासारख्या दुबळ्या जीवांना त्याचं मोठंसं ओझं वाटत नाहीं!''

: १०२४ :

'' पण अरुण- '' थोड्या वेळच्या शांततेनंतर जाई अरुणकडे स्नेहानें व अश्रूंनीं ओतप्रोत भरलेली आपली प्रेमळ दृष्टि लावून म्हणाली, ''मिरा किंवा मंजुळाताई...मला वाटतं, माझ्यापेक्षां दोघीहि किती किती श्रेष्ठ हो! ही जाई पै म्हणजे त्यांच्यापुढं एक अगदीं क्षुद्र धूलिकण ठरेल- ! अरुण, तुम्ही अजूनहि पाहिजे तर विचार करा. माझ्या मिरेबरोबर-''

'थांब जाई!-'' अरुणनें एकदां जाईकडे पाहिलें; तिचा हात आपल्या हाती घेतला व तिला आपल्याजवळ बसवीत तो तिला म्हणाला, ''कांहीं एक बोलूं नकोस; बैस इथं जवळ...तुझे हे सारे शब्द...त्यांमागील विचार-भावना,....आणि डोळ्यांतून ओघळणारे हे अश्रुच मला सांगत आहेत सारं!- पण प्रेमळ मुली, तूं म्हणतेस त्याच जाई पैची किंमत आज या घटकेलासुद्धां मला लाखाहूनहि अधिक वाटत असली तर?-''

थोडा वेळ दोघेंहि कांहीं बोललीं नाहीत. जाईच्या डोळ्यांत मुग्ध समाधान तरंगत होतें!-

: १०२५ :

मग अरुणच पुन्हां म्हणाला, ''जाई, एकदां मी जगांतील या साऱ्यांना कुत्सितपणें- 'उपकारी माणसें' म्हणत होतो!...पण त्यानंतर - आतां सर्व जाणीव झाल्यावर व पाहिल्यावर मला वाटतं...ही माझ्या निकटचींच...सारीं अनेक प्रकारें श्रेष्ठ ठरणारीं उपकारी माणसंच होतीं, आहेत!...मला आतां तरी वाटतं, आपणहि दोघं त्यांच्याचप्रमाणं खरीखुरीं जगांत जगणारी माणसं होऊं या! मुली, आजपर्यंत नुसती कल्पनेंतून मी चित्रं काढीत होतो. - अगदीं अलिकडे अलिकडे तेवढ्या - माझ्या भावी चित्रांत तुला मॉडेल म्हणून बसविण्याच्या कल्पना...माझ्या मनांत घोळत होत्या!- पण जाई, आतां तुला माझ्या आयुष्याच्या एकाच एका मोठ्या अफाट चित्रांत मॉडेल म्हणून खरंखुरं स्थान देऊन माझं यापुढलं आयुष्य जगावंसं मला उत्कटतेनं वाटू लागलं आहे!-''

अरुणच्या त्या शब्दांमागील ओतप्रोत भरलेल्या प्रेमाची जाणीव होऊन, जाईचें हृदय अनेक भावनांनी अगदीं तुडुंब भरून आलें होतें!- त्याच्या त्या चिरवांच्छित निकट सहवासानें तिचा धडधडणारा गौरवर्ण ऊर खालीं वर होत होता. सौजन्याच्या कायम छटा नेहमीं वागवणारा तिचा सुंदर चेहरा जास्तच आरक्त व प्रफुल्लित झाला होता!-

तो अगदीं हृदयांत कोंदटणारा आनंद व त्या क्षणींच्या विविध भावना...यामुळें शेवटीं तिला कांहीं तरी बोलावें...पुष्कळसें बोलावें....असें सारखें वाटूं लागलें!-

..आणि आपल्या तसल्या आनंदानें दाटून आलेल्या कंठातून कांहींतरी शब्द बाहेर टाकण्याची ती व्यर्थ धडपड करूं लागली.

: १०२६ :

- तोंच तिच्या खांद्यावर अतिशय स्नेहानें आपला आत ठेवून, अरुण तिला प्रेमभरल्या शब्दांत म्हणाला, ''नको ग जाई, तुझ्या असल्या मुग्ध धडपडींतूनच मी तुझ्या प्रेमानं तुडंब भरलेल्या उदात्त हृदयाच्या साऱ्या हालचाली पूर्णपणें समजूं शकतो!-''

पुन्हा थोडा वेळ तेथें अगदीं शांतता नांदत होती.

मग अरुण जाईला हळुवार शब्दांत म्हणाला, 'जाई, तुला माहीतच आहे!-

मिरा, मंजुळा, तूं,...तुम्हां तिघींच्याहि स्नेहाचं भाग्य माझ्या आतांपर्यंतच्या लहानग्या आयुष्यांत मला लाभलेलं आहे! त्या दोघींच्या प्रेमळ स्मृती मला माझ्या हृदयांतून कधीं साफ काढून टाकतां आल्या नाहींत... येणारहि नाहींत! - त्या गोफाचें पीळ थोडे तरी कायम हे राहणारच- तरी पण शेवटीं मला तूंच लाभलीस, हेंहि मी माझं मोठं भाग्यच समजतों!- जाई, जाई, माझ्याकडे आतांच्या या प्रेमळ नजरेनं तूं अशीच हंसून पाहूं लागलीस, कीं,...मला माझ्या भावी आयुष्यांतील साऱ्या उत्साहाचा खरा खळखळणारा झराच सांपडला अशी खात्री वाटते!-''

अरुण थोडा वेळ तिच्याकडे तसाच कांहीं एक बोलतां प्रेमानं पहात राहिला. व मग तिला म्हणाला, ''जाई, पोरी, तुझ्या अक्षरानं लिहिलेल्या त्या पत्रापेक्षां अश्रूंच्या भिजलेल्या बाकीच्या कोऱ्या कागदांतूनच मला तुझ्या हृदयांतील साऱ्या भावना खऱ्या स्वरुपांत वाचतां आल्या!- मग तूं मला कधीं न पाठविलेल्या त्या पत्राला, माझं उत्तर पाहिजे आहे ना तुला?...''

भेदरलेल्या प्रश्नार्थक नजरेनें जाई अरुणकडे पहात होती.

तिला आपल्या अगदीं जवळ ओढून अगदी स्नेहपूर्वक दृष्टीनें तिच्याकडे पहात अरुण तिला म्हणाला, ''जाई, गोड मुली, हेंच माझं उत्तर!...''

हर्षनिर्भर जाईनें आपले अश्रूंनी भरलेले बोलके डोळे अरुणकडे मुकाट्यानेंच वळविले व त्याच्या अगदीं निकट बिलगून अतिशय विश्वस्तपणें तिनें आपली मान त्याच्या खांद्यावर टेंकली.

समोरील जाईच्या फुलांनी भरलेल्या मंडपाकडून मधून मधून मनोहर सुगंधानें भरलेल्या व भारणाऱ्या वाऱ्याच्या झुळकी त्यांच्याकडे येत होत्या!...

अरुणला क्षणभर वाटलें...''आपल्या खांद्यावर मान टाकून...स्वस्थ व विश्वस्तपणें पडलेल्या जाईच्या प्रेमळ मनाचाच हा सुगंध वातावरणांत दूरवर दरवळत आहे!''-

: १०२७ :

फाटकाजवळील पारिजातवृक्ष आपला शेंडा हळुहळू हालवून जणुं त्यांच्या आनंदांत प्रेमानें भागीदार होत होता.

....तिकडे पहातां पहातां अरुणला एक जुनी स्मृति झाली -

थोडा वेळ तो तसाच जणूं शून्यपणें तिकडे पहात राहिला. व मग हळूच जाईचा खांदा हालवून तिची मान आपल्याकडे फिरवीत तो तिला म्हणाला, ''जाई...तो समोरचा पारिजात पाहिलास? माझ्या पूर्वीच्या भकास, एकाकी आयुष्यांतील एक जुनी संध्याकाळ मला आठवत आहे त्या क्षणीं!- माझ्याशीं जरा एकरूप होऊन माझ्याच दृष्टीनं त्याच्या तळाशीं पहा. त्या वेळीं फुलांनी तो नुसता बहरला होता. चिमुकल्या शुभ्र पाकळ्या, कोंवळे पोवळी रंगाचे देंठ आणि वाऱ्यावर पसरणारा, मनाला धुंद करणारा त्याचा मंद सुगंध!- तीं सारीं...त्याचींच...त्या एकाच झाडाचीं फुलं!...पण जरा नीट तेथली खेदकारक गंमत पहा!..त्यांच्यातील कांहीं आंत दिमाखानं पडलेलीं... तर कांही बिचारीं त्या येणाऱ्या जाणाऱ्यांच्या पाऊलवाटेवर!... आंत पडलेलीं तेवढी चांगली आणि बाहेरचीं वाईट असं होतं थोडंच?- छे! मुळींच नाहीं!- मग असं कां? केवळ अज्ञात अगम्य परिस्थिती!- पण त्यामुळं केवढा मोठा नाश झालेला दिसत होता! किती भयंकर देखावा तो! बाहेरची सुकुमार फुलं

बापडीं पायदळीं पडलेलीं!...त्यांच्या पाकळ्या, देंठ, सुगंध सारं सारं साफ नाहीसं होऊन तीं मातीमोल झालेलीं! आणि हीं दुसरीं?...तीं अगदीं नाजूकपणें बेंचलीं जात होतीं!.. त्यांचे हार गुंफिले जात होते!- प्रत्यक्ष देवाच्याहि शिरोभागीं त्यांचं स्थान होतं!-

: १०२८ :

अरुण नंतर कांहीं वेळ तसाच मुकाट्यानें विचार करीत राहिला.

आणि मग,...त्याच दिशेनें पहात, जाईला घट्ट बिलगून तो पुढें म्हणाला, ''पण जाई, आतां त्याच मनोमय दृश्याकडे तसं पहातां पहातां...माझ्या बदललेल्या दृष्टीला कांहीं न पाहिलेलं अगदीं नवीनंच कांहींतरी दिसत आहे!...तीं पाहिलीस,... कांहीं वाऱ्याच्या झुळकेनं वईच्या बाजूस आलेलीं बाहेरचीं फुलं!- त्यांतलींच ती जवळजवळ पडलेलीं दोन फुलं पहा- आतांपर्यंत पडलेल्या प्रखर किरणांनी तीं अगदीं सुकलीं आहेत...त्यांच्यांतील जीवनरस- त्यांचा सुगंध...कांहींसा कमी झाला आहे. किंचित् निस्तेजहि दिसत आहेत तीं!...पण जणुं काय...एकमेकांच्या सहवासामुळंच तीं धीरानं आपलं आयुष्य जगत आहेत!...त्यांचे सारे अवयव,..त्या सुमनांचा नैसर्गिक आल्हाददायक सुगंध सारा नसला तरी बराचसा कायम आहे. आणि त्या सैरावैरा पायदळीं पडून चुरगळलेल्या त्यांच्या इतर मातिमोल भावंडांपेक्षां तरी त्याचं आयुष्य जास्त आशापूर्ण, बरंचसं जगण्यालायक आहे खास! नाहीं वाटत तुला असं?-''

अरुणनें आतांपर्यंत परिजातकाच्या झाडाखालीं लावलेली आपली विचारी पण शून्य दृष्टि पटकन् वर केली; आणि एकदां अतिशय प्रेमानें जाईकडे पाहिलें.

जाईहि त्याच्याकडे अश्रुभरित नेत्रांनी व प्रेमपूर्ण अंतःकरणानें टक लावून पहात होती.....

दोघांची एकदम दृष्टादृष्ट झाली. दोघेंहि अगदीं मनापासून हंसली.

: १०२९ :

''साऱ्याच मानवी आयुष्याचं- आपल्याहि आयुष्याचं असंच आहे, जाई!'' अरुण पुन्हां हळुवारपणें हलक्या स्वरांत बोलूं लागला, ''गोड मुली, त्या दोन कांहींशा कोमेजलेल्या...पण वाऱ्याच्या झुळकीनं बाजूस झालेल्या फुलांचंच आयुष्य,...आपण आतां यापुढं जगूं या!...मला स्वर्गीय प्रेम म्हणजे काय तें समजत नाहीं, जाई!...पण तुझ्याविषयीं मला उत्कट प्रेम, अकृत्रिम स्नेह जिव्हाळा वाटतो!- आपल्या लहानग्या आयुष्यांत आपल्या परिस्थितीचे अनेक कटु अनुभव आले आहेत. तूं अनेक टक्केटोणपे खाल्ले आहेस! - माणसानंच निर्माण केलेल्या जगाच्या-सामान्यतः निष्प्रेम, विषम, स्वार्थी..व्यवहाराचीहि तुला झळ लागली आहे, नाहीं का? तशीच मलाहि लागली आहे!...त्या साऱ्या अगम्य परिस्थितीला धीरानं तोंड देण्याचा आपण दोघांनींहि थोडा फार प्रयत्न केला आहे!''



आपल्याकडे अतिशय स्नेहानें पहाणाऱ्या जाईकडे पहात अरुण गंभीरपणें हसला; आणि मग तो जाईचा आपल्या हातांतील हात प्रेमानें दाबीत तिला म्हणाला, ''पण यापुढंच आपल्याला पुढली खरी वाटचाल करायची आहे!...होय जाई, एकमेकांच्या निकट सहवासांत- प्रांजल, स्नेहशील, प्रेमळ, जिवलग...व्यक्तिप्रमाणं आपण वागून...आपलं व्यक्तिमत्व, आपल्या अंगांतील साऱ्या चांगल्या नैसर्गिक शक्ति एकवटून, - पूर्वीसारख्याच ध्येयपूर्ण पण प्रत्यक्ष भराऱ्या आतां मारूं या! - आणि हेंच आपलं वैवाहिक जीवन!...आशा व उत्साह यांच्या जोरावर आपली आयुष्यं...कांहींना ना कांहीं प्रमाणांत तरी सामाजिकदृष्ट्या फलदायी करण्याची उमेद बाळगूं या!- हें आपलं कदाचित् अगदीं लहान केंद्र असेल, त्याच्या कक्षेंत आपला उघडा स्वार्थ असला तरी चालेल! -

पण त्याच सुखासाठीं, ध्येयशील आयुष्यासाठीं आपण आतां हपापूं या!- आपल्याला आतां समजूं लागलं आहे, जाई- एकटेपणा यापुढं आपणां दोघांनाहि असह्य होईल!-''

बाबा, भाई, जाधवबाबा, कमळामावशी, मिरा, मंजुळा, सीतामाई, रमणिकभाई...सारीं सारीं माणसें, आपापल्या प्रेमळ दृष्टीनें, त्यांच्याकडे व जाईकडे पहात, - भोवती स्नेहानें वावरत आहेत - असाच क्षणभर अरुणला भास झाला. - अरुणनें बोलणें मध्येंच थांबविलें.

त्यानें जाईकडे दृष्टि वळवली; तीहि त्या वेळीं त्याच्याचकडे पहात होती. तिच्या दृष्टींत अकृत्रिम प्रेम होतें. मोहकता होती. अरुणविषयींचा जिव्हाळा, आत्मीयता होती. तिच्या पाणीदार डोळ्यांतून त्या क्षणीं ती अनुभवीत असलेल्या आनंदी घटनेमुळेंच आनंदाश्रूंची सर येत होती!-

तिनें अरुणचा हात आपल्या हातीं घेऊन तो हळुवार प्रेमानें दाबला व त्याच्या खांद्यावर पूर्ण विश्वासानें पुन्हां आपली मान टेकून शांतपणें विसांवा घेतला.

मग थोड्या वेळानें तिनें हळूच आपली मान वर उचलली आणि आपल्याकडे प्रेमानें पहाणाऱ्या अरुणकडे आपली दृष्टि वळवली. आनंदानें कोंदटलेल्या हृदयानें ती म्हणाली...''हो, माझ्या आयुष्यांत आज अरुणोदय झाला...हृदयांत त्याचें तेज मावतच नाही आतां! त्या प्रकाशांत...समजूत,... सहानुभूति...तडजोड...असे सरळ सरळ येऊन भिडणारे अनेक प्रकाशकिरण सांपडतील कुणालाहि....''

✻ समाप्त ✻